म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें.
विषय बा.वा.
दा. क्र. ६९९९

IRBK-0106999
IRBK-0106999

# मराठी कथा

३०,०३५
अनुक्रम
वा.वा.
२२०५
3-8-79

११५१

वा. क्र. ६९९९
वा.वा.

IRBK-0106999
IRBK-0106999

संयोजक : अरविंद गोखले

कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणें

मराठी कथा : १९५९

— — —

प्रथमावृत्ति : १ मार्च १९६१
किंमत : साडेतीन रुपये
मुखपृष्ठ : शि. द. फडणीस

— — —

प्रकाशक : अ. अं. कुलकर्णी,
कॉंटिनेंटल प्रकाशन,
टिळक रोड, पुणें २

— — —

मुद्रक : रा. ना. सरनाईक,
सुलभ मुद्रणालय,
२९१ शनवार पेठ, पुणें २

मराठी साहित्यांत सध्यां कथेचें युग सुरू आहे असें अनेकदां म्हटलें जातें. हरिभाऊंच्या काळांत अंकुरलेली कथा आतां चांगलीच बहरली दरवळली आहे. फडके-खांडेकरांनीं लघुकथेंत आणलेली कुसर, नंतरच्या नवकथाकारांनीं बदललेला कथेचा मोहरा, आज लिहूं लागलेल्या लेखकांनीं सुरू ठेवलेले प्रयोग—या सर्वांमुळें कथावाङ्मय समृद्ध झालेलें आहे. कथा साहित्यावर विसंबून नवीं मासिकें निघत आहेत व दिवाळी अंकांनीं शंभरी ओलांडली आहे. दरमहा एक तरी कथासंग्रह प्रसिद्ध होत असतो, कथा स्पर्धा कुठें ना कुठें सुरू असतात, मराठी कथा भारतीय व पाश्चात्य भाषांतून अवतरतांना आढळते. जाणकार असेंहि म्हणतात कीं उत्कृष्ट मराठी कथा जागतिक कथावाङ्मयाशीं पैजा जिंकेल.

ह्या नाण्याला दुसरी बाजूहि आहे. मराठी कथा परपुष्ट आहे अशी टीका होत असतें. नवकथेबद्दलची नाराजी टीकाकारांच्या व रसिकांच्या मनांतून पुरती गेलेली नाहीं. आज प्रसिद्ध होणाऱ्या कथेबद्दल चिंता व्यक्त केली जात आहे. आत्यंतिक दुर्बोधतेंतून प्रच्छन्न अश्लीलतेकडे कथावाङ्मय झुकत आहे असें म्हटलें जातें. आणि चांगल्या कथेऐवजीं कथेवरच्या भ्रष्ट टीकेचे तण वाङ्मयांत वाढत आहेच.

मतामतांच्या ह्या गलक्यांत मराठी कथेची प्रवृत्ति समजावी, प्रकृति तपासावी, म्हणून कांहीं तुरळक यत्न चालू आहेतच. एक वर्षाच्या कालावधींत प्रसिद्ध झालेल्या कथामधून निवडक दहा उत्कृष्ट कथा वेचून त्या रसिकांच्यापुढें ठेवणें व त्यायोगें आजचें कथालेखन कोणतीं वेगळीं वळणें घेत आहे, किती उंचावर झेपावत आहे, ह्याचा अंदाज घेणें हा असाच एक प्रयत्न.

वर्षभरांत प्रसिद्ध झालेल्या उत्कृष्ट कथांचा संग्रह प्रकाशित करणें ही कांहीं नवीन कल्पना नाहीं. जॉन कोनोंज व सिबील नॉर्टन या संपादक-द्वयांनीं १९४७ सालच्या जगांतील उत्कृष्ट कथांचा संग्रह प्रथम प्रसिद्ध केला. त्या अगोदरपासून इंग्लंड-अमेरिकेंत त्या त्या देशांतील थोर कथांचीं पुस्तकें संपादित केलीं जात आहेत. अमेरिकेंत तर एकेका वर्षीं असें दोन तीन संग्रह वेगवेगळ्या संपादकांनी प्रसिद्ध केलेले आढळतात. 'ओ हेन्री प्राईझ स्टोरीज'चे संग्रह विलक्षण लोकप्रिय झालेले आहेत. ओब्रायन व बुर्नेट हे संपादक असे वार्षिक संग्रह आज पंचेचाळीस वर्षे अमेरिकेंत प्रसिद्ध करीत आहेत. एका छोट्या कालखंडांतल्या उत्कृष्ट प्रणयकथा, रहस्यकथा वगैरे विषयांवरील संग्रहहि अमेरिकेपासून ऑस्ट्रियापर्यंत अनेक देशांतून प्रसिद्ध होत असतात.

'आवडत्या गोष्टी', 'कथावैभव' वगैरे निवडक कथांचे संग्रह मराठींत प्रसिद्ध झालेले असले तरी एका वर्षांतील वेचक कथांचा संग्रह, माझ्या समजुतीप्रमाणें, हा पहिलाच आहे. असा संग्रह शक्य तों एखाद्या संघटनेतर्फे निघावा अगर एखाद्या चांगल्या मासिकाचा खास अंक म्हणून काढला जावा अशी प्रथम कल्पना होती. पण असें प्रकाशन काढण्यांत अनेक अडचणी होत्या. गेल्या वर्षीच्या कथांची निवड होऊनहि पुस्तक प्रसिद्ध करणें जमूं शकलें नाहीं. आतां 'कॉंटिनेंटल प्रकाशन'चे रा. अनंतराव कुलकर्णी ह्यांनीं प्रकाशनाची जबाबदारी पत्करल्यामुळें, इतक्या उशीरानें का होईना, पण १९५९ च्या कथांचें पुस्तक प्रसिद्ध होत आहे. ह्याचबरोबर १९६० सालच्या कथांचा संग्रहहि निघत आहे आणि ह्या पुढील वार्षिक संग्रह वेळच्या वेळीं प्रकाशित होण्याची व्यवस्था होत आहे.

ह्या संग्रहांतील कथा निवडतांना मला अनेक स्नेह्यांची मदत झाली आहे. त्या सर्वांचा मी आभारी आहें. कथांच्या निवडीची जबाबदारी अर्थात् माझी आहे. प्रकाशनाच्या सोयीसाठीं दहा कथांची मर्यादा घालणें आवश्यक

होते; त्यामुळें कांहीं चांगल्या कथा बाजूला ठेवणें भाग होते. कांहीं थोर कथा दृष्टीआड झाल्या असणें अशक्य नाहीं. तसेंच कांहीं कथा आवर्जून निवडल्या असूनहि व्यावहारिक अडचणीमुळें पुस्तकांत त्या दाखल होऊं शकल्या नाहींत. निवडलेल्या कथांचे बाबतींत मतभेद उद्भवणें संभवनीय आहे. एकोणीसशे एकूणसाठ सालीं प्रसिद्ध झालेल्या शेंकडों कथांमधून ह्या उचललेल्या दहा कथांच्या संग्रहांत मराठी कथा प्रकारांतील प्रयोग व पीळ-दोन्ही दिसतात आणि आजच्या कथेनें किती भरारी मारली आहे हें समजतें—एवढें जरी रसिकांना वाटलें तरी माझ्या व प्रकाशकांच्या श्रमांचें सार्थक होईल.

१९५९ सालच्या निवडक कथांचा हा गुच्छ, सर्वश्रेष्ठ कथाकार अन्तोन चेकोव्ह याच्या कथावाङ्मयास वाहिला आहे.

**अरविंद गोखले**

| | | |
|---|---|---|
| कुलकर्णी, जी. ए. | १ | माणूस नांवाचा बेटा |
| गोखले, अरविंद | ४२ | बाबी |
| जोशी, श्री. ज. | ५३ | नानूमामा |
| देशपांडे, पु. ल. | ७५ | अंतू बरवा |
| पटवर्धन, वसुंधरा | ८९ | जती |
| पाटील, शंकर | ११३ | सय |
| मिरासदार, द. मा. | १२४ | विरंगुळा |
| मोकाशी, दि. बा. | १४१ | आता आमोद सुनासि आले |
| रेगे, सदानंद | १६० | चंद्र सावली कोरतो |
| शेळके, उद्धव ज. | १७० | आटापिटा |

मराठी कथा : १९५९

अनुक्रम ३००३५
विभाग का. वा.
क्रमांक १८०
नों. दि. ३-२-६१

# माणूस नांवाचा बेटा

कुलकर्णी जी. ए.

दत्तू जोशीनें पांचच मिनिटांपूर्वीं घड्याळाकडे पाहिलें होतें हें खरें, तरी त्यानें अस्वस्थपणें पुन्हां तिकडे पाहिलें. हा शेवटचा तास सुटायला अद्याप तब्बल दहा मिनिटें आहेत, हें पाहून त्याचें मन मरगळलें. तें अधीरपणें उभें राहिलें, व वेळ काढण्यासाठीं अंग खाजवूं लागलें. खडू उचलण्यासाठीं तो बाजूला सरला, आणि अखेर त्या मुंग्यांच्या रांगेवर त्याचा पाय पडलाच. पीरियड सुरू झाल्यापासून काळजी घेऊन शेवटीं व्हायचें तें झालेंच. तोंडांत एकेक अंडें धरून जाणाऱ्या वारेमुंग्यांची एक रांगच आज वर्गांत प्रकट झाली होती. दरवाजांतून टेबलाजवळून भिंतीकडेनें जात मागें कपाटाजवळच्या फटींतून बाहेर. दत्तूनें खालीं वांकून पाहिलें. वीतभर जागा चिरडलेल्या मुंग्या व अंडीं यांनीं भरली होती. मुंग्यांच्या वेड्या घाईत थोडा खंड पडला. रांग तुटली. पुष्कळशा मुंग्या भोंवतीं जमल्या. चिरडलेल्या मुंग्या त्यांनीं तोंडांत उचलल्या. तेवढी जागा बाजूला टाकून रांग सांधली गेली. पुन्हां तोच घाईघाईचा अनिवार्य प्रवास सुरू झाला. एक मुंगी, एक अंडें. काळा ठिपका, पांढरा ठिपका, काळा, पांढरा...

शेणानें सारवलेली, पण न लोटलेली, पोपडे निघालेली जमीन. समोर पानपट्टी-सिगारेटचीं दुकानें, व त्यांत नेहमीं चकाट्या पिटीत बसलेलीं कोल्हापुरी माणसें. त्या शाळेला एखाद्या गोडाउनची बकाल कळा होती. लोखंडी दुकानांत जुन्या लोखंडाचा ढीग टाकतात, तसें वाटे तिच्याकडे

पाहून. पण हेडमास्तर मात्र तिच्याविषयीं बोलतांना नवी पिढी, राष्ट्राचें भवितव्य, शिक्षणं परमो धर्मः इत्यादि बोलत, सगळ्यांपुढें पातळ कणके-प्रमाणें हसत, व नंतर दहावी-अकरावीमधल्या पोरांना शिकवणीला येण्या-बद्दल दमदाटी करीत. तेथील बहुतेक सगळेच मास्तर शिकवणीलक्ष्मीधरच होते म्हणा. घाटे-परुळेकरहि घ्यावें, आणि शिकवण्याहि कराव्यात !

समोर कळकट, किंवा जादा आगाऊ चेहऱ्याचीं पोरें. दत्तू त्या वर्गाला भूगोल शिकवीत असे. पण त्या तासाला जातांना बर्मिंगहॅम कुठें आहे हें आधीं बघून जात असे. मग जणूं काय इंग्लंडचा कानाकोपरा पायाखालीं घातल्याप्रमाणें निर्लज्ज खात्रीनें पोरांना तें गांव दाखवायला सांगत असे. ‘ मी सर, मी सर ’—कांहीं पोरें चीत्कारत पुढें येऊन कान खाजवीत, घामट अंगाचे भपकारे टाकीत नकाशाजवळ येऊन उभीं राहत. पहिल्या बांकावरील कंटाळलेल्या चेहऱ्याच्या मुली वेण्या पुढें आणीत, रिबनी कुरवाळीत. रस्त्यावरील मोटारींची मिनिटामिनिटाला अर्धा शेर धूळ आंत शिरत असे आणि सतत नासकें फळ खात राहिल्याप्रमाणें दत्तूचें मन शिसारत असे.

स्वतः शाळेंत असतां इंजिनियर होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारा दत्तू, कुणा गणागणपांचीं पोरें, शालिनी मानेचे चितळत असलेल्या हिऱ्याप्रमाणें डोळे, बर्मिंगहॅमचे कारखाने, भिंतीवर मध्येंच चुकचुकणारी पाल, आणि वर्गांत मागून घेतलेल्या भूगोलाच्या पुस्तकांतील मोराचें पीस— या साऱ्यांत काय दुवा आहे कुणास ठाऊक, पण त्या चार भिंतीच्या बादलींत त्यांचा एक ढिगारा जमला होता खरा. ती समोरची अशक्त, फिकट ( आणि हातावर केस किती ! ) आणि मांजरपाटी चेहऱ्याची, इयररिंग्ज सतत हालविणारी शांता दीक्षित. अक्षर अतिशय घाणेरडें व तिला इंग्रजी विषयांत कधीं चार-पांचपेक्षां जास्त मार्क पडले नाहींत. पण सिनेमांतील गाणीं ओल्या वेलीसारख्या आवाजानें ती म्हणायची. तिच्याकडे पाहतांच दत्तू अस्वस्थ झाला. फार. त्याच्या मनांत एक पोकळी निर्माण झाली. तिची थोरली बहीण सुलभा पांच-सहा वर्षांपूर्वीं त्याच शाळेंतून मॅट्रिक झाली. रिझल्टनंतर तिनें एका रंगीबेरंगी हातरुमालांतून पेढे आणून सगळ्यांना वांटले. पेढे दत्तूला सर्वांत शेवटीं,

पण त्या हातरुमालासह. लालभडक, उडत्या पदराचें पातळ नेसून तिनें आंत डौलदार पाऊल टाकलें कीं, सारी शाळा जागी होत असे, तिच्याच सारखी रंगीत वाटे. दोन महिन्यांपूर्वी त्या सुलभेनें आत्महत्या केली. कां कुणास ठाऊक. लोक नाना गोष्टी सांगत. जीवनाचा थेंब न् थेंब उचलण्याच्या उत्साहानें भरलेल्या त्या रसरशीत मुलीनें तेंच जीवन कां फेकून दिलें असेल ? अगदीं शेवटच्या क्षणीं तिच्या मनांत कोणत्या भावनांचा वणवा पेटला असेल ? तिचें राहूं दे, सध्यां दोन्ही तळव्यांवर हनुवटी टेकून व्यग्र स्वप्नाळू बसलेल्या या शांताच्या मनांत तरी या क्षणीं काय चाललें आहे ? इतर पोरांच्या मनांत ? कुणास ठाऊक. सारेच जण आपल्या मनाच्या कोठडींतील कैदी. वरवर तीं पोरें बर्मिंगहॅमचें नांव ऐकतात, आपण तें नांव बडबडतों, आणि चुकचुकणारी पाल ऐकत मनांत एकटेच भटकत राहतों...सुमन मुजुमदारच्या केसांत निशिगंधाची वेणी आहे. कित्येकदां मधूनच मंद गंध येतो. किती तरी वर्षांपूर्वी दत्तू कॉलेजमध्यें शिकवीत असतां रेखानें देखील त्याला संक्रान्तीला हलवा व मूठभर निशिगंधाचींच फुलें दिलीं होतीं, व हळूच खालच्या मानेनें विचारलें होतें, " मी तुमच्या आयुष्यांत येऊं शकेन का ? " दत्तूनें कॉलेजमध्यें एक वर्ष तत्त्वज्ञान शिकवलें होतें. नंतर बहीण आजारी म्हणून तो परत आला — व राहिला. प्लेटोच्या चिरंतन ' वर्ल्ड ऑफ् आयडिआज् 'शीं त्याचा परिचय होता. त्यानें क्रोचे, काण्ट, रसेल यांचे ग्रंथ वाचले होते. आयुष्याच्या जिन्यावर रेखेचीं निशिगंधी पावलें ऐकलीं होतीं. शेवटीं तें सारें ओघळून गेलें आणि आलें काय वांट्याला ? तर हीं घामट पोरें, बर्मिंगहॅम, चुकचुकणारी पाल, जत्रेंत तात्पुरत्या थाटलेल्या दुकानाप्रमाणें चारचौघांसारखा सरळ सफळ संसार.

अद्यापहि घंटा झाली नाहीं म्हणतांच दत्तू उगाचच चिडला. समोरील पोरांकडे पाहून संताप आला. त्या प्रत्येकाच्या हातावर, आपला हात दुखेपर्यंत ओलसर वेतानें छड्या माराव्यात असें त्याला वाटलें ! सारीं एकजात इब्लीस डॅंबीस कार्टीं ! तें कोपऱ्यांतील गोबरेल्या चेहऱ्याचें दिवटें कारटें– दिवेकर ! कुठलीहि मिरवणूक, फंड, संप, असो आगाऊपणा करीत उगाच धडपडत असे; ज्याचें शुद्धलेखनहि कधीं त्याला बापजन्मीं जमणार

नाहीं. अशा घोषणा बोंबलत हिंडत असे. हीं कारटीं पुढें मोठीं होणार, आपल्याचसारखीं पोरें जगावर सोडणार, मग त्यांना दरडोई एक मत मिळणार, आणि त्या आधारावर हा जनताजनार्दन ‘ आम्हांला समजेल असं वाङ्मय द्या हो ! आम्हांला कळेल असं संगीत द्या हो ! ’ असें ओरडत हिंडणार. हरामखोर लेकाचे ! त्यांपैकीं बहुतेकांना चेहऱ्यावरील काळ्या टिकल्यांप्रमाणें नखानें टचाटचा चिरडून टाकलें पाहिजे.

अखेर एकदा घंटा झाली. दत्तूला शाळेचें सुतक संपल्यासारखें वाटलें व जरा बरें वाटलें. आणखी एक सही रजिस्टरवर पडली आणि एक दिवस निकालांत निघाला. तसें पाहिलें तर आजचा दिवस खराबच गेला. कोणत्याच पोरानें फी आणून दिली नाहीं, त्यामुळें खिशांत द्रव्य नाहीं. आज दहावीच्या वर्गाला मराठीच्या तासाला बालकवींची ‘ औदुंबर ’ कविता शिकवायची होती, व दत्तूनें त्यासाठीं सकाळपासून तयारी केली होती. जुन्या आवडत्या कविता पुन्हां वाचून काढल्या होत्या. एकच धडकी, एकच अंतिम बोल त्यानें पुन्हां ऐकला. शून्य मनाच्या घुमटांत पारवा घुमला. जीवाला दुखवून मायेचा हिरवा रावा दूर उडाला. खालीं पाण्याचा डोह आहे, त्यावर तलम नाजुक वस्त्र पसरल्याप्रमाणें गोड काळिमा आहे. इथवर चित्र कसें छान आहे, खडी काढलेल्या नायलॉनप्रमाणें. पण नंतर अंग थरारतें. फुलें तुडवीत तुडवीत भान न राहतां खूप पुढें जावें व वळतांच विशाल शिखरांच्या पार्श्वभूमीवर शुभ्र दाढीचा भव्य योगी तपश्चर्येंत मग्न असलेला दिसावा, त्याप्रमाणें मन दबतें, पावलें थांबतात, व मनावर झर्रदिशीं कांटा चमकून जातो. त्या डोहांत, पालथ्या घातलेल्या आभाळाखालीं, पाय सोडून औदुंबर बसला आहे ! भव्य, गंभीर, विचारमग्न ! आजूबाजूला पांखरें, कीटक उडतात – मरतात. ऐलपैल तटांवरील हिरवाळी खाऊन पोसलेलीं गुरें, मेंढ्या चार घरांच्या गांवांत कापलीं जातात. डोहांत मासे सळसळतात, एकमेकांवर जगतात. पण हें सारें स्वीकारून पचवून औदुंबर मग्न बसला आहे. महाबोधि वृक्षालाच बुद्धाचें ज्ञान झाल्याप्रमाणें तो शांत आहे... हें सारें सांगत असतां राम सुंठणकर, शामा रेगे, नानू जाधव यांना तरी तें आवडेल, फार आवडेल. खरें म्हणजे साऱ्या वर्गांत शिकवण्याजोग्या याच तीन

व्यक्ति. बाकी सारे काडेचिराइत...फक्त देशाचे आधारस्तंभ. कोणत्याहि सत्याग्रहाचें फुकटें वैरण. एकदम भारताचें वैभव, व शिल्पकार. गांव, प्रांत वगैरे चिल्लर गोष्टी त्यांच्या खिजगणतींत नाहींत. त्यांचा सारा हिशेब देशाच्या मापावर ! मोठीं ऐपतदार कार्टीं. फक्त आज मात्र तीं कांखा खाजवतात. बिनाका गीतमाला निष्ठेनें ऐकतात, आणि परीक्षेंत दादाभाई नौरोजी ही महात्मा गांधींची पत्नी, म्हणून लिहितात इतकेंच.

पण हें सारें राहूनच गेलें. पूर्वीं कलाल कीं दलाल असलेला, पंधरा लाखांची मालमत्ता करून त्यागी जीवन काढणारा एक महान पुढारी मेला. दत्तूला तर तो अद्याप जिवंत होता हेंच माहीत नव्हतें. मराठीचा तास गेला, त्या तासाला हेडमास्तरांनीं दुखवट्याची सभा घेतली. जगांतील साऱ्या सद्‌गुणांच्या पाकळ्या उधळल्या गेल्या. नंतर दोन मिनिटें स्तब्ध राहून सगळ्यांनीं आपल्या दाटून आलेल्या भावना दाखवाव्यात असें ठरलें. दोन मिनिटें निव्वळ गप्प उभें राहणेंहि किती कठीण आहे याची दत्तूला कल्पना आली. त्याची सारखी चुळबूळ सुरू झाली. त्यानें अस्वस्थपणें आजूबाजूला पाहिलें. सगळ्याच चेहऱ्यांवर ती अस्वस्थता होती. त्याचा हात हळूच सिगारेटच्या खिशाकडे गेला, त्याला गरम चहाची आठवण झाली, उकाडा वाढूं लागला. पण मध्यें खालीं मान घालून उभ्या असलेल्या हेडमास्तरांस कांहींच हालचाल दिसेना. असाच थोडा वेळ गेला तर खुद्द त्यांचीच दुखवट्याची सभा घ्यावी लागणार अशी त्याला भीति वाटली. पण तसें कांहीं घडलें नाहीं. प्रथम त्यांच्या वहाणा हलल्या. तेथून सजीवता पसरत वर चेहऱ्यावर आली, व त्यांनीं मान हलवली. सगळे एकदम बाहेर आले. तेथें तंबाखू चघळीत निरुपद्रवी बसलेल्या गड्याला त्यांनीं गरम गरम चहाची ऑर्डर देऊन पिटाळलें.

अशा रीतीनें शब्दांनीं सजवून ठेवलेल्या तासाचा खुर्दा झाला. त्यानंतर आठवड्याच्या परीक्षेचे पेपर वेळेवर दिले नाहींत म्हणून खुळ्या कोंबडीचा चेहरा असलेला सुपरवायझर इंगळे उगाचच गुरगुरला. आपला चेहरा जणूं उकिरडा आहे व तो त्यावर टचाटचा टोंच मारत आहे अशा तऱ्हेनें दहा मिनिटें तो बोलत होता. अरे जा रे जा भुकडबालाजी ! साधा थर्ड क्लास बी. ए. आणि तोहि इकॉनॉमिक्ससारख्या किराणाभुसारी विषयाचा !

सासरा गव्हर्निंग बॉडीवर आहे म्हणून नोकरी तर मिळाली, आणि ऐट काय आणतो तर सी. डी. देशमुखांची ! उद्यांच्या उद्यां तुझे पेपर आणून तुझ्या बोडक्यांत असे आदळतो कीं दांतच खुळखुळले पाहिजेत. वास्तविक दत्तूनें आपल्या धाकट्या भावाला ते पेपर तपासून ठेवायला कालच सांगितलें होतें. पण तो गेला मॅटिनीला, आणि त्याच्या या बेजबाबदार वागणुकीनें सुपरवायझर आपल्यावर तुटून पडला.

" ह्यः ह्यः ! " लाचार हसून दत्तू म्हणाला, " हो हो, उद्यां नक्की आणून देतों. बरं कांहीं चहा घेतां ? हो, विचारायला विसरलों तुमचा खोकला कसा आहे ? ही हवा असली चमत्कारिकच हो. "

पण कांहीं का होईना, असे आंचके खात दिवस तरी संपला. दत्तू कॉमन रूममध्यें आला. त्यानें पुस्तकें, डस्टर वगैरे कपाटांत फेकून दिलें, व समाधानानें खिशांतून चार मिनार सिगरेट काढली. दत्तूनें सुरुवात केली होती ती काकांच्या खिशांतून पिवळा हत्ती घेऊन. पण एकदां चार मिनार घेतल्यावर तिच्यांतील कैफ दुसऱ्या कशांतच येणार नाहीं. राग, निराशा, विषण्णता या कोणत्याहि वेळीं चालणारी एकच सिगरेट म्हणजे, बस्स, चार मिनार ! चांगलें जेवण झाल्यानंतर ( जेवण म्हणजे अर्थात् कोंबडीचें. नाहीं तर बाकीचें जेवण काय, आहे आपलें यज्ञकर्म ! ) प्लेअर्सला एक भावोत्कट गंध असतो. मन स्वप्नाळू होतें. पण सुपरवायझर उगाचच मिशा फरफरूं लागला कीं जेहत्ते तेथें त्याचें काम नाहीं. तेथें चार मिनारच पाहिजे. एखाद्या वडारणीच्या आडदांड आलिंगनाप्रमाणें रासवट उग्र दर्पानें निदान सारें मन ब्रश मारल्याप्रमाणें होतें. साऱ्या विषयावर निगरगट्टपणें वापरतां येणारी चार मिनार हें सिगरेटमधील सुनीत आहे !

पण कुठें तीन-चार झुरके घेतो न घेतो तों तो अगदीं पाण्यांत घातलेल्या देशी कापडाप्रमाणें आकसला. एकंदरीनें आजचा सारा दिवसच असा जायचा होता. कारण शाळेचे तीन लाइफमेंबर एका मागोमाग आंत आले. कुठल्याहि विषयावर रीतसर मीटिंग घ्यायची त्यांची तयारी असे. ' पुस्तकांच्या कपाटांतील झुरळें मारावींत कीं नाहीं ' यावर त्यांची मीटिंग दोन तास चाले. घुत्त चेहऱ्याचा, आतांच केस पांढरे झालेला मदलूर तर शाळेला झालेल्या गुल्मासारखा होता. त्याला कांहींहि आवडीनिवडी नाहींत,

खासगी जीवन नाहीं. सदोदित तो छपराचीं कौलें मोजीत शाळेंत पडलेला असतो, व इतरांनीहि आपणासारखेंच वागावें अशी त्याची अपेक्षा असते. त्यानंतर सी. राजगोपालाचारी व टकल्या मानेचें गिधाड यांच्या संयोगांतून निर्माण झाल्याप्रमाणें दिसणारा कट्टी मास्तर, व काळा कुळकुळीत, ज्याला पोरें शाळिग्राम म्हणत, ते सोलापुरे गुरुजी (मास्तरबिस्तर सारें बाटगें. एकदम गुरुजी. दोन रुपयाला घरीं येऊन सारे विषय शिकवणारा गुरुजी !) ही सारी मंडळी इतक्या गंभीरपणें आंत आली कीं, एखाद्याला वाटावें कीं ते खांद्यावरील प्रेत बाहेर ठेवून आंत कांहीं तरी न्यायला आले आहेत. सदा गंभीर, जबाबदारीच्या ओझ्यानें वांकलेली ही मंडळी त्यांचे कपडे-देखील तसेच जळके, सुरकुतलेले ! जणूं आपल्या संस्कृतींत नीटनेटकेपणा कुठें बसतच नाहीं. कोणत्याहि कार्याची सुरुवात करायची ती स्वच्छ चेहऱ्यांनीं, कपड्यांनीं नाहींच. मग सिनेमा नटी व थोर कार्यकर्ता यांत फरक तो काय ? आपल्या कपड्यांनीं लोकांच्या पोटांत ढवळून आलें पाहिजे, वाढलेली दाढी दुसऱ्याच्या नाका-कानांत शिरली पाहिजे. तर तें खरें समाजकार्य !

आज मीटिंग आहे, तिला आपण हजर राहायला पाहिजे हें आतां कुठें दत्तूच्या ध्यानांत आलें. संध्याकाळीं कुठें तरी दीड दोन तास निवान्तपणें घालवण्याचें त्याचें स्वप्न जागच्या जागीं ठार झालें. कांहीं तरी निमित्त शोधण्यासाठीं त्यानें मेंदूला पराण्या टोचायला सुरुवात केली. आपली मावसबहीण मेलनें पुण्यास जाणार आहे...पण ही सबब फार वेळां वापरली गेली होती. त्याच्या सांगण्याप्रमाणें दर खेपेला एक मावसबहीण पुण्याला गेली असती, तर एव्हांना पुण्याची निम्मी वस्ती त्यांचीच झाली असती. आतां फ्लूहि संपला होता. शेवटीं त्यानें आपल्या सासूबाईचे डोळे तपासून आणण्याचें ठरवलें.

" बरं का जोशी, " किंचित् खांकरत मदलूर म्हणाले, पण इतरांना विचारल्याखेरीज ते स्वतः कोणताच निर्णय घेत नसत. त्यांनीं कट्टींकडे पाहिलें. कट्टींनीं सोलापुरेकडे पाहतांच त्यांनीं होकारार्थी मान हलवली. मग कट्टींनीं मदलूरचा कटाक्ष डॉज बॉलप्रमाणें परत केला, व मदलूरना आत्मविश्वास आला.

"बरं का जोशी, गॅदरिंगसाठीं आम्ही मीटिंग बोलावली होती. पण कांहीं कारणामुळें ती पुढें ढकलली आहे..."

एक अवघड कार्य तडीस नेल्याचें समाधान त्या तिघांच्याहि चेहऱ्यावर होतें. त्यांचा चेहरा जर इतका ओल्या मडक्यासारखा नसता तर दत्तूनें त्यांना कुरवाळायला देखील कमी केलें नसतें. ललल करत त्याच्याबरोबर वॉल्झची एक गिरकीदेखील घेतली असती.

दत्तू ताबडतोब शाळेंतून निसटला. बाहेर आकाश पिवळ्या काजूप्रमाणें दिसत होतें. घरें, सतत हालचाल करीत चालणारी गर्दी, माडीच्या खिडक्याचीं तावदानें, हीं सारीं पिवळ्या फिल्टरमधून पहिल्यासारखीं दिसत होतीं. त्या पिवळसर तरल वातावरणांत पांच-दहा मिनिटें चालल्यावर दत्तूच्या मनावर एका आकर्षक अलिप्ततेची छाया पडली. जणूं कांहीं त्यानें आपले लागेबांधे गुंडाळून कोपऱ्यांत ठेवून टाकले. हें सारे काय आहे? रस्त्यानें तेलाचीं पिपें घेऊन एक बैलगाडी जात होती. एका बैलाचीं हाडें कातड्यावर स्पष्ट टचटचीत दिसत होतीं, व मानेवर लालसर मांस दाखवणारें आवाळूं होतें. गाडीवाल्यानें पाठीच्या कण्यावर खटदिशीं चाबकाची काठी मारली, कीं बैल सारें अंग धनुष्याप्रमाणें वांकवी, हाडांचा भाता पिंजारे, व जूं जास्तच त्या ओलसर मांसांत रुतत असे. रस्त्याच्या कडेला विलायती चिंचांचे चार ढीग मांडून बसलेली म्हातारी, गळ्याभोंवतीं टेप टाकून कात्रीचा आवाज करीत कापड कापणारा शिंपी, हातावर पातळाचा पोत पाहत असतांनाच पायाच्या अंगठ्यानें पिंढरी खाजवणारी कापडदुकानांतील तरुणी, नवीन फ्रेम घातलेला फोटो हातांत घेऊन रस्त्यांतच पाहत उभा असलेला माणूस, गाडीखालीं झोंपलेलें कुत्रें, एका परसांत कुंपणाला उमललेलीं द्राक्षाळाचीं लाल फुलें, देवळाच्या कोंपऱ्यांत एकटीच बसलेली लाल नेसलेली विधवा स्त्री, गटारांतून वहाणारा पाण्याचा काळा पाट, आणि साऱ्यावर विशाल वस्त्राप्रमाणें दिसणारा पिवळसर गुजरी प्रकाश– काय आहे सारें हें? आणि हें पाहत असलेला दत्तू तरी कोण? त्याचा कोट आंखूड आहे, त्याच्या खिशांत दोन-चार आणेहि नसतील. त्याचें मन आंबलें आहे. तो हें सारें पाहतो. तो हें पाहत आहे हें कुणी तरी पाहत आहे, आणि तो हें पाहत आहे हें कुणी पाहतें, हें पाहणारें कुणी...

पण ही भावना फार वेळ टिकलीच नाहीं. वाऱ्यानें दूर गेलेलें ओलसर वस्त्र पुन्हां येऊन अंगाला चिकटल्याप्रमाणें सारें जीवन त्याला चिकटलें. त्या गुंतावळ्यांत तो सांपडला. त्याला प्रथम आठवण झाली ती चहाची. त्यानें चहासाठीं गड्याला पाठवलें होतें हें खरें, पण त्या मदलूरपासून सुटण्यासाठीं तो धांवत सुटला होता. पण चहाची कळ विरली नव्हती. नकळत खिसा चांचपीत तो बाजूच्या हॉटेलमध्यें शिरला. आंत शिरत असतांनाच कुणी तरी त्याच्या पाठीवर थाप मारली, व चोरी करीत असतां पकडल्या-प्रमाणें तो उगाचच वरमला, आणि त्यानें बाजूला पाहिलें. फोडाफोडाच्या तोंडाचा, बोटभर दाढी वाढलेला नाईक तोडांत एकेक शेंगदाणा टाकीत त्याच्याकडे पाहत होता. त्यानें खिशांत हात घालून फक्काभर दाणे दत्तूपुढें केले व तो ते घेणार कीं नाहीं याची वाट न पाहतां पुन्हां खिशांत ठेवून दिले.

" काय जोशीबुवा, आज रमी नाहीं वाटतं ? " त्यानें विचारलें. शब्दाबरोबर शेंगदाण्याचा वास बाहेर पडला.

" कुठली रमी नि काय ! काल आमचं झालं ना चर्र ! " गळ्यावरून बोट फिरवीत दत्तू म्हणाला, " अहो, काय सालीं पानं आलीं. बदाम राजाजवळ किलवर राणी, तर चौकट अठ्ठयाजवळ इस्पिक दुरी ! यांत काय सिक्वेन्स होणार कप्पाळ ! साडेचार रुपये गेले काल घस्सकन्. तेव्हां म्हटलं, बाई रमी ! हीच तूं सोठचिठ्ठी समज.'' दत्तू हंसला, " बरं कांहीं चहा घेणार ? "

उदासपणें नाईकनें मान हलवली, व बाजूला उभ्या असलेल्या आपल्या अल्सेशियन कुत्र्याकडे पाहिलें. जवळजवळ तीन फूट उंच असलेला धिप्पाड पण अशक्त कुत्रा त्यांचें बोलणें लक्ष देऊन ऐकत असल्याप्रमाणें उभा होता.

" आतां प्रकृति कशी काय आहे ? " दत्तूनें विचारलें. गेले कित्येक महिने नाईकचा सासरा आजारी होता. नाईक आपल्या सासऱ्याचा किती मिंधा आहे हें दत्तूला माहीत होतें. त्याच्यामुळें त्याला नोकरी मिळाली होती, रहायला घर होतें. सासऱ्यानें घालायला शर्ट घेतला कीं बटनें लावायला लाचारीनें नाईक पुढें होत असे. किंग हा नाईकाचा अल्सेशियन, व नाईक सासऱ्याचा ! पण बिचारा चांगल्या स्वभावाचा. सर्वांना शेंगदाणे

द्यायचा, फुकट सिगरेट वांटायचा, गाढवासारखें खेळून पैसे देऊन जायचा. क्लबमध्यें रोख पैसे देणारे लोक फार थोडेच होते.

"प्रकृति होय? कांहीं विशेष सुधारणा नाहीं हो." चिंबलेल्या आवाजांत तो म्हणाला, "दररोज दवाखान्यांत न्यावं लागतं, पोटांतील पाणी काढावं लागतं. टिकेलसं वाटत नाहीं."

दत्तु दचकला. त्यानें आश्चर्यानें विचारलें, "पाणी काढावं लागतं? पण तुम्ही तर म्हणत होता कीं सासऱ्याला ब्लडप्रेशर आहे म्हणून!"

"सासरे गेले खड्डयांत!" तो वैतागानें म्हणाला, "मी माझ्या किंगविषयीं बोलत होतों. मटन घातलं, फिश दिले, सारं करून झालं. आतां तो येतो, माझ्याबरोबर हिंडतो-फिरतो. पण महिना-दीड महिन्यांत खलास होणार. जोशीबुवा, तुला आश्चर्य वाटेल. लहानपणीं आमच्या घरीं एक वेडसर मोलकरीण होती. तिच्यानंतर मला जवळ करणारा हा किंगच—"

त्यानें सुस्कारा सोडून किंगकडे पाहिलें. जणूं आतांच त्या उमद्या, भव्य कुत्र्यावरून कातडेंमांस गळून फक्त सांगाडा उभा होता! आपली पहिली मुलगी भारती तीन वर्षें घरदार नाचली. नंतर तिचे निळसर डोळे, मऊ केस, नितळ, एवढींशीं पावलें नाहींशीं झालीं. किंग, भारती, खड्डयांत जाणारा सासरा, उघड्या पडलेल्या छातीचे दादा, लाल पातळाची सुलभा – सगळाच एक सांगाड्यांचा प्रचंड घोळका आहे सगळेच जण शेवटीं सांगाड्याचे पोस्टडेटेड चेक्स्.

नाईकला सोडून दत्तू आंत शिरला. साऱ्या स्पेशल खोल्या भरल्या होत्या. म्हणून तो बाहेरच एका टेबलावर बसला. त्याच टेबलावर दाढी वाढलेला एक माणूस ब्रेडचे कचाकचा लचके तोडून उसळींत बुचक् बुडवून खात होता. ठिकठिकाणीं मचामचा हलत असलेलीं निरनिराळ्या आकारांचीं तोंडें होतीं. बावळट, अधाशी, कंटाळवाणी, उंदरासारखीं, उंटासारखीं, हजार ठिकाणीं चेपलेल्या कचरापेट्यांसारखीं; पोरें मध्येंच हातांत प्लेटी घेऊन त्यामधून सळक सरकल्याप्रमाणें हिंडत, वेदनेप्रमाणें ओरडत. तीं पांचपन्नास तोंडें बकाबका खात असतां, त्या किडक्या, वेड्या-वांकड्या पिवळसर दातांच्या मचमचगिरणीनें दत्तूची भूक पार मेली. मानवता, मानवता म्हणून आपलें प्रेम ज्या वेळीं ऊतूं जात असतें त्या वेळीं

बहुधा आपण प्लॅटफॉर्मवर किंवा टेबलाजवळ असतों. शंभर माणसें कांहीं तरी खात असतां त्यांच्याकडे पाहा किंवा एका दुपारीं थर्ड क्लासमधून घामट मांसाच्या ढिगाबरोबर दोन तास प्रवास करा. ऊतू जात असलेलें प्रेम एकदम पोट उमळून बाहेर येतें. या सगळ्यांवर एका झटक्यांत बंधूप्रमाणें प्रेम करायचें ? सारे आपले बंधू ? कंबर खाजवीत, तोंडांत चिवडा भरीत असलेला तो कोपऱ्यांतील माणूस ? स्पेशल खोलींत जेवतांना भात मळून बोटांच्या फटींतून बाहेर काढणारा, कोंपरापर्यंत हात राड करून अन्नाचे गोळे धपाधपा तोंडांत टाकणारा काळा माणूसहि ? छट् ! दत्तूनें मान हलवली. हें कांहीं आपल्याला जमणार नाहीं. काय साम्य आहे असल्यांत आणि आपल्यांत ? निव्वळ ऐंद्रिय आवडींतहि सारखेपणा नाहीं. एकाच्या उग्र अत्तरानें डोकें भणभणतें, एकाची लालभडक आमटी पाहून घेरी येते. एकजण थुलथुलीत ढिसाळ बाई पाहून विरघळतो तर दुसऱ्याला तिच्यामुळें वैराग्य वाटतें ! एकाच पित्याचीं लेंकरें. Bah ! आणि बुद्धिवंतांचें तें बिनहाडामांसाचें भूतपोर विश्वमानव– त्याला तर आपल्याकडून एक नया पैसाहि मिळणार नाहीं. सॉमरसेट, चर्चिल, अर्नेस्ट अहमदअल्ली, ओंकार-प्रसाद नारायणस्वामी, चँग-फू-चुंग, हीं माणसें आपणाला आवडतील, न आवडतील. पण या रक्तमांसरहित विश्वमानवावर प्रेम काय करायचें डोंबल ! मग लेको, त्याप्रमाणें विश्वस्त्रीशीं संभोग करा ! छप्पन्न इंच ऐसपैस पन्ह्याचा हा विश्वप्रेमाचा तागा कांखोटीस मारून देशादेशांत लंगोट्या वांटीत हिंडणें हें कांहीं आपल्याला जमणार नाहीं. त्याबद्दल पुन्हां विचारच नको, अशा अर्थानें पुन्हां दत्तूनें मान हलवली.

आंत उकाडा विलक्षण होता. आपण लाह्या फुलवायच्या गाडग्यांत बसलों आहों, असें दत्तूला वाटूं लागलें. आतां आपण बर्फाळ प्रदेशांत असायला हवें होतें. टिंग टिंग घंटा वाजवीत जाणाऱ्या गाडींतलें संगीत हवें होतें. बर्फावरून स्लेज घसरत जात आहे. आपल्या हातीं कुणाचा तरी हात आहे. ( सुधेचा कीं रेखेचा ? ) व रेनडियरच्या गळ्यांतील घंटा टिंग टिंग वाजत आहेत. जिंगल् बेल्स, जिंगल बेल्स, जिंगल ऑल द वे... आणि मग हळूहळू गोठलेल्या गडद काळ्या आकाशावर एकेक चांदणीचा कशिदा उमटत जातो.

२००३५
वा. वा.
१८७
३-४-६१

पण या चित्रानें कांहीं उकाडा कमी झाला नाहीं. दत्तू उठला व काउंटरजवळ आला. त्या वेळीं त्याच्या हालचालींत विशिष्ट धूर्तपणा आला. त्यानें मुद्दाम बाजूला ठेवलेला आणा बाहेर काढला व ऐटींत टेबलावर टाकला. पायरी उतरून जातांना त्यानें हळूच मागें पाहिलें. काउंटरवरील माणसानें आणा गल्ल्यांत फेकल्यावर त्याला हायसें वाटलें. कारण तो आणा साफ खोटा होता. पानपट्टीवाला, परीट, भाजीवाली यांच्याकडून तो ताबडतोब परत आला होता आणि आतां त्यानें मोठ्या शिताफीनें उडप्याच्या गल्ल्यांत तो खपवला होता. त्याला थोडा आनंदहि झाला, कारण कुणा एकाला तरी त्यानें हातोहात फसवलें होतें ! पंधरा दिवसांपूर्वीं सुधेसाठीं वारभर कापड घेतलें. "रंग ना साहेब ! त्याची काळजीच सोडा. रंग जरा हलला कीं कापड परत घेऊन या. आम्हांला असं फसवून कसं चालेल ? धंदा आहे. पुन्हां गिऱ्हाईक यायला पाहिजे." पहिल्याच धुण्यांत डोणभर पाणी शाईसारखें झालें; व कापड मांजराच्या कातड्यासारखें ! तें कापड दाखवतांच दुकानदारानें खांदे उडवले. "आम्हांला जसा माल येतो, तसा विकतों," तो पुटपुटला व त्यानें 'एक वारवालें गिऱ्हाईक गेलें मसणांत' असा चेहरा केला. नंतर काल फर्स्ट क्लास म्हणून त्या बाईनें दिलेलें कलिंगड अनिमिया झालेलें निघालें. कुठलें तरी पदक मिळालेला महान् राष्ट्रीय चित्रपट भिकार शेंबडा ठरला. एक तासापूर्वीं आणलेला बल्ब लावतांच फट्‌दिशीं खलास झाला. आठ दिवसांत भारतीचा ताप उतरेल म्हणून स्कूटरवरून ऐटींत आलेल्या डॉक्टरनें सांगितलें. नंतर पंधरा दिवस भारतीनें डोळे उघडले नाहींत. खेळायला म्हणून दिलेलें आठ आण्यांचें नाणें तसेंच मुठींत ठेवून ती गेली. दत्तूनें तिच्या वाळल्या चेहऱ्यावरून हात फिरवला, डॉक्टरांचें बिल दिलें, आणि भारतीच्या खेळण्याची पिशवी वर अडकवून टाकली. सारीकडे फसवणूक, फसणारा एकटा. जत्रेंत स्टॉल्स निरनिराळे, फसणारं गिऱ्हाईक एकच.

छान जिरली उडप्याची ! —त्याला वाटलें.

पण त्याचें भित्रें कोंबडीमन उगाचच उडूं लागलें, संस्कारांची पिंजर फुगवूं लागलें. कांहीं लाज नाहीं वाटत ? कपभर चहा पितोस, आणि खोटा आणा

देतोस ? होय. देतों खोटा आणा ! त्या उडप्यानें तरी चांगला चहा दिला आहे कशावरुन ? काल वापरलेलीच भुकटी त्यानें वापरली असेल. मग काय चुकलं त्याला बुडवण्यांत ? बुडवणार, हज्जारदां बुडवणार.

दत्तू स्वतःशींच हंसला, व आपण आपलीदेखील कशी झक केली असें त्याला वाटलें.

आज काय होतें कुणास ठाऊक, पण त्या रामेश्वर रस्त्यावर सर्वत्र रोषणाई होती. कुणाची जयंतीमयंती, कसला तरी उद्घाटन-समारंभ इमारतीवर विजेच्या दिव्यांच्या माळा पेटल्या होत्या, व हिरव्या निळ्या रंगांचे ठिपके टिपटिपत होते. मूठभर चुरमुऱ्यांसाठीं माणसांची झुंबड उठली होती. दुसरा एक घोळका बावळट, सामुदायिक चेहऱ्यानें, रबरी मान ताणताणून वर पाहत होता. काय पाहत राहातात हीं माणसें ? ड्रमवर दणादणा काठी आपटून हवेच्या चिंध्या उडवणारा बँडवाला पाहून, प्रचंड आवाज करीत फुटणाऱ्या फटाकड्या पाहून त्यांची कोणती भावना तृप्त होते ? तसें पाहिलें तर त्या दिव्यांच्या माळांतहि फारसें आकर्षक कांहीं नव्हतें ! मग निव्वळ आवाजाचें आकर्षण कां बरें इतकें ? बारशाला ताशांच्या आवाजांत यायचें व टिमकीचा आवाज घेऊन जायचें, हें आपलें आयुष्य आहे म्हणून ?

तो त्या घोळक्यांत शिरला व एकदम धक्काबुक्कींत पडला. कुणी तरी त्याचीं बोटें नाल मारलेल्या वहाणांखालीं सावकाश संपूर्णपणें चिरडलीं. त्याचा चष्मा नाकावरून घसरला. समोरचीं माणसें, दिवे, दुकानें पुसल्यासारखीं झालीं, व फक्त खूप आवाजांच्या स्पंजांत उभारल्यासारखें त्याला वाटूं लागलें. सारें आयुष्यच चष्म्याच्या काडीच्या आधारें लोंबूं लागलें. त्यानें धडपडत चष्मा पुन्हां बसवला. या गर्दींत आपला निभाव लागणार नाहीं हें त्यानें ओळखलें. समोर कुणाचा तरी अनामिक जाडजूड पंजा होता. त्यावर त्यानें चिडून सिगरेटचें थोटूक चिरडलें, व तो मागें वळला. डाव्या हाताकडील बोळानें गेल्यास मुख्य रस्त्याला जातां येत होतें.

पण कोपरा वळून येतो न येतो तोंच तो थबकला. तेथल्या दोन-चार बंद दुकानांच्या कट्टयावर अगदीं कोंपऱ्यांत एक बाई बसली होती. मध्यम वर्गातील, स्वच्छ कपड्यांची. वास्तविक तो कट्टा चांगला अर्धा फर्लांग तरी

असेल, पण ती बाई, दिव्याचा थोडाहि प्रत्यक्ष प्रकाश आंगावर पडला तरी अंग भाजेल, अशी अगदीं अंग चोरून बसली होती, व तिचा चेहरा चुरगळल्यासारखा दिसत होता. पण त्याचें मन चरकलें तें तिच्याबरोबर असलेल्या छोट्या मुलीकडे पाहून. तीदेखील आपल्या आईला अगदीं चिकटून बसली होती, आणि तिच्या मांडीवर डोकें ठेवून शांतपणें समोरच्या प्रकाशाकडे, लोकांच्या गर्दीकडे पाहत होती. इथें कांहीं तरी चुकत आहे, अशी एकदम दत्तूची भावना झाली. समोर इतर लोक मोहरीच्या दाण्याप्रमाणें घोळले जात आहेत, मग याच दोघी शापित असल्याप्रमाणें त्या वर्तुळाबाहेर कां ? जिथें मोठीं माणसें लहान मुलाप्रमाणें वागत आहेत, खिदळत आहेत, तिथें ही छोटी अशी गप्प गोठल्यासारखी कां ? काय त्यांच्या मनांत जळत आहे ? कसला आघात झाला आहे त्यांच्यावर ? दूर सिनेमाची जाहिरात वाजली कीं जेवण सोडून भारती धाडधाड जिना उतरत असे, व रस्त्यावर धिंगाणा घालीत असे. आणि ही मुलगी अशी अर्धांग मनाची ? आयुष्याच्या सुरुवातीलाच ? मागच्या दिव्यांच्या प्रकाशांत अंधारवडावर बसलेले दोन पक्षी. कां ? काय ? कसें ?

तो बेचैन झाला. फारच. त्या बाईच्या चेहऱ्यांत व आपल्या बहिणीच्या चेहऱ्यांत थोडें साम्य आहे हें ध्यानांत येतांच तर तो व्याकुळ झाला. सरळ घरीं जावें, व दिवा न लावतांच अशा स्वस्थ अंथरुणावर पडून रहावें असें त्याला वाटूं लागलें. सोन्याच्या अत्यंत नाजुक सांखळीला जपावें तसें त्यानें तिला जपलें होतें. थोडें कर्ज काढून तिचें लग्न एका ओव्हरसिअरशीं करून दिलें होतें. पण त्या घरीं दत्तू जर कधीं गेला तर दूध घालायला येणाऱ्या गवळ्यापेक्षां कधीं जास्त किंमत त्याला त्या मंडळींकडून मिळाली नाहीं. त्याची बहीण सारखी राबत असे. पांच-दहा माणसांचा डोळा चुकवून कधीं तरी त्याला चहाचा एखादा जादा कप देत असे. एकदां टी-सेटमधील किटली फुटली, म्हणून तिच्या नवऱ्यानें दत्तूसमोर लाथ मारली. बहिणीनें त्याला बाहेर जायला सांगितलें म्हणून बरें. नंतर तासभर त्याचे हात संतापानें थरथरत होते. तिला मूल होईना म्हणून अखेर त्या मंडळींनीं तिला दत्तूकडे पाठवून दिलें. तिला मुलांची इतकी आवड कीं, आटवल भरवण्यासाठीं भारतीला तिच्या अंगावरून ओरबडूनच काढावें लागे. ती

वर्षा-दीड वर्षांतच वारली. जवळजवळ हृद्रोगानेंच. शेवटीं तिनें दत्तूच्या चेहऱ्यावरून हात फिरविला. मुद्दाम बोलावून आणलेल्या नवऱ्यालाहि—त्या नवऱ्यालाहि—तिनें अशक्त हातांनीं नमस्कार केला होता. कुणाच्याहि आयुष्याला नंदादीपाप्रमाणें उजळूं शकली असती, ती बहीण अशीच स्वतःच्या अंधारांत वठून गेली होती. त्या आठवणीनें दत्तूच्या डोळ्यांच्या कडा उष्ण ओल्या झाल्या, व तो उगाचच, वेड्यासारखा लगबगीनें चालूं लागला.

थोड्या वेळाने तो रस्त्याला आला, व त्या नेहमींच्या गर्दींत त्याला स्वतःपासून सुरक्षित वाटलें. चौकांत तो नेहमीं जेथें पुस्तकें घेत असे तो बुकस्टॉल होता. सहज जातां जातां त्यानें शोकेसमध्यें 'पेटन प्लेस' हें पुस्तक आहे कीं नाहीं पाहिलें. होय, तें अद्याप तिथेंच होतें. तें त्याला फार दिवसापांसून विकत घ्यायचें होतें. पण पूर्वींचे दहा रुपये दिल्याखेरीज पुन्हां उधारी मिळेल कीं नाहीं याची त्याला शंका होती. त्या पुस्तकाचा विचार करीत असतांनाच त्यानें कपाळावर हात मारला, व सुटकेचा मार्ग कुठें आहे कीं काय हें तो हताशपणें पाहूं लागला. पण आतां फार उशीर झाला होता. तिनें त्याला आधींच पाहिलें होतें. खांद्याला अडकवलेली पिशवी हिंदकळत वसंतकुमारी साठे मांसाच्या हप्त्याहप्त्यानें दुकानांतून खालीं उतरली.

"वा, छान, बरी भेट झाली !" तिनें खुळ्यासारखी टाळी वाजवली, व पोतें फिसकल्याप्रमाणें ती हंसली. "मी तुम्हांला मुद्दामच भेटणार होतें."

दत्तू हंसला. उगाचच. नाइलाजानें. वाटीभर पेजेसारखा. पण त्याच्या मनावर विषण्णतेचे शिंतोडेहि उडाले. वसंतकुमारी कॉलेजमध्यें फार स्मार्ट दिसायची. व्हरांड्यांतून ती टकटक सँडल्स वाजवीत चालली कीं दत्तू-सारख्या पोरांच्या मनांत आयँबिक पेंटॅमिटरमध्यें आडपडदा नसलेलीं इच्छासुनीतें उमटायचीं. ती कशीबशी बी. ए. झाली. तोंपर्यंत तिच्या प्रत्येक भागाला स्वायत्तता मिळाल्यामुळें ते मांसमोकाट वाढून बसले. तिच्याकडे पाहून आतां दत्तूला शरमल्यासारखें वाटलें. तिच्याचसाठीं. त्याला वाटलें, पुरुषानें जगावें पैसा असेपर्यंत व स्त्रीनें तारुण्य असेपर्यंत. ज्यूलिएट, लैला हीं नांवें सुगंधी होऊन बसलीं याचें एकच कारण. त्यांना

जगावें कसें हें समजलें होतें कीं नाहीं कुणास ठाऊक, पण मरावें केव्हां हें मात्र नक्की माहीत होतें. चार रडक्या पोरांचा लबेदा घेऊन एखादा फंड गोळा करायला निघालेल्या ज्यूलिएटची नुसती कल्पना तरी करून पहा! खरें आयुष्य सुरू झालें कीं त्यांतील काव्य आधींच खलास होऊन गेलेलें असतें.

" तर काय ! " दत्तू म्हणाला. वसंतकुमारी त्याला कांहीं तरी सांगत होती. पिशवींतून एक पुस्तक काढून त्याला दाखवीत होती. तो तिच्या कविता-संग्रह होता. भर दुपारीं पिंपळ सळसळतो, हृदयांतील कळ लाल जागवतो; आभाळाच्या निळ्या स्मशानीं, भूत पाहतें मी भविष्याचें; महात्मा गांधींचा मृत्युदिन, ये सुभाष राजसा, इत्यादि. मोठ्या सामाजिक विषयांपासून आपण अलिप्त नाहीं हें दाखविण्यासाठीं दोन-चार असले विषय. नद्यांना दिलेल्या आमंत्रणाप्रमाणें. बाकीचे नाजुक शब्द, शिंप्याच्या दुकानांत गोळा केलेल्या रेशमी चिंध्या. आकर्षक पण रिकामे. परंतु ते क्षणभर लक्ष वेधीत. झकपक पोषाख केलेल्या चार बायका कुठें जात आहेत हें माहीत नसतांहि क्षणभर त्यांच्याकडे वळून पाहतों त्याप्रमाणें— व तेवढेंच.

" सध्यांच्या या यंत्रयुगांत संस्कृतिप्रेम, कलासक्ति टिकविण्याचं काम आपणा मध्यमवर्गीयांवर आहे, असं नाहीं तुम्हांला वाटत ? " वसंत-कुमारीनें लाडिकपणें डोळे मोठे केले. रेनकोटच्या बटणाएवढे. नखरा पूर्वींचा, पण आतां तो या मांसाच्या ढिगावर ठेवला होता. तो कविता-संग्रह दत्तूनें विकत घ्यावा ही तिची इच्छा. दर पुस्तकामागें तिला सहा आणे मिळणार होते. त्यावर कणकेच्या गोळ्यांतील अळीप्रमाणें जगून तिचा आत्मा कलाप्रेम पसरवणार होता. कव्हरवर दहा वर्षें व पन्नास पौंड या मागचा आकर्षक फोटो छापला होता. तिच्या तारुण्याचा तो गुळगुळीत प्रिंटवरील मृत्युलेख होता.

दत्तूनें काव्यसंग्रह विकत घेतला नाहीं. वसंतकुमारीनें पुस्तक पिशवींत ठेवलें, व ती त्याच्याबरोबर चालूं लागली.

" यानंतर मी एक चरित्र लिहायला घेणार आहें. नंतर कादंबरी. त्यांची वर्गणी आजच भरली तर तीं अर्ध्या किंमतींत मिळतील. ' अशोक प्रकाशना 'ची ती नवी योजना आहे. " चालतां चालतां ती सांगूं लागली, " आपल्या हातीं आहे, तेवढं कार्य करायचं. "

तिच्याविषयीं वाटणाऱ्या अनुकंपेमुळेंच दत्तू फार चिडला व फाड्‌दिशीं तिच्या मुस्कटांत द्यावी असें त्याला वाटलें. हें ओबडधोबड आयुष्य जिला कधीं बोंचलें नाहीं, खुपलें नाहीं, ती मानभावीपणानें समाजाला जीवन-दर्शन घडवणार ! आईच्या अंगाशीं चिकटून बसलेल्या त्या छोट्या मुलीच्या मूकपणांत दहा पुस्तकें भरून राहिलीं आहेत !

त्यानें कसाबसा तिचा निरोप घेतला. आणखी कुणा एका गणा रामा पंचहत्यारीचें चरित्र म्हणतांच त्याच्या पोटांत ढवळूं लागलें. मराठींतील चरित्रें पाहिलीं कीं, महाराष्ट्रांत सारे सद्‌गुणांचे राक्षसच जन्माला आले कीं काय असें वाटावें ! आमच्या साऱ्या मोठ्या लोकांना सद्‌गुणाची एकेक जाडजूड व्हेरिकोज नव्हें झालेली. सारें आयुष्य साफसूफ गिलावा केलेली चिरेबंदी बनावट. कुठें फट नाहीं, खळगा नाहीं. आतांच दत्तूला वसंत-कुमारीच्या चरित्राचें स्वरूप स्पष्ट दिसूं लागलें.

आमचा चरित्रनायक लहानपणीं फार हूड. ( केवढें कौतुक ! लहानपणीं बेडरपणें करवंदें शोधणारा, किंवा गटारांत होड्या सोडणारा पोरगा चक्क पुढें रावबहादूर झाला. गांवांतील प्रत्येक टमरेल ज्याच्या कारखान्यांत तयार झालें असा मोठा टिनपॉट कारखानदार झाला, इत्यादि ) बरें, तें पोर लहानपणीं अगदींच बावळट असेल, आपल्या बरोबरीच्या मुलींचीं पोलकीं ताठ तटाटूं लागलेलीं पाहून त्यांनीं सॅन्फोराइझ्ड कापड वापरावें असा सल्ला देण्याइतकें मद्दड असेल, तरी लेखकाचें जेहत्ते ह्यः ह्यः असतेंच. पुढील मोठेपणाचीं बीजें लहानपणीं दिसलींच. शेजारच्या कावेरीच्या बाहुलीचें लग्न असतां त्यांनीं निःस्वार्थीपणानें आपली सोंवळ्याची लंगोटी लुगडें म्हणून देऊन टाकली. नंतर वडिलांसमोर उभें राहून अत्यंत धैर्यानें त्यांनीं ती गोष्ट मान्य केली. वडिलांना या गोष्टीचें इतकें कौतुक वाटलें कीं त्यांनीं दुसरी लंगोटी देखील खिडकींतून बाहेर फेकून दिली. पान अठ्ठेचाळीसवरील मुंजींत काढलेल्या फोटोंत ती लंगोटी स्पष्ट दिसत आहे. मग अशाच वाती तीनशें पानें वळल्या जातात. नंतर चरित्रनायकाचा आत्मा अनंतांत विलीन होत असतांनाचा हंबरडा मी पामर काय वर्णन करणार ? आणि एकंदरीनें फलांश काय, तर गांवच्या लायब्ररींत किंवा म्युनिसिपालिटींत झुंड मिशा असलेला एक फोटो, त्यांच्या नांवें मुलींच्या

शाळेंत दरवर्षीं वाटल्या जाणाऱ्या गीतेच्या पांच प्रती, पुस्तकांच्या यादींत एक नांव आणि रद्दीच्या ढिगांत एक मणभर रद्दी ! हीं आपलीं चरित्रें !

कधीं या नायकांना माणसांचीं दुःखें भोगायची पाळीच आली नाहीं ? डोळ्यांना एखादी गोष्ट धडधडीत सत्य दिसत असतां कसल्या तरी दडपणामुळें ती दिसत नाहीं, असें मांसाच्या दुर्बलतेमुळें सांगण्याची पाळी आली नाहीं ? आणि त्या शरमेनें मन आयुष्यभर पिचलें नाहीं ? कुणालाच गॅलिलिओचा मनस्ताप नव्हता ? निव्वळ वासनेनें कधींच शरीर जळलें नाहीं ? रागाच्या भरांत एक शब्द गेला व अत्यंत जिव्हाळ्याच्या जागीं जखम झाली, या पश्चात्तापानें मन कधीं कुरतडलें गेलें नाहीं ! कधीं मोहानें, कधीं महत्त्वाकांक्षेनें कुणाचा तरी विश्वासघात करून पापक्षालनासाठीं आयुष्यभर वणावणा हिंडण्याची कुणावरच पाळी आली नाहीं ? भेकडपणामुळें प्रिय व्यक्तीचा बळी द्यावा लागला, द्वेषानें मन पेटलें, असें कधींसुद्धां घडलें नाहीं ? खड्डयांत गेले ते सत्कार, तीं भाषणें, तो तुरुंगवास. तुमच्या चरित्रांत हा जिवंत माणूस आहे कुठें ?

आणि या चरित्रांत कुठें पाप नाहीं, गुन्हा नाहीं, शरम नाहीं. सारा ' प्लॅस्टर ऑफ पॅरिस ' गुळगुळीतपणा. म्हणजे या लोकांना जीवनाचे पदरच दिसले नाहींत कीं या पुजाऱ्यांनीं सारीं बिळेंच लिंपून टाकलीं आहेत, त्यांतील काळे पिवळे नाग झांकून ठेवले आहेत ? मग हीं चरित्रांचीं बुळबुळीत घोटीव, एकसांची सहस्रलिंगें वाङ्मयांत मांडून ठेवायचीं, त्यासमोर भाविकपणें बसायचें, एकमेकांना ' तेरी भी चूप मेरी भी चूप ' असा डोळा मारून जल्लोष करायचा : " ही आपली संस्कृति ! " आणि आडपडदा न ठेवतां लिहिलेल्या चरित्रांकडे बोट दाखवून धक्का बसलासें करीत म्हणायचें, " नाहीं तर तो पहा कानकाप्या व्हॅन्गॉफ, जुगारी, डोस्टोव्हस्की, आणि लिंगपिसाट मोपाँसां— "

आणि पुष्कळदां आपले चरित्रनायक निघतातहि तसेच रुक्ष एकमार्गी ! राजकारणी मनुष्याला ललितवाङ्मय-नाट्याची आवड नाहीं, कवीला क्रिकेट माहीत नाहीं, आणि संशोधकाला रंग माहीत असतात ते फक्त दोन–काळा व पांढरा ! महाराष्ट्राची प्रकृतीच तशी आहे कीं, काय कुणास ठाऊक. तेथील जीवनावर विलासाची कळा कधीं आलीच नाहीं. परवडत असतांहि

दुकानांत जाऊन अत्यंत टिकाऊ, मळखाऊ गद्य कापड घेणारा माणूस मराठीच असण्याची जास्त शक्यता. भाषेंत दरबारी आदब आली नाहीं. ऐन भरभराटीच्या काळांतहि दिवाण-ई-खाससारखीं शिल्पपुष्पें उमललीं नाहींत. कलासक्त धुंदी तर इथें रोगाचाच प्रकार ठरेल. गायनामागें लागून आयुष्य विसकटणाऱ्या कलावंताला कणकवलीचा किराणा दुकानदारहि वेडपट व्यसनी ठरवील, तर शिकण्यापेक्षां गुरें हांकणें पसंत करणाऱ्या पोरासाठीं दीड दमडी खेडेगांवांत शाळा घालून बसणारा ध्येयवादी ठरतो ! जंत झालेल्या पोटासारखीं असह्य, अवजड ( काय लिहितो देव जाणे ! ) पुस्तकें लिहिणारा उगाचच भाव खातो, पण नर्गिसला 'पद्मश्री' मिळतांच सात्त्विक संतापाचा वणवा पेटतो. एखाद्या गायकाविषयीं लिहितांना त्यांचें गायन राहिलें बाजूला—' पण गायक असूनहि खाँसाहेब निर्व्यसनी होते ', ही आमची सर्वांत मोठी स्तुति ! अहो, एखाद्या गांवांत कॉलऱ्यानें पन्नास माणसें मेलीं तर त्यांत चाळीस माणसें निर्व्यसनी असतात. पण स्वरांची स्वर्गीय देणगी असलेला लाखांत एक जन्मतो. जरा कुठें थाटामाटांत एखादा समारंभ झाला, कीं त्यासाठींच टपून बसलेले कळकळीचे कार्यकर्ते ताबडतोब वर्तमानपत्राकडे धांवतात. ' हा सारा पैसा गोरगरिबांसाठीं खर्च करतां आला नसता का ? " बरें, इतकें करूनहि गोरगरिबांचें लचांड एकदां कायमचें निकालांत निघालें असतें तरी हरकत नव्हती. तें अनादि कालापासून आहे, अनंतापर्यंत राहणारच. गोरगरिबांना मदत करायलाच आपण जन्मलों, तर मग ते गोरगरीब कशासाठीं जन्मले आहेत ? आमची मदत घ्यायला ! छान. म्हणजे छातींत खुपसायला सुरी, व सुरी खुपसण्यासाठीं छाती ! त्यांत आणखी आपण अत्यंत बुद्धिवादी अशी आपली समजूत. खरें म्हणजे आमच्यासारखे भाबडे कुणी नसतील. कुणी तरी ' शिवाजी महाराज की जय ' म्हटलें, कीं त्यानें डोळ्यांत टाकलेली धूळ आम्ही डोक्यावर घेतों. ती पवित्र घोषणा ऐकून आपण दीड दमडीचीं भाषणें वेदवाक्यें मानलीं, तिच्यामुळें आम्ही दिवाळखोर राजकीय पक्षांवर ऐपतीचीं वस्त्रें टाकलीं. एखाद्या मंगल देवालयांत पुजाऱ्यांनीं खाजगी मालमत्ता करावी त्याप्रमाणें त्या पवित्र छायेंत अनेकांनीं स्वार्थ तृप्त केले, आपलें आसन स्थिर केलें. ज्या युगप्रवर्तक नांवानें सूर्योदयदेखील नैसर्गिक वेळेपेक्षां एक तास आधीं व्हावा

त्याला ग्रामपंचायती-म्युनिसिपालिटीच्या कवडीमोल निवडणुकींत आम्ही खेंचून आणायला मागें-पुढें पाहत नाहीं. रविवर्म्यानें आपल्या चित्रासाठीं महाराष्ट्रीय पोषाख निवडला, म्हणून आमच्या मतें तो फार श्रेष्ठ चित्रकार ! एक मराठी माणूस = एक अबोल माणूस. दोन = ब्राह्मण-ब्राह्मणेतर अथवा कोकणस्थ-देशस्थ वाद, व तीन माणसें = एक शाळा ! ज्या ठिकाणीं बाकीचे करपून गेले असते, नामशेष झाले असते, तेथें महाराष्ट्र निंबाच्या झाडाप्रमाणें ताठ व चिवट राहिला, आणि कांहीं विशिष्ट गुणांचीच जाणीव घेऊन जीवनाच्या एका अरुंद पट्टीवर नीट नाकासमोर चालला आहे...

आपल्याच तंद्रींतून दत्तू भानावर आला त्या वेळीं त्याला एकदम आश्चर्य वाटलें. वास्तविक त्याला आतां घरीं जायचें होतें. पण नेहमींच्या सरावानें पाय क्लबाच्या रस्त्याला लागले होते. खिशांत पैसा नसल्यामुळें रमी खेळण्याचा प्रश्न नाहीं, व रमी नाहीं म्हणजे जादा सिगारेट घेण्याचीहि जरूरी नाहीं. तो पुलावरून डाव्या बाजूला वळला, व त्यानें सरावाप्रमाणें पुलाकडे पाहिलें. होय, तो नेहमींचा महारोगी भिकारी तेथें होताच. त्याच्याकडे पाहतांच अंगावर शहारे येत. बोटें तुटलेले आंधळे हातपाय हलवीत तो याचना करी, एखाददुसरें नाणें मिळालें कीं, बसकुराखालीं चांचपडत सरकवी. अंगावर माशा घोंघावत, एखादें कुत्रें अंगावर भुंके. बाजूला दोन कळुंद्रीं पोरें डोक्यांत माती घालून खिदळत, व त्या साऱ्यांचे मागें लाल ज्योतीप्रमाणें दिसणारा तरणाताठा गुलमोहोर वाऱ्यांत हलतांच वाळलेलीं पानेंफुलें टपाटपा खालीं पडत. जवळून जात असतां दत्तूनें अंग चोरलें, व स्वतःच महारोगी असल्याप्रमाणें तो अगदीं दुसऱ्या कडेनें चालूं लागला. पण जातांना त्यानें हळूच डोळ्याच्या कोंपऱ्यांतून त्या रोगट संसाराकडे पाहिलें व तेवढ्यांतहि ती गोष्ट त्याच्या नजरेंतून सुटली नाहीं. त्या भिकाऱ्याच्या बाजूला बसलेली, करांकरां डोकें खाजवणारी बाई गरोदर होती.

मऊ बिलबिलीत बेडकीवर पाय पडल्याप्रमाणें दत्तू आकसला. तें दृश्य आठवणीमधून काढून टाकण्याचा त्यानें प्रयत्न केला, पण नाहीं. त्याला एकदम पारोसें वाटूं लागलें. मनांत गांडुळांचें वारुळ फुटल्याप्रमाणें तो

मलिन, अस्वस्थ झाला. बोटें नसलेले हात, आपल्या मागें असलीं रोगट रोपटीं लावीत येणारे वासनेचे काळे क्षण. सुलभेचें प्रेत वर काढलें त्या वेळीं तें देखील टमाम फुगलें होतें. हातपाय फुग्यासारखे दिसत होते. अशी रेखीव ती, पण आतां तिला आकार राहिला नव्हता. तीहि म्हणे गरोदर होती. विश्वासानें तिनें कुणाच्या कुणाच्या छातीवर डोकें ठेवलें कुणास ठाऊक ! प्रत्येकाला प्रत्येकाचा संशय येत होता, आणि आंत, अगदीं आंत, शरीर तापवणारा हेवा वाटत होता. तिच्या आईबापांना शरमेनें मान वर करायला जागा उरली नाहीं. त्यांच्याजवळ नोटांची पत्री करावी. इतका पैसा आहे. पण सुलभेनें आपल्या हातानें आयुष्य चिरडून टाकलें, आणि ही भिकारीण विटक्या पातळापासून उद्यांचा महारोगी जाहीरपणें मिरवीत गुलमोहोराच्या लाल छत्रीखालीं बसते ! आणि आपल्या बहिणीला मूलहि झालें नाहीं. त्याच पृष्ठभागावरील हे सारे बुडबुडे ! लोकांच्या शिव्या-शापांत आंधळा हात वर वरून जगणारा भिकारी, त्याची रेषा पुढें चाढवणारी गरोदर बाई, तेंच आयुष्य विषारी वस्त्राप्रमाणें भिरकावून मुक्त होणारी सुलभा; नवऱ्याला हात जोडणारी बहीण, आवाळूंतील लाल वेदना घेऊन हाडें झिजवणारा बैल, उद्यांच्या मृत्यूची चिंता न करणारा किंग, आणि जें घडणार नव्हतें तें घडवण्याचा प्रयत्न करून, पुन्हां शेवटीं निशि-गंधाचींच फुलें देऊन " मी जातें " म्हणून खालच्या मानेनें निघून जाणारी, सारें आयुष्य जखमेप्रमाणें सहन करणारी रेखा. आणि त्यांच्याच बरोबर वाहवतीला लागलेला हा एकशेंचाळीस रुपयेवाला, दोन मुलांचा बाप दत्तू जोशी, इंग्रजीचा स्कॉलर, तत्त्वज्ञानाचा एम्. ए., आपल्या कॉलेजचा पहिला फेलो, आज ऐपत नगद दोन आणे !

आभाळाचा पिवळसर रंग केव्हांच मळला होता, व तें आतां धुरकटल्या-सारखें दिसत होतें. क्लबसमोरील हिरवळीवरून जातांना गवताचीं पातीं चरचरत, पायांचीं बोटें ओलसर होत, व त्यामुळें चिरडलेल्या बोटांवर फुंकर पडल्याप्रमाणें वाटे. सारें मैदान वर कांचपात्र घातल्याप्रमाणें स्वच्छ, नीरव होतें. पट्ट्यापट्ट्याचे गंजिफ्रॉक घातलेलीं दोन मुलें कांहीं तरी अगदीं मन लावून बोलत बोलत उभीं होतीं व एक तारेच्या तुकड्याप्रमाणें वांकून गेलेली म्हातारी झुडपांकडेनें काटक्या शोधीत सरकत होती.

क्लबरूम सिगरेटच्या धुरानें भरून गेली होती, व त्यामधून नेहमींचे चेहरे अस्पष्ट दिसत होते. उकाड्यानें आंत कुंद वाटे, व ठिकठिकाणीं अस्ताव्यस्त झालेल्या उघड्या कॉलरी दिसत. येथें दत्तूला हायसें वाटलें. सारे ओळखीचे परिचयांतले. एकाच तणाव्याने ताणलेलीं माणसें. पै काय, आणा काय, पालथ्या पत्त्यांतून कसलें भवितव्य निघतें याच एका धगधगीत उत्सुकतेनें सारे टांगलेले. मनाचे खासगी कोनेकोपरे, तेथील त्रस्त करणारीं भावनांची गुतावळ फेकून देऊन पडद्यावरील चित्रांप्रमाणें अगदीं सपाट होऊन बसलेलीं हीं माणसें. दत्तूनें एक खुर्ची ओढली व त्या वर्तुळाच्या कडेला तो बसला. आज तो खेळण्याविषयीं उत्सुक नव्हताच. काल येथें त्याचें श्राद्धच झालें होतें. असाच एक दिवस येतो कधीं तरी. त्या महारोग्याच्या आंधळ्या बोटांसारखा हात लावावें तें पान भलतेंच निघतें. आपण आपलें आयुष्यच सारें तासा-दोन तासांत जगत असल्याप्रमाणें, कांहीं जमत नाहीं, कांहीं कळत नाहीं, पण असें कडेला बसणें हें ठीक. साऱ्यांचीं सुखदुःखें, ईर्ष्या या भावना समजतात. लठ्ठ देशपांडे मध्येंच थरथरत्या हातानें सिगरेट कां पेटवतो हें समजतें. डॉक्टर वास्तविक खुर्चीत उशी फेकल्याप्रमाणें बसणारे, पण ते मध्येंच कां ताठ बसतात हें पाहतां येतें. सहा जणांचें जीवन प्रत्येकीं आपणाला जगतां येतें – साऱ्यांपासून अलिप्त राहूनहि. नेहमीं खादीचे बेंगरूळ कपडे घालीत असल्यामुळें खादीच्याच अंगाचा दिसणारा मोरे, विशेष कधीं कुणाशीं जमवून न घेणारा हिरवट प्रोफेसर, जरा डाव वाईट आला कीं साऱ्या क्लबला मीठमिरीं न घालतांच खाऊं करणारा वकील, वुलन पॅंटमध्यें आजारी पाल हिंडत असल्याप्रमाणें दिसणारा बापट, ( बिचाऱ्याला कधीं कुणी त्या नांवानें हांक मारली नाहीं. काव्याची विशेष आवड नसणारेहि त्याला ' बापट कुळ्ळे आपट ' या संपूर्ण सयमक नांवानेंच हांक मारीत. त्यानेंहि कंटाळून तक्रार करण्याचें सोडून दिलें होतें. ), हीं सारीं त्या टेबलाभोंवतीं होतीं. कोपऱ्यांतील टेबलावर निग्रो कळसणावर, फाटक्या आवाजांत सतत बडबड करणारा काळे, हजार लोकांचें देणें ठेवणारा निर्लज्ज कामत व सतत घड्याळाकडे पाहणारा केळकर ही मंडळी. बाहेरच्या जगाचा एक लचकाच एक तेथें धुराच्या पडद्याआड स्वतंत्रपणें जगत होता. निरनिराळ्या प्रकृतींचीं हीं माणसें. आयुष्याचीं पानें प्रत्येकापुढें टाकलीं आहेत. ज्याची

त्यानें सुसंगति साधायची, विजय मिळवायचा, शिक्षा स्वीकारायची. आणि नऊ वाजतां खालच्या मानेनें बाहेर पडायचें, किंवा हा दिवस तरी गोड झाला या समाधानांत अंधारांत शिरायचें.

दत्तूच्या बाजूला आणखी कुणी तरी खुर्ची ओढली. गणपतनाना आले म्हणतांच दत्तू आदबीनें बाजूला सरला. गणपतनाना उगाच हंसले. त्यांनीं हातांतील पुस्तक व काठी काळजीपूर्वक खिडकींत ठेवली, व आपलीं व्हायोलिनवर शोभणारीं लांबसडक बोटें जुळवून ते खेळ पाहूं लागले. साऱ्या क्लबांत दत्तूला फक्त गणपतनानांविषयीं कुतूहल व आदर वाटत असे. त्या गृहस्थानें खोऱ्यानें पैसा ओढला, सुपासुपानें खर्च केला. साऱ्या आयुष्यभर शौकहि असा कलंदर केला कीं तें अत्तराच्या दिव्यांनीं सुगंधी प्रकाशलें. चाळीस वर्षांपूर्वीं एल्‌एल्. बी. ला पहिला वर्ग मिळवलेले गणपतनाना आतापर्यंत हायकोर्ट-जज्ज होऊन जायचे. पण त्यांनीं काढली मोटार कंपनी. मोठमोठ्या पिशव्यांतून गल्ला बँकेंत भरला. गांवांतील पहिला रेडिओ गणपतनानांचा. पहिलें सिनेमा थिएटर त्यांचें. त्यांच्या दिवाणखान्यांत मोठमोठ्या गायकांच्या बैठकी झडल्या. त्यांचे कपडे असे ऐटबाज असत कीं, कधीं तरी कंपनीच्या कामाला विजापूर-बागलकोटकडे ते गेले कीं त्यांचा रुबाब पहायला लोक मुद्दाम येत. एका संस्थानिकाकडे असलेल्या एका कोकिळकंठी कलावतीला त्यांनीं उघडपणें मोटारींतून आणलें. तिची पहिली शेज झाली ती म्हणे रुपये व फुलें यांच्या शय्येवर ! पण तिनें पत्नीला एक शब्द उर्मटपणें बोलतांच भर अंगणांत त्यांनीं तिला वेतानें फोडून काढलें. मुंबईला कंकय्या खेळणार, पुण्याला बालगंधर्वांचें ' स्वयंवर ' लागणार म्हटलें कीं, गणपतनाना फर्स्ट क्लासमधून लव्याजम्यासह चालले. नवीन शाळेसाठीं मदत मागायला त्यांच्याकडे कांहीं लोक आले त्या वेळीं, आपलें नांव शाळेला न देण्याच्या अटीवर ड्रावरमधून पंचवीस हजारांच्या नोटांचा अस्ताव्यस्त ढिगारा त्यांनीं त्या लोकांपुढें टाकला. गांवांतील सहा मोठ्या विहिरी त्यांनीं बांधल्या. गांवांतील सध्यांच्या निम्म्या डॉक्टर-वकिलांचें शिक्षण त्यांच्या आतषबाजीमधून झालें. पण बहर ओसरला. सारा पैसा गेला. पण तो स्वतः मिळवलेला. वडिलार्जित मिळकत त्यांनीं जशीच्या तशी मुलाच्या हवालीं केली. आपलीं दोन हजार इंग्रजी पुस्तकें नेटिव्ह लायब्ररीला देऊन टाकलीं. मैफल

संपून गेली. पण ना खेद ना खंत. कुठें चिकटून राहिल्याची खूण नाहीं, कांहीं तुटून गेल्याचा डाग नाहीं. आतां ते एका खोलींत रहात, पांढरा शुभ्र, गुडघ्यापर्यंत नेहरू शर्ट घालीत, पाढरे झालेले केस सारे मागें कळवीत हातांत नेहमीं चांदीच्या मुठीची काठी, व हातांत डिक्सन कार, किंवा गार्डनरचें एक पुस्तक. ते स्वतः कधींच रमी खेळत नसत. साऱ्या आयुष्याचा धुंद जुगार करणाऱ्याला पै–आण्यांत काय आकर्षण वाटणार ? अलिप्त नजरेनें ते सारा खेळ पाहत, दोन-चार आण्यांसाठीं चाललेली बाचाबाची ऐकत, निर्लज्जपणें देणीं बुडविणाऱ्याकडे ‘ कांहीं समजत नाहीं ’ अशा नजरेनें पाहत. एखादा ग्रीक देव माणसांच्या किरकोळ जगांत येऊन जावा त्याप्रमाणें त्यांचें क्लबला येणें असे.

मोरे एकदम ताठतो. त्याचे लालसर डोळे एकदम ठिणगी टाकणार त्याप्रमाणें लांबट जांभळाच्या आकाराचे होतात. तो आतां खात्रीनें एकाच पानासाठीं थांबला आहे. कारण नेहमींचा मोरे व आतांचा मोरे यांत फरक आहे. आतांचा मोरे शिकारीसाठीं टपलेल्या कुत्र्यासारखा आहे, त्याचे ओठ विलग आहेत, व सिगरेटवर अर्धा इंच राख जमली आहे. तो टेबलावरून पान उचलतो, व सरपटत टेबलाच्या कडेला आणून कोपरा मोडून पाहतो. पण त्याबरोबर त्याच्यांतील तणाव ओसरतो, व डोळे चेचल्यासारखे होतात. तो खुर्चींत विस्कळित पडतो, व चिडून तेंच पान भिरकावून देतो.

त्याला पाहिजे होता बदाम दहा, पण निघाला इस्पिक आठ. जर तो दहा मिळाला असता तर त्याला दुप्पट पॉइंट्स् मिळाले असते. मायनस साडेसहाशें मधून निम्मे तरी कमी झाले असते. इथेंच काय, पण आयुष्यांतहि कधीं त्याला हवा त्या वेळीं बदाम दहा मिळाला नाहीं. त्याचा हातच दुर्दैवी. जरी त्यानें बाभळीचें रोपटें लावलें असतें तरी तें जळून गेलें असतें. त्यानें चालवायला घेतलेलें हॉटेल बंद पडलें. बायको बाळंतपणांत खलास झाली. आतां त्यानें व्यापार सुरू केला होता. पण गेल्या शनिवारीं मालानें भरलेली वेंगुर्ल्याला निघालेली ट्रक सातव्या मैलाजवळच उलटली. आणि आतां त्याचा थोरला दहा वर्षांचा मुलगा टायफॉइडनें आजारी आहे. त्याला कधींच बदाम दहा मिळत नाहीं. पण

पिंजारलेल्या केसांनीं, वखवखलेल्या मनानें तो दररोज येतो, नशिबाची परीक्षा पाहतो, नव्या अपेक्षेनें प्रत्येक क्षण कुरवाळतो, व शेवटीं चार-सहा नाणीं टेबलावर टाकून ' बराय मंडळी ' म्हणत कोट अडकवून निघून जातो.

पण मोरेच्या हातून इस्पिक आठ पडतांच वकील त्यावर तुटून पडतो व चीत्कारत पानें खालीं मांडतो. त्याला नेमकें तेंच पान पाहिजे असतें, त्यामुळें मोरेच्या हातातोंडाशीं आलेला रमी त्याला मिळतो. मोरे रागानें सारीं पानें टेबलावर भिरकावतो, व कोट उचलून चालूं लागतो. स्वतः-कडेच पाहिल्याप्रमाणें दत्तू त्याच्याकडे कळवळून पाहतो. त्याचेंहि तसेंच झालें होतें. रेखेशीं जवळजवळ लग्न ठरलें होतें. ' आतां बोहल्यावरून पळून जाऊं नको ' असेंहि त्यानें तिला बजावलें होतें. पण नाहीं. तो प्रसंगच आला नाहीं. एका इंजिनियरशीं (इंजिनियरशीं ! सुंदर नाजुक पत्रें लिहिणारी, आर्त भावगीतें म्हणणारी रेखा, इंजिनियरबरोबर चौपाटी-वर हिंडणार !) लग्न करून ती निघून गेली. आणि दत्तूनें साऱ्या काळ्या लाल आठवणी पत्त्याप्रमाणें फेकून दिल्या...मोरेप्रमाणें !

अचानक कधीं तरी जागी होणारी कळ, आज तीव्रतेनें जागी झाली. दत्तू अस्वस्थ झाला. कुंद धुरकट खोली, अस्पष्ट चेहरे, टेबलाच्या खवल्या-प्रमाणें दिसणारे पत्ते, त्यावरील काळे तांबडे डोळे. त्या जागीं त्याला तिचीं पत्रें, कोरीव अक्षरें, रेशमी रिबन बांधून लांकडी पेटींतून दिलेली बुद्धाची छोटी मूर्ति दिसूं लागली. अबोलीचीं फुलें, बॉटल ग्रीन जॉर्जेटचें पातळ, तिनें म्हटलेल्या पूरीयाधनाश्रीचे स्वर, शारदा नाटकांतील तिचें शारदेचें काम... दत्तू तेथून एकदम उठला, व भटकत दुसऱ्या टेबलाजवळ आला. त्याला खेळायचें नव्हतें; नाहीं तर तेथें वास्तविक एक जागा रिकामी झाली होती. ॲनिमिया झालेल्या मुलीसारखा दिसणारा केळकर साडेसात वाजले म्हणतांच दंश झाल्याप्रमाणें घरीं जायला एकदम उठला होता. तशी त्याच्या बायकोची ताकीदच होती. त्याच्या बाजूला फोपसा, जून पांढऱ्या बटाट्या-सारखा दिसणारा मडीमन तोंडांत तंबाखू असल्यामुळें तोंडाची कुंची करून कांहीं तरी बडबडत होता, त्याच्याकडे कुणाचें लक्ष नव्हतें, व त्या अवस्थेंत तें कुणाला समजलेंहि नसतें.

त्या केळकराचा दत्तूला फार राग आला. गाढवानें त्या वासंती पोतदारशीं प्रेमविवाह केला होता. त्या बाईची कीर्ति जगजाहीर होती. अद्यापहि तिच्या भटक्या आयुष्यावर कसलाच दाब नव्हता. पांच महिन्यांपूर्वी नायलॉनचें झकपक पातळ नेसून ती दत्तूच्या घरीं आली होती. कां, तर म्हणे सुधाला भेटायचें होतें. पंधरा दिवसांसाठीं सुधा माहेरीं गेली आहे हें त्यानें तिला दोनदां सांगितलें होतें. एकदां बाजारांत व एकदां सिनेमा-थिएटरांत केळकर समोर असतां. सुधाला भेटायचें आहे! कसलें तरी धुंद अत्तर; आतांशा ती ब्रा देखील रेशमीच वापरत असे कीं काय कुणास ठाऊक. ती जायला निघाली त्या वेळीं तिच्या चेहऱ्यावर विजयाचें कुत्सित स्मित होतें. मांजर जिभल्या चाटतें तसें! तें पाहून दत्तू शरमला. आपण जास्त ताबा दाखवायला पाहिजे होता असें त्याला वाटलें. त्या आठवणीनेंहि तो आतां शरमला. राखेची चिमूट जिभेवर पडल्याप्रमाणें त्याचें मन कडवटलें. त्याचप्रमाणें ती मनोहर देसाईकडे जात असे. रत्नाकर अमलाडीच्या मोटारींतहि तिला अनेकांनीं पाहिलें होतें. आणि हा केवळ जीव तोडीत साडेसातला घरीं जातो. साऱ्या गांवाला जें माहीत तें त्याला माहीत नाहीं? कीं माहीत असून तें सगळें स्वीकारून तो आनंदानें जगतो? खालीं महारोग्याचा संसार घेऊन आनंदानें फुलणाऱ्या गुलमोहरासारखा? केळकराचें मन दत्तूला कधींच समजलें नाहीं. लग्नापूर्वी पत्नीला इतर कुणाच्या हाताचा स्पर्श झाला आहे असें समजलें तरी साऱ्या आयुष्यभर, डिटेक्टिव्ह पुस्तकावर असते, त्याप्रमाणें उघड्या पंजाची छाया पडते, आणि हा डोळ्यांना झांपड्या लावून साडेसातच्या ठोक्याला लोंबकळत आयुष्य काढतो आहे! चिडून दत्तूला वाटलें एक ब्लेड घेऊन त्याच्या त्या तृप्त बावळट चेहऱ्यावर चराचरा रेघा ओढाव्यात, व म्हणावें, "नीट डोळे उघड, उघड्या डोळ्यांनीं सारें स्वीकार. आयुष्यभर असाच पंचवीस वर्षांचा राहूं नको..."

त्याला मिळालेले दोन आणे न घेतां, छत्री विसरून तसाच केळकर बाहेर धांवला, व सायकलीवरून निघून गेला. त्याच्याविषयीं दत्तूला संताप, सहानुभूति वाटली— आणि थोडा हेवाहि! सुख असावें तर असें अभंग, निरामय, परिस्थितीच्या लांटापलीकडचें. नाहीं तरी ज्यामुळें कांहींहि बदलतां येणार नाहीं, तें काटेरी ज्ञान हवें तरी कशाला?

मडीमन पुन्हां कांहीं तरी बोलत होता, सांगत होता. या खेपेला त्यानें कचदिशीं दत्तूच्या पोटांत बोट खुपसलें. तो काय सांगत आहे हें दत्तू ऐकूं लागला. मोरेचा आजारी मुलगा आज सकाळीं वारला, तरी तो मूर्ख लेकाचा संध्याकाळीं क्लबला येतो, हें तो सांगत होता.

दत्तू एकदम बधिर झाला. त्याला तेथें उभें राहवेना. त्या मडीमनच्या लठ्ठ पांढऱ्या तोंडाचीं कुत्रीं मोरेवर भुंकत आहेत, त्याचे लचके तोडीत आहेत, व तो काटक्या वेंचणाऱ्या म्हातारीप्रमाणें बदाम दहा शोधीत हिंडत आहे असें त्याला वाटूं लागलें. तो बाहेर आला. नुसतेंच अवखळ हुंदडणाऱ्या वाऱ्याला आतां शीतल कुरवळणारी माया आली होती. त्या थंड हिरवळीवर आडवें व्हावें, गवताच्या पात्यांचा स्पर्श तळव्यांना व्हावा, वाऱ्याची झुळूक छातीला बडवावी अशी त्याला इच्छा झाली. तो पायरीवरच थोडा वेळ गप्प, गोंधळून उभा राहिला. वाऱ्याच्या तलम, फडफडणाऱ्या पडद्यावरील आकृतीप्रमाणें.

" ह्यः ह्यः! नमस्कार, नमस्कार ! " कोणी तरी अगदीं त्याच्याजवळच खिस्स केलें. तो चमकला व त्यानें मागें वळून पाहिलें. तो संतापला नाहीं, तो जास्त शरमला. हातांत नेहमींची पिशवी घेऊन दाढीवाले केतकरशास्त्री उभे होते. जोडलेला हात तसाच ताटकळत ठेवून ते पुन्हां तेलकट हंसले. कॉलर एकदम आवळ झाल्याप्रमाणें त्यांनीं आपल्या उंटमानेला दोन्ही बाजूंनीं दोन-तीन वळसे दिले. त्यांच्या हंसण्यांत जो मेंगटपणा होता तो पाहून काळ्या घोड्याच्या पोटांतहि ढवळूं लागावें ! दत्तूला तर आपल्या हिंदी चित्रपटांतील नायिकांचें फिल्मी पतिप्रेम सोडलें, तर साऱ्या जगांत इतकें ओशट, मळमळ निर्माण करणारें कांहींच नसेल असें वाटे. त्याला अनेकदां संतापानें वाटे, हें हंसणें म्हणजे एखाद्या अवघड आगीं खाजत असतां नखांना नेमकी जागा सांपडावी तसलें भळभळीत वेडेंविद्रें आहे. तो हताश झाला. शास्त्रीबुवाकडून आतां सुटका नाहीं हें त्यानें ओळखलें.

" कां ? फार दिवसांनीं गांठभेठ ? " एक चार मिनार पेटवीत त्यानें विचारलें. गेल्या शनिवारींच त्यांची भेट झाली होती.

" ह्यः ह्यः ! कांहीं नाहीं, आपला सल्ला घेणार होतों. आपण विद्वान्, आपला व्यासंग दांडगा... "

दमून गेल्याप्रमाणें दत्तूनें धूर सोडला. बाबारे, हा सारा तमाशा कशाला? पहिले चार अंक काढून टाक, आणि ये शेवटच्या अंकाला. किती पैसे पाहिजेत बरें?

"इथंच बसूं कीं. आपलं काय!" म्हणत शास्त्रीबुवांनीं पायरीवरच आसन ठोकलें. बुवा फार नम्र. कुणी तरी जाजमावर, खुर्चीवर बसा म्हटलें कीं नाहीं, ते कोपऱ्यांतच वांसराप्रमाणें ढोपरें मोडून वहाणाझाडणीवर बसतील. मग कोंपऱ्यांत ठेवलेली छत्री मोडली, किंवा आंत जातांना मोलकरणीनें ठेवलेली तिळेलाची बाटली सांडली, तरी हरकत नाहीं.

"इथं नको, चला त्या हिरवळीवर बसूं." अतिशय शरमून दत्तू म्हणाला.

"वा, तर चला," बुवा म्हणाले, "आपलं काय, धरणीमाताच आहे. जन्मलों तिथं, जाणारहि तिथंच!"

दत्तूला चार मिनार कंपनीविषयीं फार कृतज्ञता वाटली. त्या कडक धुंदींत असले शेवग्याच्या झाडांतून डिंक ठिबकल्याप्रमाणें चिकट शब्द ऐकूं येत नाहींत, अंग मलिन करीत नाहींत. दत्तू बऱ्याच अंतरावर बसला. बुवांनीं पिशवी धरणीमातेवर टाकली, व उगाचच इकडे तिकडे उत्कटपणें पाहिलें. हीं सारीं लक्षणें नेहमींचींच होतीं, व त्यांचा दत्तूला चांगला परिचय होता. समोरील खिश्चन स्मशानभूमि, दूरचे दिवे, वरील दोन-चार चांदण्या यांतून नाहीं म्हटलें तरी चमचाभर मंगल बुवा काढणार! मांगल्य म्हणजे तर शास्त्रीबुवांचा अगदीं हातखंडा. म्युनिसिपालिटीचें साफसफाई पथक डी. डी.टी. मारीत जातें, त्याप्रमाणें ते ठिकठिकाणीं पच्चक पच्चक मांगल्य टाकीत जात असत. आणि तेंहि विशिष्ट शिक्क्याचेंच मांगल्य बरें का! आपल्या संस्कृतींत अगदीं हातमोजांत हात बसल्याप्रमाणें बसणारे शास्त्रीबुवा भयंकर संस्कृतिवाले. टमरेल घेऊन जातांना तें उजव्या हातांत असावें कीं डाव्या हातांत असावें हें ते संस्कृतीला वाट पुसितु ठरवीत असत. एक पतंग पंधरा मिनिटें उडत ठेवण्याइतका लांब उसासा त्यांनीं सोडला व ते म्हणाले, "सगळीकडे मांगल्य भरून राहिलं आहे."

"दत्तू व्यग्र झाला. तो चिडला नाहीं, संतापला नाहीं. सइसुट्ट्यो

म्हटल्यावर लपणाऱ्याला शोधून काढायला हिंडावें, त्याप्रमाणें त्याचें मन भरकटूं लागलें. सगळीकडे ! बैलाच्या पाठीवरील तें वाहतें, लाल आवाळूं ? मुलभाचें प्रेत ? भिकाऱ्याचीं सडलेलीं बोटें, एकाकी बसलेली मुलगी, जातांना नुसतीं हाडें ठेवणारा भारतीचा आजार ? बहिणीनें सहन केलेली लाथ ? दादांची उघडी छाती ? सद्या परटाच्या मुलीच्या मांडीवरील डागण्याचा डाग ? सगळीकडे ? अगदीं भरून ऊतूं जातंय् ?

" आँ ? काय म्हणालांत ? " त्यानें दचकून विचारलें.

" नाहीं म्हटलं, माझ्या पुस्तकाचा माझ्या बांधवांना कांहीं उपयोग आहे का ? " बुवा विचारीत होते. त्यांचा आपला नम्र प्रयत्न, बालकें कर जोडुनि केलेला. सेवा गोड मानून घ्यावी वगैरे. पण त्यांचें पुस्तक— तें कसल्या तरी आख्यानांचें होतें — विशेष खपलें नव्हतें. पण जनतेसाठीं सारें जीवन. त्यांत कसली प्रसिद्धीची, पैशाची हांव ? आणि त्यांत आपलें आहे तरी काय स्वतःचें ? देवानें दिलेली देणगी, धन्याघरचा माल, आपण हमाल.

" उपयोग आहे कीं ! नाहीं कसा ? " जवळजवळ खेकसूनच दत्तू म्हणाला. आहे उपयोग डोंबलाचा ! उपवर मुली फोटो काढून घेतांना हात वर ठेवायला बाजूला एक पुस्तक घेतात, तसलें म्हणून कायम उपयोग आहे ! किंवा रात्रीं मांजर खडखड करतांना कोपऱ्यांत भिरकवण्यासाठीं.

" उद्यांच्या रविवारीं मी मुलांना कथा सांगणार आहें. तेवढाच एक दिवस आनंदांत जाईल माझा. मुलें हीं देवाचीं फुलें । आनंदानें जगचि डुले." बुवा आतां चक्क हुंदका देणार असें त्याला वाटलें, कारण त्यांचे शब्द तर अश्रूंनीं भिजलेच होते. बुवा पंधरवडा-महिन्यानें कथा सांगत. कुठेंहि. मुलें बसतील तेथें. धरणीमातेवर, आभाळाच्या निळ्या छायेखालीं देवाच्या हिरव्या चवऱ्यांच्या छायेंत.

" विशाल पवित्र हिमालयाच्या पायथ्याशीं गाढवाचीं दोन पिलें होतीं. एकाचें नांव माणिक ( मानेला उजव्या बाजूला हिसका ). दुसऱ्याचें नांव मोती ( आतां डाव्या बाजूला हिसका ). फार फार प्रेमळ. एकत्र हंसायचीं, एकमेकांच्या खांद्यावर खांदा टाकून खूप रडायचीं, मनें शुद्ध करून

च्यायचीं. असा जिव्हाळा, तसा जिव्हाळा. फार प्रेमळ, गोजिरवाणी, अगदीं तुमच्यासारखीं..."

आणि या असल्या गोष्टी कुणापुढें ? तर घरीं, पुस्तकांत, फक्त सेन्सॉर-शमनार्थच वस्त्रार्थे किंचित् चड्डी घातलेल्या अमेरिकन नटींचे पौष्टिक फोटो ठेवणाऱ्या पोरांपुढें !

घरीं शास्त्रीबुवांना सात आणि दहा वर्षांच्या दोन सुरेख मुली होत्या. जाईजुईसारख्या त्या अगदीं नितळ, स्वच्छ हंसायच्या, आणि सदां हंसायच्या. बाहेरून आल्यानंतर त्यांना दारांत पाहिल्यावर कुणालाहि एकदम ताजेंतवानें वाटावें. पण त्या बाकीच्या मुलींत मिसळतांना फाटक्या कपड्यामुळें शरमून जात. सुधानें एक दिवस त्यांना घरीं चहाला बोलावलें तर एक कप चहाच्या उपकाराखालीं त्या अगदीं दडपून गेल्या. लाज लाजल्या. पण त्यांना कधीं शास्त्रीबुवांनीं जवळ घेऊन गोष्टी सांगितल्या नाहींत. कारण काय, तर देशासाठीं झिजणाऱ्याला बायकामुलें, खासगी आयुष्य कांहीं नसतें. आठ-दहा वर्षें झालीं त्यांना, पण त्यांना अलीबाबा, अल्लादीन हीं नांवें माहीत नव्हतीं, अंगावरील काडी झटकून टाकावी त्याप्रमाणें कवचकुंडलें देऊन टाकणाऱ्या कर्णाची हकिगत माहीत नव्हती, कमळाप्रमाणें जमिनींतून वर आली, आणि विजेप्रमाणें भूमींत गेली, त्या सीतेचा जीवनवृत्तान्त त्यांना ठाऊक नव्हता. आपली छोटी मुलगी जयू हिच्या गालाला अतिशय आकर्षक खळी पडते, तिचें हंसणें ओठांवरच न राहतां तिचे गालहि हंसतात हें तरी बुवांना माहीत होतें कीं नाहीं कुणास ठाऊक. आई व मुली सारख्या पत्रावळी लावीत, पडलेंसडलें काम करीत. जुने कपडे मिळवीत. नव्या नव्या पिशव्या, छत्र्या घेऊन शाळेला जाणाऱ्या मुलींकडे अविश्वासानें हेव्यानें पहात. शास्त्रीबुवांना नोकरी नव्हती क्लबमध्यें पस्तीस रुपयांची पार्ट-टाईम कारकुनाची नोकरी त्यांना मिळाली असती. पण तेवढा वेळहि त्यांना पस्तीस रुपड्यांसाठीं व्यर्थ जावा असें वाटलें नाहीं. पण दत्तूला वाटलें, बुद्ध ख्रिस्ताला मानवी जीवन बदलतां आलें नाहीं. तें महत्कार्य जरी बुवांनीं करून दाखवलें, तरी त्या दोन मुलींच्या शरमेमुळें ते कायम गुन्हेगारच ठरतील.

"उद्यां मी जी कथा सांगणार आहें," बुवा सांगत होते, "ती

आहे एका फेरीवाल्याची. मोठ्या दुकानांतून माल घ्यायचा, गल्लोगल्लीं हिंडून विकायचा. अत्यंत सज्जन, दरिद्री, पण सोन्याच्या मनाचा–पण त्याला नांव काय द्यावें हें मला समजेना. नांव कसें असावें, तर संस्कृतप्रचुर गंगाकांठचें, कन्याकुमारीच्या छायेंतलें—"

चिकट गुळाच्या ठिपक्याप्रमाणें शब्द ठिपकत होते. एका अजस्र चिकट कोळ्याच्या जाळ्यांत सांपडल्याप्रमाणें दत्तूचें मन धडपडूं लागलें, अंग झटकूं लागलें. तो गुदमरूं लागला.

" हो, मग त्याला तुम्ही अग्निमित्र कां नांव देत नाहीं ? " त्यानें चिडून विचारलें.

" वा, छान आहे नांव ! " उत्साहानें पुढें सरकत बुवा म्हणाले, " पण एक नम्र प्रश्न. अग्निमित्रच कां ? "

" म्हणजे संस्कृतमध्यें अग्निमित्र म्हणून कुणी तरी मालविक्या आहे ना ? " जळजळीत डोळ्यांनीं त्यांच्याकडे पाहत दत्तू म्हणाला. बुवा गोंधळले व वरमले. दत्तूला वाटलें, आतां शेवटचा अंक येणार. बुवा उगाचच खोकणार. ( ते खोकले. ) आतां मान वेळावीत ते हंसणार— ( ते हंसले ) व शेवटीं दोन-चार रुपये उसने मागणार. बुवांनीं तीन रुपये उसने मागितले. रविवारीं मुलांना चणेचुरमुरे द्यायला. दत्तूच्या खिशांत एखाददुसरा आणा असेल-नसेल. उद्यां सकाळीं घरीं न राहण्याचें ठरवून त्यानें शास्त्रीबुवांना सकाळीं आठ वाजतां येण्यास सांगितलें, व आपली सुटका करून घेतली.

" तुम्ही अग्निमित्र म्हणालांत ना ? नांव छान आहे. बरं उद्यां आठ वाजतां येतों मी." जातां जातां तीनदां नमस्कार करून बुवा म्हणाले.

तो परतला त्या वेळीं क्लब-रूम रिकामी झाली होती. खालीं सिगरेटच्या थोटकांचा ढीग व टेबलावर अस्ताव्यस्त पत्ते. इतका वेळ निरनिराळ्या भावना धारण करून नाचणारे पत्ते आतां निर्जीव पडले होते. ना सुख, ना दुःख, ना अर्थ. प्रत्येकानें आपला अर्थ आपण पहायचा.

बाहेर आतां पावसाची सौम्य झिमझिम अंधाराच्या पाटीवरील गिजबिजाटाप्रमाणें सुरू झाली होती. केळकर कसाहि छत्री विसरून गेला. होताच. दत्तूनें ती छत्री उचलली, व तो एकटाच घराकडे चालूं लागला.

ओलसर रस्ता पडलेल्या सापासारखा चकाकत होता. त्यावरील दिव्यांच्या प्रतिबिंबाच्या वांकड्यातिकड्या रेषा सळकेच्या वेदनेप्रमाणें दिसत. मध्येंच मोटरींच्या लाल दिव्यांचा शिडकावा दिसे. निळसर ट्यूबलाईट आपला प्रकाश टाकी. त्यामुळें लाल-निळ्या जखमा मधूनमधून फुटल्या-प्रमाणें दिसत.

तो घरीं आला. छत्री बंद करून ती कोपऱ्यांत ठेवतो न ठेवतो तोंच मोहनचा हात धरून त्याला ओढीत आणीत सुधा बाहेर आली. नेहमींच्या तक्रारींचा खास अंक तयार होता. मोहननें शेजारच्या शिंपिणीला चिंध्यांची बाहुली म्हटलें होतें, व ती बोंबलत आली होती. नव्या शर्टावर त्यानें तळहाताएवढा शाईचा डाग पाडला होता व टारझन म्हणून कपड्यांच्या दोरीला लोंबकळतांच दोरी तुटून ढीगभर कपडे अस्ताव्यस्त पडले होते. व...

आपण तो लाल-निळ्या रंगाच्या जखमा अंगावर घेणारा रस्ता आहोंत. व आपल्यावरून माणसें पचक् पचक् पावलें टाकीत चाललीं आहेत असें दत्तूला वाटलें. त्यानें कोट खुंटीवर ठेवला व तेथेंच निर्विकारपणें तो खुर्चीत पसरला.

" पण बेबी कुठाय् ? " त्यानें त्रासिकपणें विचारलें. पत्नी, मुलगा, मुलगी. निदान येथें तरी चांगला सिक्वेन्स जमूं द्या ! दूर कुठें तरी रेखा अशीच पाहत बसली असेल.

" येतेय् ती. जेवायला बसलीय. " तितक्याच त्रासिकपणें सुधा म्हणाली. ती कांहीं तरी बडबडत होती. अखेर चुलीवर कांहीं तरी ऊतूं जातें म्हणून ती धपाधप पावलें टाकीत आंत गेली.

दिव्याकडे पाहत दत्तू स्वस्थ पडून राहिला. दिव्याभोंवतीं तीन-चार किडे चटचट आवाज करीत घिरट्या घालीत होते. समोरील कॅलेंडर जुनें होतें, त्यावरील बाईचें तारुण्य ताजें होतें. पण पातळाचा रंग विटला होता. कोपऱ्यांत वहाणांचा ढीग. भिंतीवरील गिलाव्याच्या खपल्या उडाल्या होत्या. खिडकीचें एक तावदान फुटलें होतें. समोरच्या चाळींत, भरगच्च आंब्यासारख्या दिसणाऱ्या इंदिरेच्या घरांत कुणी तरी आलें होतें. ती हातवारे करून बोलत होती. तिचा नवरा अद्याप टेलिग्राफ ऑफिसमधून

२००३५
आ. वा.
९१२
३-४-६१

आला नसेल. इंदिरा ! तो एकटाच राहत होता, त्या वेळीं तिच्या आसुसलेल्या नजरेनें त्याच्या अंगावर कांटा येत असे. पण तशीच कुठें तरी वासनेची ठिणगी धुपत राहत असे.

अखेर तो एक दिवस तिच्याकडे गेला. दुपारीं. तिच्या शुभ्र पुष्ट छातीवर त्याच्या शर्टाचीं बटनें रुतलीं. तिच्या गळ्यांत कुठल्या तरी संतबाबाचें चित्र असलेलें लॉकेट होतें. त्याचा तर पूर्ण आकार उमटला. दोन जळत्या वासनांच्यामध्यें अनासक्त संताची समाधि ! तिचा गळा फार सुरेख आहे, गोल, लिलीसारखा आहे, हाताचा स्पर्श होतांच क्रूरपणें कुसकरावा असें वाटण्याइतका आकर्षक आहे. त्याखालीं तीळ आहे, थोडासा जांभळसरच. त्या वेळीं तिचा नवरा कड् कट् कड् कट् करीत असेल. कीं तोहि...

दत्तूच्या मनावर शरमेचा बुरा आला. त्यानंतर तो तिकडे कधीं वळला नाहीं. लाथ मारून हांकललेल्या कुत्र्याप्रमाणें त्याचें मन त्या आठवणीकडून मागें वळलें. त्यानें टेबलावरून आजचें वर्तमानपत्र पुढें ओढलें. तें त्याच्याच-प्रमाणें चिंधी होऊन गेलें होतें. शेजारच्या माधवरावांनीं तें वाचायला नेलें होतें म्हणून तें तसें झालें होतें. त्यानंतर त्यावर बेबीनें पेन्सिलीच्या रेघा ओढल्या होत्या. पिंजऱ्यामागें जगानें आपल्या अंगाच्या एका भागावरील गोंदणीं उघडीं केलीं होतीं.

एका कामगार बाईला तिळें झालें होतें. पाहिजे. योग्य माणसाला तीन आगाऊ इन्क्रिमेंट्स्. अर्जेंटिनांत अपघात होऊन शहाण्णव माणसें मेलीं. प्रिन्सेस मार्गारेटनें लग्नाचा विचार पुढें ढकलला. आकर्षक चेहरा, आकार. पण पुढें टाकलेलें गवत खाणारें मन. पांढरे डाग कायमचे जाण्याचें औषध. कमरेंत आतां कांकडीसारखी मोडते कीं काय असें वाटणाऱ्या नटीचें चित्र देऊन नृत्यसंगीताचा आदर्श कुटुंबपट. भोकरवाडी ( बुद्रुक ) येथील रहिवाशांतर्फें परळ येथें सत्यनारायण. तलावांत तरंगणारें नुकतेंच लग्न झालेल्या तरुणीचें प्रेत. पोलीस तपास चालू आहे...दत्तू त्यांत कशांतच गुंतेना. त्यानें वर्तमानपत्र खालीं टाकलें, व विमनस्कपणें, टेबलाखालीं पडलेला तेलकट कागद उचलला. म्हणजे आज कोपऱ्यावरील दुकानांतून

बाईसाहेबांनीं पूर्ण मिरच्या असलेलीं भजीं आणवलीं होतीं तर ! आणि आपणाला एकहि नाहीं.

" सुधा, ए सुधा—" तो मुकेनें किंचाळला, पण आंतल्या गोमगाल्यांत कुणाला कांहीं ऐकूं गेलें नाहीं. तो तेलकट कागद कुणाला तरी आईकडून आलेलें पत्र होतें. " आतां पाणी ओढण्याचे श्रम होत नाहींत. तेव्हां दोन-चार रुपयांची मदत करीत जा.—"

मिरचीभजीं विकणारी बाई मोठी टंच आहे. पिवळ्या जर्द इरकली खणाची चोळी घालून जाणाऱ्यायेणाऱ्याकडे पाहत ती पाचकळ हंसते. साधव ज्यूलियनच्या शैलीसारखें जिवंत चढ-उताराचें शरीर तिनें खुशाल शोरूममध्यें ठेवलें आहे. दोन आण्यांचीं भजीं घेतांना धुवट कपड्यांतील चिप्पाड मनें रेंगाळत, जवळ मोड असतांहि उगाचच नोटा मिरवीत, व जास्तच हावरीं होऊन फिरत. पण पाणी ओढण्याचे श्रम न होणारी ही आई कोण ? तिचा चेहरा आपल्या आईसारखा असेल ? गालांवर एवढासा डाग, कपाळावरील कुंकू गेल्यानें उघडी पडलेली गोंदण्याची हिरवी जखम घरांत धुणेंभाडीं करून खरबरीत झालेलीं बोटें. तिला असलें पत्र पाठवण्याचा प्रसंग आला नाहीं. आपण मिळवते होण्याच्या आंतच ती अशक्तपणें खोकत निघून गेली. तिचा खरबरीत हात, आपल्या हातांत भज्यांचा कागद, भजींवाली, तिचें रानवट. ताणलेलें शरीर...

आपण आश्रयासाठीं झाडाखालीं बसलों आहोंत पण थेंब ठिबकूनच अंग भिजत आहे असें त्याला वाटलें. इतके पत्ते आपल्यापुढें पडले. त्यांतून काय आकृति काढायची ?

सगळे पत्तेच, सगळीं माणसेंच ! इसेक्स जहाज बुडाल्यावर बाराशें मैलांच्या प्रवसांत लाइफबोटमध्यें कॅप्टन एकेकाला मारून त्याचें रक्त पिऊन स्वतः जगतो, तर टिटॅनिक बुडतांना एक म्हातारा खलाशी आपल्या कुत्र्यासाठीं माघारीं येतो, व कुत्र्याबरोबर बुडून मरतो. किरकोळ भांडणांत मुलगा जन्मदात्या आईच्या जिव्हारीं लाथ मारतो, बहीण भावाचा विश्वासघात करते. तर सिडनी कार्टन कुणाच्या तरी साठीं स्वतः मरतो. डेस्डेमोनाचा दीप अंथरुणांत विझतो, आणि वासंती नायलॉनचें पातळ लयींत हालवीत हंसत निघून जाते. एखादी वेडी पतीच्या मृत्यूनें छातींत सुरी खुपसून घेते,

तर दुसरी चेंगरलेल्या स्तनांच्या मध्यें लॉकेट रुतवून घेते. एकजण तारुण्यांतील एका आठवणीवर आयुष्याला धार लावीत बसतो, तर दुसरा चौदाव्यां दिवशीं बोहल्यावर चढतो. मालकंसाचा भव्य विस्तार, मोटारीखालची किंकाळी, बाळंत होत असतांनाचा आक्रोश, विमानहल्ल्याचा मन फाडणारा आवाज, चुंबनाचें चुटुकसंगीत, प्रेत बाहेर नेत असतांनाची कालवाकालव. सारीं माणसेंच, सारे माणसांचे आवाज! रशिया-जर्मनीमध्यें कँपमध्यें ब्रेडच्या तुकड्यासाठीं एक तरुणी पंधरा जणांना जाहीरपणें शरिराचें दान करते. दान घेणारीं व देणारीं माणसेंच. दारांच्या फटींत बोटें घालून कडाकडा चिरडणारीं, नखाखालीं टांचण्या खुपसणारीं! बेलसेनमध्यें कैद्यांना जिवंत जाळणारीं माणसेंच. हिरोशिमामध्यें अपंग झालेलीं हजारों माणसें—व तो प्रसंग त्यांच्यावर आणणारीं! आपलें मांस कपोतांना देणारा शिबि, आणि नरमुंडांचा गोपूर रचणारा तैमूर! क्रूसावर हातांपायांत खिळे ठोकल्यावर वेदनेनें Eloi, Eloi असे उद्गार काढणारा ख्रिस्त, आणि त्याच क्रूसाखालीं त्याचे कपडे कुणाला मिळावे यासाठीं कवड्या खुळखुळवणारे पहारेकरी—दोघेहि माणसेंच! या साऱ्याच बिंदूंना छेदून जाणारें तें विशाल वर्तुळ तरी कोणतें! सगळा माणूस तरी जाऊं दे, पण त्याच्या नुसत्या पावलांविषयीं देखील हीच गत आहे. त्याचा पूर्वज दिनोसॉर याचें चौपन्न इंच लांबीचें अजस्र पाऊल, बुटक्या ओबडधोबड पावलांचा तूलो लॉट्रेक्, सारें शरीर अमर करून घोट्यांतच रात्रंदिवस मृत्यु बाळगून ठेवणारा ॲकिलिस, आणि गिझेलची नृत्यरम्य कहाणी सांगणारी युलानोव्हाची कबूतरासारखीं पावलें!

या सगळ्यांना एकत्र अणणारी, त्यांत जीव भरणारी ही विश्वाची नाडी तरी कोणती आहे? त्यांत सिक्वेन्स कोणता? दैनंदिन आयुष्यांत अनुभवाची रास पडते, त्यांना कोणत्या आकृतींत बसावयाचें? खेळण्याचे नियम माहीत नसतां खेळायला कोण बसवतें? आणि हें सारें विचारायचें तरी कुणाला? देवाला?

...देवानें नंतर मूठभर माती घेतली...मिशन स्कूलमध्यें असतांना बायबल वाचणारे मास्तर दत्तूला आठवले...माती घेतली व त्यांत प्रभूनें स्वतःचा श्वास मिसळला, आणि त्यानें स्वतःची प्रतिमा तयार केली. स्वतःची प्रतिमा? राग, लोभ, द्वेष, वासना हीं मग सारीं त्याचींच का प्रतिबिंबें?

हात्तिच्या ! मग आपण त्याला उगाचच घाबरत होतों. मग त्याचा तरी मोठेपणा कशांत आहे ? मग आम्हांला शिक्षा तरी कां किंवा शाबासकी तरी कसली ? काळे तांबडे पत्ते आपणच निर्माण करून कांहीं बदाम एक्याला मानाची पदवी देऊन इस्पिक गुलामाला फांशीं देत नाहीं ! छट्, प्रतिमा बितिमा सारें झूट !—दत्तू चिडून म्हणाला. सगळा आंधळा, सिकेन्स न देणारा वेडा डाव ! त्या महारोग्याच्या बोटांसारखा !

उलट देवाला आम्ही आमची प्रतिमा बनवली ! आमच्या मनाचे अनेक पापुद्रे सोलून काढून एक बुजगावणें तयार केलें ! तो आहे म्हणून आम्ही जगत नाहीं, आम्ही आहों म्हणून तो जगतो. आणि आम्हीच निर्माण केलेले ते सद्‌गुण, तें धर्मशास्त्र, तें नीतिशास्त्र ! सारीं दैनंदिन सुरक्षित जीवनाच्या परसांत लावलेलीं वीत-वीतभर रोपटीं. त्या भिंती पडून परिस्थितीचें क्षितिज वाढूं द्या. मग विश्वामित्र कुत्र्याची तंगडी चघळतो. मुलगा बापाला मारतो, कातडीं मऊ करण्यासाठीं सतत दांत त्यावर घांसल्यानें दातांचे खुंट राहिलेल्या म्हतारीला एस्किमो खुशाल बर्फांत टाकून पुढें जातो. आणि जिवलग मित्राचा विश्वासघात करून, माणूस कातडें कोरें ठेवतो. हौदांत पाणी थोडें आहे, तोंवर ठीक आहे, पण तेंच तोंडापर्यंत आलें कीं माकडीण पिलांवर उभी राहून स्वतःचा जीव बचावते हें बिरबलालाहि माहीत होतें. सारे सद्‌गुण, नियम, सारें कांहीं ' अदर कंडिशन्स रिमेनिंग द सेम... ' मग गुन्हेगार कोण, फिर्यादी कोण ? आणि न्यायाधीश तरी कोण ? सर्वश्रेष्ठ न्यायाधीश तर आपल्या वशिल्याचा, आपल्या आधारें जगणारा ! कीं आपण सारेच जण एक अनिवार्य विशाल शिक्षा भोगणारे गुन्हेगार आहोंत ? आपण आपल्या कल्पनेनें यमयातनांचा नरक निर्माण केला. आपण हावऱ्या विश्वासघातकी, दुष्ट माणसांना तेथें पाठविलें. माणसें जळत आहेत, चिरलीं जात आहेत, उकळत्या तेलांत टाकलीं जात आहेत. ही त्यांना आमची धार्मिक शिक्षा ! कुणास ठाऊक, या इथेंच आपण सारेजण दुसऱ्या जगांतून हांकललेले गुन्हेगार नसूं कशावरून ? मग तक्रार कसली, न्याय कसला, आणि अन्याय तरी कसला ?

दत्तूला एकदम आपल्या वडिलांची–दादांची आठवण झाली. घरून करून आणायला सांगितलेलें उदाहरण जर सुटलें नाहीं, तर दत्तू त्यांच्या

मांडींत डोकें खूपसून हुंदके देत बसे. त्यामुळें उदाहरण सुटत नसे; उदाहरण गेलें खड्डयांत, त्याचें उत्तर आलें काय न आलें काय, असा मोकळेपणा वाटत असे. आजहि त्याला दादांची फार गरज वाटली. दादा शाळेंत मास्तर होते. त्यांच्याकडून तीस वर्षांत एकहि विद्यार्थी नापास झाला नाहीं. त्यांच्याकडून नापास होणारा विद्यार्थी जगांत कुठेंच पास होणार नाहीं अशी त्यांची ख्याति ! परीक्षा झाली कीं रडक्या चेहऱ्यांच्या मुलांनीं सोपा भरून जात असे. काळ बदलला, परंतु त्यांच्यांत बदल झाला नाहीं. तांदूळ रुपयाला दोन शेर झाले, परंतु भिकाऱ्यांसाठीं सोप्याला ठेवलेला तांदुळाचा डबा हलला नाहीं. कोणत्याहि तऱ्हेचें व्यसन न लावून घेतां त्यांनीं पै न् पै शिल्लक टाकली. आणि तो पैसा घेऊन प्रत्यक्ष भावानें त्यांना बुडवलें, पण विषाचा एक थेंबहि त्यांच्या आयुष्यांत उतरला नाहीं.

" तो पैसा आपला नव्हताच म्हणायचा, दत्तू. " तेच उलट दत्तूला समजावीत. " आपण जेवायला बसतों, एक घांस उचलतों. पण त्यांत खडा, केस दिसतो. झालं, तो घास आपला नव्हेच. "

दत्तू व त्याचा मित्र नारायण गोरे दोघेहि पहिल्या वर्षीं मॅट्रिकला नापास झाले. गोरेला त्याच्या बापानें खुर्चीच्या रुळानें बडवलें. दादांनीं मात्र दत्तूला जवळ घेऊन आपल्या हातांतील घड्याळ त्याच्या हातावर बांधलें.

" होशील रे पास. या वर्षीं नाहीं तर पुढल्या वर्षीं. "

त्यांनीं साऱ्या आयुष्यांत कधीं कुणाला कठोर शब्द वापरला नाहीं, कीं कुणावर हात टाकला नाहीं.

फक्त एकच प्रसंग सोडून. घरासमोरील सद्या परीट लालभडक पळीनें, आपल्या लहान, भेदरून गेलेल्या मुलीला डागणी देत होता तो प्रसंग सोडून. त्या वेळीं दादा हरिमंदिराकडून येत होते. हातांत नेहमींची पांढऱ्या कापडाची छत्रीहि नव्हती. त्या पळीकडे पाहातांच संतापानें त्याचें अंग थरथरूं लागलें. त्यांनीं अंगावरील उपरण्याचाच पिळा केला, व आपल्या वयस्क दुबळ्या हातानें ते सद्याला मारूं लागले ! त्यांचें मरणहि बेलाचें पान गळावें त्याप्रमाणें झालें. ते नेहमींप्रमाणें संध्याकाळीं गणपतीकडून येत होते. पण तेथून पांच-दहा पावलांवरच ते खालीं पडले. बाजूला नातलगांपैकीं कुणी नाहीं. कुणाला त्रास नाहीं. त्यांना घरीं आणलें

त्या वेळीं त्यांचें उपरणें कुणीं तरी उचललें होतें, शर्टांचीं चांदीचीं बटणें नाहींशीं झालीं होतीं, आणि कधीं कुणाच्या द्वेषाचा ओरखडाहि नसलेली त्यांची अशक्त छाती उघडी पडली होती. शेवटीं तेथेंहि त्यांनीं म्हटलें असेल, " दत्तू, तीं बटणं माझीं नव्हतींच म्हणायचीं. "

या जगांत राहून, याच आयुष्याचें ओझें स्वीकारून, त्यांनीं कसें आपलें मन न विरजतां ठेवलें, आणि आपलें उत्तर मात्र असें वेडपट आलें ? दत्तूला वाटलें, आपण पुन्हां लहान व्हावें, दादांना खेटून बसावें, त्यांच्या जानव्यांतील रुद्राक्षाशीं खेळावें. मग जगांतील सारीं उदाहरणें, खुद्द जगाचेंच प्रचंड गोल उदाहरण, गेलीं खड्डयांत.

त्यानें पुन्हां उगाचच वर्तमानपत्र उचललें. पण तें इतकें चुरगळून गेलें होतें कीं, कुणालाहि वाचावेंसें वाटलें नसतें. तो माधवराव महाकंजूष. मधुमेह झाला तर किती साखर फुकट जाते याचा हिशेब ठेवणारा, दररोज एक आणा टाकून स्वतःचें वर्तमानपत्र घ्यायला काय झालें आहे ? वेळीं अवेळीं येतो; ' मोहन, अमुक आहे ? वैनी, तमुक आहे ? ' म्हणून विचारीत त्रास देतो.

माधवराव आपल्या अपरोक्ष येऊन जातो ! दत्तू एकदम कावराबावरा झाला. मरगळलेल्या मनावरील पिसें एकदम फिस्कारलीं. जर त्याला फक्त वर्तमानपत्रच हवें तर तो आपण असतांना कां येत नाहीं ? तो उतावीळपणें सुधाला हांक मारणार तोंच पदराला हात पुशीत तीच बाहेर आली. अजूनहि त्या पदराला कोथिंबिरीची काडी चिटकली होती व एका ठिकाणीं पीठ उडालें होतें. दत्तूनें तिच्याकडे निरखून पाहत विचारलें, " दुपारीं माधवराव आले होते वाटतं ? "

" तर काय ! दररोजच येतात, " हात झाडीत ती त्रासिकपणें म्हणाली, " येतात, उगाच तास न् तास बडबडत बसतात. "

काय बोलतो बरें तो इतकें ? कीं सुधा नाटक करीत आहे ? ती आपणाला फसवीत आहे असें जरी त्याला खात्रीनें वाटलें असतें तरी एका परीनें बरें वाटलें असतें. पण नाहीं. त्याला कांहींच अंदाज लागेना. तो जास्तच चिडला.

" काय ग, तुझं लॉकेट आहे का एखादं ? " त्यानें विचारलें.

" लॉकेट ? " सुधानें गोंधळून विचारलें, " कसलं लॉकेट ? " मग ती एकदम हसली. शास्त्रीबुवांच्या जयूसारखें स्वच्छ हंसली. तिच्या आयुष्यावरून वीस-बावीस वर्षें गळून पडलीं, व क्षणभर तिच्या चेहऱ्यावर झळझळीत घांसलेल्या भांड्याची कळा दिसली. " म्हणजे मला एक लॉकेट घेणार कीं काय या खेपेला ? बेबीला इयररिंग्ज, मोहनला सांखळी झाली. मग घ्यायचंच असलं तर त्या इंदिराबाईसारखं घेऊं. उघडतां येतं ना, तसलं ! "

" मग आंत कसला तरी फोटो ठेवतां येईल, " नाटकांतल्या प्रॉम्प्टर-प्रमाणें दत्तू सुचवूं लागला.

" म्हणजे, हो ! आंत कसला तरी फोटो ठेवतां येईल. "

" कुठल्या तरी देवाचा, संतबाबाचा,—"

" तें काय करायचं घेऊन तुम्हांला कुणाचा फोटो तें ? " ती खोडकर-पणें म्हणाली. " चला आतां जेवायला. एकदां तरी उजाडायच्या आंत पडूं दे मला. "

तो निर्जीवपणें उठला. आपण शिकारी कीं शिकार हें त्याला समजेना. वेदना ठसठसत होती. पण तिचें मूळ बोटांना लागेना. तिच्या मनसोकळ्या चेहऱ्यावर अविश्वास दाखवावा असेंहि त्याला वाटेना. तूंच स्वतः आहेस भाबडा, मूर्ख, बेअकली—तो पुटपुटला. त्यानें केळकरची छत्री उचलून कोंपऱ्यांत फेकली, त्यालाहि एक शिवी हांसडली, व शर्ट न काढतांच तो पाटावर येऊन पडला.

जेवण कोंबून तो अंथरुणावर पडला खरा, पण नजरेसमोरची भुतावळ स्थिरावेना. एकाकी मुलीचा चेहरा, बैलाच्या पाठीवरचें आवाळूं, भिकार-णीचें पोट, बहिणीला लागलेली लाथ, मांडीवरील डागलेला डाग...कोण खुळखुळून टाकतें या कवड्या ? कां ? कशा ? केव्हां ? कुठें ? आणि या प्रश्नांना जर उत्तरें नाहींत, तर हे प्रश्न तरी नागफण्याप्रमाणें कां निष्कारण उभे राहतात ? अनुभवांच्या पायऱ्या चढत चढत वर निळ्या आभाळाच्या छत्रीखालीं चिरंतन ज्ञानाचें स्मित घेऊन बुद्धाप्रमाणें रहावें. किंवा कांहींच समजलें नसल्यामुळें सदा हंसणारी छोटी जयू व्हावें. मला रस्त्याकडेचा दगड कर, म्हणजे साऱ्या सुखदुःखाची लाट निर्विकारपणें वरून जाऊं

देईन. किंवा गणपतनानांची चालू क्षणांतच जगण्याची धुंदी हवी. मागें प्रेमानें, दुःखानें पहाणें नको. समोर भविष्यांत आशेचा गळ नको. बिन-तक्रार गाडी ओढणारा बैलदेखील व्हावें. पण हें अर्धवट, दुबळें, माणसाचें आयुष्य नको. साऱ्या प्रश्नांचें या अंधारांत कुठें तरी स्विच आहे. तें तरी हाताला लागावें, किंवा हे सारे प्रश्न तरी चिरडून टाकावेत. फक्त साधा, जाड कातडीचा, नुसतें जठर व मोठें आंतडें असलेला प्राणी कर. आपण सारीं माणसें ! आपल्या क्षुद्र बुद्धीनें या प्रश्नांचीं उत्तरें शोधण्याची घमेंड बाळगणारे. अंगुस्तानचें रहाटगाडगें करून पॅसिफिक उपसणारे. खेळांतील घड्याळाचे कांटे फिरवून रेडिओच्या संगीताची वाट पाहाणारे. हातावर एखादें झगझगीत नाणें पडतें काय, याची वाट पहात लाल गुलमोहोरा-खालीं बसलेलीं, आंधळ्या, चांचपडणाऱ्या बोटांचीं माणसें !

दत्तूला तर लहानपणापासूनच कसलींच उदाहरणें सहज सुटलीं नाहींत. इतक्या वर्षांनंतर तरी आपल्याला काय समजलेंय् ? भारतीच्या हनुवटीला हात लावतांच ती खुदकन् कां हंसत असे हें शेवटपर्यंत समजलें नाहीं. हॅटला चार भोकें कां असतात, कोटाच्या अस्तनीला बटणें कां, हवेंत जन्मणाऱ्या पारंब्या वेध घेत जमिनीकडे येतात, व जमिनीवर फुटलेल्या अंड्यांतून बाहेर पडणारे पक्षी पहिल्या शक्य क्षणीं वर धांव कां घेतात, चार मळक्या बिया मातींत टाकल्या कीं त्यांतून लाल निळ्या रंगाचीं ॲस्टर फुलें कशीं येतात, मधमाशीला पोळें बांधतांना एकच आकृति कशी माहीत असते, किलिमांजारोवर वाघाचें प्रेत कुठून आलें, अश्वत्थामा सध्यां कुठें भटकतो आहे, अगदीं पहिलें मूल जन्माला आलें, त्या वेळीं त्या पहिल्या आईबापांच्या भावना काय होत्या, ऑरोरा बोरिॲलिस म्हणजे काय, एक सूक्ष्म क्षण फुलांना गंध देतो, दुसरा कॅन्सरमध्यें मांसांत मृत्यु खोल पेरीत जातो, कसें ?...

सगळा नुसता वांझोट्या, म्हाताऱ्या प्रश्नांचा जनानखाना. आणि आपलें दुबळें मन कंचुकीप्रमाणें त्यांच्या चेहऱ्याकडे पाहत निष्फळ हिंडतें. वी आर् द हॉलो मेन्, वी आर् द स्टफ्ड मेन्...

या साऱ्या जंजाळापेक्षां रे-मार्टिनचें ग्रामर, बर्मिंगहॅम, शिकवण्या परवडल्या. लठ्ठ, लड्डू बायकांचे चित्रपट, दर मासिकाचें मुखपृष्ठ म्हणजे

कुंटणखान्याची खिडकी करणाऱ्या चित्रकाराचीं रंगानें राडेराड झालेलीं चित्रें पतकरलीं व आचरट, ‘दूध घालतांना गवळी मालकिणीचे स्तन करकचतो,’ असल्या हकिकती सांगणारीं मस्ती-रतीवालीं मासिकें चालतील. रेन-मार्टिन टेबलावर, मासिकें उशीखालीं, चार मिनाराचीं थोट्कें जमिनीवर ही ठिकठिकाणची माती गोळा करायची, व त्या नखाएवढ्या उबदार घरट्यांत कुंभारकिड्याप्रमाणें सुखी राहाचें. बस्स! या साऱ्या धडपडीत हें क्षुद्र समाधान. ही इतिश्री. चार पानें आंकडेमोड करून उत्तर काय? तर X = 0

दत्तू उगाचच चिडला, अस्वस्थ झाला, व त्यानें रागानें दिवा घालवला.

बराच वेळ तो पोकळ, पेंढा भरलेल्या अंगानें पडून होता. उद्यां सकाळीं पुन्हा शिकवणी. तींच पोरें, तेच चेहरे, डायरेक्ट-इन्डायरेक्ट, अनॅलिसिस...

तो चमकला. आंत कुठें तरी नाणें फरशीवर पडलें. सारें शरीर जिवंत झालें. उद्यां एक तारीख. उद्यांपासून तो अतिशय हुशार जाधव आणि लीला कामत शिकवणीला येणार. तो खुलला. स्वतःशींच थोडा हंसलाहि. मग उद्यां ती बालकवीची ‘औदुंबर’ हीच कविता सांगावी. पुन्हां ऐल-तटावर पैलतटावर हिरवाळी घेऊन तो निळासांवळा झरा वाहूं लागला. चार घरांचें गांव चिमुकलें जागें झालें. त्या तंद्रींत त्याचे डोळे जडावले. जीवनासक्तीचे धागे इतका वेळ बाजूला उभे राहून सारा खेळ पाहत होते, ते पुढें आले, व त्यांनीं त्याला गुरफटून टाकलें. सुटण्याची इतकी धडपड करूनहि पुन्हां उद्यांवर विश्वासून तो त्या जाळ्यांत अंग आंखडून झोंपला. जडावलेले डोळे मिटण्यापूर्वीं त्याला क्षणभर शाळेंतील मुंग्यांची लांबलचक रांग दिसली. चिरडलेल्या मुंग्यांभोंवतीं क्षणाची खळबळ. पण पुन्हां काळा—पांढरा ठिपका. काळा, पांढरा, काळा—

आणि त्या लयींत त्याचा दिवस संपला!

* * *

सत्यकथा, ऑगस्ट

# बावी

**गोखले अरविंद**

मैत्रिणी अगर शाळेंतल्या मास्तरणी आल्या तर कांदेपोहे करतां येतात, वर्गांतल्या मुली आल्या तर आणून ठेवलेलीं बिस्किटं किंवा शेजारच्या वाड्यांतलीं बकुळीचीं फुलं देतां येतात, मावसभाऊ धुमकेतूसारखा अचानक उपटला तर चहाच्या जोडीला कोपऱ्यावरून सिगरेटचं पाकीट मागवतां येतं, पण जिवलग मैत्रिणीचा नवरा प्रथमच येणार असला तर यांपैकीं अगर यावेगळं काय करायचं? सुधाचे यजमान भेटायला येणार म्हणून काशीची एकच धांदल उडून गेली होती. शनिवारची सकाळची शाळा संपवून ती घरीं आली तेव्हां 'बाळासाहेब कॉन्फरन्सला सोलापुरास गेले आहेत, शनिवारीं दुपारीं तीनचे सुमारास तुझ्याकडे जायला त्यांना मीं बजावलं आहे—' अशा अर्थाचं सुधाचं कार्ड तिला मिळालं अन् थरथरत्या उत्कंठेनं ती वेडीपिशी झाली. पत्र हातांत धरून तिनें आरशांत स्वतःकडे व खोलीभर पाहिलं. आपल्या अवताराची, आपल्या छोट्या बिऱ्हाडाची, तिला लाज वाटली. अकरा वाजले होते व बाळासाहेब यायला जेमतेम चार तास होते. हातांतला पेपरांचा गठ्ठा तसाच टाकून तिनें पदर बांधला, केरसुणी उचलली व अगदीं आढं झाडण्यापासून साफसुफीला सुरुवात केली.

सुधा तिची अगदीं जिवाभावाची मैत्रीण होती. शाळेंत असल्यापासून दोघींची ओळख; पण खरी मैत्री वाढीला लागली ती एस्. टी. सी. च्या

वर्गांत व विशेषतः सोलापूरला नोकरी लागल्यावर दोघींनीं मिळून बिऱ्हाड केलं तेव्हां. तीनएक वर्षं दोघी एका शाळेंत शिकायला जात होत्या नि एका खोलींत राहात होत्या. एकमेकींसाठीं स्वैंपाक करावयाचा, पेपर्स तपासायचे, झोप आली नाहीं तर जाग्रणं करायचीं, मनांतलं खुपणारं सुखवणारं सारं एकमेकींना सांगायचं . अशा जिवलग सखीच्या पतिराजांचं स्वागत करणं आपलं परम कर्तव्य आहे ह्या भावनेनं काशी झटत होती. सगळी खोली तिनें नीट लावून टाकली. वह्या-पेपरांचे गठ्ठे व कपडयांचे बोळे पलंगाखालीं दडवले. शेल्फवरचीं पुस्तकं झटकलीं. भिंतीवरच्या तसबिरी पुसल्या. कृष्ण-गोपींचं उत्तान कॅलेंडर काढून टाकलं. सुधाचे नि तिचे चार-पांच फोटो एका फ्रेममध्यें बसवले होते. ती फ्रेम पलंगासमोर टांगली. पलंगावर परीट-घडीची 'सुखस्वप्नें' विणलेली चादर पसरली. पोह्याचं सामान व बिस्किटांचा पुडा आणून टाकला. शेजारून चहाचा नवा सेटहि आणून ठेवला. सिगरेट? बाळासाहेब सिगरेट ओढतात कीं नाहीं तें तिला ठाऊक नव्हतं. लग्नांत पुरुषमंडळी सारखी पानतंबाखू खात होती व सिगरेटी ओढीत होती. पण बाळासाहेबांना हीं व्यसनं आहेत कीं नाहींत, हें काशीला नक्की आठवेना.

फुलदाणींत फुलं रचलीं. बकुळीच्या फुलांचा ढीगहि टीपॉयवर आणून ठेवला. घडयाळाच्या घायकुती कांट्यांकडे पाहत काशी एकेक उरकत होती. खोलीला अधिकाधिक उजळा देत होती. सुधाच्या लग्नाला सहा महिने होऊन गेले होते. सहा महिने काशीनें एकाकीपणीं, बिऱ्हाडांत एकटीनं काढले होते. एकटंच शाळेला जायचं, एकटीचाच स्वैंपाक करून एकट्यानं जेवायचं, खोलींत एकटंच राहायचं. सुधाला नि बाळासाहेबांना सोलापूरला येऊन जायला तिनें खास आमंत्रण दिलं होतं. पण नव्या संसारांत रमलेल्या सुधेला पत्र लिहायलाहि सवड नव्हती. आज सगळा विरह, एकाकीपणा अंशतः कमी होणार होता. सुधा नाहीं तरी तिचा पति भेटीला येणार होता.

सगळं मनासारखं लागलं असं वाटल्यावर काशीला जेवायची आठवण झाली. एक वाजायला आला होता, पण अजून ती जेवली नव्हती. जेवणा-वर तिची वासनाच नव्हती. झांकून ठेवलेली पोळी-भाजी तिनें उघडून पाहिली व परत ठेवून दिली. बाळासाहेबांना पोहे आवडतील कीं नाहीं ह्याचीच काळजी तिला वाटूं लागली. सुधाला कांदेपोहे फार आवडतात.

घाईनें काशी न्हाणीघरांत गेली. सकाळीं स्नान झालं होतं तरी पुन्हा तिनें खांद्याखालून पाणी घ्यायला सुरुवात केली.

...बाळासाहेब सिगरेट ओढीत नसतील. पूर्वीं ओढीत असले तरी आतां त्यांनीं सोडली असणार. अन् कांदेपोह्यांची बशी पुढें येतांच बायकोच्या आठवणीनें ते खुलतील— गार पाण्याचा स्पर्श अंगाला होतांच काशीच्या मनांत विचार आले. कांदेपोह्याची बशी हातांत धरून नवऱ्याच्या पुढ्यांत उभी असलेली सुधेची मूर्ति तिला दिसली व कसलीशी कढत लाट तिच्या गार अवयवांवरून गेली. ‘ त्यानं सिगरेट ओढलेलं मला मुळींच रुचायचं नाहीं, काशी, मुळींच रुचायचं नाहीं...’ खिडकींतून बकुळीकडं बघत माना वेळावून म्हणणारी सुधा तिला आठवली. बोलल्यासारखं केल्याशिवाय ती राहणार नाहीं हें काशीला माहीत होतं. काशी स्वतःशींच खुदकन् हंसली व गार पाण्याचे तांब्याच्या तांबे अंगावर ओतूं लागली.

आरशापुढें ब्लाऊझच्या घड्यांची चळत घेऊन काशी उभी राहिली. कुठला रंग निवडावा, कळेना तिला. सगळेच ब्लाऊझ सुधाच्या आवडीचे होते. तिनेंच आपल्या पसंतीचीं कापडं नि फॅशन्स काशीसाठीं निवडल्या होत्या. चटणी रंगाचा ब्लाऊझ पाहिल्यावर बाळासाहेबांना काय वाटेल ? ह्या सहा महिन्यांत सुधाच्या आवडीनिवडी त्यांनीं आत्मसात् केल्या असतील कीं नाहीं ? सुधाच्या लकबी-लहरी काशी सांभाळीत असे; आतां बाळासाहेब तिच्या कलांनीं वागत असतील का ?

एकाएकीं काशी वेड्यासारखी आरशांत पाहूं लागली. चटणी रंगाचा ब्लाऊझ घातलेली सुधा तिला आरशांत दिसूं लागली. अन् मग कांहींच न ल्यायलेली सुधा आरशापुढें उभी असलेली तिला दिसली !...एका रविवारीं सुधाचं स्नान झाल्यावर काशी न्हाणीघरांत गेली; पण पाणी तापलें नव्हतें म्हणून तशीच बाहेर आली. खोलीचं दार नुसतं लोटून घेतलं होतं, त्यांतून तिनं आंत पाहिलं तों न्हाऊन आलेली सुधा आरशापुढें पदर न घेतां उभी असलेली तिला दिसली. आपलं टवटवीत, उन्नत शरीर ती आरशांत न्याहाळीत होती. सुधेची अनावृत आकृति काशीनें पाहिली; नि काशीला दाराशीं उभी असलेलं सुधेनं पाहिलं. दोघीहि लाजेनं लाल झाल्या...

तो लज्जित चेहरा, ते अनावृत उरोज, काशीला परत आठवलं, दिसलं अन् ती आरशांतून आरपार बघायचा यत्न करूं लागली. बाळासाहेबांना बघायचा यत्न करूं लागली. मांडव परतणं झाल्यावर फोटो काढण्याचे वेळीं सुधेच्या अंगाला रेलून उभे असलेले बाळासाहेब तिला आठवले. जिवलग मैत्रिणीचं अनावृत रूप बहुधा काशीनं एकटीनंच पाहिलं होतं. तें तिचंच गुपित होतं. अधिकारहि होता....आतां बाळासाहेब...

काशी जरा भांबावून—जरा भारावून पलंगाला टेकली. समोर कोच होतं. पूर्वीं त्या जागीं सुधाचा पलंग होता. सुधाच्या पलंगावरची चादर नेहमीं परीटघडीची असे. आपल्या पलंगावर कुणी बसलेलं तिला आवडत नसे. त्या कोचावर आतां बाळासाहेब येऊन बसतील. काशीनं घाईनं वेषभूषा आटोपली व ती गॅलरींत धांवली.

मैत्रिणीच्या नवऱ्याची इतक्या आतुरतेनं वाट पाहात उभं राहणं चांगलं कीं वाईट तें काशीला कळेना. ती तशीच उभी राहून रस्त्याचं वळण पाहूं लागली. तिला बाळासाहेबांना पाहायचं होतं, त्यांच्याशीं बोलायचं होतं. त्यांच्या डोळ्यांत साठलेलीं सुधेचीं सगळीं रूपं तपासायचीं होतीं. तिच्या जिवलग मैत्रिणीचे ते जन्माचे जोडीदार झाले होते. आतां सुधा काशीला सोडून त्यांच्या खोलींत राहात होती. काशीऐवजीं त्यांच्यासह अंगतपंगत करीत होती. दिवस बुडाला तरी दिव्याच्या आधारानं गप्पा मारीत होती...काय काय सांगितलं असेल तिनं ?—लहानपणीं गाई-म्हशींच्या मागं ती एकटीच रानांत गेली होती इथपासून लग्नाआधीं अपरात्रीं तिला एक वाईट स्वप्न पडे तिथपर्यंत सारं ?—जें जें ती दिवसा-दुपारीं व कधीं अपरात्रीं काशीजवळ बोलली तें सारं नवऱ्याच्या कानांत कुजबुजत असेल ?

उन्हाची तिरीप लागूं लागली म्हणून काशी घरांत आली. आपल्या खोलींत सुधेनंच संसार थाटला आहे असं तिला भासूं लागलं. आरशापुढें सुधा उभी होती नि तिला लगटून होते बाळासाहेब. फोटोफ्रेममध्यें सुधा नि बाळासाहेब हंसत होते. ते कोचावर बसले होते नि ती कांदेपोह्याची बशी घेऊन उभी होती. काशी जरा सुखावली—जरा बावरली. तिला भूक लागली. बाळासाहेब यायच्या आंत खाऊन घ्यावं म्हणून ती आंतल्या दोन खणी

स्वैंपाकघरांत गेली. तिच्या डोळ्यांपुढें रुखवत दिसूं लागलं. बाळासाहेबांना तिनं आग्रहानं वाढलं होतं. उखाणा सांगायला सुधेच्या पाठीं ती उभी होती. बाळासाहेबांचा होकार आला तेव्हां सुधा नि ती उत्तररात्रीपर्यंत बोलत होती. अन् करवलीच्या आविर्भावानं सुधेची सासरीं पाठवणी करतांना ती बाळासाहेबांना ' माझ्या सुधेला सांभाळा ' म्हणून म्हणाली होती... थोडीशी पोळी खातांच काशीचं पोट भरलं व डोळे पाणावले. सुधा जड पावलांनीं दूर गेलेली तिला दिसली. ती भरल्या मनानें दाराशीं आली, तों दारांत बाळासाहेब उभे होते !

" या— " दचकून काशी मागं सरली व स्वतःला सावरीत हंसून म्हणाली.

सुधेचा नवरा वेगळा दिसत होता. लग्नांत धोतर नि रेशमी सदरा घातलेले बाळासाहेब आतां सुटाबुटांत होते. किती तरतरीत व लहानखोर दिसत होते.

" सुधानं कार्ड टाकलं होतं ना ?—मला बजावलं होतं तुमच्याकडे जायला. अगदीं वेळ काढून आलों—" बाळासाहेब खोलीभर पाहत व हाशहुश् करीत म्हणाले, " या कॉन्फरन्सच्या गडबडींत विसरलोंच होतों—" नेहमींचीच संवय असावी तसे ते सरळ कोचावर जाऊन बसले.

पलंगाला टेकून काशी उभी राहिली. तिची छाती उगाचच धडधडत होती. परका पुरुष तिच्या बिऱ्हाडांत आजवर आला नव्हता. पण बाळासाहेबांना परकं कसं म्हणायचं ? ते सुधाचे यजमान होते. त्यांचा ह्या घरावर हक्क होता. ह्या कोचावर, इथल्या पुस्तकांवर, आरशांतल्या प्रतिबिंबावर. खिडकींतून दिसणाऱ्या बकुळीवर ! किती तरी दिवसांनीं घर भरल्यासारखं काशीला वाटलं. तिचा चेहरा उजळला. कौतुकानें ती म्हणाली,

" आमची सुधा ठीक आहे नं ? "

" तुमची ? " हातांतल्या टाइम्सनें वारा घेत बाळासाहेब हसले. " छान आहे कीं — तुमची खूप आठवण करते. तुमच्याबद्दल, ह्या खोलीबद्दल खूप बडबडत असते ती—"

काशी पलंगावर बसली. नव्या संसारांत सुधा आपल्याला विसरली नाहीं

ह्यानं हरखून गेली. उद्यां सुधा भेटली कीं आपल्याला एका बाजूला घेऊन ती नवऱ्याबद्दल सांगत सुटेल ह्यांत तिला शंका राहिली नव्हती.

अंमळ कुणी बोललं नाहीं. बाळासाहेबांजवळ सुधा पोपटासारखी बोलत असेल, पण काशीला त्यांच्याशीं काय बोलावं तें चटकन् सुचेना. अन् बाळासाहेब तर त्या कोचांत जुलमानं आणून बसवावं, तसं बसले होते.

" रात्रीची गाडी कितीची आहे हो ? " बाळासाहेब एकदम म्हणाले.

" जाणार आज ? " काशीनें चमकून विचारलं.

" हो. कॉन्फरन्सचं काम संपलं सकाळींच. इथें उन्हाळा कोण होतोय्. अन् गांवहि कसलं बकाल—" बाळासाहेब परत वारा घेत कंटाळल्या चेहऱ्यानें म्हणाले. शक्य असेल तर आत्तांच्या गाडीनें जायचीहि त्यांची तयारी होती. बायकोनें बजावलं होतं म्हणून ते काशीला भेटायला थांबले होते, एवढंच ! काशीला तें जाणवलं व तिचा विरस झाला. सुधाबद्दल दोघांनीं खूप खूप बोलावं असं तिला वाटत होतं पण ती नुसतंच म्हणाली,

" खायला करत्यें—"

" अहो, नको—आज पार्टी होती आमची. अगदीं भूक नाहीं—"

" कांदेपोहे—" काशी हंसून म्हणाली नि बाळासाहेबहि स्वतःला नकळत हंसले.

स्वैंपाकघरांत जाणाऱ्या काशीच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत बाळासाहेब ऐसपैस बसले. तीन दिवस हॉटेलचं खाऊन ते विटले होते. आतां घरचं खाणं नि तेहि कांदेपोहे—बाळासाहेबांना सुधाची तीव्रतेनं आठवण आली. सुधा खुषींत असली कीं कांदेपोह्याचा बेत करी. बाळासाहेबांना घास देई. बाळासाहेब खुलले; नि मग त्यांच्या ध्यानांत आलं कीं सुधेला स्वैंपाक शिकवला तिच्या मैत्रिणीनं. त्यांना पोह्यांची गोडी लावली सुधेनं नि सुधेला लावली काशीनं !

कोचांतल्या कोचांत ते सावरून बसले. कंटाळल्याची भावना जरा नाहींशी झाली व डोळे बारीक करून ते स्वैंपाकघराच्या दिशेनं बघूं लागले.

मधल्या दारांतून काशीच्या हालचाली अधूनमधून दिसत होत्या. बाळासाहेबांना वाटलं, काशी अगदीं अरबूज आहे. पुरुषी ! मग सुधा सारखं

'काशी काशी' करी त्याची केलेली थट्टा व त्यावरचं सुधाचं चिडणं त्यांना स्मरलं. सुधा काशीला फार मानते. दीड-दोन वर्षांच्या सहवासानं दोघी जिवलग मैत्रिणी झाल्या होत्या. लग्न होण्यापूर्वी परक्या गांवांत, सोबती-विना दोघींनीं एकत्र दिवस काढले होते. त्या वेळच्या किती तरी आठवणी सुधेनं बाळासाहेबांना सांगितल्या होत्या. त्या सगळ्या कहाण्यांत काशी होती. काशीचं आस्तित्व, काशीचं महत्त्व, बाळासाहेबांना अचानक आठवलं नि त्यांना एकदम विचित्र वाटूं लागलं.

आतां ते खोलीभर भिरभिरत्या नजरेनं पाहूं लागले. शेजारच्या टीपॉय-वर बकुळीचीं फुलं होतीं; नि त्यांच्या घरीं, सुधेच्या उशीखालीं बकुळीची माळ होती. इथलींच तीं फुलं. कदाचित् काशीनं माळलेलीं. दुरून येणारा बकुळीचा गंध हुंगीत सुधेनं कित्येक रात्रीं अकारण जागून काढल्या होत्या. जणूं बाळासाहेब भेटावेत म्हणून. आपल्यासाठीं घेतलेलं तें एक व्रतच बाळासाहेबांना वाटलं होतं. पण आतां त्यांना उमगलं कीं, त्यांची बायको आलोचन जागत होती तेव्हां सोबतीला होती ही मैत्रीण. ह्या समोरच्या पलंगावर काशी अन् कोचाच्या जागीं सुधा. ह्या कोचाच्या जागीं पूर्वी आपल्या पत्नीचा पलंग असला पाहिजे. जी लाघवी सुधा आजकाल सदोदित आपल्या कुशींत राहायला बघते ती पूर्वी, इथं काशीपुढं लोळत असली पाहिजे.

भिंतीवरच्या आरशांत अस्ताव्यस्त झोपलेली सुधा त्यांना दिसूं लागली. अन् मग ते भान विसरून आरशांतच बघत राहिले. दिवस-रात्र एकत्र राहिलेल्या ह्या नावोढांनीं एकमेकांचे देहहि पाहिले असतील ! न्हातांना, कपडे बदलतांना, गादीवर लोळतांना. जें फक्त बाळासाहेबांनाच ज्ञात होतं, जिथें फक्त बाळासाहेबांचाच स्पर्श होतो, तिथें काशीची नजरहि पडली असणार ! बाळासाहेबांना काशीबद्दल तीव्र मत्सर वाटला; नि त्याच क्षणीं तिच्याबद्दल अपार आपलेपणा वाटूं लागला.

उन्मादाच्या गुंगींत जेव्हां ते डोळे मिटून हुंकार देत पडून राहात, तेव्हां त्यांच्या केसांतून बोटें फिरवीत सुधा सोलापूरला काढलेल्या दिवसांच्या अनेक आठवणी सांगे. 'कधीं नाहीं तो पाऊस कोसळला...पार्कपासून काशी नि मी वसंतसेनेसारख्या भिजत आलों...' 'रोज अपरात्रीं मला

वाईट स्वप्न पडायचं. मी दचकून उठायची नि काशीला मिठी मारायची...'
'तुमच्या घरचा होकार बाबांनीं मला कळवला तेव्हां मी अगदी गोंधळून गेलें. काशीनं तेव्हां मला आधार दिला......' त्या वेळीं क्षुल्लक वाटलेली सुधेची बडबड आतां बाळासाहेबांचं मन भारून टाकूं लागली. त्या शब्दामागची सृष्टि आतां सभोंवतीं स्पष्ट दिसूं लागली.

बाळासाहेब कोचावर आणखी रेलून आरामशीर बसले. जणूं सुधाहि त्यांना लगटून बसली होती. तो कोच, समोरचा आरसा, शेल्फवरचीं पुस्तकं, टेबलावरचा दिवा, खिडकींतून दिसणारी बकुळीची फांदी नि स्वैंपाकघरांतून येणारा स्टोव्हचा आवाज ह्या सगळ्यांशीं आपलं कांहीं नातं आहे असं त्यांना वाटूं लागलं. समोरच्या फोटोफ्रेममधल्या सुधाचा नि तिच्या खांद्यावर हात ठेवून उभ्या असलेल्या काशीचा फोटो पाहात न कळत ते शीळ घालूं लागले.

पोह्याच्या वेळण्या व चहाची किटली–कपबशा घेऊन काशी बाहेर आली. पोहे करायला वेळ लागला म्हणून ती कांहीं म्हणणारा होती. पण बाळासाहेब खुषींत बसलेले पाहून तिला आश्चर्य वाटलं व कांहीं बोलायचं ती विसरून गेली. परत जायच्या गाडीची चौकशी करणारे बाळासाहेब टायची गांठ सैल करून, कोचावरची उशी खाकेखालीं सरकवून, आरामशीर बसले होते. जणूं ते ह्या बिऱ्हाडांत मुक्कामच करायला आले होते.

"आवडले पोहे ?" पोह्यांचा घास बाळासाहेबांनीं तोंडांत घालतांच काशीनें विचारलं.

"इतके दिवस नुसतं ऐकत होतों सुधाकडून. आज प्रत्यक्षच—" बाळासाहेबांनीं आणिक तीन-चार घास घेतले.

"इश्श्य !—ती माझ्यापेक्षां सुगरण आहे—"

"तुम्हीच शिकवलंत तिला. पोह्यांपासून पुरणपोळ्यांपर्यंत—"

"तुमच्यापर्यंत पोंचलं वाटतं सारं ?"

"मग कुणापर्यंत पोंचणार–?" बाळासाहेब हंसून उद्गारले नि त्यांनीं सावकाश खाणं संपवलं...

काशी जेवली नव्हती, पण तिला पोह्याचे चार घासहि जाईनात. बघतां येईल तितकं ती बाळासाहेबांकडे बघून घेत होती. त्यांच्या डोळ्याकडे,

हाताकडे, हालचालीकडे. सुधेचा स्पर्श, सुधेचा गंध त्या आकृतीशीं एकजीव झाला होता. जें सगळं काशीचं होतं, काशीनं पाहिलं जपलं होतं, तें सारं आतां बाळासाहेब सांभाळीत होते. काशीच्या भोंवतीं घुटमळलेला जीव आतां बाळासाहेबांच्या भोंवतीं घोंगावत होता. बाळासाहेबांचं व काशीचं केवढं जवळचं नातं होतं ! एक व्यक्तिमत्त्व, एक भावविश्व दोघांनींहि जवळून न्याहाळलं होतं. सुधा काशीची होती नि सुधा बाळासाहेबांचीहि होती. ती दोघांशीं समरस झालेली होती. पण काशी व बाळासाहेब एकमेकांपासून दूर होते, आणि त्यांनीं समरस होणं अशक्य होतं. मैत्रिणीचा पति एवढंच तिला बाळासाहेबांकडे पाहतां येत होतं. त्याच नात्यानं, उपचार सांभाळून, दूरत्व ठेवून, वागायचं होतं. काशीला हें सारं विचित्र वाटलं व ती अधिकच वेंधळ्यासारखी बघत राहिली.

" तो टेबल लॅंप सहावीच्या मुलींनीं भेट दिला ना ?...तो फ्रेममधला, उजवीकडचा फोटो पार्कमधला ना ? तुमच्या मावसभावानें काढलेला ?... अन् लुगड्यांचे बोळे पलंगाखालीं टाकतां कीं नाहीं ? " बाळासाहेब खोलीभर पाहात एकेक विचारीत होते. जणूं ते ह्या खोलींत सहा महिन्यांपूर्वीं राहिले होते. काशीबरोबर ! सुधाशीं ते समरस झाले होते, अन् आतां सुधाच्या स्मृतींशीं एकरूप होत होते. सुधेच्या इथल्या वस्तु नि इथले दिवस ह्यांच्याशीं त्यांचंहि नातं होतं. बकुळीवरून येणाऱ्या झुळकीशीं, आरशांतल्या दिसणाऱ्या प्रतिबिंबाशीं, ह्या खोलींतल्या विचित्र एकान्ताशीं. इथं राहणाऱ्या सुधेच्या सखीशीं...

मग बाळासाहेबहि काशीकडे पाहूं लागले. काशी सुपारीचं तबक लावीत होती अन् तिच्या लांबसडक बोटांकडे, घट्ट पदराकडे, भरदार आंबाड्याकडे, मोठ्या कुंकवाकडे, शेलाट्या शरीराकडे बाळासाहेबांची नजर धांव घेत होती. आणि त्यांचं मन म्हणत होतं, ' काशी तूं आणि मी कसल्याशा धाग्यांनीं जखडलेलों आहोंत. आपण एकाच नाण्याच्या दोन बाजू आहोंत. माझी लाडकी तुझी सखी आहे. तुझ्या सहवासांत सुधेचं भावजीवन बहरलं आणि आतां त्यांचीं आकाशपुष्पं माझ्या संसारांत सडा घालीत आहेत. एका व्यक्तीशीं आपण सुखदुःखाचे वांटेकरी झालेलों आहोंत...' त्यांना एकदम वाटलं, कीं काशीशीं फार मोकळेपणानं, अगदीं मनांतलं बोलावं !

ग्रं. क्र. ६९९९
वि. बो.वा



—पण त्या क्षणींच ते गप्प झाले. काशी एक परस्त्री होती. लग्नांत कांहीं तास व आत्तां कांहीं मिनिटं भेटलेली बायकोची ती केवळ एक मैत्रीण होती.

" सुपारी घेतां नं ? " काशीनें मृदुपणीं विचारलं.

" लवंग घेतों एक— "

" सुधा पाहुण्यांसाठींसुद्धां सुपारी आणीत नसे. ह्या सुपाऱ्या परवां आणल्या मीं— "

" लग्नांत पान खाल्लं मीं, तें शेवटचंच— " बाळासाहेब म्हणाले व अर्धीच लवंग खाऊन परत गप्प झाले.

कांहीं मिनिटं अशींच गेलीं. मग बाळासाहेब म्हणाले,

" दुसरी कुणी पार्टनर नाहीं घेतलीत बिऱ्हाडांत ? "

" नाहीं घेतली झालं— " काशी उद्‌गारली व पलंगाच्या कडीशीं चाळा करूं लागली. आपल्या मनांत बाळासाहेबांच्याबद्दल जे विचार येत आहत ते बाळासाहेबांनीं हेरले असं तिला त्यांच्या बोलण्यावरून, त्यांच्या बदललेल्या चर्येवरून, त्यांच्या आवाजावरून वाटलं. तिचा अधिकच गोंधळ उडाला. न राहवून मग तिनें बाळासाहेबांच्याकडे टक लावून पाहिलं.

तिच्या सरळ दृष्टिक्षेपानं बाळासाहेब जरा गडबडले. ' माझ्याबद्दलच तुम्ही विचार करीत आहांत ना ?—जें मला वाटतंय्, तेंच तुम्हांला वाटतंय् ना ?— आपण एकमेकांशीं एका भावजीवनानं, एका गुपितानं बांधले आहोंत, असं तुम्हांलाहि म्हणायचंय् ना '—असंच जणूं काशी म्हणत आहे असं त्यांना वाटलं. जें त्यांच्या अर्धांगीनें केलं तें त्यांनीं करणं अगत्याचं होतं असं त्यांना प्रामाणिकपणानं वाटूं लागलं. दोघांच्यांत औपचारिक अंतर ठेवण्यांत काय अर्थ आहे ? धीर करून त्यांनीं बोलायचं ठरवलं. पण दुसरेंच शब्द त्यांच्या तोंडांत आले,—

" तुम्ही आमच्याकडे कधीं येतां ? शाळेला सुट्टी लागली कीं आलं पाहिजे...सुधाला फार आनंद होईल... " नवऱ्याला मत्सर वाटेल इतकी विकृत मैत्री दोन स्त्रियांत असूं शकते असं कुठेंसं वाचलेलं त्यांना अकस्मात् स्मरलं.

" सुटीला अवकाश आहे. त्याआधीं तुम्ही दोघं मिळून आलं पाहिजे सोलापूरला— " घसा कोरडा करीत काशी म्हणाली. पहिल्या रात्रीच्या

हकीगती पुरुष आपल्या मित्रांना सांगतात असं कुठं तरी ऐकलेलं तिला आठवलं.

झालेलं संभाषण म्हणजे भेटीचं भरतवाक्य ह्या जाणिवेनं बाळासाहेबांनीं टायची गांठ घट्ट केली. सगळ्या खोलीवर ओढाळ, अखेरची दृष्टि टाकलेली पलंगाच्या कडेला टेकून बसलेली काशी उठली व चादरीची सुरकुती नीट करूं लागली. बाळासाहेब निरोप घेणार, ह्या खोलीबाहेर जाणार, म्हणून ती खिन्न झाली. त्यांनीं उठण्याची लगबग केली. तसं निरोपाचं म्हणून म्हणाली,

" सांगा बाबीला—"

" बाबीला ? " थक्क होऊन बाळासाहेब कोचांत खिळून बसले.

काशीहि गलबलून गेली. आपल्या मैत्रिणीला ती खास ठेवणींतलं म्हणून 'बाबी' अशी हांक मारीत असे. तिनें शोधलेलं, तिनेंच म्हणायचं तें नांव होतं !...अन् लग्नांत सुधेचं नांव बदलण्यावरून रुसणींफुगणीं झालीं, तेव्हां एकान्तांत बाळासाहेबांनीं सुधेला सांगितलं होतं कीं, " तुझं नांव कुणी कांहींहि ठेवो— मी आपला तुला 'बाबी' म्हणणार ! "...

विलक्षण संभ्रमांत काशीनें पलंगावरची चादर चुरगाळून टाकली. जातों म्हणणं, कोचावरून उठणं, खोलीबाहेर पडणं बाळासाहेबांना कठीण वाटूं लागलं. दोघंहि एकमेकांकडे पाहात, एकमेकांच्या नजरा चुकवून, बसून राहिले.

वेळ जाऊं लागला नि बाळासाहेबांना आठवलं कीं, आपल्या खिशांत सिगरेटचं पाकीट आहे. लग्न झाल्यापासून त्यांनीं सिगरेटला स्पर्श केला नव्हता. कॉन्फरन्सच्या पार्टींत त्यांना सिगरेटचं पाकीट मिळालं होतं. मनांतला विचित्र गोंधळ शमविण्यासाठीं सिगरेट ओढणं हा एकच उपाय होता.

वेळ खूप होता व पाकिटांत दहा सिगरेटस् होत्या. बाळासाहेबांनीं सिगरेट शिलगावली व ते धुराचे लोट सोडूं लागले. गलबललेल्या मनानं काशी धुराच्या झोतांत अंधुक होणारी बाळासाहेबांची आकृति पाहूं लागली. मग बकुळीचा ढीग पुढें ओढून ती एकेक फूल हळुवारपणें दोऱ्यांत ओवूं लागली ...

* * *

दीपावली – मार्च

# नानूमामा

जोशी श्री. ज.

बरेंच वय होईपर्यंत—साधारणपणें वयाचीं दहा-बारा वर्षें उलटून जाईपर्यंत—मीं नानूमामाला बघितलेंच नव्हतें. पण त्याच्याविषयीं ऐकलें मात्र खूप होतें ! माझ्या सर्व नातेवाइकांत नानूमामा खूपच श्रीमंत होता— महाराष्ट्रांतील एका फार मोठ्या व नामवंत गृहस्थाचा दत्तकपुत्र होता, त्यामुळें त्याच्याविषयीं घरांत नेहमींच कांहीं ना कांहीं ऐकायला मिळे आणि गंमत वाटे. गरीब लोकांना नेहमीं श्रीमंत व सुस्थितींतील लोकांविषयीं बोलायला आवडतें हें तर झालेंच, पण आईचें बालपण नानूमामाच्या घरांतील मोठ्या परिवारांत गेलें असल्यामुळें, स्वतःच्या दरिद्री संसारांतील खस्ता खातांखातां, तिला लांबच्या का होईना, पण श्रीमंत भावाविषयीं बोलणें आवडे, हेंहि सांगतां येईल.

आईचा तो भाऊ लागे, पण लांबचा—खूप लांबचा. अगदीं खरें सांगायचें तर त्यांचा नात्याचा संबंध फारसा नसेलहि ! परंतु त्या श्रीमंत घराण्यात जुन्या काळांतील खानदानी पद्धतीप्रमाणें जे गरीब, अनाथ आश्रित जमा झाले होते, त्यांत माझ्या आईचे वडीलहि होते, आणि त्यामुळेच तिचा बालपणांतील बराचसा काल, त्या वाड्यांत गेलेला होता. आश्रिताचें जिणें

ती त्या मोठ्या पेशवाई वाड्यांत जगली होती आणि भाटांनीं सार्वभौम राजाचीं स्तुतिस्तोत्रें गावींत, त्याप्रमाणें ती नेहमीं नानूमामांचीं गात असे, असें म्हटलें तर तें विशेष चूक होणार नाहीं. आईचा नि बाबांचा संसार इतर चार संसारांप्रमाणें अगदीं गरीब होता, हें उघड आहे. नारायण-पेठेंतील त्या दोन अंधाऱ्या ओलसर खोल्यांत वावरतांना वर्षांनुवर्षें तिनें नानूमामांच्या मोठ्या वाड्याचें नि संपन्न जीवनाचें चित्र मनांत जपून ठेवलें होतें, असें समजण्यासहि हरकत नाहीं.

मला आठवत आहे, लहानपणीं कधीं आईबरोबर मंडईत गेलों, कीं टिळक पुतळ्याच्या बाजूनें पानांचे गाळे आहेत, तिथें उभें राहिलें, कीं ती एका खूप मोठ्या वाड्याकडे बोट दाखवी आणि सांगें, " तो नानू-मामाचा वाडा ! "

हातांतील भाजीची झोळी सावरतां सावरतां मी टाचा उंच करून त्या वाड्याकडे बघितल्याचें मला पक्कें स्मरतें ! आज इतकीं वर्षें झालीं, पण त्या मोठ्या अंगाच्या वाड्याचें स्वरूप मनावरून पुसलें गेलें नाहीं. स्थूल प्रकृतीचा पण म्लान गंभीर चेहऱ्याचा एखादा माणूस असावा, तसा तो वाडा मला प्रथमदर्शनींच वाटला. कांहीं दुःखद विचार मनांत सारखे घोळत असलेल्या रुबाबदार पुरुषासारखें त्या वाड्याचें स्वरूप होतें. एखाद्या घराच्या आंतल्या खोलींत कुणी तरी मरत पडलें असावें—एखाद्या जीवाची अंतकाळची तडफड नि आक्रान्त चाललेला असावा, व बाहेरच्या बाजूला इतर खोल्यांतून नेहमींचे व्यवहार शांतपणें चाललेले असावेत, म्हणजे जसें तें घर दिसेल, तसेंच नानूमामाचें तें प्रचंड घर दिसत होतें, असें इतक्या लहानपणींहि मला वाटलें होतें. उतकें आयुष्य वाहून गेलें, पण सांगायला कांहीं हरकत नाहीं, कीं मालवलेल्या, म्लान चेहऱ्याचीं अशा तऱ्हेचीं घरें मीं फार कमी बघितलीं असतील.

पण त्या म्लान वास्तूच्या नुसत्या दर्शनानें देखील आईच्या आठवणींना पालवी फुटे, तिच्या आणि काळसर वर्णाच्या किंचित् ओबडधोबड चेहऱ्यांत कांहीं निराळीच चमक भासायला लागे! वडिलांसाठीं एक आण्याचीं पानें व चुना घेतांना ती सांगायची, "बाहेरच्या बाजूला तो मोठा हॉल दिसतोय ना, तिथें पूर्वी 'रावसाहेब' बसायचे! तिथें कुणाला जायची परवानगी नसे, मी इतक्या वर्षांत तिथें फक्त एकदां गेलें होतें!"

'रावसाहेब' कोण होते हें मला माहीत होतें. आमच्या मराठीच्या पुस्तकांत मीं त्यांचें चरित्र वाचलें होतें. तांबडसर ऐटबाज पगडी घातलेला, आणि गळ्याभोंवतीं उपरणें लपटलेला त्यांचा फोटोहि त्याच धड्यांत मीं बघितला होता, व इतक्या मोठ्या लोकोत्तर पुरुषाचें नि माझें अगदीं लांबचें का होईना, पण नातें आहे, या विचारांनीं अभिमान पावलों होतों. 'रावसाहेब' कोण होते हें विचारण्याची मला जरुरी नव्हती.

एवढ्या वेळांत पानें घेऊन आम्ही मंडईच्या खालच्या बाजूला पालेभाज्या घ्यायला गेलेलीं असायचीं. आईचा चेहरा अजूनहि फुललेला असायचा, तिचें तेंच पुराण चालायचें! ती सांगायची,

"—आणि बाजूला मोठी खोली आहे ना, तिथें नानू बसायचा! तिथेंहि कुणी जायचें नाहीं. एखाद्या राजपुत्रासारखा त्याचा थाट असायचा!... जरीची निळी टोपी घालून घरच्या मोठ्या बग्गीतून पुढेंमागें पट्टेवाले घेऊन तो तेव्हां शाळेंत जायचा!"

मंडई उरकून आमच्या बिऱ्हाडापाशीं आली, तरी देखील आईचें बोलणें संपायचेंच नाहीं! त्या मोठ्या खानदानी घरांतील अनेक गोष्टी ती ऐकवीतच राहायची! दत्तकाचीं भांडणें...कुणी लक्ष्मीकाकू होत्या त्यांचा जहांबाजपणा...सोपाना गड्यानें चोरून गांजा ओढणें...कुणी नारायण-

राव होते, त्यांनीं व्यवहार बघतां बघतां किती नि कसे पैसे खाल्ले—हें सांगायची ! लहानपणीं ह्या मोठ्या श्रीमंती घरांत कोणकोणत्या माणसांनीं तिला कसेंकसें वागविलें होतें, याचें सुंदर वर्णन करायची !

त्या वर्णनांत मी अगदीं तल्लीन होऊन जायचा. कां होऊन जायचा हें त्या वेळीं कळायचें नाहीं, पण आतां इतक्या वर्षांनंतर त्याचें कारण सहज सांगतां येईल. नारायणपेठेंतील त्या दोन ओलसर खोल्यांतील आंबलेलें दरिद्री जीवन जगतांजगतां मला त्या श्रीमंती वातावरणाच्या गोष्टींची मजा वाटत असावी. जरीची टोपी घालून आणि पुढेंमागें पट्टेवाले घेऊन मोठ्या थाटानें बग्गींतून शाळेंत जाणाऱ्या नानूमामाचा मला त्या वेळीं हेवा तर वाटेच, पण एक प्रकारची आसक्तियुक्त अशी आत्मीयताहि वाटे, हें सांगणें जरूर आहे. आई त्या वेळीं आणखी इतर माणसांबद्दल जें बोले, त्याबद्दलहि अशीच चमत्कारिक ओढ वाटे. मी स्वतः अजून नानूमामालाच बघितलें नव्हतें, तर इतर कोणाला बघणार ? तरी महाभारतांतील कौरवपांडवांचीं चित्रें जशीं आपल्या मनांत तयार झालेलीं असतात, त्याचप्रमाणें आईच्या बोलण्यांत नेहमीं येणाऱ्या लक्ष्मीकाकूंचीं आणि नारायणरावांचीं चित्रें माझ्या मनावर अगदीं स्पष्टतया उमटलेलीं असत. मीं लक्ष्मीकाकूंना बघितलें नव्हतें—बघणें शक्यच नव्हतें, परंतु त्यांचें रूप मनाशीं केव्हांच निश्चित केलें होतें. त्या नक्कीच अशा स्थूल अंगाच्या गौर वर्णाच्या, आणि गोबऱ्या चेहऱ्याच्या असतील, आणि स्त्री-जातीला–विशेषतः श्रीमंत चित्पावन स्त्रीला शोभेसा ठसका त्यांच्या प्रत्येक बोलण्यांत नक्कीच असेल ! कुत्सित, आडवेंतिडवें बोलून त्या आसपासच्या लोकांचीं मनें नेहमींच रक्तबंबाळ करीत असतील, आणि त्याची त्यांना तिळमात्र क्षितिहि वाटत नसेल !...व्यवहार बघतां बघतां पैसे खाणारे नारायणराव असे डोक्याला टक्कल पडलेले, काळेंमिचकट जानवें घातलेले व प्रत्येकाशीं अजीजीनें आणि लाचारीनें बोलणारे असतील...नारायणराव

आणि लक्ष्मीकाकू यांच्याप्रमाणेंच मीं आयुष्यांत कधींहि न बघितलेल्या अनेकविध व्यक्तींचीं रेखाचित्रें त्या वेळीं माझ्या मनावर तेव्हां चितारलेलीं होतीं.

असेच दिवस जात होते, आणि नानूमामाच्या गोष्टी मी ऐकतच होतों. तो डॉक्टर आहे, आतां मुंबईला प्रॅक्टिस करीत आहे, व आतां त्या प्रचंड घरांत दुसरें कोणी राहत नाहीं, हें मला आईच्या बोलण्यावरून समजलेंच होतें. 'रावसाहेब' कित्येक वर्षांपूर्वीं मयत झाले होते, आणि त्या घराची सारी शान आतां संपलेली होती. कणगींतील धान्याचे दाणे हळूहळू संपत जावे, त्याप्रमाणें आश्रितांचा घोळका आतां कुठल्या कुठें गेला होता. त्यांपैकीं कुणी मेले होते, कुणी वृद्ध होऊन दुसरा आसरा बघितला होता, तर कुणाला नानूमामानें हाकून दिलें होतें. एवढ्या मोठ्या प्रचंड वाड्यांत आतां नोकरवर्गाशिवाय दुसरें कोणीहि नव्हतें, असें मी ऐकत होतों, आणि त्या जुन्या घराविषयींचें माझें ममत्वहि संपत चाललें होतें. अजूनहि एखादे-वेळीं मी मंडईत गेलों, कीं पानें घेतांना त्या वाड्याकडे टक लावून बघण्यास विसरत नसे, परंतु त्या विषयांतील बरेंचसें स्वारस्य कमी होत चाललें होतें असें म्हणायला हरकत नाहीं !

अशींच आणखी कांहीं वर्षें गेलीं असावीं, आणि मग 'तो' दिवस उगवला ! इतक्या वर्षांनंतरहि मला त्याचें स्मरण अगदीं पूर्ण आहे.

अशी सकाळची,—साडेआठ-नऊची वेळ होती ! वडील स्नान आटोपून नि कपाळावर आडवें दुबोटी पांढरें गंध लावून बाहेरच्या खोलींत देवाची पूजा करीत बसले होते, आणि आई आंतल्या घरांत पोळ्या लाटीत होती ! आम्हीं सारीं भावंडें तशींच अस्वच्छ कपड्यांनीं आणि झोपेनंतरच्या मलिन चेहऱ्यांनीं दाराजवळच्या भिंतीजवळ जी वळकट्यांची रास ठेवली होती, त्यावर गुधडा घालीत होतों. वडील मोठमोठ्यांदा कांहीं स्तोत्र म्हणत होते,

आणि आई आंतल्या घरांतून कुणावर तरी ओरडत होती ! असा हा धुमाकूळ चालू असतांनाच कुणी तरी एक माणूस वडिलांच्या नांवाची चौकशी करीत दरवाजापाशीं आला नि तिथेंच उभा राहिला.

वळकट्यांच्या राशीवर बसून मीं त्या माणसाकडे बघितलें, आणि मला तो एकदम निराळा वाटला. त्याचे कपडे स्वच्छ होते, पण परीटघडीचे नव्हते. डोक्यावर तपकिरी रंगाची घडीची टोपी होती, आणि ओठांवर किंचित् पांढुरक्या मिशांचा भला मोठा झुबका होता ! त्याच्या उभे रहाण्याच्या पद्धतीवरूनच मला त्याचें निराळेपण जाणवलें होतें. श्रीमंत माणसाच्या पिढीजात नोकरानें वागावें–उभें राहावें तसें त्याचें वागणें होतें.

स्तोत्र म्हणणें वडिलांनीं एकदम थांबवलें व विचारलें, " कोण आहे ? "

अदबीनें हात जोडून त्यानें सांगितलें, " मी आहें ! "

माझ्या वडिलांशीं इतकें अदबीनें वागलेलें मी आजपर्यंत कुणालाहि बघितलें नाहीं. ऐतिहासिक नाटकांतील एखाद्या काळोजी किंवा हिरोजी-प्रमाणें त्यानें जमिनीला तीन वेळ हात लावून, " मी आहें सरकार ! " म्हटलें असतें, तरी मला त्या वेळीं वाटलें तितकें आश्चर्य वाटलें नसतें.

माझ्या वडिलांनीं त्याला ओळखलें नाहीं, म्हणून ते नुसतेच बघत बसले. तेव्हां तोच पुढें म्हणाला, " मी नानासाहेबांकडून आलों आहें ! "

तरीहि वडिलांच्या डोक्यांत प्रकाश पडला नाहीं, तेव्हां त्यानें पुढें सांगितलें " रामेश्वराजवळचे नानासाहेब ! नमूताईची चौकशी करायला पाठवलं आहे त्यांनीं ! "

' नमूताई ' हें माझ्या आईचें माहेरचें नांव आहे. तें ऐकल्यावर

30,035 मा.वा. 968 3-8-61

वडिलांना एकदम समजलें व ते आश्चर्यानें ओरडले, " ओऽहोऽहो ! म्हणजे नानूमामांकडून तुम्ही आलां आहांत ? "

तो " हो " म्हणाला व पुढें त्यानें सांगितलें, " मुंबईची प्रॅक्टिस बंद करून नानासाहेब पुण्याला आले आहेत, आणि त्यांनीं मुलांना घेऊन नमूताईला रविवारीं दुपारीं चहाला बोलावलं आहे. "

आई इतकें झाल्यावर बाहेर आली व त्या माणसाच्या दर्शनानें एकदम सुखावली ! मग जुन्या आठवणींना उजाळा मिळाला, आणि थोड्या वेळानें तो माणूस निघून गेला.

त्या माणसानें सांगितलेला निरोप मीं ऐकला होता, आणि मला फार आनंद झाला होता. रविवारीं नानूमामानें बोलावलें होतें, म्हणजे अजून फक्त दोन-तीन दिवसांनींच लहानपणापासून बघत असलेल्या त्या किल्लेवजा अजस्र वाड्यांत मी प्रवेश करणार होतों, व आमच्या नात्यांतील एकुलत्या एक श्रीमंत माणसाला बघणार होतों.

मी आनंदलों होतों. माझ्याखालचीं भांवडें सुखावलीं होतीं, पण कां कुणास ठाऊक, वडील मात्र एकदम गंभीर झाले होते. ते कांहींच बोलत नव्हते—नुसतेच ' हं हं ' करीत होते. त्यांचें तें गांभीर्य त्या साऱ्या दिवसभर टिकलें होतें, आणि दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं ऑफिसमधून आल्यानंतर चहा पितांपितां ते आईला म्हणाले, "—म्हणजे आतां पंचाईत आली ! "

कशाची पंचाईत आली हें आईला कळलें होतें, म्हणून ती नुसतीच थंड बसली.

तेव्हां तेच पुढें म्हणाले, " तुम्हांला आतां परवां नानूमामाकडे जायचं आहे ! पण चांगले—झुळझुळीत कपडे कुणालाच नाहींत ! "

ही गोष्टहि खरी होती, आणि बोलण्याजोगें तींत कांहींच नव्हतें, तेव्हां आई गप्पच बसली.

वडील पुढें स्वतःशींच पुटपुटावें तशा आवाजांत म्हणाले, “ कुणालाच कांहीं कपडे नाहींत. विजार आहे, तर सद्रा चांगला नाहीं ! आणि पायांत तर कुणाच्याच नाहीं !...छे बुवा ! इतक्या श्रीमंत लोकांकडे असं जाणं कसं तरीच दिसेल ! ”

“ माझं कांहीं नाहीं, पण मुलांचं मात्र बघायला पाहिजे ! ” आई म्हणाली.

“ नाहीं तर असं करावं, कुणीच जाऊं नये झालं !—सांगावं कांहीं तरी कारण— ” माझ्याकडे दृष्टि टाकीत वडील म्हणाले.

त्यांचें तें बोलणें ऐकून माझ्या मनाला बसलेला हादरा मला आठवत आहे !... वाटलें, कीं वडील स्वतःचेंच बोलणें खरें करतील, आणि ती सोन्याची द्वारका मला कधीं दिसणारच नाहीं.

पण तसे अर्थातच कांहीं झालें नाहीं. दुसऱ्या–तिसऱ्या दिवशीं कुठून तरी वडिलांनीं पैसे उसने आणले. आणि आम्हांला तयार कपड्यांच्या दुकानांत नेऊन, प्रत्येक मुलाला एक निळी चड्डी व खाकी शर्ट घेऊन आले. आईला अर्थातच कांहीं घेतलें नाहीं– घेणें शक्यच झालें नाहीं. ती तशीच राहिली.

मग रविवारीं दुपारीं आम्ही सर्व भावंडें ते आमच्या अंगाचे नसलेले आणि भयंकर दाटणारे, खळीचा वास मारणारे कपडे घालून नानूमामाकडे जावयास निघालों. एखाद्या सेनापतीनें अगदीं शेवटच्या घटकेला सैन्याची पाहणी करावी तशी वडिलांनीं आम्हां सर्वांची केली, व माझ्याकडे पाहून चेहरा वाकडा करीत ते म्हणाले, “ बाकी सारें ठीक आहे. पण याच्या पायावर खरूज आहे; आणि मलमाचे काळे डाग आहेत. याला मोजे घालायला पाहिजेत. नाहीं तर तें भारी वाईट दिसेल. ”

आईलाहि तें बोलणें पटलें ! इतक्या श्रीमंतांकडे पायावर खरूज घेऊन

जाणें बरें नव्हे, हें उघड होतें. खरूज असणें हें अर्थातच तितकेंसें वाईट नव्हतें. अंगावर ती घेऊन वाड्यांतल्या—आसपासच्या मुलांबरोबर खेळणेंहि वाईट नव्हतें. पण तिच्यासह नानूमामाकडे जाणें मात्र अब्रह्मण्यम् होतें. मग पुन्हा एकच धावाधाव नि आरडाओरडा झाला. तें एक महान् संकट नव्यानेंच जणुं उभें राहिलें, व त्या यक्षप्रश्नाची सोडवणूक कशी करावी याबद्दल बरीच चर्चा झाली. शेवटीं कांहीं विचार करून वडिलांनीं कष्टी चेहऱ्यानें खिशांतले आठ आणे आईजवळ दिले, व सांगितलें, " — जातांना तुळशीबागेजवळ आठ आण्यांचे मोजे घ्या, नि ते त्याला घालून मग पुढें जा. " त्याप्रमाणें आम्ही खाकी रंगाचे-भोकें भोकें असलेले मोजे विकत घेतले. ( माझ्या आयुष्यांतले ते पहिलेच मोजे. दुसरे मोजे मी नोकरीसाठीं 'इंटरव्ह्यू'ला मुंबईस गेलों, तेव्हां घेतले. ) ते तिथेंच घातले, व पुढें निघालों.

आम्ही हळूहळू रामेश्वराजवळच्या त्यांच्या मोठ्या वाड्यांत आलों, आणि का कुणास ठाऊक, पण आई एकदम गंभीर झाली, आम्ही सर्वच थोड्याफार प्रमाणांत कावरींबावरीं झालों, आणि धडधडत्या छातीनें आंत शिरलों.

खरेंच सांगतों, इतका मोठा प्रचंड वाडा मी तोंपर्यंत बघितला नव्हता. आणिं खऱ्या खऱ्या श्रीमंत माणसाच्या घरांत तर प्रथमच पाऊल टाकीत होतों. आमच्या पुण्याचे वाडे इतके प्रकाशमान, इतके स्वच्छ कधींच नसतात. त्यांच्यावर नेहमींच एक जुनाटपणाची अवकळा पसरलेली असते, आणि दरिद्री जीवनाचीं लक्तरें त्याच्या अंगाखांद्यांवरून नेहमींच लोंबत असतात. पण तसें नानूमामाच्या वाड्याचें नव्हतें. वाडा चांगला प्रशस्त, दोनमजली होता, आणि खालीं असें मोठें फरसबंद अंगण होतें. एवढी गोष्ट खरी, कीं वाड्याच्या मोठ्या अंगाच्या मानानें तिथें गडबड-गोंधळ अजिबात नव्हता; एक प्रकारची अदबशीर, व किंचित् भीतिदायक शांतता असल्यासारखें वाटत होतें.

आम्ही आंत शिरलों, तेव्हां दुसऱ्या बाजूला अंगणांतल्या बाकावर तो त्या दिवशींचा माणूस बसलेला दिसला; त्यानें आम्हांला वरच्या

हॉलमध्यें नेलें, व बसण्यास सांगितलें वरच्या दिवाणखान्यांत नानूमामाच्या सासुरवाडीच्या नात्याकडील आणखी कांहीं बायका होत्या, आणि दोन-चार नीटनेटके कपडे केलेलीं, सुकुमार, टवटवीत शरीरयष्टीचीं मुलें होतीं. त्या बायका दागिन्यांनीं व उंची कपड्यांनीं मढलेल्या होत्या, आणि त्यांच्या सर्व व्यक्तिमत्त्वावर सुखवस्तुपणाची, किंवा ऐदी श्रीमंतीची चमत्कारिक कळा दिसत होती. त्या सर्व घोळक्यांत अगदीं उठून दिसण्याइतकी गरिबी फक्त आमचीच होती. आणि त्यामुळें आईवरील आणि आम्हां भावंडांवरील केविलवाणेपणाची छाया जास्त गडद झाली होती.

त्या उंची कपडे घातलेल्या स्त्रियांच्या गराड्यांत आई अंग चोरून, मुकाटपणानें बसली, व आम्ही मुलें बाजूला बसलों ! खरें म्हणजे मुलां-मुलांनीं बोलायला पाहिजे होतें– दंगामस्ती करायला पाहिजे होती. पण आम्ही तशींच बसलों. त्या श्रीमंत सुकुमार मुलांत आणि आमच्यांत कांहींच साम्य नव्हतें, साम्यस्थळें नव्हतीं. त्या घोळक्यांत बसलों असतांना मला वाटतें, आयुष्यांत अगदीं प्रथमच अजाणतेपणानें का होईना, मण मी 'क्लास-कॉन्शस' झालों होतों, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

त्या दिवाणखान्यांतून खालीं मंडईतील पानवाल्यांचीं दुकानें दिसत होतीं, आणि गिऱ्हाइकांचा कलरव ऐकूं येत होता. हॉलच्या मध्यावर एका मोठ्या कोचावर 'रावसाहेबां'चें खूप मोठें असें तैलचित्र ठेवलेलें होतें, आणि त्याला पिवळ्या फुलांचा खूप मोठा असा ताजा हार घातला होता. त्या मोठ्या तैलचित्रासमोर केव्हां तरी लावलेली उदबत्ती जळूनजळून आतां शेवटास आली होती, आणि तिच्या वासांत, फुलांच्या गंधाचें चमत्कारिक मिश्रण झालें होतें. तो अर्थातच रावसाहेबांचा दिवाणखाना होता, हें उघड होतें. लहानपणापासून मंडईच्या मागच्या बाजूला पानांच्या दुकानाच्या बाजूनें ज्या दिवाणखान्याकडे मी बघत होतों, तोच हा दिवाण-खाना होता. रावसाहेबांना मरून जवळ जवळ चाळीस वर्षें होऊन गेलीं होतीं, परंतु ते जणुं जिवंत आहेत, अशा भावनेनें ती वास्तु जतन करून ठेवण्यांत आली होती.

आम्ही असे बराच वेळ तिथें बसलों होतों. एखाद्या मुलाखतीला न्यावें त्याप्रमाणें आंतून नोकर येऊन एकएका बाईला नि तिच्या मुलांना आंत

नेत होता, आणि थोड्याच वेळांत तीं बाहेर येत होतीं. प्रथम तीं टवटवीत अंगाचीं सुकुमार मुलें, आणि उंची वस्त्रें नेसलेल्या त्या गौरवर्ण स्त्रिया आंत जाऊन आल्या आणि नंतर नोकराबरोबर आम्ही आंत गेलों.

आंतल्या दिवाणखान्यांत मधल्या कोचावर परीटघडीचें तलम रेशमी कपडे घालून नानूमामा बसला होता. आणि शेजारींच हिऱ्यामोत्यांचे दागिने अंगावर असलेली, पूर्ण गौरवर्णाची तारामामी होती. त्या वेळीं नानूमामाचें प्रथम पाहिलेलें स्वरूप माझ्या अजूनहि स्मरणांत आहे. त्याचा चेहरा असा गोरटेला नि गोब्रा होता, आणि डोळ्यांवर ऐटबाज फ्रेमचा सोनेरी चष्मा होता, हें तर झालेंच, पण साऱ्या व्यक्तिमत्त्वावर श्रीमंतीचा—सुखवस्तु-पणाचा— एक चमत्कारिक तवंग असल्याचें मला त्या वेळींहि जाणवल्या-वांचून राहिलें नाहीं. एखाद्या वेळीं अगदीं लहानसहान गोष्टी उगीचच लक्षांत येतात, आणि जन्मभर मनांत पक्क्या रुतून बसतात. त्याप्रमाणें त्याच्या अगदीं जवळ बसल्यानंतर माझ्या हें लक्षांत आलें होतें, कीं त्याचे तळहात आणि तळपाय अगदीं शुभ्र—अगदीं मळहीन होते. तळहातांचें एक असो, परंतु तळपाय देखील इतके शुभ्र असणारा, — त्यावर मळाचा काळा ठिपकाहि नसणारा मराठी माणूस मी आजतागायत पाहिलेला नाहीं असें म्हटलें तर तें चूक होणार नाहीं. किंबहुना असेंहि म्हणतां येईल, कीं त्यांच्या एकंदर घडणींतच महाराष्ट्रीयत्वाचा अंशच फार कमी असावा. मी स्वतः महाराष्ट्रीय श्रीमंत व संपन्न माणसें फार करून बघितलीं नाहींत, परंतु जीं कांहीं बघितलीं आहेत, त्यांच्यामध्यें इतका लिबालिबीत—इतका तुकतुकीत—माणूस माझ्या दृष्टिपथांत आलेला नाहीं. महाराष्ट्रीय श्रीमंत माणून देखील बराचसा ओबडधोबड व राकट असतो— सह्याद्रीचा अंश त्याच्यांत थोडा तरी असतोच, परंतु नानूमामा त्याला अपवाद होता, असें म्हणणें भाग आहे. म्हणूनच असेल कदाचित्, त्याची ती एखाद्या पारशासारखी तुकतुकीत अंगकांति मला त्या वेळीं विचित्र वाटली होती.

आम्ही आंत गेलों, आणि त्यांच्यापुढें उभे राहिलों. श्रीमंत माणसें गरीब माणसांची चौकशी करतांना जो एक कनवाळूपणाचा मृदु-मुलायम आवाज काढतात, तशा आवाजांत मग त्यांनीं आमची चौकशी केली.

' आतां बरं आहे ना ? ', ' मुलं किती ? ', ' मुलं ठीक दिसतात ! ' वगैरे प्रश्नोत्तरें झालीं आणि जुन्या आठवणी निघाल्या. नंतर प्रत्येक मुलाला जवळ बोलावून त्याच्या हनुवटीला किंवा गालाला हात लावून प्रत्येकाचें नांव विचारलें, आणि ' हा छान दिसतो ! ', ' याचे डोळे अगदीं हुबेहूब तुझ्यासारखे दिसतात ' किंवा असेंच कांहीं तरी बोलून कौतुक करण्यांत आलें. मी त्याला आवडलों होतों किंवा नाहीं हें मला सांगतां येत नाहीं कदाचित् आवडलों असेन, कदाचित् नसेनहि. परंतु मी जवळ गेल्यानंतर त्यानें माझें नाक ओढून माझें कौतुक केल्याचें मला नक्की स्मरतें. ( स्वच्छतेच्या बाबतींत माझें नाक बरें आहे, पण पायावर खरूज असल्यामुळें त्यांनीं दगा दिला आहे ! माझ्या इतर भांवडांचे पाय बरे होते, पण नाकें अगदींच वाईट होतीं. त्या वेळीं मीं पायांत मोजे घातले होते तें बरें केलें होतें, अशी भावना झाल्याचें मला नक्की आठवतें. )

आंतून आम्ही बाहेर आलों आणि पुन्हां त्या टवटवीत नीटनेटक्या मुलांत बसलों. नंतर गड्यांनीं फराळाचीं ताटें व आइस्क्रीमच्या बशा आणून ठेवल्या व नानूमामा आणि तारामामी कोचावर येऊन बसलीं व आग्रह करूं लागलीं. फराळाचे पदार्थ आणि पिवळें धमक केशरी आइस्-क्रीम खरोखर चांगलें होतें, आणि मी तशा तऱ्हेचे पदार्थ तोंपर्यंत खाल्ले नव्हते. परंतु तेथल्या श्रीमंती दरबारी वातावरणाचा माझ्या मनावर असा कांहीं विचित्र परिणाम झाला कीं ते मी विशेष खाऊं शकलों नाहीं.

खाणें झाल्यानंतर प्रत्येक मुलाचें कौतुक झालें. कुणाला काय येतें, काय नाहीं याची चौकशी झाली. मला आठवत आहे कीं त्या टवटवीत सुकुमार मुलांनीं त्या वेळीं मोठ्या ठसक्यांत, धीटपणानें इंग्रजी गाणीं म्हणून दाखविलीं, आणि मुलांसाठीं बसविलेला एक नाचहि करून दाखविला. त्या मुलांचें अर्थातच खूप कौतुक झालें, आणि इंग्रजी गाण्यावर नानूमामा खूप हंसला. मला कुणी गाणें म्हणायला सांगितलेंहि नाहीं, आणि कुणी कौतुकहि केलें नाहीं. ( गाणें म्हणायला सांगितलें असतें तर मी त्या वेळीं ' झाडींतुनी हे उडुनी प्रभातीं–' किंवा ' कां रे नाठविसी ' म्हणून दाखविलें असतें, आणि तें फारच वाईट झालें असतें असें आज मला वाटत आहे. )

गाणीं वगैरे झाल्यानंतर संध्याकाळ झाली आणि एकएक माणसें घरीं परतायला लागलीं. प्रथम तीं सुकुमार टवटवीत मुलें आणि त्यांच्या आया निघून गेल्या. आम्ही तसेच बसलों होतों, आणि तो प्रचंड अजस्र वाडा रिकामा होत होता. भरतीचें पाणी ओहोटीच्या वेळीं मागें सरत असावें. आणि उघड्या पडत चाललेल्या, ओक्याबोक्या वाटणाऱ्या किनाऱ्यावर बसावें तसें आतां त्या मोठ्या वाड्यांत थोडें-फार वाटायला लागलें होतें. शेवटीं हळूहळू कोणी राहिलें नाहीं, आणि मग आम्ही निघालों. त्याच वेळीं कसें कोणास ठाऊक—व्हायला नको होती, पण मला जाणीव झाली कीं त्या एवढ्या प्रचंड वाड्याच्या मानानें माणसें, घरचीं माणसें फारच थोडीं आहेत, व ती वास्तु कांहीं एका अर्थानें म्लान, मलिन आणि कंटाळवाणी दिसत आहे. माणसें जात होतीं, आणि आवाजानें भरून गेलेलें तें घर हळूहळू शांत होत होतें. मी जिना उतरून खालीं अंगणांत आलों, आणि वर बघितलें, तर सारें शांत होतें – जणुं ती वास्तु, तो परिसर झपाटल्यासारखा झाला होता, त्याची शुद्ध जाऊन तो तिथें शिळा होऊन पडला होता. इतक्या लहान वयांत ती शांतता मला एकदम जाणवली आणि मग एकदम वीज चमकावी तसें लक्षांत आलें, कीं एवढ्या मोठ्या त्या प्रचंड वाड्यांत घरचीं अशीं कुणी मुलेंच नाहींत ! नानूमामाला, तारामामीला स्वतःचीं मुळीं मुलेंच नाहींत ! खरें सांगायचें म्हणजे त्या प्रचंड चौकांत विटीदांडूचा नाहीं तर क्रिकेटचा डाव किती रंगायला पाहिजे होता. पण खेळायला तिथें मुलेंच नव्हतीं. हॉलच्या व खोल्यांच्या दरवाजा-खिडक्यांना लावलेल्या रंगीबेरंगी काचा दंगामस्ती करून फोडून टाकायला तिथें कुणी मुलेंच नव्हतीं ! सगळ्या कांचा अगदीं शाबूत होत्या. त्यांच्यावर एक चीर—एक ओरखडाहि गेलेला नव्हता. त्या बालवयांत देखील त्या प्रचंड वाड्यांतील, रावसाहेबांच्या दिवाणखान्यांतील आणि नानूमामाच्या खोलींतील स्वच्छतेंतील न्यून मला एकदम जाणवलें नि कसेंसेंच वाटलें.

काय वाटलें, कां वाटलें तें सांगतां येणार नाहीं– खरें म्हणजे असें वाटण्याचें नि विचार करण्याचें माझें तें वयहि नव्हतें. परंतु ह्या वेळींहि माझी त्या ध्वनिशून्य वाड्याविषयीं कांहीं चमत्कारिक भावना झाली हें निश्चित आहे. मला त्या वेळीं असेंहि वाटलें कीं शांततेचें, व्यवस्थितपणाचें ओझें सहन न

होऊनच नानूमामानें इतर मुलांना पाचारण केलें असेल. फावड्यानें किंवा कुदळीनें चिखल फोडावा किंवा ओल्या मातीचे गट्ठे चुरगळावेत, तशी घरांतील शांतता फोडली तोडली जात नाहीं, हें जाणूनच कदाचित् त्या अपत्यहीन दंपतीनें नात्यांतील इतर मुलांना बोलावलें असेल.

दुडक्या चालीनें आम्ही घरीं आलों, व उगाच बसलों. आईचा साराच उत्साह संपला होता. आम्हा सर्वांनाहि कांहीं एक चमत्कारिक सुन्नपणा आला होता. वडील त्या दिवशीं थंडच होते, पण एक दिवस जाऊं देऊन त्यांनीं आईला नानूमामाकडील वृत्तान्त विचारला.

त्या वेळीं आईहि शांत झाली होती. तिनें तो वृत्तान्त अगदीं तिखट-मीठ लावून सांगितलाच, पुढें पण म्हटलें, " त्या पटवर्धनांकडच्या नि बापटां-कडच्या बायका नानूजवळ सारख्या स्वतःच्या मुलांचीं कौतुकं करीत. होत्या...म्हणे आमचा प्रभाकर असा आहे नि शरद् तसा आहे !... अरविंदाला इंग्रजी गाणं येतं नि त्याला शाळेंत नाच शिकवला आहे... छे ग बाई ! माणसांना इतकं पुढंपुढं करणं सारखं जमतं तरी कसं कुणास ठाऊक ! "

वडील यावर नेहमींच्या पद्धतीप्रमाणें खोखो हंसले होते, आणि म्हणाले होते, " मग तूंहि तुझ्या मुलांचं कौतुक करायचं होतंस—तुला कुणी नाहीं म्हटलं होतं ! " आणि नंतर माझ्याकडे दृष्टि टाकून, व स्वतःच डोळे मिचकावून ते पुढें म्हणाले होते, " अग, त्याचा कांहीं नेम नाहीं ! कुणाच्या मनांत कोण, कसा आणि कधीं भरेल तें सांगतां यायचं नाहीं ! कदाचित् हा आपला श्रीकृष्णहि नानूच्या मनांत भरेल, व तो त्यालाच दत्तक घेईल ! "

माझ्यादेखतच हीं बोलणीं चाललीं होतीं, आणि अपेक्षेपेक्षां—कल्पने-पेक्षां तीं माझ्यावर परिणाम करीत होतीं. वडील गंमतीनें बोलत होते, पण ती गंमत कळण्याचें माझें वय नव्हतें. मला साऱ्या गोष्टी खऱ्याच वाटत होत्या.

वडिलांचें तें बोलणें ऐकलें, आणि एकदम जणूं मी दुसरा झालों. क्षण-भर मीं माझ्या कारकुनी करणाऱ्या, आणि प्रपंचाचा गाडा अतीव कष्टानें ओढणाऱ्या वडिलांकडे व आसपासच्या दरिद्री वातावरणाकडे बघितलें,

आणि मला भास झाला, कीं नानूमामानें मला दत्तकच घेतलें आहे, आणि नारायण पेठेंतील ती ओलसर ओंगळ जागा सोडून मी त्या मोठ्या अजस्र वाड्यांत राहत आहें— जरीची टोपी घालून व पुढेंमागें पट्टेवाले घेऊन घरच्या बग्गींतुन मी मोठ्या डौलानें शाळेंत जात आहें !

पुढें बरेच दिवस वडिलांच्या ह्या बोलण्यानें उत्पन्न झालेलें कल्पनिक चित्र मला सुखवीत राहिलें. एका दृष्टीनें खरी गोष्ट ही होती, कीं, नानूमामांजवळ अमाप इस्टेट होती, आणि दोन्ही बाजूंकडच्या नात्यांतील प्रत्येक जण आपल्या मुलाचें प्यादें त्याच्यापुढें सरकवीत होता. त्या 'रेस'-मध्यें टिकणें मला केवळ अशक्य होतें, हें अगदीं उघड होतें. टवटवीत, सुकुमार अंगकान्तीच्या देखण्या मुलांना टाकून माझ्यासारख्या ओबडधोबड चेहऱ्याच्या, पायाला खरूज आलेल्या मुलाला तो दत्तक कशाला घेईल ? ही स्थिति वडिलांना नक्कीच माहीत असेल, व म्हणूनच त्यांनीं कधीं या बाबतींत पुन्हा शब्द काढला नाहीं. एकदाच काढला, पण तेवढ्याचमुळें माझ्या मनांत एक अदृश्य अशी दुनिया उभी केली गेली, हें कांहीं खोटें नाहीं.

नानूमामा पुण्यांत स्थायिक झाल्यावर दरवर्षीं उन्हाळ्यांत एकदां आइस्क्रीम खायला आणि दिवाळींत फराळाला सर्व मुलांना बोलावी, तेव्हां त्याची गांठ पडे. त्या अजस्र आणि ध्वनिशून्य वाड्यांतील रावसाहेबांच्या दिवाणखान्यांत आणि नानूमामाच्या गॅलरीच्या कोपऱ्यांतील खोलींत पाऊल टाकण्याची संधि मिळे. अर्थात् वर्षांमागून वर्षें उलटून गेलीं, तरी तेथील वातावरण तसेंच असे—त्यांत तिळमात्र बदल झालेला नसे, हें उघड आहे. दर वर्षीं तशीच दरबारी आणि अलिप्त वागणूक असे. तेच पदार्थ, तींच बोलणीं आणि मुलांचें कौतुक करण्याची तीच ठरीव पद्धत. कशांत कांहीं बदल नसायचा.

हा मधला काळ जवळजवळ आठ-दहा वर्षांचा असेल. बालपण संपून मीं तारुण्यांत प्रवेश केला होता, आणि मामा-मामी प्रौढावस्था संपवून वृद्धावस्थेकडे झुकलीं होतीं. परंतु त्या परिसरांतील वातावरण तसेंच होतें ! रेशमी झुळझुळीत कपडे घातलेला, गोऱ्यागुबऱ्या चेहऱ्याचा नानूमामा आणि अंगावर सदैव हिऱ्यामोत्यांचे दागिने असलेली तारामामी, दोघेंहि तशींच होतीं. इतका काळ वाहून गेला, पण चेहऱ्यावर एखाददुसरी सुरकुती

पडण्याखेरीज त्या दोघांमध्येंहि बदल असा कधीं झालाच नाहीं. जुन्या लेण्यांमध्यें हजारों वर्षांपूर्वींचीं चित्रें जशींच्या तशीं जतन करून ठेवलेलीं असतात, त्यांचे रंग कधीं विटत नाहींत, काळ कधीं त्यांच्यावर परिणाम करूं शकत नाहीं, तसेंच त्या दोघांचें होतें असें म्हटलें तर चूक होणार नाहीं.

आज मला आश्चर्य वाटत आहे कीं इतकी गरिबी असून, परिस्थितींत इतकें अंतर असून देखील इतक्या दूरच्या नात्याच्या आधारावर आम्हांला त्या वाड्यांत कसा प्रवेश मिळत होता ? अगदीं संपन्न जीवनांत डोकावण्याची संधि कां दिली जात होती ? अगदीं खूप विचार केला तरी याचीं कारणें सांपडत नाहींत.—सांगतां येत नाहींत. कदाचित् असेंहि असेल कीं जगांत प्रत्येक गोष्टीला कारण लागतेंच असेंहि नाहीं. एखाद्या परिवारांत माणसें एकदां चिकटलीं, कीं वर्षांनुवर्षें तशींच तिथें लळत-लोंबत राहतात. तीं त्यापासून तुटत नाहींत. काय कारण असेल तें असो, पण आम्ही सर्व भावंडें त्या वास्तूला आणि परिवाराला चिकटून होतों, ही गोष्ट मात्र खरी.

नानूमामाला—तारामामीला आमच्याबद्दल काय वाटत असेल तें सांगतां येत नाहीं. कदाचित् श्रीमंत लोकांना गरीब लोकांविषयीं वाटतो तसा सूक्ष्म तिरस्कारहि असेल ! त्यांतून पुन्हां हें सांगायला पाहिजे कीं खुद्द नानूमामाचे नातेवाईक पुण्यांत फार कमी होते; पण तारामामींचें श्रीमंत माहेर नातेवाइकांनीं समृद्ध होतें. नानूमामा त्यामुळें बरा वागे, पण तारामामींच्या वागण्यांत मात्र तो सूक्ष्म तिरस्कार कधीं कधीं दिसून येई.

इतक्या वर्षांनीं आठवण केली तरी सूक्ष्म तिरस्काराची आणि अलिप्तपणाची धार अजूनहि जाणवत आहे—त्या जखमेची बोंच अजूनहि दुःख देत आहे. तिथें गेलों असतांना आम्ही कधीं मोठ्यानें बोललों, दंगाधोपा केला किंवा त्या ध्वनिशून्य वास्तूला आवाजानें बरबटलें, तर नानूमामा किंचित् अस्वस्थ होत. पण तारामामींच्या कपाळाला एकदम आठ्या पडत, आणि उजवी भुंवई वर चढे. मग एखादे वेळीं त्या गड्याकरवीं दंगा न करण्याविषयीं समज देत, आणि त्यानेंहि न भागलें तर स्वतः येऊन मृदु पण ताठर आवाजांत म्हणत, " अरे तुम्हांला ओरडा करूं नका म्हणून किती सांगायचं ? दंगा करायचा असला तर आपले घरीं जा बघूं ! " आणि नंतर माझ्या आईकडे बघून पुटपुटत, " मघापासून सारखा

आरडाओरडा चालला आहे— पण तुमचं आपलं एक नाहीं नि दोन नाहीं. जरा थोडंसं रागवायचं तर खरं !" यावर आई ओशाळेपणानें हसे, व ओरडा न करण्यास सांगे. या वेळीं तारामामींचा आवाज अगदीं मृदु मुलायम असे, परंतु डोळ्यांत, चेहऱ्यावर अशी कांहीं विलक्षण तिरस्काराची धार असे कीं, तिचें वर्णन करणें अशक्य आहे. या प्रसंगा-सारखाच दुसरा एक प्रसंग आठवतो. कसला तरी समारंभ असल्यामुळें नानूमामाकडे जेवायला गेलों होतों; कुणी तरी बडे पाहुणे आले होते, व दिवाणखान्यांत मोठी पंगत मांडली होती. हातांत चांदीचीं भांडीं घेऊन तारामामी व इतर श्रीमंत बायका वाढण्यासाठीं सज्ज होत्या. मदत करावी म्हणून माझी आईहि वाढण्यासाठीं गेली, व तिनें एकदां वाढलेंहि ! परंतु एका खेपेनंतर लगेच तारामामीनें तिच्या हातांतलें ताट काढून घेतलें व अगदीं रुक्षपणानें सांगितलें, " तुम्ही नका वाढूं ! आणि उगीच मध्येंमध्येंहि करूं नका ! तिकडेच कुठें तरी बसा घटकाभर ! " त्या एवढेंच बोलल्या आणि जखमी होऊन आई बाजूला बसली. पंगत सुरू होती, हशाखोखोशा चालला होता, आणि हिऱ्यामोत्यांचे दागिने अंगावर झगमगत असलेल्या बायका वाढीत होत्या. परंतु माझी आई मात्र मालवलेल्या चेहऱ्यानें कोपऱ्यांत बसली होती. तिच्याकडे तेव्हां कुणाचें लक्ष गेलें नाहीं— तिचा अभाव कुणाला जाणवला नाहीं. इतक्या लहानपणीं देखील बाहेरच्या पंगतींत जेवायला बसलों असतांना तिची रक्तबंबाळ अवस्था मला दिसली होती— जाणवली होती, हें सांगणें भाग आहे.

पण इतकें सगळें असलें तरी आम्ही तिथें जातच राहिलों मध्यं-तरींच्या काळांत खूप लोकांनीं आडूनआडून—उघडपणें देखील स्वतःच्या मुलांबद्दल प्रयत्न केले, पण कुणाला यश मिळालें नाहीं. हळूहळू दत्तक जाण्याच्या माझ्या मनांतील स्वप्नाचा पुरा लोप झाला, आणि नुसतेंच तिथें जाणें राहिलें. तारामामींच्या माहेरच्या मुलांचे प्रयत्न चालले होते, पण मुक्कामावर कुणीच पोंचलें नाहीं. वर्ष-दोन वर्षं एखाद्या मुलाचें खूप कौतुक चाले. तो दिसायला चांगला आहे, हुषार आहे, क्रिकेट चांगलें खेळतो, वगैरे गोष्टी सारख्या बोलल्या आणि चघळल्या जात. पण थोड्याच काळांत तो मुलगा मागें पडे, आणि दुसरा कुणी हुषार मुलगा

पुढें येऊन त्याच्या कौतुकाला सुरुवात होई. दर दोन वर्षांनीं तरुण मुलीला जनानखान्यांत आणणाऱ्या आणि पुढें तिला सांदीकोपऱ्यांत फेकून देणाऱ्या एखाद्या नबाबासारखें हें कृत्य होतें, पण त्याला कुणाचाच इलाज नव्हता.

अशींच आणखी बरींच वर्षें गेलीं, पण त्या अवजड अजस्र वास्तूंत कांहीं फरक पडलाच नाहीं. तिथें कांहीं बदल होईल याची शक्यताहि माझ्या मनांतून पार पुसून गेली. जगाच्या अंतापर्यंत तो वाडा नि त्या वाड्यांत राहणारीं तीं दोन श्रीमंत खानदानी माणसें तशींच राहणार आहेत, अशीच जणु माझ्या मनाची खात्री होती.

परंतु तसें व्हायचें नव्हतें. एकदां तिथें गेलों असतांना सहज कानांवर आलें कीं, नानूमामा त्या वाड्यांत सूतिकागृह काढणार आहे. स्वतःचा कंटाळा घालविण्यासाठीं तो तिथें हॉस्पिटल काढणार आहे. प्रथम प्रथम ती बातमी खरी वांटली नाहीं, परंतु पुढें पांच-सहा महिन्यांतच ती वास्तवांत आली. हळूहळू मग बाहेरच्या वातावरणांत बदल होत गेला. दिवाणखान्यांतील उंची गालिचे, लोड नि तक्क्ये अदृश्य झाले आणि तिथें एका ओळींत मांडलेल्या लोखंडी खाटा, आणि त्यांच्या पायथ्याशीं बांधलेले चिमुकले पाळणे दिसायला लागले. ज्या वाड्यांत जवळजवळ तीस-चाळीस वर्षांत लहान मुलांच्या रडण्याचा आवाज ऐकूं आला नाहीं तिथें दररोज एक-दोन मुलें जन्माला यायला लागलीं. मला वाटतें, त्या दोघांच्या आयुष्यांतील तो सर्वांत सुंदर काळ होता. तीं दोघेंहि दवाखान्यांत जोडीनें काम करीत होतीं, आणि मुलांची दृष्ट काढण्यापासून तों काजळ घालण्यापर्यंत सर्व कामें मोठ्या हौसेनें करीत होतीं. पुण्यांतील श्रीमंत, घरंदाज स्त्रियांचें त्या दिवसांत तो वाडा एक केंद्र बनला होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं. केव्हांहि नानूमामाकडे गेलें, तरी त्याच्यासमोर एखादी अवघडलेल्या अंगाची, गौरी वर्णाची इरकली नऊवारी लुगडें नेसलेली पहिलटकरीण बसलेली असायची, आणि तो तिला मोठ्या गांभीर्यानें प्रकृतीची कशी काळजी घ्यावी, काय खावें, नि किती खावें, जिना चढावा किंवा नाहीं, आणि वांकायचें झाल्यास शरीर किती अंशांपर्यंत लववावें इत्यादि गोष्टी सांगत असायचा. त्या दिवसांत तारामामीहि जास्त सतेज नी जास्त बोलक्या झाल्या होत्या, असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांच्या हातांत

नेहमीं लाल लाल रंगाचें, सातआठ दिवसांचें मूल असे, आणि तोंडांत बाळ आणि बाळंतीण याशिवाय विषय नसे.

हॉस्पिटल निघाल्यापासून पांच-सहा वर्षांनीं माझें लग्न झालें, आणि पहिलें अपत्य होण्याचा संभव दिसायला लागला. लगेच मी बायकोचें नांव दवाखान्यांत घातलें, आणि आम्हां उभयतांच्या तिथें फेऱ्या सुरू झाल्या. हळूहळू दिवस भरले, आणि बायको प्रसूत झाली.

दोन-चार दिवस तसेच तिथें गेले, आणि नंतर एकदां संध्याकाळच्या वेळीं मी तिथें असतांना नानूमामा मला म्हणाला, " एक गोष्ट मीं ठरवली आहे—"

मीं विचारलें, " ती कोणती? "

" तुझ्याकडून या केसचे पैसे न घेण्याचं मीं ठरवलं आहे! हे बाळंतपण मी तसंच करीन. तुझी बायको जणूं माझ्या घरींच बाळंतपणाला आली आहे, असं समज! तुझं काय म्हणणं आहे? "

मी कांहींच बोललों नाहीं. पण मला कसेंसेंच वाटत होतें. इतक्यांत हातांतील चांदीच्या नक्षीदार भांड्यांत जळता ऊद घेऊन तारामामी तिथें आल्या, आणि त्या उदाच्या वासानें मी आणखीनच कावराबावरा झालों.

पण नानूमामाला माझ्या मनाची कांहींच कल्पना नव्हती. तो तारामामीला म्हणाला, " बरं का ग, मीं सारं याला सांगितलं आहे. "

तारामामी कांहींच बोलल्या नाहींत. त्यांची आणि माझी दृष्टादृष्ट झाली, तेव्हां सुगंधी उदाचा धूर मध्यें असून देखील त्यांची दृष्टि बरिचशी म्लान आणि विमनस्क आहे असें मला वाटलें.

घरीं येऊन मीं वडिलांना हें सांगितलें तेव्हां त्यांनाहि कसेंसेंच वाटलें, व एखादी गोष्ट अगदीं झटकून टाकावी, तसें ते म्हणाले, " तसं नको! "

कारण माहीत होतें, तरीहि मीं विचारलें, " कां? "

ते कांहींच बोलले नाहींत; माझ्या बायकोनें विरोध केला तरी तिचेंहि कांहीं चाललें नाहीं. हळूहळू बारा-पंधरा दिवस झाले, आणि त्या अजस्र वाड्यांत नानूमामानें बादशाही वैभवांत माझ्या मुलाचें बारसें केलें. खूप पेढे वांटले, आणि माझ्या बायकोला उंची लुगडें देऊन तिची रवानगी केली.

झाला तो समारंभ मोठा झाला, पण आम्हांला कोणालाच तें बारसें मानवलें नाहीं. कसली तरी अदृश्य भीति मनावर घोंगावतच राहिली. आणि झालेंहि तसेंच. तें मूल जेमतेम आठ-दहा महिने राहिलें, पण त्यानें कधीं अंग धरलें नाहीं—तें कधीं हसलें-खिदळलेंच नाहीं. कधीं मोठ्यानें रडलेंहि नाहीं. एखाद्या कोमेजलेल्या – बिनफुललेल्या किंवा कधींहि न फुलणाऱ्या कळीसारखा त्या मुलाचा सारा अवतार होता. खूप औषधोपचार झाले, सर्व कांहीं झालें; परंतु तें मूल पुढें कधीं सुधारलेंच नाहीं. एखाद्या अदृश्य शक्तीच्या सामर्थ्याखालीं चेंगरून-चुरगळून गेल्यासारखें तें सदां केविलवाणेंच राहिलें. सात-आठ महिने तें जेमतेम जगांत राहिलें, आणि पुढें हळूहळू वठत जाऊन एके दिवशीं सकाळीं तें पूर्णपणें वठलें—त्याचें निर्माल्य झालें.

कुणी कांहीं बोललें नाहीं, पण मला आणि माझ्या बायकोला तें समजलें–अंतर्यामाला जाणवलें. बाळंतपण नानूमामाकडे व्हायला नको होतें हें माझ्या लक्षांत आलें. त्या प्रचंड, अजस्र वास्तूला अपत्यविहीनतेच्या शाप आहे– तिच्या परिसरांत स्वतःचें असें कोणतेंच मूल वाढूं शकत नाहीं, हें मला जणु नव्यानें कळलें, आणि कसेंसेंच वाटलें. एकदां असेंहि वाटलें, कीं अगदीं लहानपणीं मी स्वतः वांच्छिल्याप्रमाणें त्या घरांत दत्तक गेलों नाहीं, हें बरेंच झालें ! कुणी सांगावें, तसें झालें असतें तर त्या अदृश्य शक्तीनें माझा केव्हांच चोळामेळा केला असतां. मीहि कादचित् असाच अल्पवयांत सुकून वठून गेलों असतों.

त्यानंतर माझ्या बायकोनें नानूमामाच्या घराचें अगदीं नांव टाकलें. तिच्या मनांत त्या वास्तूविषयीं एक चमत्कारिक अढी निर्माण झाली. परंतु मी तिथें कधींमधीं जातच राहिलों. तिच्या प्रतिकाराला न जुमानतांहि, कां कुणास ठाऊक, पण तिथें जातच राहिलों. तिच्या मनांत जशी चमत्कारिक अढी आणि नावड निर्माण झाली होती त्याचप्रमाणें त्या घराविषयीं माझ्या मांनत जस्तच औत्सुक्य निर्माण झालें आणि मंतरलेल्या जागेकडे खेचलें जावें तसा मीहि तिकडे ओढला जायला लागलों.

मी तिथें कधीं तरी जात होतों, पण तेथली शान नि अदब आतां झपाट्यानें मावळत होती. बुडणारी बोट किनाऱ्यावरून बघावी, तसें त्या

ध्वनिशून्य खानदानी घराची ऐट मावळतांना मी दर दिवशीं बघतच होतों. नंतरच्या दिवसांत मग म्हातारपणामुळें त्यांनीं तो दावखानाहि बंद केला, आणि एक-दोन गड्यांच्या साहाय्यानें तीं दोघेंच त्या वाड्यांत राहायला लागलीं.

एखादे वेळीं मी तिथें जाई, त्या वेळीं मला त्या दोघांची स्थिति स्पष्ट दिसे. बहुतेक गडी काढले होते, आणि साऱ्या खोल्या बंद केल्या होत्या. वृद्धापकाळामुळें नानूमामा खचला होता आणि काठीच्या आधाराशिवाय चालणें-हिंडणें त्याला कठीण होत चाललें होतें. बहुतेक सारा वेळ तो स्वतःच्या खोलींत पडून असे आणि एकटी तारामामी त्याच्या शुश्रूषेंत मग्न असे. त्याच्या मानानें तारामामी मात्र प्रकृतीनें अगदीं धडधाकट होती, आणि पैशाअडक्याचे सर्व व्यवहार पाहत होती. त्या जुन्या वाड्यांतलें सारें वैभव आतां झाकळल्यासारखें झालें होतें. रावसाहेबांचा दिवाणखाना, मोठें स्वयंपाकघर, चांदीचीं भांडीं– सारें तसेंच होतें. पण त्यांतील आत्मा केव्हांच लोपला होता. दत्तकाचीं बोलणीं अगदीं बंद होतीं आणि तारामामीच्या अगोदर नानूमामा मरणार हें सर्वांनीं गृहीत धरलें होतें. एखाद्या मोठ्या प्रवासाला जाण्यापूर्वीं करावी, तशी नानूमामानें सारी व्यवस्था केली होती. नानूमामा लवकर मरणार आणि त्या अजस्र मोठ्या वाड्यांत तारामामीला पुढें सारा जन्म एकटीनें कंठावा लागणार हें उघड होतें. नानूमामाच्या मृत्यूनंतर त्या मानी स्त्रीचें आयुष्य कसें जाणार याचीच सर्वांना जणूं काळजी होती !

पण ती काळजी करण्याचें कारणच पडलें नाहीं ! मृत्यूनेंच जणूं मोठ्या चमत्कारिकपणानें त्या काळजींतून साऱ्यांनाच मुक्त केलें. नानूमामाच्या मृत्यूची वाट पाहणाऱ्या नातेवाइकांना मृत्यूनें असा एक गंमतीदार नि अकल्पित तडाखा दिला, कीं सारेच स्तिमित झाले.

त्या घटनेआधीं एक-दोन दिवसच मी त्या वाड्यांत एका उदास संध्याकाळीं गेलों होतों. जिना चढून वर गेलों, तर बाहेरच्या दिवाणखान्यांत तारामामी मोठ्या कोचावर बसून वर्तमानपत्र वाचीत होत्या. माझी आणि त्यांची दृष्टादृष्ट झाली आणि त्या हंसल्या ! कां कुणास ठाऊक, पण मला त्यांच्या त्या हसण्यांत-बघण्यांत कमालीची खिन्नता आढळली. कसलें तरी

दुःख मनांत टोचत असावें अशी त्यांची मुद्रा होती. अंगावर नेहमींप्रमाणें हिऱ्यामोत्यांचे दागिने होते, पण तेहि त्या दिवशीं मलूल वाटले.

त्यांची नि माझी दृष्टादृष्ट झाली व मीं विचारलें, " कशी काय आहे तब्बेत ? "

खिन्नपणानें त्यांनीं सांगितलें, " बरी आहे. " आणि नंतर कांहीं विचार करून त्या म्हणाल्या, " तूं थोडा वेळ इथेंच बस ! मी आंतून बोलावतें. "

इतकें बोलून त्या आंत गेल्या. बहुधा त्यांनीं नानूमामाचे कपडे बदलून शुभ्र परीटघडीचे कपडे घातले असावेत ! अगदीं अखेरच्या वेळींहि दुसऱ्यासमोर केविलवाणेपणा दिसूं नये, याची त्या काळजी घेत असाव्यात.

थोड्याच वेळांत आंतून बोलावणें आलें, आणि मी त्या पहिल्या दिवशींच्या खोलींत गेलों. एका रॉकिंग चेअरवर त्याला त्यांनीं बसवला होता, आणि अंगावर फुलाफुलांची शाल होती. खोलींत किंचित् अंधार होता, तरीहि त्याच्या चेहऱ्यावरची निस्तेजता मला जाणवल्याशिवाय राहिली नाहीं.

त्याच्या समोरच्या खुर्चीवर मी उगाच बसलों, व कांहीं तरी बोलायचें म्हणून विचारलें, " कशी काय आहे तब्बेत ? "

खिन्न हंसून तो म्हणाला, " ही अशी आहे ! " आणि त्यानें तारामामीकडे बघितलें.

त्यानंतर कुणीच कांहीं बोललें नाहीं. मी उगाच बसलों. तो आतां फार थोड्या दिवसांचा सोबती आहे, हें समजून कसें तरीच वाटलें. लहानपणीं आईबरोबर अगदीं पहिल्यानें या वाड्यांत आल्याचा प्रसंग माझ्या मनापुढें साकार झाला, आणि मन खिन्नतेनें भरून गेलें.

बोलण्याजोगें कांहींच नव्हतें. म्हणून मी उठलों, व त्याचा निरोप घेऊन बाहेर रावसाहेबांच्या दिवाणखान्यांत आलों. तारामामीहि मागोमाग उठल्या व तिथेंच उभ्या राहिल्या. कांहीं तरी बोलायचें म्हणून मीं म्हटलें, " तब्बेत बरी दिसत नाहीं ! "

" बरी तर नाहींच, पण स्वभावहि फार चिरचिरा झाला आहे. " त्यांनीं सांगितलें, " खाण्यापिण्याच्या आवडी तर इतक्या आहेत, कीं गडीमाणसांवर – कुणावर सोपवतांहि येत नाहीं. सारंच मला करावं लागतं. "

हें बोलत असतांना त्यांच्या डोळ्यांशीं माझे डोळे भिडले, आणि कधीं नव्हे ती त्या एकाकी स्त्रीच्या आयुष्यांतील आर्तता मला जाणवली. मी त्यांना इतकीं वर्षें बघत होतों, पण त्यांच्या इतक्या जवळ कधीं आलोंच नव्हतों. श्रीमंतीच्या तोऱ्यांत, आणि दागिन्यांच्या व उंची वस्त्रांच्या झगझगाटांत वावणाऱ्या त्या स्त्रीचें मूक दुःख जणुं मला एकदम त्या दिवशींच जाणवलें, आणि त्या क्षणभरांतच, त्यांच्या भकास आयुष्याचें पूर्ण चित्र डोळ्यांपुढें उभें राहिलें.

चार-पांच मिनिटें तशींच गेलीं, आणि मीं म्हटलें, "तुम्हीच आहांत, म्हणून तरी त्यांचीं इतकीं तंत्रं सांभाळतां ?"

त्यावर त्या हंसल्या, मलूलपणानें हंसल्या, व म्हणाल्या, "होय रे बाबा ! आतां तुझ्या तोंडूनच तेवढी स्तुति ऐकायची राहिली होती !" आणि असें बोलतां बोलतां त्यांनीं मग एकदम स्वतःला सावरलें, व त्यांच्या डोळ्यांत तें जुनें खानदानी पाणी चमकायला लागलें. या क्षुद्र माणसाला फार जवळ येऊं दिलें याची जणुं त्यांना मनस्वी खंत वाटली, व त्यांनीं मला निरोप दिला.

मी बाहेर पडलों आणि जिना उतरून त्या प्रशस्त फरसबंद चौकांत येऊन उभा राहिलों. एकाहि खिडकीचें व दाराचें तावदान कधींहि न फुटलेल्या त्या अतिशांत वाड्यांत एक जीव मृत्यूशीं सामना करीत आहे, आणि दुसरा त्याची शुश्रूषा करीत आहे. याची खंत मला वाटली, व मी घराबाहेर आलों. नानूमामावर मृत्यु एक-दोन आठवड्यांतच झडप घालणार ही माझी खात्री होती. परंतु झालें भलतेंच. त्यानंतर दुसऱ्या तिसऱ्या दिवशीं मी कामावरून घरीं आलों, तेव्हां बायकोनें सहज सांगावें तसें सांगितलें, "आज एक वाईट बातमी आहे."

ती नानूमामाच्या मृत्यूची बातमी असणार हें उघड होतें, म्हणून मीं विचारलें, "काय बातमी आहे ?"

"तुम्हांला कल्पना यायची नाहीं." ती संथ आवाजांत म्हणाली व तिनें पुढें सांगितलें, "आज सकाळीं तुमच्या तारामामी गेल्या !"

ती बातमी खरोखरच धक्का देणारी होती, म्हणून मीं म्हटलें, "काय म्हणतेस !"

" खरंच सांगतें आहें ! तारामामी गेल्या. काल रात्रीं त्या नेहमींप्रमाणें नानूमामाचें सारें करून झोपल्या — त्या सकाळीं उठल्याच नाहींत ! "

बराच वेळ मी सुन्न होऊन बसलों. काय बोलावें हेंच कळेना. थोडा वेळ तसाच गेला आणि मीं म्हटलें, " आतां नानूमामाचं कसं होणार ? शरिराच्या अशा अवस्थेंत तो एकटा कसा राहाणार ? "

त्यानंतर एक-दोन दिवस जाऊं देऊन, मी त्याच्या समाचारास गेलों, तेव्हां वाड्याचें वातावरण पालटल्यासारखें दिसलें. तारामामीच्या माहेरच्या नातेवाइकांनीं तिथें एक अदृश्य असें कडें केलें होतें, आणि आंत जाऊन त्यांचें दर्शन घेणें — त्याच्याशीं बोलणें — हें खरोखर कठीण काम होतें. त्या दिवशीं मी गेलों, तेव्हां बाहेर गड्यानें सांगितलें, " आज त्यांना फार त्रास झाला आहे ! ते कुणालाच भेटूं शकत नाहींत — तुम्ही येऊन गेल्याचें मी सांगतों. " मी नंतर पुन्हा सात-आठ दिवसांनीं गेलों, तरी देखील तीच पोलिशी चौकशी आणि तीच आडकाठी. हळूहळू मग माझ्या लक्षांत आलें, कीं त्याच्याभोंवतीं श्रीमंत नातेवाइकांनीं चौकी-पहारे बसवले आहेत, आणि आतां वर्गयुद्धाला खरी सुरुवात झाली आहे. त्या सर्व श्रीमंत मंडळींना असें वाटणें साहजिक होतें कीं, हे गरीब नातेवाईक त्याला एकटे भेटले, तर घोटाळे करतील ! ते येतील, त्याचें मन द्रवेल, आणि त्या अमाप संपत्तींतील कांहीं भाग तरी या लोकांना मिळेल. शेवटीं अगदीं अखेरीची वेळ आली, तरी आसपासचें वातावरण कांहीं बदललें नाहीं. पैशाशिवाय, संपत्तीशिवाय दुसरा विषय तिथें त्या दिवसांत नव्हता हेंच खरें ! जाणाऱ्या जीवाबद्दल तिथें भीति नव्हती – काळजी नव्हती. काळजी होती ती फक्त, ती अमाप संपत्ति कोणाच्या घरांत जाईल या गोष्टीची !

मला त्या वातावरणाचा लवकरच उबग आला, व मीं तिथें जाणें सोडलें ! हळूहळू मी त्याला जवळ जवळ विसरूनहि गेलों. कधीं मंडईत गेलों आणि पानें घ्यायला लागलों कीं, त्याचें स्मरण होई, व जावेंसें वाटे, पण कधीं गेलों नाहीं !

असेच बरेच दिवस गेले; आणि मला वाटतें, तो ऑक्टोबर महिना होता. ऊन भयंकर रणरणत होतें, आणि कसली तरी सुट्टी असल्यामुळें

मी जेवून सुखानें पडलों होतों. माझ्या डोळ्यांवर किंचितशी झापड आली होती, इतक्यांत कुणी तरी दार वाजवलें, व मी उठून बसलों.

येणाऱ्या माणसानें एखादी ठरलेली गोष्ट घडावी, तशा सहजतेनें सांगितलें, " तुमचे नानासाहेब दुपारीं गेले ! तुम्हांला बोलावलं आहे. "

मी ' बरं ' म्हणालों आणि कपडे करून बाहेर पडलों. मनांत भावना कांहींच नव्हत्या. वाईट वाटत नव्हतें — कांहींच वाटत नव्हतें ! दुपारच्या रणरणत्या उन्हांत मी तसाच चालत रामेश्वरापाशीं येऊन त्या मोठ्या वाड्यांत शिरलों ! वाड्यांत रडारड कांहींच नव्हती - रडणारें असें कुणी शिल्लकच नव्हतें. साराच अगदीं कोरडा नि भावनाशून्य व्यवहार होता. मी वर गेलों, तेव्हां प्रेत रावसाहेबांच्या खोलींत ठेवलें होतें, आणि मी लहानपणा-पासून बघितलेलीं तीं टवटवीत अंगयष्टीचीं सुकुमार माणसें अवतींभोंवतीं गंभीर चेहरे करून वावरत होतीं.

तिथें मी उगाच इकडे तिकडे घोटाळलों,—पिवळ्या फुलांचा हार घातलेल्या रावसाहेबांच्या फोटोकडे, आणि मंडईतल्या गर्दीकडे बघत उभा राहिलों शेवटीं प्रेत नेण्याची वेळ आली, तेव्हा त्या टोळक्यांत मी अलिप्त-पणानेंच उभा होतों. इतक्यांत त्या घराण्यांतील एक जुने हितसंबंधी वृद्ध गृहस्थ माझ्या जवळ आले, व म्हणाले, " पुढचे सारे विधी तुम्हांलाच करायचे आहेत ! "

एकदम आश्चर्य वाटून मीं म्हटलें, " अहो, माझा काय संबंध ? " आणि त्या घोळक्यांतील श्रीमंत लोकांकडे दृष्टि टाकून पुढें म्हटलें, " ही इतकीं सगळीं माणसं इथं असतांना ? "

" खरं आहे तें ! पण तीं सारीं त्यांच्या सासुरवाडीचीं माणसं. तीं त्यांना जवळ होतीं, पण खरीं लांबच होतीं. मगाच आम्हीं विचार केला, आणि लक्षांत आलं, कीं त्यांच्या रक्ताचा—अगदीं खूप लांबचा का होईना, पण संबंध असलेले आज पुण्यांत फक्त तुम्हीच आहांत ! "

अनुमति देण्याशिवाय अर्थातच इलाज नव्हता, व मीं ' होय ' म्हटलें. थोड्याच वेळांत सर्व तयारी झाली, आणि पुष्पहारांनीं मंडित झालेलें तें प्रेत बाहेर काढलें गेलें. त्या म्हाताऱ्या गृहस्थांनीं माझा हात धरला, मी पुढें झालों आणि हातांत शिंकाळें धरून दुपारच्या त्या रणरणत्या उन्हांत

लक्ष्मी रोडनें ती प्रेतयात्रा सुरू केली. माझ्या हातांत शिंकाळें होतें आणि मी एका अंत्ययात्रेचा निदान त्या वेळीं तरी सूत्रधार होतों. ती वेळ हंसण्याची मुळींच नव्हती, पण तरीहि मला हंसू आलें. वाटलें, कीं मी लहानपणीं नानूमामाला दत्तक जाणार होतों, त्या अजस्र पेशवाई वाड्याचा मालक होणार होतों, जरीची टोपी घालून, आणि पुढेंमागें पट्टेवाले घेऊन घरच्या बग्गींतून मोठ्या ऐटीनें शाळेंत जाणार होतों ! बालपणींचें तें स्वप्न काळाच्या प्रवाहांत कुठल्या कुठें विरलें– वाहून गेलें ! परंतु आज एखाद्या पुत्रानें पित्याचा करावा, तसा त्याचा अंत्यविधि मला करावा लागत आहे ! कागदोपत्रीं नसलों, मालकी हक्कानें नसलों, तरी धर्महक्कानें मी त्याचा जणुं वारसच आहें, आणि त्याला अग्नि देण्याचें काम विधीनें माझ्या अंगावर सोपविलें आहे. लहानपणचें तें बालिश स्वप्न अशा विचित्र तऱ्हेनें साकार होण्याचा योग येत आहे.

आम्ही त्याच्या देहाचें दहन केलें, आणि घोळक्यानें घरीं आलों. परत येतांना लोक त्याच्या इस्टेटीबद्दलच बोलत होते ! त्यानें त्या अपाम इस्टेटी-पैकीं एक कपर्दिकहि कोणाच्या हातीं लागूं दिली नव्हती, जीवनाच्या शेवटच्या दिवसांत देखील चांदीचीं भांडीं व उंची गालिचे विकून टाकून त्याचे टक्के करण्याची तत्परता दाखविली होती, याबद्दल तीं सर्व संबंधित माणसें जळफळत होतीं ! मला अर्थात् कांहींच वाटत नव्हतें. त्या अपत्य-विहीन, पाशरहित माणसानें, संपत्तीवरच सारी माया जडविली होती, आणि मुलाचें संगोपन करावें तसें तो त्या अपाम संपत्तीचेंच रक्षण करीत होता, हें मीं ओळखलें होतें. त्याच्याविषयीं विचार करीत असतांनाच आम्हीं त्या अजस्र वाड्यांत आलों, आणि अन्त्यशय्येच्या जागीं ठेवलेल्या दिव्याचें दर्शन घेतलें, व मीं तें घर सोडलें. त्यानंतर मी आजतागायत तिकडे गेलों नाहीं—जाण्याची इच्छाच झाली नाहीं.

अजूनहि एखादे वेळीं मी मंडईत गेलों तरी त्या वेळीं मी विड्याच्या पानांच्या गाळ्यांकडे जात नाहीं, तिकडे गेलों तर अवजड अंगाची, व म्लान-मलिन चेहऱ्याची ती वास्तु दिसेल अशी सारखी भीति मला वाटत असते.

* * *

मौज : दिवाळी अंक

# अंतू बरवा

देशपांडे पु. ल.

रत्नागिरीच्या त्या मधल्या आळींत लोकोत्तर पुरुष राहातात. देवानें ही माणसांची एक निराळीच घडण केलेली आहे. त्यांच्यांत रत्नागिरीच्या लाल चिऱ्याचे, नारळा-फणसाचे, खाजऱ्या आळवाचे आणि फट् म्हणतां प्राण कंठाशीं आणणाऱ्या ओल्या सुपारीचे गुण अगदीं एकवटून आहेत. रत्नागिरीच्या शितांतच ही भुतावळ लपली आहे कीं पाण्यांतच प्राणवायु नि पाणवायूच्या जोडीला आणखी कसला वायु मिसळला आहे तें त्या रत्नांग्रीच्या विश्वेश्वरालाच ठाऊक.

अंतू बरवा ह्याच मातींत उगवला नि पिकला. वास्तविक अंतू बरव्याला कुणी अंतू असें एकेरी म्हणावें हें त्याचें वय नव्हे. मी बारा-चौदा वर्षांपूर्वी त्यांना प्रथम पाहिलें त्या वेळींच त्यांच्या दाढीचे खुंट नि कानावरचे आणि छातीवरचे केस पिकलेले होते. दांतांचा बराचसा अण्णू गोगट्या झाला होता. अण्णू गोगट्या होणें म्हणजे ' पडणें '. हा अंतूनें मराठी भाषेला बहाल केलेला वाक्प्रचार आहे. रत्नांग्रीचा अण्णू गोगटे वकील गेलीं सहा वर्षें ओळीनं मुन्शिपाल्टीच्या निवडणुकींत पडत आला आहे. तेव्हांपासून विहिरींत पोहरा पडला तरी पोहऱ्याचा " ' अण्णू ' झाला काय रे ! " म्हणून अंतू ओरडतो.

समोरासमोर अंतूला कोणी अंतू म्हणत नाहीं. परंतु उल्लेख मात्र सहसा एकेरी. किंबहुना कोंकणांतली मंडळी एकूणच एकवचनी. पण

अंतूला संबोधन ‘ अंतूशेट ’ हें आहे. ह्या चित्पावनाला ही वैश्यवृत्तीची उपाधी फार प्राचीन काळीं चिकटली. अंतूच्या हातून तें पाप घडलें होतें. पहिल्या महायुद्धाच्या वेळीं अंतूनें बंदरावर कसलें तरी दुकान काढलें होतें. तें केव्हांच बुडालें. परंतु ‘ अंतूशेट ’ व्हायला तें कारण पुरेसें होतें. त्यानंतर अंतूनें पोटापाण्याचा उद्योग केल्याचें कोणाच्या स्मरणांत नाहीं. दोन वेळच्या भाताची त्याची कुठें तरी सोय आहे. थोडी जमीन आहे. नारळीचीं पांच-पंचवीस आणि पोफळीचीं दहा-पंधरा आणि रातांबींचीं कांहीं अशीं झाडें आहेत. दोन-पांच हापूस आंबे आहेत– कुठें फणस, चिंच उभी आहे. वाडवडलार्जित घराच्या वांटणींत एक पडवी आणि खोली आली आहे. विहिरीवर वहिवाटीचा हक्क आहे. ह्या सगळ्या आधारावर अंतूशेट उभे आहेत.

त्यांची आणि माझी पहिली भेट बापू हेगिष्ट्याच्या दुकानांत झाली. मी सिगरेटी घ्यायला गेलों होतों आणि केसरीच्या मागून अर्धा जस्ती काड्यांचा चष्मा कपाळावर घेत अंतूशेटनीं तडक प्रश्न केला होता...

“ वकीलसाहेबांचे जांवई ना ? ”

“ हो ! ”

“ झटक्यांत ओळखलेंच मीं ! बसा ! बापू, जांवयबापूंना चहा मागवा. ”

एकदम इतक्या सलगींत आलेला म्हातारा कोण हें मला कळेना. पण अंतूशेटनींच खुलासा केला, “ तुमचे सासरे दोस्त हो आमचे. सांगा त्यांना अंतू बरवा विचारीत होता म्हणून... ”

“ ठीक आहे ! ”

“ केव्हां आलांत पुण्याहून ? ”

“ परवांच आलों. ”

“ बरोबर. दिवाळसण असेल. मागा चांगली फोर्ड गाडी ! काय ? ”

“ तुमचे दोस्त आहेत ना, तुम्हीच सांगा. ”

“ वा...पुण्याचे तुम्ही...बोलण्यांत ऐकणार काय आम्हांला !... मग मुक्काम आहे कीं आपली फ्लाइंग व्हिजीट ? ”

“ दोन-तीन दिवसांनीं जाईन ! ”

" उत्तम ! थोडक्यांत गाडी असते. त्या सड्यावरच्या कसोपकर वकिलाच्या जांवयासारखें नका करूं. त्यानें सहा महिने तळ ठोकला. शेवटीं कसोपकर वकिलान् एक दिवस खळं सारवायास लावलें त्यास ! जास्त दिवस जांवई राहिला कीं तो दशम ग्रह होतो. कसें ? "

" बरोबर आहे ! "

" बापूशेट ओळखलंत कीं नाहीं ? आमच्या वकिलांचे जांवई ! आम्ही दोघेहि त्यांचेच पक्षकार हो ! "

हेगिष्ट्यांनीं नमस्कार केला.

" चहा घेतां ? "

" नको हो, उकडतंय् फार ! " मी म्हणालों.

" अहो, रत्नांग्रीस उकडायचेंच. गोठ्यांत निजणारान् बैलाच्या मुताची घाण येते म्हणून भागेल काय ? " शेवटला ' काय ? ' वरच्या पट्टींत उडवीत अंतूशेट म्हणाले, " रत्नांग्रीस थंड हवा असती तर शिमला म्हणाले नसते काय आमच्या गांवाला ?...पण उकाड्याच्या तुमच्या सड्यावर अधिक त्रास ! दुपारच्या वेळीं मारा सायकलीवर टांग नी थेट या आमच्या पोफळीच्या बागेंत झोंपायला. पोफळीचा बाग म्हणजे एअर-कंडिशन हो... " मनमुराद हंसत अंतूशेट म्हणाले. वर आणि ' आमच्या कंट्री विनोद हो जांवयबापू ' हेंहि ठेवून दिलें. " बापूशेट, पाहुणे लेखक आहेत हो...आमच्या आबा शेट्यासारखीं नाटकें लिहिलीं आहेत. फार बोलूं नका. नाहीं तर तुमच्यावर लिहितील एखादा फर्मास फार्स ! "

अंतूशेट बर्‍यापर्यंत माझी कीर्ति पोहोंचल्याचें ऐकून झालेला आनंद बापूशेट हेगिष्ट्याच्या प्रश्नानें मावळला. मला नीट न्याहाळीत बापूशेट म्हणाले, " काय करतात ? "

" करतात काय म्हंजे ? खुळे कीं काय तुम्ही हेगिष्टे ? ती रद्दी काढा. दहा ठिकाणीं फोटोखालीं नांव छापलेलें आढळेल तुम्हांला. सिनेमांत असतात. "

" म्हणतां काय ? " हेगिष्टे माझ्याकडे ' अजि म्यां ब्रह्म पाहिलें ' असा चेहरा करून पाहत म्हणाले.

“ काय हो जांवईबापू एक विचारूं काय ? ” मिस्किल प्रश्नाची नांदी चेहऱ्यावर दिसत होती.

“ विचारा कीं–”

“ एक सिनेमा काढला कीं काय मिळतं हो तुम्हांला... ? ”

मी कांहीं कोंकणांत प्रथमच आलों नव्हतों त्यामुळें ह्या प्रश्नाला मी सरावलों होतों—

“ तें सिनेमासिनेमावर अवलंबून आहे...”

“ नाहीं, मण आम्ही वाचलंय् एक लाख - दीड लाख मिळतात...”

“ मराठी सिनेमांत एवढे कुठले ? ”

“ समजा !— पण पांच पुज्यं नसलीं तरी तीन पुज्यं पडत असतीलच...”

“ पडतात कधीं कधीं...बुडतातहि ! ”

“ अहो, तें चालायचंच. धंदा म्हटला कीं चढणं आलं नी बुडणं आलं... आणखी एक विचारूं काय ?...म्हणजे रागावणार नसलांत तर...”

“ छे, रागवायचं काय...”

“ सिनेमांतल्या नट्यांबद्दल आम्ही हें जें कांहीं वाचतों तें खरें असतें कीं आपलें गंगाधर बाष्टयाच्या अस्सल बेळगांवी लोण्यासारखं पीठ मिसळलेलें ? ”

“ हें जें कांहीं म्हणजे ? ” मी उगीचच वेड पांघरलें.

“ वस्ताद हो जांवयबापू ! कोर्टांत साक्षीदार म्हणून नांव काढाल ! अहो, हें जें कांहीं म्हणजे तर्जनी-नासिकान्यायांतला प्रकार म्हणतात तें...” हा तर्जनी नासिकान्याय चटकन माझ्या ध्यानांत आला नाहीं. शेवटीं अंतूशेटनीं आपली तर्जनी नाकपुडीला लावीत साभिनय खुलासा केला. तेवढ्यांत हेगिष्टयांनीं मागवलेला चहा आला. “ घ्या ! ” अंतूशेटनीं माझ्या हातांत कप दिला आणि त्या चहावाल्या पोराला, “ रत्नांग्रीच्या समस्त म्हयशी तूर्तास गाभण कायरे झंप्या ” असें म्हणून जातां जातां चहाच्या रंगावर शेरा मारला. आणि बशींत चहा ओतून फुर्र फुर्र फुंकायला सुरुवात केली. वास्तविक त्या पोऱ्याला चहांत दूध कमी आहे हें त्यांना सरळ सांगतां आलें असतें. पण अंतूशेटचेंच काय त्यांच्या साऱ्या आळीचें बोलणेंच तिरकें. ”

अंतूशेटचा आणि माझा परिचय आतां जुना झाला. गेल्या दहा-बारा वर्षांतच मी जितक्या वेळां रत्नागिरीला गेलों तितक्या वेळां मी त्यांना भेटलों. त्यांच्या अड्डयांत त्यांनीं मला जमवूनहि घेतलें. एक-दोनदां गंजीफा शिकवायचा प्रयत्नहि केला. आणि त्या साठीच्या आसपास उभ्या असलेल्या वृद्धांच्या अड्डयांत मग अंतूशेट आणि त्यांचे सांगाती यांचं जीवनविषयक अचाट तत्त्वज्ञान मीं खूप ऐकलं. त्यांची विशिष्ट परिभाषा तिथें मला कळली. खांद्यावर पैरणी, कमरेला पंचा, पायांत करकरती वहाण, एका हातांत दंडा नि दुसऱ्या हातांत फाणस घेऊन. " रे गोविंदभट टाकतोस काय दोन डाव ? " किंवा " परांजपे, जागा आहेस कीं झाला तुझा अजगर ? " अशा आरोळ्या मारीत पत्त्यांतले भिडू गोळा करणाऱ्या त्या मडळींत मीहि भटकलों. पत्त्यांचा डाव फारसा रंगला नाहीं कीं पानें टाकून, " जांवयबापू, म्हणा एखादा मालकंस...गडबोल्या कूट थोडा तबला पाव्हण्याबरोबर—खातूशेट उघडा तुमचा खोका... " असल्या फर्माइशीनंतर मी आवाजहि साफ करून घेत असे. " नरड्यांत मज्जा आहे हो तुमच्या " ही दाद तिथेंच मिळे.

वर्षा दोन वर्षांतून एखादी फेरी रत्नागिरीला घडे. दर फेरींत मात्र एखादा मेंबर गळाल्याचें कळे.

" दामूकाका दिसले नाहींत कुठें अंतूशेठ ! "

" कोण ? दामू नेना ?—तो चैनींत आहे ! वरती रंभा त्याच्या टकलावर तेल थापत्ये नि उर्वशी पंख्यान् वारा घालत्ये म्हणतात. "

" म्हणजे ? "

" अहो, म्हंजे वाघाचे पंजे ! दामू नेन्याची रत्नांग्रीहून झाली बदली ! " असें म्हणून अंतूशेटनीं आकाशाकडे बोट दाखवलें.

" अरे अरे अरे ! कळलं नाहीं मला. "

" अहो, कळणार कसं ? दामू नेना चचला म्हणून रेडिओंत का बातमी सांगणार आहेत ? 'केसरीं'त आला होता गृह्यसंस्कार छापून. मनमिळावू, प्रेमळ व धर्मपरायण होते असा ! छापणारे काय— द्याल तें छापतील. दामू नेना कसला प्रेमळ ? ताटीवर आडवा पडला होता तरी कपाळावरची आठी तशीच !—एके रात्रीं उकडतांय् घरांत म्हणून खळ्यांत झोंपला तो तिथेंच संपलेला आढळला पहांटे ! पुण्यवान् माणूस. गतवर्षीं आषाढीच्या

दिवशीं गेला वैकुंठलोकीं–रत्नांग्रींत दोन पालख्या निघाल्या आषाढीला... एक विठोबाची नि दुसरी दामू नेन्याची...आषाढांत तो गेला नि विजयादशमीला आपल्या दतू परांजप्यान् सीमोल्लंघन केलेनीत. अवघ्या देहाचें सोनें झालें–इजा झाला बिजा झाला आतां तिजाची वाट पहातोंय् !” मिष्किलपणानें खांदा उडवीत अंतूशेट म्हणाले.

पांच फुटांच्या आंतबाहेरची उंची, तांबूस गोरा वर्ण, तोंडावर बारीक वांगाचे ठिपके, घारे मिचमिचे डोळे, वयोमानाप्रमाणें वाढत चाललेल्या सुरकुत्या, डोक्यावर ईशान्य नैर्ऋत्य दाखवणारी तेलाच्या कडा उमटलेली टोपी, अंगांत अंगरखा, कमरेला गुडघाभर पंचा, पायांत कोंकणी वहाणा, दांतांची अर्धी पंगत उठून गेलेली, त्यामुळें मोकळ्या हिरड्यांना जीभ लावीत बोलायची खोड–आणि ह्या साऱ्या साजासकट वजन सुमारें शंभर पौंड...ह्या सगळ्या जराजीर्ण होत चाललेल्या गोष्टींत एक गोष्ट ताजी म्हणजे सानुनासिक परंतु सुस्पष्ट आवाज आणि डोक्यावर पिढ्यान् पिढ्या थापलेल्या खोबरेल तेलानें दिलेली वंशपरंपरागत तैलबुद्धि ! अंतूशेटच नव्हे, तर त्या आळींतले त्या वयाचे सारेच नमुने कमी-अधिक फरकानें एकाच वळणाचे किंवा एकाच आड-वळणाचे. भाषेला फुरश्यासारखी पायांत गिरकी घेऊन चावायची संवयच झालेली. कुणाचं बरं झाल्याचं सुख नाहीं; वाईट झाल्याचं दुःख नाहीं. जन्माचं सोयर नाहीं; मरणाचं सुतक नाहीं. गाण्याची रुचि नाहीं–तिटकारा नाहीं–खाण्यांत चवीपेक्षां उदरभरण हाच स्वच्छ हेतु ! आयुष्याची सारवट गाडी वंगण नाहीं म्हणून कुरकुरली नाहीं – आहे म्हणून वेगानें पळाली नाहीं–चाल मात्र कोंकणी वाटेसारखी सदां नागमोडीची. नशिबांत अश्वत्थाम्याघरच्या पिठाचा दुधाची वाटी ! त्याच्या घरीं पिठाचं दूध झालं. इथें देवानं नारळाचा कल्पवृक्ष दिलेला. पण त्यांतल्या खोबऱ्याहून करवंटीची सलगी अधिक !

उन्हाळ्यांत कुठली तरी मुंबईची दुय्यम नाटक कंपनी–झापाच्या थेटरांत ‘ एकच प्याला ’ घेऊन आली होती. संच जेमतेमच होता. पहिला अंक संपला. बाहेर सोड्याच्या बाटल्यांचे चीत्कार सुरू झाले. किटसनच्या प्रकाशांत अंतूशेटची मूर्ति दिसली. अंतूशेट फरकॅपवाल्या मॅनेजरशीं चर्चा करीत होते,

“ कशी काय गर्दी ? ”

" ठीक आहे ! "

" प्लान तर मोकळाच दिसतोय. सोडतां काय अर्ध्या तिकिटांत..."

" छे ! छे ! "

" अहो, छे छे म्हणून झिटकतां काय पाल झाडल्यासारखें ? पहिला अंक ऐकला मी हितूनच. सिंधूच्या पार्ट्यांत काय दम दिसत नाहीं तुमच्या... लागे हृदयीं हुरहुर म्हणजे अगदींच पिचकवणी म्हटलंनीत्...बालगंधर्वांचें ऐकलें होतेंत काय ? " नेहमींप्रमाणें शेवटला ' काय ' उडवीत अंतूशेट म्हणाले.

मॅनेजरहि जरा उखडले,

" आग्रह नाहीं आमचा तुम्ही नाटक बघायला चला असा..."

" गांवांत आग्रहाचे बोर्ड तर टांगले आहेत—आणि काल घरोघर जाहिरातीची अक्षत देखील घेऊन हिंडत होते तुमचे ब्यांडवाले ! अहो ! एर्वीतेर्वी रिकाम्या खुर्चीला नाटक दाखवायचें—चार आण्यांत जमवा. "

" चार आण्यांत बघायला काय डोंबाऱ्याचा खेळ आहे काय ? "

" अहो, तो बरा ! आधीं तो खेळ दाखवतो आणि मग थाळी फिरवतो... तुम्ही तसें करा. पुढलें कशि या त्यजूं पदाला जमलें फक्कड तर थाळींत चार आणे आणखी टाकीन..." बाजूची मंडळी हंसली आणि मॅनेजर आणखी उखडला. तेवढ्यांत अंतूशेटची नजर माझ्याकडे वळली.

" नमस्कार हो जांवयबापू..."

" नमस्कार ! "

" काय जमलाय काय एकच प्याला ? "

" ठीक आहे ! "

" फुकट पासांत कीं काय तुम्ही ? बाकी तुम्हीहि त्यांतलेच. एक न्हावी दुसऱ्या न्हाव्याच्या दाढीचे पैसे घेत नाहीं म्हणतात. "

" नाहीं हो—हें पहा तिकीट आहे ! "

" मग ठीक आहे. म्हणून मुळमुळीतसें उत्तर दिलेंत ? दमड्या मोजल्या आहेत ना तुम्ही ?–तो सिंधूचा पार्टी तर एकदम कंडम वाटला मला—"

" अहो, सिंधूचा पार्टी कसला ? बाई आहे ती काम करणारी..."

" सांगताय काय ? कसला हो आवाज नि कसलें तें दिसणें ? मनांत आणील तर कडेवर घेईल सुधाकरला--सिंधु कसली सिंधुदुर्ग आहे मालवणचा नुसता..."

" पहिलंत वाटतं नाटक ? "

" उगीच जरा-- त्या कोपऱ्यांतलीं दोन झापें बाजूला करून पाहिलं घटकाभर...छ्याः ! ह्यांच्यापेक्षां दशावतारी बरे—"

कांहीं कारण नसतांना आपल्या मताची एक पिंक टाकून अंतूशेट निघून गेले. बाकी अशा दिवस-रात्र ' पिंका ' टाकीत टाकीतच त्यांचें आयुष्य गेलें. अंतूशेटची व माझी आतां इतक्या वर्षांची ओळख, परंतु त्यांच्या कौटुंबिक परिस्थितीविषयीं मला फारसें कधींच कळलें नाहीं. त्यांच्याच अड्डयांतल्या अण्णा सान्यांनीं एकदांच फक्त कांहीं माहिती पुरवली होती. कधीं तरी त्यांच्या बोलण्यांतून अंतूशेटच्या मुलाचा उल्लेख आला.

" म्हणजे ? अंतूशेटना मुलगा आहे ? "

" आहे ? म्हणजे काय ? चांगला कलेक्टर आहे ! "

" कलेक्टर ? "

" भायखळ्याच्या स्टेशनावर तिकिटें गोळा करतो. "

चेहऱ्यावरची सुरकुती हालूं न देतां अण्णा म्हणाले.

" मग वडलांना मदत करीत नाहीं कीं काय ? "

" अहो, करतो कधीं कधीं—त्यालाहि त्याचा संसार आहे...त्यांतून बी बी शी आयला जायपीचा डबा जोडलेला..."

ह्या अड्डयांतले हे विशेष शब्द गोळा केले तर एक स्वतंत्र कोश होईल. बी बी सी आय्ला जी आय् पीचा डबा जोडणें म्हणजे आंतर्जातीय विवाह हें लक्षांत यायला मला उशीर लागला.

" काय लक्षांत आलं ना ? तेव्हां अंतूशेटच्या स्नान-संध्येची पंचाईत होते– मुलाच्या घरीं थोडीं इतर आह्निकेंहि चालतात म्हणे. आमच्या अंतूशेटचें जमायचें कसें ? एकदां सगळा अपमान गिळून नातवाचा चेहरा पाहण्यास गेला होता...गणित चुकल्यासारखा परतला...दसरा-दिवाळीला अंदू बऱ्याला मिळतें आपलें मनिआर्डरींतून पितृप्रेमाचें पोस्त ! पांच-दहा

रुपयांचें ! तेवढ्यांत फिरतो मिशीला कोकम लावून तूप म्हणून सांगत ! आणि उगीचच खुर्दा खुळखुळावतो चार दिवस खिशांत हात घालून..."

"अहो, तिकिट कलेक्टरला पगार तो काय असणार ?"

"पगार बेताचाच-पण चवल्या पावल्यांचीं आचमनें चालतात म्हणतात...खरं खोटं देव जाणें आणि चालायचेंच ! घेतले तर घेऊं देत... काय ? अहो, आठ आणे खाल्ले कीं चौकडीचा मुगुट घालून रत्नागिरीच्या डिस्ट्रिक्ट जेलांत घालतात...आणि एक लाख खाल्ले कीं गांधी टोपी घालून पाठवतात असेंब्लींत ! लोकनियुक्त प्रतिनिधि !"

राजकारण हा तर अंतूशेटच्या अड्ड्यांतला लाडका विषय ! प्रत्येक राजकीय पुढाऱ्यावर आणि तत्त्वप्रणालीवर अगदीं मौलिक विचार !

कोंकणांत दुष्काळ पडला होता. तसा तिथें नेहमींच दुष्काळ. पण हा दुष्काळ अंतूशेटच्या भाषेंत सांगायचें म्हणजे 'फ्यामिन् आक्टान्वयें पास, झालेला !' दुष्काळी भागांतून नेहरूंचा दौरा चालला होता. गांवांत धामधूम होती. कोणी तरी संध्याकाळीं अंतूशेटना विचारलें, "काय अंतूशेट ! भाषणास दिसलां नाहीं ?"

"कुणाच्या न्हेरूच्या ? छाट् ! अरे दुष्काळ पडला हितें—तर भाषणें कसलीं देतोस ? तांदूळ दे ! हें म्हणजे भाट्याच्या खाडींत बुडणाऱ्या दालद्याला विश्वेश्वराच्या घाटीवर उभें राहून कुराण वाचून दाखवण्यापैकीं आहे. तो तिथें बोंबलतोय् नी हा हितें...ह्याचा त्यास उपयोग नाहीं—नि त्याचा ह्यास ! तुम्ही आपले खुळे—आला न्हेरू चालले बघायास ! आणि रत्नांग्रींत दाखवलेंनीत काय त्यास ? बाळ गंगाधर टिळक जन्मले ती खोली आणि खाट ? गंगाधरपंत टिळकास काय स्वप्नांत दृष्टान्त झाला होता काय रे—तुझ्या बायकोच्या पोटीं लोकमान्य जन्मास येणार म्हणून ? कुणाची तरी खाट दाखवली नि दिलें ठोकून त्याच्यावर टिळकान् पहिलें ट्यां केलें म्हणून ! पुरावा काय ? का टिळकाच्या आयशीचें बाळंतपण केलेली सुईण होती साक्षीस ? टिळकाचे साडे ! शंभर वर्षें झालीं त्याच्या जन्मास. तूं जन्माला आलास ती खोली तुझ्या मातुश्रीस तरी सांगतां येईल काय ? म्हातारीला विचारून ये घरीं जाऊन आणि मग सांग मला टिळकाच्या नि न्हेरूच्या गोष्टी..."

मला नेहमीं प्रश्न पडे, कीं ह्या मंडळींचीं आदराचीं स्थानें कोणतीं ? गांवांत ' पंडित ' आला कीं त्याला ' पढिक ' म्हणून उडव.

" बाजारांत जाऊन पैशाचें लिंबू आणायास सांग. स्तंभाजवळच्या लायब्ररींत जाईल नि तिथें मागेल लिंबू ! "

कुणाचा मुलगा प्रोफेसर झाला हें ऐकल्यावर अंतूशेट चटकन् म्हणाले, " सर्केशींत काय हो ? पूर्वी एक छत्रे प्रोफेसर होता. " कुणी नवें दुकान काढलें तर ' दिवाळ्याचा अर्ज आत्तांच मागवून ठेव म्हणावें ' हा आशीर्वाद.

जीवनाच्या कुठल्या तत्त्वज्ञानाचा अर्क ही मंडळी प्यालीं आहेत देव जाणे. त्यांतलीं निम्म्याहून अधिक माणसें मनिआर्डरीवर जगतात आणि त्यांतले पैसे वांचवून दावे लढवतात. प्रत्येकाची तारीख पडलेली. विशाल सागरतीर आहे, नारळीचीं बनें आहेत...पोफळीच्या बागा आहेत...सारं कांहीं आहे, पण त्या उदात्ततेला दारिद्र्य विलक्षण छेद देऊन जातं आणि मग उरतं एक भयाण विनोदाचं अभेद्य कवच !

कशावरून तरी गांधींच्या गोष्टी निघाल्या. अंतूशेटनीं आपलं भाष्य सुरू केलं : " अहो, कसला गांधी ? जगभर गेला पण रत्नांग्रीस आला नाहीं–पक्का तो. त्यास नेमकें ठाऊक इथें त्याच्या पंचाचें कौतुक नाहीं नी दांडीचें नाहीं––आम्ही सगळेच पंचेवाले नि त्याच्याहि पेक्षां उघडे ! सुताबितांत तथ्य नाहीं हो ! आमचा शंभूभट जन्मभर जानव्याचें सूत काढीत आला. ब्रिटिशसरकार सोडा, पण रत्नांग्रीचा गिलिगन कलेक्टर देखील घाबरला नाहीं !––तिसरें शस्त्र म्हणजे उपासाचें ! इथें निम्में कोंकण उपाशी ! नेहमीं तुपाशीं खाणाऱ्यास उपाशी माणसाचें कौतुक... आम्हांस कसलें ?...नाहीं, माणूस असेल मोठा...पण आमच्या हिशेबीं त्याच्या मोठेपणाची नोंद करायची कुठल्या खात्यावर ? आणि स्वराज्याचा म्हणाल तर संबंध गांधीशींहि नाहीं, टिळकांशींहि नाहीं नि सावरकराशींहि नाहीं."

" म्हणजे स्वराज्य काय आकाशांतून पडलं ? "

" तें कुठून पडलं तें तुम्ही तपासा ! पण इंग्रज गेला तो कंटाळून. अहो, लुटण्यासारखें काय शिल्लक होतें ? धंदा बुडीत खातीं जायला लगला– फुंकलेनीत दिवाळें ! कुंभार मडकीं घेऊन गेला तुम्हीं फुंका उकिरडा !

हें सगळें चक्रनेमिक्रमेण होतें...सत्ता इंग्रजाची नाहीं, न्हेरूची नाहीं आणि जनतेची नाहीं...सत्ता आहे विश्वेश्वराची !"

"मग तुमचा विश्वेश्वर इंग्रजाच्या ताब्यांत कसा गेला ?"

"खुळे कीं काय तुम्ही ? विश्वेश्वर घट्ट आहे राजिवड्यावर ! अहो, एक खेळ करून दाखवला त्यानें..."

"दीडशें वर्षांच्या गुलामीचा कसला खेळ ?"

"अहो, दीडशें वर्षं तुमचीं ? ब्रह्मदेवाच्या रिष्टवाचांतला काटा सेकंदानं देखील सरकत नाहीं हजार वर्षं ओलांडल्याशिवाय !"

कोंकणांतल्या त्या मधल्या आळींतल्या ओसरीवर, भोंवतीं माडाच्या काळ्या आकृति हलतांना कंदिलाच्या प्रकाशांत तीं--थकलेलीं सुकलेलीं तोंडें हें तत्त्वज्ञान सांगूं लागलीं कीं काळीज हादरतें..."अहो, समाजवादाच्या गफ्फा आहेत हो गफ्फा ! अहो, एक आंब्याचें पानदेखील नसतें हो दुसऱ्यासारखें...ब्रह्मदेवाच्या दरबारीं प्रत्येक भांडें निराळें...सगळ्या माणसांचीं नशिबें सारखीं होतील कशीं ? घटकाभर धरा तुमचा आला समाजवाद ! तो आमचा रत्नांग्रीचा गांवगांधी शिट्टया फुंकून फुंकून सांगतो तशी आली कोंकण रेल्वे नी गेली पांडू गुरवाच्या परसांतून—म्हणून काय थोट्या पांडबाच्या खांद्याला हाताचे खुंट फुटणार काय ?...आणि हात नाहींत म्हणजे मग कसेल त्याची जमीन, दिसेल त्याची थैली, ह्या तुमच्या राज्यांत थोटा पांडू कसणार काय नि कसा ? तो तसाच राहायचा ! स्वराज्य आलं म्हणून हरि साठ्याचा तिरळा डोळा सरळ नाहीं झाला नि महादेव गडबोल्याचं धोंद आंत नाहीं गेलं !—हें डावें उजवें रहायचेंच समाजांत ! अहो, रामराज्यांत देखील मारुतीचें शेपूट उपटून रामान् आपल्या पाठीस नाहीं जोडलें—हा नरच राहिला नि तो वानरच राहिला..."

अशा वेळीं अंतूशेटच्या जिभेवर सरस्वती नाचते.

"बरोबर आहे !"

"उगीच तोंड देखलें बरोबर आहे म्हणू नका त्या श्यामराव मुरकुट्यासारखें ! चुकत असलें तर कान उपटा ! तुम्ही माझ्याहून लहान खरे पण शिक्षणान् थोर आहांत..."

अंतूशेटच्या असल्या भाषणांत केवळ तिरका विनोद नसतो—त्यांचें कुठें तरी कांहीं तरी जळत असतें.

गेल्या चार-पांच वर्षांत रत्नागिरीला फार वेळां जातांच आलें नाहीं. आतां तिथें वीज आली. कॉलेज आलें—डांबरी रस्ते आले. मी दोन-तीन वर्षांपूर्वीं गेलों तेव्हां अंतूशेटना म्हणालों,

" अंतुशेट, रत्नागिरी झकपक झाली हो तुमची ! विजेचे दिवे आले. तुमच्या घरीं आली कीं नाहीं वीज ? "

" छे हो–काळोख आहे तो बरा आहे ! उद्यां झकपक प्रकाश पडला तर बघायचें काय दळिद्रच ना ? अहो पोपडे उडालेल्या भिंती नि गळकीं कौलं बघायला वीज हो कशाला ? आमचें दळिद्र काळोखांत दडलेलें बरें ! " अंतूशेट मनमुराद हंसले. या खेपेला दातांचा जवळजवळ संपूर्ण अण्णा गोगस्या झालेला दिसला. शिवाय अड्डयांतलीं आणखीहि एक-दोन मंडळी ' निजधामाला ' गेल्याचें कळलें.

कधीं नाहीं ती एक कारुण्याची नि गोडव्याची झांक अंतूशेटच्या बोलण्यांत मला आढळली. अड्डयांतल्या रिकाम्या जागा त्यांच्या मनांत कुठं तरी घर करून जात असाव्या. " जोगळेकरांचा मुलगा दिल्लीस बदलला हो वरच्या जागेवर... " अंतूशेट आपण होऊन सांगत होते. " म्हाताऱ्याला काशीविश्वेश्वर हरिद्वार हृषिकेश घडवून आणलनीत...मावंदें घातलें जोरदार शंभू जोगळेकरान् ! गंगेच्या पाण्याचा लहानसा गड्डू शिलबंद करून आठवणीन् घेऊन आला माझ्यासाठीं ! पुढल्या खेपेला याल तेव्हां त्याचें शिल फोडून गड्डू आमच्या तोंडांत उपडा झालेला दिसेल हो जांवयबापू... " पहिल्या भेटींतलें संबोधन अजून कायम होतें.

त्यानंतर गेल्याच वर्षीं पुन्हां रत्नागिरीला जाण्याचा योग आला. अंतूशेटच्या घरचा गंगाजलाचा गड्डू सुदैवानें सीलबंदच होता.

" वा वा ! कांग्रेचुलेशन हो जांवयबापू ! कळलें आम्हांला. जाऊन या हो. एक रिक्वेष्ट आहे. आतां इंग्लिश बोललें पाहिजे तुमच्याशीं... "

" कसली रिक्वेस्ट ? "

" तेवढा कोहिनूर हिरा पाहून या. माझी आपली उगीचच तेवढी इच्छा राहिली हो ! पिंडाला कावळा नाहीं शिवला तर कोहिनूर कोहिनूर

म्हणा. शिवेल ! परत आल्यावर सांगा कसा दिसतो तो. लंडन प्यरिस सगळं बघून या. " मला उगीचच त्यांच्या पाया पडावें असें वाटलें. मी रस्त्यांतच त्यांना वांकून नमस्कार केला.

" आयुष्यमान् व्हा ! श्रद्धाळू आहांत म्हणून यश आहे हो तुम्हांला."

मीं निरोप घेतला आणि चार पावलें टाकलीं असतील. लगेच हांक ऐकूं आली....

" ओ जांवयबापू...'

" काय अंतूशेट ? "

" जातांय ते एकटेच कीं सपत्नीक ? "

" आम्ही दोघेंहि जातोंय्. "

" हें चांगलें केलैंत !...उगीचच एक किडा आला डोक्यांत. म्हटलें परदेशीं विद्या शिकायला निघाला आहांत--देवयानीची कथा आठवली... काय ? आमच्या मुलीलाहि आशीर्वाद सांगा हो ! तुमचं भाग्य तिच्यामुळें आहे. तुम्हांला म्हणून सांगतों. मनांत ठेवा हो !... कुठें बोलूं नका. चाळीस वर्षांपूर्वीं आमची ही गेली...दाराचा हापूस तेव्हांपासून ह्या घटकेपर्यंत मोहरला नाहीं...शेकड्यांनीं आंबा घेतलाय् एकेकाळीं त्या आंब्याचा...पण भाग्य कुठल्या वाटेनं जातं बघा. असो... सुखरूप या... इथून प्रयाण केव्हां ? "

" उद्यां सकाळच्या एस्. टी. नें जाणार ! "

" डायरेक्ट मुंबई कीं काय ? "

" होय ! "

" हें चांगलें केलैंत ! एकदां तो प्रवास घडला कीं त्या चिकाटीवर माणसांनीं पृथ्वीप्रदाक्षिणा करून यावें...परवां वरच्या आळींतला तात्या जोग जाऊन आला...अजून हाडांचा हिशेब जमवतोय–सात-आठ हांक हरवलीं म्हणतो यष्टींत..." अंतूशेट सगळें तोंड उघडून हंसत होते. आतां त्या तोंडांत एकच दांत लुकलुकत होता.

पहांटे पांच वाजतां एस्. टी. स्टॅण्डवर अंतूशेटची ' जांवयबापू ' ही

खणखणीत हांक ऐकूं आली. मी चकितच झालों. अंतूशेटनीं वैद्याच्या पुडीसारखी एक पुडी माझ्या हातीं दिली.

" तुमचा विश्वास नाहीं, ठाऊक आहे मला. पण एवढी पुडी असूं द्या तुमच्या खिशांत. विश्वेश्वराचा अंगारा आहे. विमानांतून जाणार म्हणून कळलें वकिलसाहेबांकडून...एवढी पुडी जड नाहीं खिशाला..."

एस्. टी. सुटली. आणि अंतूशेटनीं आमच्या कुटुंबीयांबरोबर सदरा धरून आपले म्हातारे मिचमिचे डोळे पुसले. तेवढ्या अंधुक प्रकाशांत त्यांचें तें खपाटीला गेलेलें पोट चटकन् माझ्या डोळ्यावर उगीचच आघात करून गेलें.

कोंकणांतल्या फणसासारखींच तिथलीं माणसें देखील खूप पिकल्याशिवाय गोडवा येत नाहीं त्यांच्यांत !

* * *

'दीपावली' : दिवाळी अंक

# जती

**पटवर्धन वसुंधरा**

आमच्या वडिलांसारखे वडील त्रिभुवनांत मिळणार नाहींत हें जरी खरें असलें, तरी त्यांचा एक गुण इतका टोकाला गेला आहे, कीं तो आतां जवळ जवळ दुर्गुणच झाला आहे. दया ! ज्याच्या त्याच्याविषयीं दया आणि माया ! या एका गुणापायीं सगळें वायां गेल्यासारखें वाटतें. त्यांचें त्यांनाच मिळत नाहीं. मी आतां मोठा झालों. घर, शेती पाहूं लागलों. आमचें राहणें जरी शहरांत असलें आणि आम्हांला जरी नोकऱ्या-चाकऱ्या असल्या तरी आज काल भागतें कुठें ? आणि अशा काय बाजीरावी नोकऱ्या लागून गेल्या आहेत तर सदां सर्वदां आबादी-आबाद असावी ? त्यामुळें खेड्यांत जें घर आणि शेती आहे तिकडे माझें मन वळलें.

खरें म्हणजे आमची वाडवडिलांपासून शेतीभाती. उसाचा मळा पिकवला तर सोन्याचें पीक येईल अशी जमीन. वाडवडिलांपासूनचें भलें मोठें घर. वाडाच म्हणानात. अंगण, सोपा, माजघर, स्वैंपाकघर, मागला सोपा, माडी, गच्ची, सारें कांहीं या घराला होतें. जरा सारवूनसुरवून निर्मळ केलें, भिंतींना पिवळ्या मातीचा रंग दिला कीं नवें बांधल्यासारखें दिसायचें.

पण आमच्या घरांत राहण्याचें भाग्य कांहीं आम्हांला कधीं लाभलें नाहीं. आमचे वडील शिकलेले. म्हणून त्यांनीं नोकरी धरली शहरांत. आणि आमच्या काकांना शेती आणि घर मिळालें. म्हणजे सगळें होतें दोघांच्या

नांवावर. पण काकांना शेतीकडे घातलें. अर्थात् घर आपोआपच त्यांना मिळालें. माझ्या वडिलांचें जसें लग्नकार्य झालें तसेंच काकांचेंहि झालें. माझ्या वडिलांना जशीं मुलें झालीं तशी काकांनाहि झालीं. पण आम्हीं तीनच भावंडें. आमचीं चुलत-भावंडें मात्र अकरा होतीं. आमचे वडील आमचा प्रपंच मोठा टुकीनें चालवीत होते. त्यांनीं कधीं आम्हांला कमी पडूं दिलें नाहीं. नोकरी करून शिवाय ते कुठें चहा-साबण वीक, कुठें फर्निचर करून वीक असे बारीकसारीक कांहीं तरी उद्योग करायचे. उद्योगी होते. हरहुन्नरी होते. कोणतेंहि काम त्यांना चटकन येत असे. कोणतेंहि काम करायाची त्यांना लाज वाटत नसे. त्यामुळें पैसा चांगला मिळवीत होते.

पण आमच्या काकांचें अगदीं उलट होतें. उद्योग कसा तो त्यांना माहीतच नव्हता. आधीं उठायचे उशीरा. मग सावकाश अंग खाजवतील, तंबाकू मळतील, तासभर चहा पीत बसतील. केव्हां तरी दांत घासायचे आणि केव्हां तरी आंघोळ करायची ! चापून झोप काढायची. दाबून गप्पा छाटायच्या आणि यांतून वेळ मिळेल तेव्हां शेती आणि जमीन ! ती सुद्धां करायची म्हणजे काय, तर उंटावरून शेळ्या हाकायच्या ! ओठावरचें जांभूळ आंत सार म्हणणारे आमचे काका ! स्वतः कधीं शेतावर गेले नाहींत. प्रथम त्यांनीं हाताखालीं माणसें ठेवून जमीन केली. अर्थात् शेतांत कांहीं उगवलें नाहीं. पुढल्या वर्षीं कुळांना देऊन केली, तर म्हणे मळ्याची चोरी झाली. त्यानंतर एकदां स्वतः केली. म्हणजे काय, कीं कांहीं केलं नाहीं. कागदपत्रांचा हा भारा काकांच्या जवळ होता. पण कशाचा कागद आणि त्यांत काय लिहिलें आहे हें कधीं त्यांनीं पाहिलें नाहीं. त्यांचीं नेहमीं खेंकटीं व्हायचीं. आणि तीं तशींच भिजत पडायचीं. त्यांची तात अगदीं गळ्याला लागली कीं, काकांची धांवाधांव सुरू व्हायची. माझ्या वडिलांना मग पत्रावर पत्रें. तारावर तारा. आपण स्वतः सुद्धां येऊन हजर व्हायचे. कर्जाचें तर विचारूंच नका; मला वाटतें, कर्ज करण्यांत आमच्या काकांच्या-इतका जबरदस्त माणूस संबंध दुनियेंत नसेल. प्रत्येक दुकानावर त्यांचें खातें होतें. आणि प्रत्येक दुकानावर त्यांचें कर्ज होतें. एवढी शेती असून काका सगळे बाहेरून विकत आणीत. आम्हांला तर कधीं मूठभर जोंधळा पाठवला नाहीं. कीं कधीं उसाचें कांडें धाडलें नाहीं. ते कर्ज करायचे.

आणि आमचे वडील तें फेडायचे. काकांचा जन्म होता कर्ज करण्याचा आणि आमच्या वडिलांचा होता तें फेडण्याचा! त्यांतून काकांचीं अकरा मुलें. त्यांचीं दुखणींबाणीं त्यांचा कपडालत्ता सगळे आमचे वडील पुरवायचे तरी "पुरत नाहीं" म्हणून कार्ड यायचेंच. किती वेळां आमच्या काकांनीं जमीन गहाण टाकली आणि माझ्या वडिलांनीं सोडवून घेतली त्याला पत्ताच नाहीं. एकदां तर काकांना दिवाळें काढायची वेळ आली. तेव्हां जामीन राहून आमच्या वडिलांनीं त्यांना सोडवलें. उपद्व्याप करावेत हें काकांचें काम आणि ते निस्तरावेत हें वडिलांचें काम! माझी आई नेहमीं म्हणायची कीं, "राहतात आमच्याजवळ म्हणून आमचे म्हणायचे. बाकी संसार करतात आपल्या भावाचा."

आणि माझी काकू अगदीं काकांना शोभेशीच होती. ती त्यांच्याहिपेक्षां थंड होती. तिनें स्वतः कधीं आंघोळ केली आहे असें वाटलें नाहीं. मुलांबाळांच्या आंघोळी झाल्या तरी वहावा, न झाल्या तरी वहावा अशी स्थितप्रज्ञ होती. जेमतेम स्वैंपाक करायची. आणि जेवली कीं आडवी व्हायची. घरांत जागजागीं केराचे पुंजके सांठलेले असायचे. मग अंगणाला केरसुणी कुठून लागणार? खेड्यांत राहून शिवार-रानांत राहिल्याचें सुख ही मंडळी उपभोगत होती.

असा सगळा काकांच्या संसाराचा आनंद होता. पण आमचे काका मात्र खरेंच आनंदांत होते. जीवाची लगबग आणि अंतःकरणाची कालवा-कालव, या वस्तु त्या नवरा–बायकोंना मुळीं माहीतच नव्हत्या. त्यांना एक ठाऊक होतें, कीं काय वाटेल तें झालें, तरी आपला भाऊ कांहीं आपल्याला सोडणार नाहीं. आपली सगळी घाण तो जरूर निस्तरेल. त्यामुळें नवराबायकोंचा निवांत गारवा होता.

पण आतां मला समजूं लागलें होतें. आमची आईहि मला म्हणायची, "केशव, अरे, हें चाललंय तरी काय? तुझ्या काकांचं असं किती दिवस निस्तरायचं? वह्या काढ आणि हिशेब कर पाहूं कीं आजपर्यंत काका, काकू आणि त्यांचीं मुलं यांच्यापायीं किती पैसा गेला?"

मलाहि वाटलें, कीं आईचें म्हणणें खरें आहे. मी वह्या तपासल्या. मला असें आढळून आलें, कीं आपल्या डोक्यावरून पाणी गेलें आहे.

आजपर्यंत आमच्या निढळाच्या घामाचा पैसा नुसता पाण्यासारखा ओतला गेला होता. तो पैसा जर आमच्यासाठीं खर्च झाला असता तर मी आतांपर्यंत विलायतेला जाऊन आलों असतों. आमच्या वडिलांना काय म्हणावें तेंच मला कळेना. मी म्हणालों, "आई, बाबांनीं एवढा पैसा त्यांना दिला तरी कसा ?"

"बाबारे, ही तुझ्या वडिलांची दया ! हें भावाचं प्रेम ! मला तर कधीं कधीं वाटतं, कीं तुझ्या वडिलांना सगळं कांहीं समजतं, पण एवढ्या बाबतींत ते अज्ञानी आहेत. भाऊ आणि त्याचा संसार म्हटला, कीं त्यांचं भान हरपतं. आपल्याला देतांना हिशोब करतील. शिल्लक टाकली पाहिजे म्हणतील. सतरा बयादी सांगतील, पण टाकलेली शिल्लक कोणाच्या पायीं ओततील म्हणतोस ? तर भावाच्या ! धाकटा भाऊ. त्यांतून नकटा. कर्तृत्वाच्या नांवानं शून्य ! पण त्यांना जसा कांहीं तो वडील भाऊ वाटतो. त्याचा शब्द मोडत नाहींत. त्याला एका शब्दानं बोलत नाहींत, कीं असं कां म्हणूनसुद्धां विचारीत नाहींत ?"

"कां ?"

"तें तूं त्यांना विचार. मला विचारूं नकोस. माझा कपाळशूळ उठतो."

मी लगेच वडिलांकडे गेलों. वडील हिशोबाच्या वह्या घेऊन बसले होते. त्यांच्यासमोर नेहमीं हिशोबाच्या वह्या असतात. कसली एवढी आंकडेमोड करतात कोण जाणें ! आंकडेमोड करून करून आमच्या काकांपायीं आमच्या वडिलांची मानमोड व्हायची वेळ आली. शिवाय हिशोब लागत नव्हता तो वेगळाच. किती मिळविले आणि किती खर्च झाले ते या वह्यांवरून जरी कळत असलें तरी होता सगळा खर्चच ! जमा कांहींच नव्हती. मग ह्या वह्यांचा उपयोग काय ? आपल्याजवळ कांहीं शिल्लक नाहीं हें काय त्या वह्यांशिवाय कळत नाहीं ? मी बाबांना म्हणालों, "बाबा, कशासाठीं एवढा हिशोब करतां ?"

"कां रे बाबा ?" बाबा वर न पहतांच 'चार सक चोवीस' करीत आणि आंकडा मांडीत म्हणाले.

"मी म्हणतों, या वह्यांचा उपयोग काय ?"

" उपयोग ? " अजूनसुद्धां बाबांचें लक्ष माझ्याकडे पुरतें गेलें नव्हतें.

" मी म्हणतों, या वह्या तुम्ही नदींत फेकून द्या. "

" कां रे बाबा ? " पुन्हां तेंच उत्तर. म्हणजे तोच प्रश्न.

" मला असं वाटतं म्हणून. "

" काय वाटतं ? " बाबांनीं शेवटचा आंकडा लिहून वही मिटत म्हटलें. आतां कुठें आरशीच्या खालून त्यांनीं वर माझ्याकडे पाहिलें. हातानें जागा दाखवीत बाबा म्हणाले, " बैस. बैस. असा आधीं नीट समोर बैस. आणि मग विचार काय तें. "

नाइलाजानें मी बसलों. वास्तविक उभ्यानेंच फाडफाड बोलावें आणि तरातरा निघून जावें अशा अवसानांत मीं आलों होतों. पण आमचे बाबा इतक्या शांतपणानें मला ' बैस ' म्हणाले कीं, मी निम्मा थंड झालों. आणि मुकाट्यानें बसलों. तरी पण आंत पेटलेलें होतें. " हं ! काय म्हणतोस ? " दौतीचें झाकण लावीत बाबा म्हणाले. बाबांची सगळी हयात शहरांत गेली. पण त्यांनीं कधीं पेन आणलें नाहीं. ते आपले टाकानें लिहीत. मोडींत. सुंदर, वळणदार अक्षरांत. टिपकागदसुद्धां ते अलिकडे वापरूं लागले होते. नाहीं तर ते आपले वाळू टाकीत. मला त्यांचा हा साधेपणा आणि काटकसर दोन्ही जाणवली. आणि उसळीसरशी मी म्हणालों, " ह्या ज्या हिशोबाच्या वह्या आहेत ना बाबा, त्या सगळ्या चुलींत घालून टाका एक दिवस. "

" कां रे बाबा ? " बाबा हंसून म्हणाले.

" उपयोग काय त्यांचा ? " माझा सूर चढला होता.

" अरे वेड्या, हिशोब असायला हवा जवळ. आपण कुठें आहोंत तें कळतं. "

" मग कुठें आहोंत सध्यां ? "

" तें वाचून पहा म्हणजे कळेल. "

" वाचल्या मी वह्या. "

" मग काय कळलं ? " बाबा अजूनहि शांतच होते.

" काय कळायचं ? वर्षन् वर्ष आपण आहोंत तिथंच आहोंत. पुष्कळ पीठ दळलं. पण आंधळं दळतं आणि कुत्रं खाऊन जातं. पाणी भरून

उपयोग काय बाबा ? पिंपाला सगळीकडून गळती लागली आहे तर भरायचंच कशाला ? ”

“ अरे बाबा, तें पिंप आपलं आहे म्हणून. ”

“ पण मी म्हणतों, दुसऱ्या पिंपांत कां भरूं नये ? ”

“ दुसरं आपलं नाहीं म्हणून. ”

“ म्हणजे जें गळकं तें आपलं. आणि धडकं तें आपलं नाहीं.”

“ असं नाहीं केशव; ” बाबा थोडे गंभीर होऊन म्हणाले, “ जें गळतं तें आपलं असं नाहीं. जें आपलं आहे तें जरी गळकं असलं, तरी तें आपलंच. आपलंच म्हणून भरायचं.”

“ त्याला डाग कां नाहीं लावला ? ”

“ लावला. पण कांहीं कांहीं पिंपं अशीं असतात पोरा, कीं त्यांना डाग कांहीं लागत नाहीं. गळक्या पिंपांत पाणी भरायचा आपला योग आहे असं समजायचं. ”

“ पण कशाला ? ”

“ अरे ! तूं तर अगदीं थेट आपल्या आईसारखंच बोलायला लागलास. तिची समजूत घालतां घालतां जन्म गेला माझा. पण तिची कांहीं समजूत पटली नाहीं. तूंहि तसाच. तिच्याच वळणावर. तुझी समजूत कुठें घालूं आतां ? ”

“ नुसती समजूत घातलीत. पण केलंत आपल्याच मनासारखं. ”

“ तसंच करायचं असतं. ”

“ त्यानं साधलं काय ? ” मीं विचारलें.

“ तें माझं मला माहीत. सांगतां येत नाहीं असा एक जमाखर्च असतो केशव ! सांगतां नाहीं येत. सांगायला गेलों तर आंतबट्टा उघडा पडतो. पण जमा असते वेगळीच. पटली तर आपल्यालाच पटते. समजावून देतां येत नाहींत अशा ज्या कांहीं गोष्टी असतात त्यांपैकीं हा जमाखर्च आहे. ”

मी थोडा वेळ गप्प बसलों. माझ्या मनांत एक विचार आला होता. बोलूं कीं नको असें वाटत होतें. बोलण्यासाठीं ओठ हलत होते. पण शब्द उमटला नाहीं. बाबांनीं तें ओळखलें. ते हंसले. म्हणाले, “ माझ्या लहानपणची मला आठवण आली. मीहि माझ्या वडिलांच्याजवळ असाच

बसायचा. असाच बोलायचा. तेव्हांहि माझ्या वडिलांच्या मतांत आणि माझ्या मतांत असंच अंतर पडायचं. पण तें तेव्हां मला कळत नव्हतं. मला वाटायचं कीं वडील चुकतात. "

" मलासुद्धां असंच वाटतंय् बाबा. रागाऊं नका. तुमच्यासारखे वडील कुठें मिळायचे नाहींत. तरीसुद्धां काकांच्याबाबत मला वाटतं कीं तुमचं धोरण चुकलंच ! "

" धोरण नव्हतंच मुळीं तें. "

" धोरण नसेल. पण व्यवहार चुकला. "

" मी काय म्हणतोंय तें कळत नाहीं तुला केशव. धोरण आणि व्यवहार कांहीं वेगळा नाहीं. व्यवहार असला कीं धोरण आपोआपच येतं. पण मीं जें कांहीं केलं तो व्यवहार नव्हता. धोरण नव्हतं. "

" भोळेपणा होता. " मी जरा अधिकपणानें पण मला वाटलें तें खरेंखुरें बोललों.

" तसं म्हण. माझं काहीं म्हणणं नाहीं. "

" पण माझं म्हणणं असं आहे बाबा, कीं आतां तें सगळं मी पाहणार. "

" म्हणजे काय करणार ? "

" आपल्या वांटणीचं जें कांहीं उत्पन्न असेल तें मी मागणार. "

बाबा क्षणभर गप्प झाले. मग म्हणाले, " बरं. माग. "

आणि ते उठलेच. मीहि उठलों. थोडा तुटकपणा झाला कीं काय असें मला वाटलें. पण आईची आठवण झाली. तिला जरा बरें वाटेल असें मला वाटलें. आणि मी धांवतच आईकडे गेलों. मी जेव्हां तिला सगळें सांगितलें तेव्हां तिनें डोक्याला बांधलेलें फडकें सोडून टाकलें. ती म्हणाली, " बरं झालं. तूं तरी आतां भोळेपणा करूं नकोस. मायापाशांत गुरफटूं नकोस. "

लगेच मी पत्र लिहायला बसलों. पुष्कळ विचार केला आणि काकांना लिहून टाकलें कीं, " आत्तांपर्यंत झालें तें झालें. आजपर्यंत आमच्या वडिलांनीं तुमचें पुष्कळ निस्तारलें. पण इथून पुढें आतां सगळें मी पाहणार आहें. या वर्षीं जें उत्पन्न येईल त्यांतलें अर्धें इकडे पाठवून द्यावें. धान्य तरी. नाहीं तर पैसा ! "

आठ दिवस गेले. पंधरा दिवस गेले. महिना गेला. तरी काकांचें उत्तर आलें नाहीं. आई म्हणाली, " ते तसलेच आहेत. एक पत्र लिहायला त्यांना बारा वर्षं लागतात. तंबाकू कोण मळेल ? "

मीं दुसरें पत्र लिहिलें.

त्यालाहि अर्थातच उत्तर आलें नाहीं.

आठ दिवसांनीं मीं तिसरें लिहिलें. चार दिवसांनीं चौथें लिहिलें. आणि मग मात्र पत्र न लिहितां मी स्वतःच गेलों.

गेलों तर काका पडवींत तंबाखू खात होते. गुळण्या टाकत होते. कोण येईल जाईल त्याच्याशीं बोलत होते. मला पाहतांच त्यांना एकदम आनंद झाला. " ये ये " म्हणत ते बसल्या बसल्याच हलले. तंबाखू सगळी थुंकून टाकत ते म्हणाले, " अग ए, ऐकलंस का ? कोण आलंय् पाहिलंस का ? "

आमच्या काकू थंडपणानें बाहेर आल्या. त्यांनीं उभें लावून घेतलें होतें. मला कसें तरीच झालें. आमची आई असें कधींच करायची नाहीं. तरी पण रीत म्हणून मी काका-काकूंना वांकून नमस्कार केला. " शतायुषी भव ! भाग्यवान् व्हा. कीर्तिमान व्हा. " असा भरगच्च आशीर्वाद काकांनीं दिला. मी धुश्श्यांतच होतों. मी म्हणालों, " काका, माझीं पत्रं मिळालीं कीं नाहीं ? "

" हो, मिळालीं कीं, किती आलीं ग पत्रं याचीं ? " काकांनीं काकूला विचारलें.

" आलीं मला वाटतं बरींच. " काकू उत्तरल्या. माझ्यापुढं त्यांनीं चहा ठेवला.

" मग उत्तर नाहीं पाठवलंत ? "

" उत्तर काय पाठवायचं ? "

" मी एवढं लिहिलं होतं तर उत्तर नको पाठवायला ? " काकांच्या अकर्तृत्वामुळें व बाबांच्या कर्तृत्वामुळें मला आपोआपच मोठेपणा प्राप्त झाला होता.

" अरे पण, लिहायचं काय तुला ? सगळं तुमचंच आहे. घेऊन जा. त्यांत विचारायचं काय आणि सांगायचं काय ? "

" काय घेऊन जाऊं ? "

" काय लागेल तें घेऊन जा. आतां मागल्या वर्षींच्या उत्पन्नाचं तर कांहीं विचारूंच नकोस. पहिलंच कर्ज फिटायचं आहे माझं. पण आतां यंदां असं जोरदार पीक येईल कीं नाहीं ? नुसता पहात रहा. पहात रहा आणि घेऊन जा. मुला, सगळा मळा तुझाच आहे बरं. तुझा बाप आणि मी कांहीं दोन नाहीं. आजपर्यंत तो असाच वागत आला. आणि मी सुद्धां. होय कीं नाहीं ग ? "

' मम ' म्हणावें तसें काकू ' होय ' म्हणाल्या. मी अधिक कांहीं बोललों नाहीं. काय बोलणार ? विचार केला कीं, जेव्हां मळा पिकेल तेव्हां पाहून घेऊं.

दुपारीं काकूनें जेवायला वाढलें. घसघशीत वाढलें. जें कांहीं भाकरी-पिठलें होतें तें सढळ हातानें वाढलें. संध्याकाळीं काकांनीं मला मळा दाखवला. जो कधींच बाहेर पडून हिंडायचा नाहीं, विशेषतः जो शेतीकडे सहसा पहायचाच नाहीं तोच काका मुद्दाम माझ्यासाठीं हिंडला. फिरला. ही जमीन आपली म्हणून त्यानें दाखवली.

मीहि जरा हरखून गेलों. किती केलें तरी माझा काका होता. परत निघतांना मी काकांच्या अकरा पोरांच्या हातावर अकरा पावल्या ठेवल्या. म्हटलें असूं दे खाऊ आपल्या भावंडांना. काकानेंहि बजावलें, " येत जा. रहात जा. उत्पन्न न्यायलाच केवळ येऊं नकोस. नुसतासुद्धां येत जा. "

मी ' बरं ' म्हणालों. गाडींत बसलों. निघतांना मला जरा हेंच झालें.

घरीं आल्यावर आईला सांगितलें. " काम फत्ते ! पुढच्या वर्षीं अर्धा वांटा आपला. जोंधळा आणूं नकोस विकत. "

" कशावरून ? " आईनेंहि उत्साहानें विचारलें.

" मी सांगतों त्यावरून ! काका-काकू अशीं वागलीं आहेत म्हणतेस प्रेमानं. "

" प्रेमानं ? " आईचा चेहरा पडला. सूर खोल गेला. मग एकदम उसळून ती म्हणाली, " हाच तो शब्द. यानंच घात झाला आपला. तो शब्द तूं उच्चारूं नकोस केशव ! तें प्रेम खरं नाहीं. "

मी एकदम गंभीर झालों. कांहीं बोललोंच नाहीं. मळा पिकेपर्यंत वाट

पहायची असें ठरवलें. माझ्या चुलत-भावंडांना खाऊ दिला हें मीं आईला सांगितलेंच नाहीं.

पण बाबांना जेव्हां हकीकत सांगतांना सांगून गेलों कीं अकरा पावल्या दिल्या, तेव्हां ते हंसले. बोलले नाहींत. माझी आई तिथें आहे कीं काय हें त्यांनीं पाहून घेतलें. आणि म्हणाले,

" मला वाटलं होतं तूं आपल्या आईच्या वळणावर आहेस. पण आत्तां वाटतंय् कीं तूं माझंसुद्धां वळण घतलं आहेस. "

" कसलं वळण बाबा ? "

" हेंच !! ज्याचं त्याला तें नाहीं वळत. ठीक आहे. ठीक आहे. " करीत बाबा बाहेर जायला निघाले.

इतक्यांत जरी मला काकांकडे जायचें नव्हतें तरी मी मधून मधून पत्र पाठवीत होतों. हेतु हा कीं आपला संबंध असावा. एकाएकीं उत्पन्नाच्या वेळीं उठून येतो असें वाटूं नये. जें गोडीनें होतें तें कडूपणानें कशाला ?

आईला अर्थात् हें पसंत नव्हतें.––पण मग मी आईला सांगायचेंच सोडून दिलें.

मग जेव्हां जायची वेळ आली तेव्हां मी स्वतःच घरीं गेलों. पण पाहतों तों काय ? काकांनीं यंदां कांहींच केलें नव्हतें. स्वतःहि केलें नाहीं कीं कुळाकडूनहि करून घेतलें नाहीं. मी म्हणालों, " हें काय काका ? शेत अगदीं रिकामंच आहे ? "

" रिकामंच असणार मुला." काका उत्तरले. मला त्यांच्या या ' मुला ' शब्दाचा राग आला. विटकराच्या टोल्यानें शेकत शेकत ते म्हणाले, " गेले कांहीं दिवस पाट धरलीय. कांहीं सुचूं देत नाहीं. जरा हलूं देत नाहीं. मी कसला जातों शेतमळ्यावर ? "

" मग कुळांना द्यायची जमीन. "

" दिली असती रे. पण तुझा बाप म्हणतो, कुळांना देऊनसुद्धां कांहीं उपयोग नाहीं. कुळं बुडवतात तुला. "

" म्हणून तुम्ही आम्हांला बुडवलंत ? "

टोला उलटापालटा करीत काका म्हणाले, " मी कुठून बुडवूं तुम्हांला ? मला ताकद कुठं आहे तेवढी ? एखाद्याला उचलून नदींत बुडवायचा

20,034
2-5-61

म्हणजे त्याला तशीच ताकद लागते. मीच इथें आकंठ रुतून बसलों आहें गाळांत. गाळांतून वर आलों तर नदींत बुडतों. नदींतून वर आलों तर गाळांत रुततों, अशी माझी अवस्था आली आहे. मी कसारें बुडवणार तुम्हांला, केशवा ? ”

“ तुमची ताकद फार मोठी आहे काका. ” मी फणफणत म्हणालों, “ अंगांत ताकद नसतांनासुद्धां तुम्हीं आम्हांला बुडवलंत. जन्मभर बुडवलंत. बाबांचा सगळा जन्म तुमचा संसार वर काढून ओढण्यांत गेला. किती ओढलं तरी तुम्ही आडांतच. तुमच्याबरोबर आम्ही. आमच्या बाबांनीं नाहीं विचार केला. पण तुम्हीं तरी विचार करायचा होतांत काका, कीं आपल्या भावालाहि तीन मुलं आहेत ? ”

“ मुलांचं काय घेऊन बसलास बाळा ? ” विटकर बाजूला ठेवून जेमतेम कुशीवर वळत ते म्हणाले, “ तुझा बाबा मोठा भाग्यवान्. तीन मुलांतच संसाराचा पसारा आवरलान्. पण माझीं अकरा आहेत. मोजून अकरा ! जिथें अकरांचं होतं तिथं तिघांचं नाहीं होणार ? ”

“ अकरांचं तरी कोणीं केलं ? बाबांनींच ना ? ”

“ होय रे मुला, माझ्या बाबांनींच बरं. पण माझा कोणीच नाहीं का तो ? तुझा बाबा होण्यापूर्वीं तो माझा भाऊ होता. अजून आहे. पुढेंहि राहील. ”

“ याच भरंवशावर तुम्ही जमीन ओस टाकलीत ? ”

काका थोडा वेळ गप्प राहिले. मग म्हणाले, “ भरंवसा लागतोच कोणाचा तरी. ”

“ पण तुमचा नाहीं. आम्हांला वाटत. ” मी म्हणालों.

“ तो योग असतो एकेकाचा. अग, याला चहा दे बरं. ”

“ मला नको आहे चहा. ”

“ रागावूं नकोस. रागावूं नकोस मुला. हें असं चालायचंच भांडावं पण तोडूं नये. एकमेकांना शिव्या द्याव्यात; पण भाऊबंदकी करूं नये. ”

“ तुम्हीच भाऊबंदकी केलीत. आपल्या भावाचं सगळं घेतलंत. त्याला कांहीं दिलं नाहींत. सगळं उत्पन्न तुम्ही खाल्लंत काका. भाऊबंदकी तुम्हीच केलीत. ”

" याला नाहीं भाऊबंदकी म्हणत केशव. याला म्हणतात प्राक्तन. पण प्राक्तन कांहीं असलं तरी खाणंपिणं सोडायचं नाहीं. चहा दिला तर घ्यावा. जेवायला वाढलं तर जेवावं. जेवण सोडलं तर त्याला म्हणतात भाऊबंदकी. माझ्या पंक्तीला तूं जेवलं पाहिजेस. "

" मला भूक नाहीं. " मी कुरकुरत म्हणालों.

" आधीं चहा पी. मग जेवणाच्या गोष्टी बोल. मी, तुझा काका सांगतोंय केशव. तो चहा पी आधीं. उचल कप. मग वाटलं तर तो कप फेकून मार काकाला. पण समोर आलेला चहा डावलूं नकोस. "

मीं कप उचलला आणि कसा तरी संपवला. ही काय बळजबरी ?

" आतां बोल. दे शिव्या. " काका म्हणाले.

" शिव्या द्यायला आलों नाहीं मी. आमच्या आईनं शिव्या द्यायला शिकवलं नाहीं आम्हांला. "

" शिव्या द्यायलासुद्धां शिकवावं लागतं का रे ? आमचीं हीं अकराच्या अकरा पोरं शिव्या देण्यांत मोठीं तरबेज आहेत. "

" इश्श ! उगीच काय कांहीं तरीच बोलायचं ? धाकटा मुलगा आहे केवढा ! अजून भुईतून वर आला नाहीं. आणि तो म्हणे शिव्या देण्यांत पटाईत ! " काकू एकदम वाचा फुटल्याप्रमाणें म्हणाल्या.

" अग होईल. शिव्या शिव्या म्हणजे तूं काय समजलीस ? काय मोठी वकिलीची परीक्षा आहे ? पण मुद्दा हा आहे केशव, कीं शिव्या देऊन भाऊबंदकी नाहीं होत. शिव्या देऊन उलट प्रेम वाढतं. ज्याच्यावर प्रेम असतं, त्यालाच आपण शिव्या देतों. ज्याच्यावर प्रेम नसतं, त्याच्यासाठीं एवढा शीण कोण घेतो ? तर तूं दे शिव्या. काय समजलास ? शिव्या दे. पण चहापाणी आणि जेवणखाण इथेंच माझ्या पंगतीला झालं पाहिजे. मग काय तुला भांडायचं असेल तें भांड. "

" भांडायचं कशाबद्दल काका ? " मी उपरोधानं विचारलं.

" पण तो उपरोध काकांनीं मुळींच मनावर घेतला नाहीं. ते म्हणाले, " तें आपलं तुझं तूं बघ. "

" काय बघणार कपाळ ? " मी रागावलों, " इथं बघायला ठेवलंय काय तुम्ही ? "

वा. क्र. ...६००० नों. दि.
वि. ... बा-वा



" तो योगायोग ! "

" योगायोग ! पण ते योगायोग आतां विसरा काका. बाबांना तुमचे हे योगायोग चालले. पण मला नाहीं चालायचे. तुमच्या पायीं आमचा किती तोटा झाला त्याचा एकदां जमाखर्च करून बघा. "

" तें सगळं तुझ्या बाबाकडे दिलं आहे. आपल्याकडे कांहीं नाहीं. जेव्हां पहावं तेव्हां तो आपला हिशोब लिहीत असतों. कशाचे एवढे हिशोब लिहितो देव जाणें ! "

" देव कशाला ? मी जाणतों. आत्तांपर्यंत तुमच्यावर आमचा एवढा पैसा खर्च झाला आहे काका, कीं तेवढ्या पैशांत आम्हीं सगळीं एकदां विलायतेला जाऊन आलों असतों. तुम्हीं इथून आम्हांला कधीं पळाभर जोंधळा नाहीं पाठवला, कीं हातभर उसाचं कांडं ! "

" तें आम्हीं सुद्धां नाहीं खाल्लं. " काकू म्हणाली.

" मग तुम्हीं केलंत तरी काय काका ? एवढा जन्म घालवलांत तरी कसा ? " मी हातावर मूठ आपटीत म्हणालों.

" तुम्हां अलीकडच्या मुलांचं चुकतं असं मी म्हणतों तें कांहीं खोटं नाहीं. काका थंडपणानेंच म्हणाले, " अरे बाबा, जन्म घालवणारा मी कोण ? आणि घालवायचं म्हणजे काय करायचं ? तो जातच असतो. जो जन्माला येतो, त्याचा जन्म आपोआपच, कसा ना कसा जातच असतो. "

काकांचें पुराण चाललेंच होतें. मी ऐकत होतों आणि विचार करीत होतों कीं हें कांहीं खरें नाहीं. हे असे खेटे घालून काम होणार नाहीं. धान्याचा दाणा मिळणार नाहीं कीं एक छदाम दिसणार नाहीं. काका नुसते बोलत राहणार. मी म्हणालों, " तें जाऊं दे. तुमचं उत्पन्न येऊं दे नाहीं तर जाऊं दे. तुम्ही जमीन करा किंवा नका करूं. उत्पन्नाचा अर्धा वांटा मला पाहिजे. "

" मी कुठें नाहीं म्हणतोंय ? घेऊन जा. अर्धं उत्पन्न तुमचं आहे हें कांहीं तूं मला सांगायला नकोस. तें आमच्या बापजाद्यांपासूनच चालत आलं आहे. "

" मग द्या आमचा वांटा. "

" द्यायला माझी ना नाहीं हें मीं तुला सांगितलंच. पण देऊं काय मुला ? इथें तुला कांहीं दिसतंय् का ? हीं दोन ज्वारीचीं पोतीं आहेत. तीं आम्हांलाच पुरणार नाहींत. वाटलं तर त्यांतलं एक घेऊन जा. "

" एका पोत्यानं काय होणार ? "

" तेंच म्हणतों मी. माझं ऐक केशव. हें सगळं आहे तुमचंच. पण यंदा कांहीं पीक आलं नाहीं. आतां मी तुला सांगतों. शिमग्याला कपाशीचं उत्पन्न येईल. मिरचीचं येईल. गवताचं येईल. त्याचे नाहीं म्हटलं तरी सात-आठशें रुपये येतात. निम्मे तुझे. निम्मे माझे. काय ? "

मी विचारांत पडलों. हें तरी खरें कशावरून ? मला होय म्हणवेना. नाहीं म्हणवेना. पण काकाच म्हणाले, " बरोबर आहे तुझं. पण या वेळीं पहा. कधीं नाहीं तरी या वेळीं मी जातीनं करणारा आहें. पहा तर खरं. नाहीं तरी तूं करणार काय ? "

मी कांहीं तरी करणार होतों. पण बोललों नाहीं. म्हटलें एक वेळ संधी देऊन पहावी. कारण जें करायचें माझ्या मनांत होतें तें अगदींच साधें नव्हतें. तरी पण काकांना दम भरला. " हें पहा काका, ही शेवटची वेळ. यापुढें जें कांहीं करायचं तें इतकं सौम्य असणार नाहीं. विचार करून ठेवा."

काका हंसले. अगदीं निर्भयपणें हंसले. अगदीं गळ्याशीं आलें तरी या माणसाला कांहींच कसें वाटत नाहीं ?

मी काकांच्या पंक्तीला जेवलों. जेवतांना काकांचा आग्रह चालू होता. काकूनें केली होती गाजराची भाजी आणि भाकरी. बरोबर एक गुळाचा खडा. पण तें ती भरपूर वाढत होती. आणि काका जसे कांहीं मी आत्तांच गांवाहून आलों अशा तऱ्हेनें बोलत होते. मुलें बिचारीं " नाना आला, नाना आला " करीत होतीं. व माझ्या जवळपास घुटमळत होतीं. मी जायला निघालों तेव्हां तीं सगळीं दाराशीं गोळा झालीं. काका म्हणाले, " हा तुमचा वडील भाऊ. पाया पडा त्याच्या. "

पटापट वांकून बिचारीं पाया पडलीं. मोठ्यानें माझी पिशवी उचलून हातांत दिली. आणि धाकटें मला बिलगून बसलें. " कुठें चालला नाना ? " त्यानें विचारलें.

मला गहिंवर आला. " आतां पुन्हां केव्हां याल ? " दुसऱ्यानें शेंबूड पुसत विचारलें.

" याल तेव्हां आमच्यासाठीं खाऊ आणा. " तिसऱ्यानें सांगितलें.

" आणीन. आणीन. " मीं म्हटलें व मागल्याप्रमाणेंच प्रत्येकाच्या हातावर चार चार आणे ठेवले.

काका म्हणाले, " अरे कशाला ही खिरापत करतोस ? आपलं गोड बोललं तरी पुष्कळ झालं. "

मी घरी आलों. कांहीं सांगितलं नाहीं. बाबांनीं बहुधा ओळखलें होतें. त्यांनीं मला फारसें विचारलेंच नाहीं. आईनें विचारून विचारून बेजार केलें. तेव्हां जरा मी डाफरून म्हणालों, " या वेळीं जमलं नाहीं तरी पुढल्या वेळीं पैसे घेऊन येईन. नाहीं तर खटला करीन त्यांच्यावर. "

खटल्याचें नांव ऐकतांच बाबा एकदम दचकले. पण आईचा चेहरा उमलून आला. ती म्हणाली, " इतकीं वर्षं हेंच मी त्यांना सांगत होतें, कीं कोर्टांत गेल्याशिवाय काम होणार नाहीं, पण लक्ष कोण देतो ? "

" मी देईन लक्ष. पण जरा दमानं घे. सारखं तेंच तेंच बोलून माझं डोकं उठवूं नकोस. "

शिमग्याला मी काकांच्याकडे गेलों. मुलांनीं एकदम गराडा घातला. आणि पिशवींतला खाऊ हस्तगत केला. तो नऊ नंबरचा पोरगा मोठा गोड होता. त्याचा चेहरा, त्याचें हंसणें, त्याचें बोलणें, सगळें छान होतें. सारखें वाटायचें कीं या पोरवड्यांत हें पोर नाहीं शोभत.

त्यांच्यांतून मोकळा झालों तों काकू दारांत येऊन म्हणाली, " जेवण तयार आहे. पानं मांडलीं आहेत. "

मी म्हणालों, " हें पहा काका, आज जो मी आलों आहें तो जेवायला नाहीं. उत्पन्न घ्यायला. मिरची झाली का कापशी झाली हें मी तुम्हांला विचारीत नाहीं. माझा वांटा माझ्या स्वाधीन करा. मग बोलूं. मग जेवूं. "

" तुझा वांटा ना, घे कीं. " असें म्हणून काकानें माझ्यापुढें पंधरा रुपये ठेवले.

" तुम्ही काय चेष्टा करतां माझी ? " मी हिरवा-पिवळा होऊन म्हणालों.

" त्याचं असं झालं केशव. मुळांतच हिशोब चुकला. शेतीभातीचं हें असंच असतं. आपण जर म्हणायला लागलों कीं, पांचशें येतील तर येतात दोनशेंच. तसंच झालं. दोनशेंसुद्धां पुरते आले नाहींत, पण मग खर्च उभे झाले. सारा भरला. बांधाच्या पलीकडल्या जमिनीचं जें भांडण चाललं आहे त्याचा खर्च झाला. कर्जाचा हप्ता दिला. घरांत थोडं धान्य घेतलं आणि तुझ्या काकूचं लुगडं अगदींच फाटलं होतं तें घेतलं. उरले फक्त पंधरा रुपये. ते सगळे तुलाच देऊन टाकले. त्या उरलेल्या पैशांत माझा हिस्सा मी ठेवलाच नाहीं."

काकांचें एकंदर कांहींच सरळ नव्हतें. मीं म्हटलें, " मला तुमच्या या बयादी नकोतच मुळीं. मी तुमच्यावर फिर्याद करणार. सगळ्या इस्टेटीचा अर्धा वांटा मला कायदेशीरच हवा. "

" मग हें काय बेकायदेशीर आहे काय ? कागदोपत्रीं लिहिलेलंच आहे कीं तसं. मग आणखी काय हवं तुला ? "

" तें कोर्टांत सांगेन. " असं म्हणून झटक्यानें उठलों. आणि जायला निघालों. पायांत वहाणा घातल्या.

" अरे, कांहीं रीत-भात आहे कीं नाहीं तुला ? " माझे बखोटे धरून काका म्हणाले, " चल आंत. जरा मुलांशीं बोल. काकूशीं बोल. माझ्या-बरोबर चार घास खा. आणि जा कुठें जायचंय् तुला तें."

मी आंत गेलों. नाइलाजानेंच पानावर बसलों. हें काय काकांचें अजब वागणें ? इकडे खुशाल फसवायचें आणि इकडे जेवायला वाढायचें.

कसें तरी जेवलों आणि घरीं आलों. कोर्टांत मी काकांच्या विरुद्ध फिर्याद लावली कीं, आमच्या जमिनीचा आणि घराचा अर्धा वांटा आमचा आम्हांला तोडून हवा.

कोर्टांत गेल्यानें माझ्या मनाचें वायुमान जसें कांहीं बदलूनच गेलें. बाबांना हें आवडलें नाहीं. पण मी मोठा झाल्यामुळें ते मला तोंडावर कांहीं म्हणाले नाहींत. त्यांच्या चेहऱ्यावर मात्र नापसंती आणि व्यग्रता दिसायची.

पण आमच्या आईसाहेब खुशींत होत्या. पोरगा अगदींच कांहीं बापा-सारखा निघाला नाहीं याचें दिला समाधान वाटत होतें. शेतीचें उत्पन्न

आलें कीं तें आपल्या ताब्यांत घ्यायचें आणि त्याचें सोनें घेऊन ते माझ्या लग्नांत सुनेच्या अंगावर घालाचें. इतके बेत तिनें आंखले होते.

आणि खुद्द मला कसें वाटायचें तें सांगतां नाहीं येत. व्यवहारी बुद्धीनें मला वाटे, कीं, मी जें करीत आहें तें बरोबर आहे. पण नात्यागोत्याची आठवण झाली कीं वाटे, गड्या, हें बरोबर नाहीं. तरी पण कोर्टकचेरी शेवटाला न्यायची ठरवली होती. गेल्या वीस-पंचवीस वर्षांत काकांनीं कांहींहि दिलें नव्हतें. आमच्या वांटणीचेंसुद्धां एकट्यानेंच खाल्लें होतें. वर दक्षिणा म्हणून बाबांनीं हजार-पांचशें, हजार पांचशें सतत दिले होते. याला कांहीं शेवट आहे कीं नाहीं? म्हणून मी कायदेशीररीत्या अशी मागणी केली होती, कीं गेल्या तीन वर्षांतील उत्पन्नाचा वांटा आणि जमीन व घराची अर्धी वांटणी आमच्या नांवावर करून मिळावी!

हें सगळें जरी खरें होतें तरी कोर्टांत जायच्या वेळीं मला आमच्या गांवीं जावेंच लागे. काकांच्या घरीं उतरावें लागे. पण मला त्याचा भारी संकोच वाटे. अपराध्यासारखें वाटे. ज्याच्यावर आपण फिर्याद लावली त्याच्या घरीं उतरायचें? त्याच्याच घरीं जेवायचें?

पण काकांनीं मला एकदां सांगून टाकलें, "हें बघ केशव, फिर्यादी-अर्यादी कोर्टांत. इथं तूं माझा पुतण्या आणि मी तुझा काका. आलास म्हणजे इथेंच उतरायचं. इथेंच जेवायचं दुसरीकडे उतरलास तर मला खपायचं नाहीं. फिर्याद केलीस तरी भाऊबंदकी करूं नकोस. भांडण कोर्टांत इथें प्रेम. माया. नातंगोतं. काय समजलास?"

मला कांहीं समजेनासेंच झालें. पण या बाबतींत काकांचा शब्द मी मोडला नाहीं. मी त्यांच्याच घरीं उतरायचा. त्यांच्याच घरीं जेवायचा. काका म्हणत, "तुझंच घर आहे." आणि कोर्टांत भांडायला जायचें तें सुद्धां एकदमच. तालुक्याच्या गांवांत कोर्ट होतें. त्या गांवाला जायचें म्हणजे नदी पार करावी लागे. एकाच नावेंत बसून आम्ही ती नदी पार करीत असूं. कोर्टांत गेलों कीं काका एका दिशेनें जायचे. मी एका दिशेनें. कोर्ट आलें कीं काका म्हणायचे, "आतां तूं माझा कोणी नाहींस."

आणि कोणी नसल्यासारखाच तो कोर्टांत बोलायचा. काय वाटेल तें सांगायचा. खोटें सुद्धां बोलायचा. बाहेर आल्यावर माझा हात धरून

म्हणायचा, “ कोर्टांत असंच करावं लागतं. ती काय खरं बोलायची जागा आहे ? ”

त्याला कोर्ट आणि घर यांत फरक करून इतकें कसें वागतां येत होतें कोण जाणें ! कोर्टांत तो वेगळेंच कपाट उघडे. बाहेर पडल्यावर निराळेंच कपाट उघडायचा.

पण काकांनीं किती जरी कपाटें उघडलीं तरी कोर्टाचा निकाल झाला आमच्यासारखा. म्हणजे अर्धी जमीन, अर्धें घर, आणि गेल्या तीन वर्षांचें उत्पन्न म्हणून तीन हजार रुपये त्यानें आम्हांला द्यायचें ठरलें.

निकाल माझ्यासारखा झाला म्हणून मला अर्थात् आनंद झाला. शिवाय त्यांत काकांना कुठेंच अन्याय नव्हता. घरीं गेल्यावर काकांना मी म्हणालों, “ निकालाप्रमाणें काका, आतां देऊन टाका. ”

“ अरे वेड्या, ” काका थंडपणानें म्हणाले, “ देऊन टाका म्हणजे काय ? जमीन उचलून तुझ्या खांद्यावर ठेवायची ? ”

मी म्हणालों, “ तसे कागदपत्र करा. आमचे तीन हजार रोख देऊन टाका. ”

“ देतों, देतों. असा घाईला येऊं नकोस. पण मी म्हणतों, हें आहे कुणाचं ! तुमचंच ना ? वेगळं काय द्यायचं ? कागदपत्रावर पुष्कळ लिहिलं तरी काय तूं इथली शेतवाडी शहरगांवीं नेणार आहेस का ? का नोकरी-चाकरी सोडून इथं या खेडेगांवांत राहणार आहेस ? मी म्हणतों, येच तूं केशवा, सोड नोकरी आणि रहा इथं. नांगर धर हातांत नी कर शेती. मी शिकवतों तुला कशी करायची तें. ”

“ तें होणार नाहीं. ” मीं म्हणालों.

“ तेंच म्हणतोंय मी. ” तंबाकूची फक्की मारत काका म्हणाले, “ कागद-पत्रावर होतं तें कांहीं खरं नाहीं. आपलेपणानं, प्रेमानं होईल तेंच खर. मी काय पळून जाणार आहें का ! कोर्टानं तुला अर्धीच जमीन दिली. आणि अर्धंच घर दिलं. पण मी तुला सबंध देतों. काय समजलास मुला ? माझा मुलगा आणि तूं, तुम्ही कांहीं वेगळे नाहीं मला. सगळं तुझंच आहे. मग तूं कशासाठीं एवढा उपद्व्याप केलास ? ”

मीं उत्तर दिलें नाहीं. काकांचा हा असला घोळ मला माहीतच झाला होता. ताबा आज नाहीं उद्यां घेतला म्हणून कांहीं बिघडत नाहीं असा विचार करून मी म्हणालों, " तीन हजार रुपये मग कधीं देतां काका ? "

" तुझा काका म्हणजे काय जहागिरदार लागून गेला आहे काय ? देईन सावकाश. हप्त्याप्त्यानं. "

मी ' बरं ' म्हणालों.

नेहमींप्रमाणेंच जेवायला बसलों. पण लक्ष जेवणांत नव्हतें. ताबा कसा घ्यायचा याचा विचार करीत होतों. पंक्तीला आमचीं चुलत-भावंडें होतींच. त्यांतला एक आठ–नऊ वर्षांचा मुलगा मला म्हणाला, " तुम्ही फिर्याद लावली आमच्यावर ? "

" अरे, तो मालक आहे आतां ! " काका आमटीचा भुरका मारत म्हणाले. " मालक म्हणजे तूं काय समजलास ? "

" फिर्याद म्हणजे काय हो नाना ? " त्या पोरानें पुन्हां विचारलें.

मला कसें तरीच झालें. मीं कांहीं उत्तरच दिलें नाहीं. जायला निघालों तेव्हां पोरें माझ्याभोंवतीं गोळा झालीं. त्यांना हातावर कांहीं तरी देऊन मी वाटेला लागलों.

घरीं आलों. निकाल आपल्यासारखा झाला हें जेव्हां कळलें तेव्हां आईला आनंदाचें भरतें आलें. बाबांचा चेहरा मात्र उतरला. स्वतःशींच म्हणाल्या-प्रमाणें ते म्हणाले, " म्हणजे जातं फुटलं. त्यापायीं नातं तुटलं नाहीं म्हणजे मिळवली. "

या गोष्टीला चार-आठ दिवस झाले. मी विचार करीत होतों कीं सगळें ताब्यांत कसें घ्यावें ? तों एक दिवस आमच्या वकिलाचें पत्र आलें कीं, काकांनीं जिल्हा कोर्टांत अपील केलें आहे !

हाच का तो काका ? कीं जो सगळेंच तुला दिलें आहे असें म्हणत होता ? हीच का काकांचीं माया ? आणि प्रेम ?

पुन्हां कोर्टांत हेलपाटे सुरू झाले. कोर्टांत गेलों कीं भांडण आणि घरीं आलों कीं काकांचें मायावी भाषण. जेवणाचा आग्रह. बोलण्याचा घोळ. मुलें मात्र माझ्यावर माया करूं लागलीं होतीं.

पण याहि कोर्टांत निकाल आमच्याचसारखा झाला. उलट, कोर्टांत झालेला आमचा खर्च काकांनीं भरून द्यावा असा आणखी नवा बोजा काकांच्या डोक्यावर चढला.

मग काकांनीं वरच्या कोर्टांत अपील केलें.

तिथेंहि आमच्याचसारखा निकाल झाला. कोर्टांचा आणखी खर्च काकांच्या उरावर चढला.

घरीं येऊन काका मला म्हणाले, " नाहीं देणार ताबा. काय करायचं तें करून घे. "

मी धसकलों. हें काय हें ? काका अद्वातद्वा पुष्कळ बोलले. मीहि मागें पाहिलें नाहीं. कायद्यानें जें झालें तेंसुद्धां न करण्याचा आडमुठेपणा पाहून माझें डोकें भडकलें होतें. मीहि बोलायचें बाकी ठेवलें नाहीं. पण काका कशालाच तयार झाले नाहींत, तेव्हां कोर्टांत ताबा मिळत नसल्याची तक्रार मी केली.

कोर्टानें समन्स बजावलें. बेलीफ आणि पोलीस घेऊन मी शेतावर गेलों. पंच आले. पाटील, कुलकर्णी हजर झाले आणि काकांच्या बडबडीकडे मुळींच लक्ष न देतां जमिनीच्या वांटण्या झाल्या. तसे कागदपत्र झाले. सह्या झाल्या. काकांनासुद्धां सही करावी लागली.

मला वाटलें, काका अकांडतांडव करतील. पण ते अगदीं शांत होते. जशी कांहीं आमचीच जमीन त्यांना मिळाली आहे. कां कोण जाणें ! माझाच जीव चुटपुटला !

आणखी पंधरा दिवसांनीं मी पुन्हां गेलों. पोलीस, पाटील, कुलकर्णी, पंच आणि बेलीफ. या वेळीं मला जरा कठीण वाटत होतें. कारण हा नुसताच घराचा वांटा नव्हता. तीन वर्षांच्या उत्पन्नाचे तीन हजार आणि कोर्टाच्या खर्चाचे पांचशें, असे साडेतीन हजार वसूल करून घेण्यासाठीं काकांच्या घरावर आम्ही जप्ती आणली होती.

प्रथम घराची वांटणी झाली. त्यापूर्वीं मी काकांना म्हणालों, " तुम्हांला हवा तो भाग घेऊन उरलेला भाग मला द्या. "

काका तंबाखू मळत म्हणाले, " तसं कशाला ? तूं पुतण्या आहेस. मी काका आहें. तुला हवा तो तूं घे आणि उरलेला भाग मला दे. "

सर्वांच्या संमतीनें घराची वांटणी झाली. नाहीं म्हटलें तरी माझ्या पोटांत कालवलें. पोरें लुकूलुकूं बघत होतीं. काकू डोळे पुसत उभी होती. काका मात्र थंड होते. वांटणी झाल्यावर त्यांनीं आपलीं सगळीं पोरें बाजूला केलीं आणि ते म्हणाले, " हा तुमच्या नानाचा भाग बरं. तिकडे नाहीं जायचं आतां खेळायला."

तसा तो आठ क्रमांकाचा पोरगा एकदम रडूं लागला. मला कसें तरीच झालें. पण तें दाबून टाकण्यासाठींच मी त्या पोरावर एकदम ओरडलों, " ए, रडूं नकोस रे. "

त्याबरोबर तें पोरगें गप्प झालें.

पण खरें संकट पुढेंच होतें. वांटणी झाली खरी. पण ते साडेतीन हजार द्यायला काकांजवळ रोख रक्कम कुठें होती ? त्यासाठीं काकांचीं भांडींकुंडीं आणि घरदार यांच्यावर जप्ती आणायचा हुकूम आम्हांला मिळाला होता. तो हुकूम बेलीफानें काकांना दाखवला. काका म्हणाले, " मग घ्या ताबा. चला रे पोरांनो, चल ग तूं. व्हा बाहेर सगळीं. हा तुमचा भाऊ आला आहे जप्ती करायला. कर्ज फेडून द्यायचं आहे त्याला. तेव्हां व्हा बाहेर सगळीं. "

काकांचीं अकरा पोरें एकेक, एकेक बाहेर आलीं. रडूं लागलीं. काकू बाहेर अंगणांत येऊन उभ्या राहिल्या. काका तर सर्वांच्या आधीं बाहेर आले होते. अंगणांतल्या एका ओंडक्यावर ते बसले आणि तंबाखू मळूं लागले.

मला जरा चमत्कारिक झालें. काय करावें तें सुचेना. मी बेलीफाकडे पाहिलें. तो काकांना म्हणाला, " तुमचीं भांडींकुंडीं बाहेर काढा. "

काका म्हणाले, " छे ! आमचा पुतण्या आला आहे जप्तीला. तो स्वतः काढील भांडींकुंडीं. मी कशाला हात लावूं ? मी नाहीं लावायचा."

माझ्या जीवाची घालमेल झाली. पण विचार केला कीं आतां डगमगून उपयोगी नाहीं. बेलीफ आणि मी आंत गेलों. भांडींकुंडीं, डबेडुबे, बादली, घंगाळ, सगळें बाहेर आणून अंगणांत टाकूं लागलों. वाटत होतें कीं ज्या भांड्यांतून काकूच्या हातचें जेवलों तींच भांडीं आज अंगणांत आणून टाकतोंय. ज्या घंगाळांतून आंघोळ केली, तेंच घंगाळ आज...पण हा

असला शोक करण्यांत कांहीं अर्थ नव्हता. मन घट्ट करून आम्ही काकांचें सगळें सामान अंगणांत आणून टाकलें. पंचांसमोर त्यांच्या याद्या झाल्या. किंमती झाल्या. गांवच्या लोकांनासुद्धां आश्चर्य वाटत होतें. मी इतका निष्ठुर असेन अशी त्यांची कल्पना नव्हती. पण मीं मन दगडासारखें घट्ट केलें. कर्तव्यावर नजर ठेवली. आईची मूर्ति समोर आणली. आणि हिशेबावर दृष्टि लावली.

चाळीस रुपये कमी भरत होते. काकांचे आणखी कांहीं तरी व्यायला हवें होतें. पण आतां तर काकांच्याजवळ कांहींच नव्हतें. चाळीस रुपयांची सूट देण्याचें माझ्या जिवावर आलें. पण काकांचें व्यायचें काय ?

मला एकदम आठवण झाली कीं, शेतावर सरमाडाची गंज आहे ती घ्यावी. आणि जी वसूली होईल ती पावली असें समजावें. मी काकांना म्हणालों, " काका, वाईट वाटतंय, पण अजून वसूली पूर्ण झाली नाहीं. तेव्हां सरमाडाची गंज... "

" मग घे कीं वेड्या. हा कायदा आहे. व्यवहार आहे. यांत वाईट काय वाटायचं आणि चांगलं काय वाटायचं ? काय तुला लागेल तें घे. "

आम्ही ती गंज जमा केली. तरी कांहीं रक्कम शिल्लक रहातच होती. बेलीफ म्हणाला, " उरलेली रक्कम तुम्हांला माफ केली आहे. "

" तरी हरकत नाहीं. " काका म्हणाले. ते अगदीं शांत होते. काकूला सारखें भरून येत होतें. सकाळीं हें काम सुरू झाल्यापासून आत्तांपर्यंत दुपारचे साडेअकरा-बारा व्हायला आले होते. मुलांना भुका लागल्या होत्या. मुलें किती लहान म्हटलीं, आणि त्यांना कांहीं कळत नाहीं म्हटलें तरी आपल्याला घराबाहेर काढलें आहे हें त्यांना समजलें. नऊ क्रमांकाचा मुलगा बापाला बिलगून ओंठ काढून म्हणाला, " आपल्याला बाहेर काढलं ? "

" होय रे बाबा. " काका त्याचे डोळे पुसत म्हणाले.

" होय का हो नाना ? आम्हांला तुम्हीं बाहेर काढलं ? " माझ्याकडे झेपावून येत तें पोरगें म्हणालें. माझा गळा एकदम भरून आला.

आठ क्रमांकाच्या मुलाला भूक लागली होती. तो म्हणाला, " आतां आपण जेवायचं कुठं ? "

सर्वांत मोठा होता तो कावराबावरा झाला. त्याला रडायची लाज वाटत होती. आणि तें त्याला आवरत नव्हतें. तो आपल्या आईला म्हणाला, " आतां आपण कुठें जाणार ? "

एकमेकांचें पाहून सगळीं रडूं लागलीं. काकूचा तर बांधच फुटला. एखादें मनुष्य जावें तसा ती आक्रोश करूं लागली. मुलें आपापल्या भांड्यांना हात लावूं लागलीं, " हें माझं पाणी प्यायचं हें तुम्ही घेतलंत नाना ? ही माझी झारी, ही तुम्ही घेतलीत नाना ? ही माझी दुधाची वाटी. ही तुम्ही घेतलीत नाना ? "

" नाना, नाना, नाना, " सगळ्यांनीं मला गराडा दिला. आणि माझ्या अंगाला लळत, लोंबत, अंगावर चढत तीं मला विचारूं लागलीं, " आम्हांला घराबाहेर काढलंत ? आम्हांला घराबाहेर काढलंत ? "

माझ्या जिवाची कालवाकालव झाली. एकाएकीं पूर आल्यासारखें झालें. माझ्या डोळ्यांतून पाणी वाहूं लागलें. एखाद्या बाईसारखेंच मला रडूं येऊं लागलें. तीं मुलें एकदां आपल्या आईकडे जात. एकदां माझ्याकडे येत. एकदां बापाला कवटाळीत. एकदां मला मिठी मारीत. बांध फुटून तीं रडूं लागलीं. मोठा मुलगा बापाकडे गेला आणि म्हणाला, " हें सगळं नानांचं झालं ? "

" हो. " काका अगदीं शांतपणानें म्हणाले.

" घरसुद्धां ? "

" घरसुद्धां. "

" भांडींसुद्धां ? "

" भांडींसुद्धां. " काकांचा स्वर मगाच्याइतकाच थंड होता.

" घरांतलं धान्यसुद्धां ? "

" धान्यसुद्धां. "

" मग आतां आपण कुठें जेवायचं ? "

काका क्षणभर थांबले आणि मग एकदम म्हणाले,

" नानाच्या घरांत. आतां आपण नानाच्या घरांत जेवायचं. चला रे पोरांनो, चल ग तूं, आतां आपण नानाच्या जवळ राहूं या. ये रे नाना.

तुझ्याशिवाय आम्हांला कोण आहे या जगांत? आतां आम्ही सगळीं तुझ्याचजवळ राहूं. चला, चला व्हा आंत. उचला हें नानाचं सामान. नानाचीं भांडीं. झाडून स्वच्छ करा हें नानाचं घर. आणि नानाच्या काकू, तूं आज नानाच्या घरचा स्वैंपाक कर. आज तो मालक. आपण पाहुणे. आपण आज त्याच्या घरीं जेवूं या. ”

पोरें भराभर सामान उचलूं लागलीं. काकू घर झाडूं लागली. कोणी तरी चुलीला पेटवण घातलें. काकूनें त्यावर भाताची हंडी चढवली. काका आपले ओटीवर नेहमींच्या जागीं बसून तंबाखूं मळूं लागले.

तेव्हां मी त्यांच्यासमोर गेलों. आणि तो जतीचा कागद फाडून टाकला.. तो वांटणीचा कागद मीं फाडून टाकला. दोघांनीं मिळून सह्या केलेला तो वांटणीचा कागद मी फाडून टाकला.

* * *

दीपावली, दिवाळी अंक

# सय

**पाटील शंकर**

पावसानं मजा करून आतां उघडीप दिली होती. रानांत बघावं तिकडं हिरवंगार दिसत होतं. पिकांवर नवी टवटवी आली होती. म्हाताऱ्या माणसानं भुईला हाताचा रेटा देऊन उठावं तशी पावसांत कुचमलेलीं पिकं वर उठलीं होतीं. जोंधळा डोक्याला लागूं लागला होता. तंबाकूमिरचींतलीं तुटाळीं नेट धरूं लागलीं होतीं. आणि आऱ्या सुटून पसरलेला भुईमुगाला कळी सुटली होती. ऊन लागेल तशीं पिकं वाढत होतीं.

दिवस नुकता वर आला होता आणि शिवा हातांत एक विळा घेऊन गवताचा भारा आणायला आपल्या बांधाकडं चालला होता. सारं शिवार हिरवंगार दिसत होतं. वरखतानं नेट धरलेल्या जोंधळ्यावर तजेलदार काळोखी आली होती. शेंड्याचीं पानं टोकदार दिसत होतीं. दहींवर पडलेलीं पिकं सकाळच्या कोंवळ्या उनांत चमकत होतीं.

जोंधळ्याला लागूनच गवताचा बांध होता. बांधाचं गवत छातीइतकं वर आलं होतं. बांध लांब होता तोंवरच त्या हिरव्या गवताचा वास भपकारत जवळ आला. सकाळच्या वेळीं फुललेल्या मोगरीचा वास यावा तसा !

शिवानं विळा खालीं टाकला आणि धोतराचा सोगा वर कमरेला खोवून तो गवताकडं बघत थोडा वेळ उभा राहिला. तो रानवट धुंद वास घमघमत होता. गवताचा तो बांध लांबच्या लांब पसरला होता. तें सारं

रान त्या कोंवळ्या-पिवळ्या उनांत भरजरी हिरव्या लुगड्याच्या पदरागत दिसत होतं. रानांतली ही हिरवी रेशीम चमकत होती. मन भुलत होतं.

लांबवर एक नजर टाकून शिवानं खालीं पडलेला विळा हातांत घेतला. आणि तो बांधाच्या एका कडेला गेला. पायांतल्या व्हाना काढून बाजूला ठेवल्या आणि चवड्यावर बसून तो पुढं झुकला. डाव्या हातानं गवताची मूठ घट्ट धरली आणि उजव्या हातांतला विळा त्या दिशेनं असा पुढं नेणार तों वरच्यावर तो हातांतून निसटून खालीं पडला.

बसकण मारून खालीं बसलेला शिवा एकाएकीं उठून उभा राहिला. त्या तरण्याताठ्या गड्याचं अंग लाडलाड हलूं लागलं. अंगांत कांपराच भरला. आपली नजर स्थिर ठेवून तो समोर बघत उभा राहिला.

तांबडंभडक जनावर न हालतां शेपटीवर उभं होतं. खडं उभं! उगवतीकडं तोंड करून हलकेच तोंडानं शीळ घालत होतं. माणसाप्रमाणं शीळ घालणारा भुजंग त्यानं कधीं पाहिला नव्हता. त्याचं तें आकारमान बघून शिवाला झेंडूच फुटला. अंगाला दरदरून घाम सुटला. त्याचा जागचा पायच उचलेना झाला. जनावराला फऱ्या रोग व्हावा तशा त्याच्या मांड्या थरथरूं लागल्या. धड उभं राहतां येईना झालं आणि सटकन् खालीं बसावं तर तीहि छाती होईना झाली. थंडीनं अंगांत हींव भरलं. डोलकाठीगत राहिल्या जागीं त्याचं अंग भेलकांडूं लागलं काय करावं हेंच कळेनासं होऊन बसलं. जीव मुठींत घेऊन तो उभा राहिला. डोळ्याची पापणी न लवतां टक लावून बघत राहिला.

समोरचा भुजंगहि तसाच निश्चल खडा उभा होता. कोंवळे किरण अंगावर पडून त्याची कान्ति भिंगागत चमकत होती. तोंडानं हलकेच शीळ घालतां घालतां तो डोलूं लागला. तें हलणारं जनावर जळांतल्या प्रतिबिंबासारखं दिसूं लागलं. आपल्याच नादांत तें दंग होऊन गेलं होतं. निसर्गाची उमलणारी सकाळची शोभा पाहत तें बेभान झालं होतं.

शिवाची छाती धडधडत होती. श्वास आवरतां येत नव्हता. पाय स्थिर रहात नव्हते. बारीकशा आवाजानं अंगावर कांटा उभा राहत होता.

आणि एकाएकीं भुजंगानं मान वळवली. शिवाकडं तोंड करून तें उभं राहिलं. तें मुटक्यागत तोंड बघून शिवाची पांचांवर धारण बसली. आतां

नजरानजर झाली होती. पाय काढावा तरी पंचाईत होती. न राहवून शिवानं एक पाऊल मागं घेतलं. पाय उचलतांच ठिसकारून भुजंगानं फणा काढला. आणि अंगाला मागंपुढं झोले देत तो उभा राहिला.

आतां कांहीं घडगत राहिली नव्हती. दैवावर हवाला ठेवून शिवानं एकाएकीं भुईला लोटांगण घेतलं. डोळे झाकून घेतले आणि दोन्ही हात एकत्र जोडून तो म्हणाला,

" बाबा मी शरण आलोंय. आतां मारणारा तूंच आणि तारणाराहि तूंच. काय चुकी घडली असली तर माफी करा. सांगा, कां दर्शन दिलं आज ? "

फूत्कार यायचे बंद झाले. म्हणून शिवानं डोळे उघडून वर पाहिलं.

भुजंग एकाएकीं अदृश्य झाला होता. कसली खसपसहि न करतां तो गडप झाला होता. फक्त बांधाच्या गवतानं भांग दिली होती आणि जळणाऱ्या उदाचा वास मागं दरवळत राहिला होता. मघापर्यंत तो घमघमणारा वास ओळखून आला नव्हता. आतां मात्र त्याची जाणीव एकाएकीं झाली. निसर्गाच्या त्या जळणाऱ्या उदबत्तीचा चमत्कार कळून आला.

अजूनहि शिवाचे हातपाय थरथरत होते. पोटांत खड्डा पडला होता. थरथरत्या हातानंच त्यानं खालीं पडलेला विळा उचलून हातांत घेतला आणि कसाबसा तो खोपीवर आला. येतांयेतांच त्यानं तंबाकूचा खुडा करत असलेल्या आपल्या काकाला हळी दिली आणि तो खोपीवर येऊन भुईला आडवा झाला. काका येण्याची वाट बघत पडून राहिला.

हळी ऐकून त्याचा काकाहि लगालगा खोपीकडं आला. आडव्या झालेल्या शिवाला बघून त्यानं लांबनंच विचारलं, " कारं पोरा, काय झालं ? "

शिवानं फक्त डोळे उघडले आणि आपल्या काकाच्या तोंडाकडं बघत तो तसाच पडून राहिला. त्याचं कपाळ घामानं डबडबलं होतं. चेहरा विचित्र दिसत होता. मृत्यूची कळा त्याच्या मुद्रेवर दिसत होती. एकाएकीं असा लोळागोळा होऊन पडलेल्या आपल्या पुतण्याला बघून त्याच्या

काकालाहि धसकाच बसला. धडधडत्या उरानं तो खालीं बसला आणि शिवाच्या अंगाला हात लावून म्हणाला,

—" अंगबी गार पडलंय ? व्हय, काय झालं ? घाबरलायस का असा ? "

शिवानं न बोलतां एकवार जीभ आपल्या ओठांवरून फिरवली. तळ-हातानं कपाळावरचा घाम पुसला आणि मग भुईला हाताचा रेटा देऊन तो दुकनकऱ्यागत बेतानं उठून बसला.

चिंताग्रस्त चेहऱ्यानं काका त्याच्या तोंडाकडं बघत राहिला, तशा आपल्याच हातानं पायाच्या पिंढऱ्या दाबत शिवा म्हणाला,

" अप्पा मरून धा वरसं झालीं न्हाई ? "

पोरानं हा प्रश्न आज कां विचारावा हें न समजून काकानं विचारलं,

" आज कां आठवण झालीरं तुला ह्याची ? "

" का न्हाई. " असं ओठांतल्या ओठांत पुटपुटून तो पुन्हां आपल्या पायाच्या पिंढऱ्या दाबत गप बसून राहिला. खालीं बघत विचार करूं लागला.

मान पुढं झुकवून काकानं विचारलं,

" शिवा, पोरा; काय, होतंय काय तुला ? पिंढऱ्या कां दाबाय लागलाईस अशा ? "

" पायांतनं पेटकंच या लागल्यात काका ? "

" एकाएकीं ? तें कशानं ? "

यावर कांहीं उत्तर न देतां तो थोडा वेळ गप्पच बसून राहिला आणि स्वतःशीं बोलावं तसं त्यानं विचारलं, " काका, चिन्ह काय बरं न्हाई. "

" काय झालं रं ? "

" काय घडतंय आणि काय न्हाई कुणाला दक्कल ! "

" अरं पर झालं तरी काय असं म्हणायला ? "

" देवाचा तांबडा भुजंग दिसला हो आज मला. " आणि असं म्हणून त्यानं विचारलं, " अप्पा मरायच्या आधीं आठ-पंधरा दिवस त्यास्नी एकदां दर्शन दिलतं न्हाई का ? "

ही गोष्ट खरी होती. त्या रानांतला तो भुजंग शिवाच्या बापाला दिसला आणि त्यावर दोन आठवड्यांत त्याचा खेळच आटपला होता. पुढं कांहीं

बर-वाईट घडायचं असलं म्हणजे अवचित तो दृष्टि पडे आणि पुन्हां अदृश्य होई असं दोन-तीन पिढ्या चालत आलं होतं. एरवीं तो दहा-दहा वर्षं कुणाला चुकूनहि दृष्टि पडत नसे. रातध्यान वस्ती पडली तरी त्याची चाहूल कधीं लागत नसे.

काळजीनं दबल्या आवाजांत काकानं विचारलं, " त्योच दिसला का तुला ? कसला होता ? "

एक सुस्कारा सोडून शिवा बोलला,

" कसला आणि काय ? लालभडक होता. "

" धुपागत वासबीस आला काय तुला ? "

" तर ! जवळ धूप जळावा तसा वास येत होता. "

" कुठसं दिसला ? "

" बांधाला हो. "

आतां कांहीं शंकाच राहिली नव्हती. न बोलतां दोघेहि अवघडून गप बसून राहिले होते. काय बोलावं हेंच त्यांना समजत नव्हतं. दोघांच्याहि जिवाला घोर लागला होता; पण कांहीं तरी आधार देणं भाग होतं. म्हणून त्याचा काका म्हणाला, " काढून टाक मनांतला इचार. "

" कसा काढूं काका ? " शिवाचे हे शब्द थेट त्याच्या काळजाला जाऊन भिडले. म्हातारा हबकला, पण वर काळजी न दाखवतां तो म्हणाला,

" काय घेऊन बसलाईस खुळ्या. साऱ्या योगायोगाच्या गोष्टी असत्यात् बाबा. नेमानेमी असेल ती कवा चुकणार हाय का ? "

शिवा आपल्याशींच विचार करीत बसला तसा त्याचा काका धीर देऊं लागला,

" तसं काय नसतय पोरा. आपला बाळक्या गडी, त्याला दोनदां भुजंग दिसला होता. काय झालं त्याचं ? "

काका उदाहरण सांगत होता आणि शिवा आपल्याच काळजींत गुरफटत चालला होता. काका काय सांगत होता हिकडं त्याचं ध्यानच नव्हतं. पोराचा विचार जात नाहीं हें बघून तो म्हणाला, " ऊठ, असा बसूं नगो. असं खालीं घेऊन काय होतय ? इनाकारणी घोर कां लावून घेतोस ? ऊठ काय तरी कामाला लाग. "

काकानं त्याच्या हाताला धरून त्याला बळंच उठवलं तसा शिवा म्हणाला,

" न्हाई काका मनच लागना झालंय कशांत."

" असं हातपाय गाळून काय होतय् पोरा ? "

हातपाय गाळून कांहीं उपयोग नव्हता हें खरं होतं. शिवाला हें पटलं आणि खोपींतलं एक खुरपं घेऊन तो म्हणाला,

" जातों. जुंधळा भांगलायचा हाय त्यो तरी भांगलतों. "

" जा भांगल जा. " असं म्हणून काकाहि आपल्या तंबाकूच्या वावरांकडं निघाला. जातां जातां पुढं बघूनच बोलला—" जा कामाला लाग जा, काय चिंता करूं नगो कसली. "

शिवाहि जोंधळ्याच्या रानाकडं गेला मनांत कसला विचार न आणतां रानांत गेला आणि जोंधळ्याचा एक आरा धरून तो भांगलण करूं लागला. रानांत खुरपं खेळवत पुढं चालला.

दुपार झाली. तिसरा प्रहर झाला आणि दिवस मावळायला आला तसा त्याचा काका आपलीं कामं आवरून त्याच्या खोपीवर आला. शिवा खोपींत नव्हता. खोपीच्या आसपास बघितलं तर तिथंहि कोणी नव्हतं. त्याच्या खोपीपुढंच काका थोडा वेळ उभा राहिला. पोरगं कुठं गेलंय हें उमजेना तशी लांब रानांत त्यानं नजर टाकली पण शिवा कुठं दिसेनासा झाला. मग पुन्हां आंत येऊन त्यानं खोपींत बघितलं. तर कोपऱ्याला झाकून ठेवलेलं भाकरीचं गठळं तसंच दिसत होतं. पोरानं दुपारची भाकरी खाल्ली नव्हती. गठळं तसंच तिथं होतं हें बघून त्याचं मन चरकलं. कामाच्या नादांत दुपारीं विचारपूस करायचीच राहून गेली होती.

काका पुन्हां खोपीबाहेर आला आणि जोंधळ्याच्या रानांत अजून भांगलण तर करत नसल असा विचार मनांत येऊन तो लगा लगा तिकडं गेला आणि ' शिवा ' म्हणून एक हळी दिली. तरी ' ओ ' आली नाहीं; तसं त्याचं धाबं दणाणलं तो आणिक थोडं पुढं गेला आणि भांगलण झालेल्या एका आऱ्याच्या तोंडाशीं उभं राहून त्यानं आंत पाहिलं.

शिवा पुढं बघून हातांतलं खुरपं खेळवत होता. भांगलण करण्यांत दंग झाला होता.

काकानं पुन्हां हळी दिली तसा तो भानावर आला. काम सोडून उभा राहिला. भांगललेल्या आऱ्यांत शिरून त्याच्याकडं जातां जातां काका म्हणाला, " अर, कवाच्या काय सकाळधरनं भांगलण कराय लागलायस तें अजून काम चालूच हाय तुझं ? "

" टाईम झाला व्हय् लई ? "

" वर बघ आभाळाकडं, बघ बघूं दिस किती झालाय ? "

डोक्याला लागलेल्या जोंधळ्याच्या पिकांत उभा राहून शिवानं मान वर करून बघितलं. मावळतीला दिवस चांगला कलला होता.

" आँ ? दिवस बुडायला गेलाय का काय ? "

काका त्याच्या तोंडाकडं बघतच राहिला. तसं शिवानं गडबडीनं बाट्क गोळा केलं आणि त्याचा जंगी भारा बांधून तो काकाला म्हणाला, " जरा हात लावा. "

काका आणि पुतण्या दोघेहि खोपीवर आले. दणकन शिवानं डोक्यावरचा भारा खालीं आदळला तशी दावणीचीं जनावरं चटाटा उठून उभीं राहिलीं. रिंदीसा चेहरा करून शिवा त्यांच्या तोंडाकडं बघत बोलला,

" तुम्हांला इसारलोंचकीरं मी ! ना वैरण, ना काडी ! दिवसभर माझ्या नांवानं तळमळला असशीला की रं ? "

गडबडीनं भारा सोडत तो काकाला म्हणाला,

" सबंध दिस आज वैरणच घालायची इसारलों. माणूस असन का कोण मी ? "

काका म्हणाला, " तूं तरी कुठं भाकरी खाल्लीयास दोपारची ! "

" आम्हांलाबी एकादसच घडली म्हणा. "

असं म्हणत त्यानं आधीं भारा सोडला आणि दावणींत बाट्क टाकून काकाला म्हणाला,

" आज असं का झालंय कळत न्हाई. काय सुद्दच व्हाईना झालीया कशाची ? "

पोरगं पार हबकलय हें बघून काका पुढं झाला आणि त्याच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला, " पोरा, आंतां हितं थांबूं नगो. थेट असाच घरला

जा. आणि काय अर्धीकोर जाईल तेवढी भाकरी खाऊन गडद झोपून न्हा जा. हितल्या वैरणकाडीचं आम्ही बघून घेऊं. तूं काय त्याची काळजी करूं नगो. जा बघूं घरला. ”

काका तिथं थांबूच देईना तसा निरुपाय होऊन तो घरला निघाला. त्यानं कसा तरी डोक्याला पटका गुंडाळला आणि पायांत पायताण घालायला म्हणून तो हिकडं तिकडं बघूं लागला. पायताणच कुठं दिसेनासं झालं. तसा तो गप उभा राहून विचार करूं लागला. काकानं विचारलं,

“ काय रं काय झालं ? ”

“ काका पायताण कुठं दिसत न्हाई हो ! असं का एकेक चिन्ह व्हाया लागलंय् ? ”

“ कुठं इसारलं असल बघ. ” असं म्हणून काकाहि हिकडं तिकडं बघूं लागला आणि शिवा म्हणाला, “ हितं न्हाई काका पायताण. ”

“ तर मग ? ”

“ सकाळीं बांधालाच न्हायलंय तें. ”

हातांत काठी घेऊन दोघेहि पुन्हां त्या बांधापर्यंत गेले. सकाळीं काढून ठेवलेल्या पायांतल्या पायताणाचा जोड अजून तसाच तिथं पडला होता. गडबडीनं पायांत घालून शिवा माघारीं वळला आणि लांबनंच बोट करून काकाला म्हणाला, “ तिथंच दिसला बघा. गवत कापायला मी असा खालीं बसलों आणि एकाएकीं शीळ ऐकायला आली. बघतोय तर भादर शेपटीवर खडा उभा होता. माझ्या हातांतनं इळाच खालीं गळून पडला.”

दोघेहि खोपीवर आले आणि शिवा घरीं जायला निघाला तसा काका त्याच्या खांद्यावर हलकेंच थोपटत म्हणाला,

“ म्हातारीला ह्यांतलं कांहीं सांगूं नगो हं. उगच तिच्या जिवाला घोर लागल. काय कळूं देऊं नगो बरं का तिला. ”

“ बरं, न्हाई सांगत. ”

“ आणि हें बघ काय करायचं चुकलंय काय येवढं म्हातारीला सहज इचारून घे. ”

“ म्हणजे ? ”

" न्हवं देवाचं काय चुकलंय काय येवढं इचारून घे आणि काय चुकलं असलं तर करतों म्हण."

" तें मी सकाळींच सांगितलंय."

" तुझा अप्पा दर आमुशाला नारळ देत होता." येवढंच पुटपुटून तो गप उभा राहिला. खालीं मान घालून शिवा म्हणाला,

" अलीकडं ह्या दोन-तीन सालांत ती प्रथाच मागं पडलीय. वरतीकडच्या रानांतल्या पिराला कोंबडीबी बंद झालीया. पर हें बंद पडून आता दोन-तीन वरसं झालीं कीं काका."

काका न बोलतां उभा राहिला आणि नुसतं खुणवून म्हणाला,

" असुंदे जा."

शिवा दिवस मावळायला घरीं आला तशी म्हातारी म्हणाली,

" पोरा, कारं लौकर ?"

" आलों झालं." येवढंच म्हणून तो थेट आंत गेला. तांब्याभर पाणी पायावर ओतून घेऊन बाहेर आला आणि भिंतीला पाठ लावून बसून राहिला. पोराचा चेहरा मोहरा म्हातारीला कांहीं तरी निराळा दिसला. तिनं खोदून खोदून विचारलं, पण शिवानं कांहीं थांग लागूं दिला नाहीं. ' जरा अंग मोडून आलंय, अंगांत कणकण हाय ' असं निमित्त सांगून त्यानं खालवर घातलं आणि गप पडून राहिला. म्हातारीच्या आग्रहाखातर त्यानं कसा तरी एक तुकडा गिळला आणि पुन्हां खालवर घालून तो गप पडला.

सगळीकडं निजानीज झाली; तशी उशाची चिमणी फुंकून म्हातारीहि कलंडली. पाय पोटांत घेऊन पडून राहिली.

भरगच्च रात्र झाली; तरी शिवाच्या डोळ्याला डोळा लागला नव्हता. मनांत विचारचक्र चालूच होतं. आणि रात्रीच्या त्या अंधारांत एकाएकीं त्याला शीळ ऐकायला आली. झटक्यासरशीं तो उठून उभा राहिला आणि नकळतच तोंडानं बोलून गेला, " रत्ने, दिवा लाव ग जरा."

म्हातारी एकाएकीं उठून बसली. उशाची आगपेटी घेऊन तिनं काडी ओढली आणि चिमणी लावून झाल्यावर ती वर मान करून बघूं लागली. शिवा थरथरत उभा होता.

" काय झालरं ? " असं म्हणत ती जवळ गेली आणि त्याला पोटाशीं धरून म्हणाली, " कां भ्यालास ? सपान पडलं व्हय ? "

शिवाची बोबडी वळली होती. तोंडांतून शब्द फुटत नव्हता. सगळं अंग घामानं चिक्क भिजून गेलं होतं. ऊर धडधडत होता. गुडघ्यांतनं पाय मोडल्यागत तो मटकन खालीं बसला; तशी म्हातारी हबकली. भान विसरून मोठ्यानं म्हणाली, " अरं माझ्या देवा ! काय झालंरं बाबा तुला ? शिवा, ए शिवा ? "

शिवानं धोतराच्या सोग्यानं तोंडावरचा घाम पुसला आणि स्वतःला सावरून तो म्हणाला,

" काय न्हाई, सपान पडलं. "

म्हातारी तशीच बघत राहिली तसा तो पुन्हां म्हणाला, " सपान पडलं ग. जा, झोप जा. "

म्हातारीनं दिवा विझवला आणि अंगावर वाकाळ घेत ती म्हणाली,

" रत्नीची का आठवण झाली तुला ! रत्ने म्हणून हांक मारायला ती काय घरांत हाय व्हय हितं ? "

खरंच असं कसं घडलं हें त्याला कळत नव्हतं. तोंडांतनं ' रत्ने ' हें नांव कसं आलं ? ती तर बाळंतपणाला माहेरीं गेली होती. तिला जाऊन चांगले दोन महिने झाले असतां असं एकाएकीं तिचं नांव आपल्या तोंडांत कां यावं बरं ? शिवा विचार करीत पडून राहिला.

...रात्र उलटत गेली तसा दोघांचाहि डोळा लागला आणि केव्हां मध्यान् रात्रीं माहेरीं बाळंतपणाला गेलेली त्याची बायको हळूच दार उघडून आंत आली आणि त्याच्या पायाशीं बसून म्हणाली, " काय होतंय तुमाला ? "

" मला ? "

" हूं ! तुमालाच. "

" मला काय होत न्हाई. मला तुझी काळजी लागलीय. "

ती त्याचा पाय दाबतां दाबतां खालीं बघून म्हणाली, " माझी काळजी करायला काय झालं ? मी तर खाऊन पिऊन चांगली बोक्यागत झालेंय."

तो उठून बसला आणि तोंड बंद करून हळू आवाजांत म्हणाला,

" आईला सांगायची न्हाई गोष्ट. "

" काय ? कसली गोष्ट ? "

शिवा भानावर आला आणि उठून बसला. तो बेचैन होऊन गेला होता. त्यानं आईला हांक मारली तशी म्हातारी घाबऱ्या घाबऱ्या म्हणाली,

" कारं ? काय होतंय ? "

" का न्हाई, जरा दिवा लाव. "

दिवा लावला आणि शिवा म्हातारीजवळ येऊन म्हणाला, " आई, झोप लागंनागं मला. जरा बोलत तर बसूं या. "

म्हातारीहि उठून बसली. दोघंहि एकमेकांच्या तोंडाकडं बघत बसले. शिवा म्हणाला,

" चिमणी जरा मोठी तर कर. "

म्हातारीनं काडी घेऊन चिमणीची वात वर सारली आणि शिवानं विचारलं,

" आतां कितवा म्हैना म्हणायचा ह्यो ? "

म्हातारी येडबडली. ती म्हणाली,

" कसला म्हैना म्हनतोस ? "

" न्हवं रत्नीला आतां कितवा म्हैना लागला म्हनतों ? "

म्हातारी त्याच्या तोंडाकडं बघत राहिली. पोरगं असं कां बोलूं लागलंय तिला कळंना झालं. ती काळजीनं म्हणाली, — " शिवा तुला काय होतयरं पोरा ? "

* * *

वसुधा

# विरंगुळा

मिरासदार द. मा.

संध्याकाळ झाली आणि कोर्ट सुटलें तसें तात्या हळूहळू घरीं आले. नुसतेंच पुढें केलेलें दार त्यांनीं ढकललें. आंत पाऊल टाकल्यावर संवयीनें ते एकदम उजवीकडे वळले. त्याबरोबर जमिनीवरच्या सतरंजीच्या भोकांत त्यांचा अंगठा अडकला आणि रोजच्याप्रमाणें आजहि त्यांना ठेंच लागली. या हिसक्यानें सबंध सतरंजी गोळा झाली. खालीं दडपलेला धुरळा एकदम उसळला. तात्यांच्या नाकांत गेला. जरा ठसकत ते कोपऱ्याजवळच्या टेबलापाशीं गेले. लकालका मागें-पुढें हलणारी खुर्ची त्यांनीं बेतानें पुढें ओढली. तिच्यांत बसून ते स्वस्थ पडून राहिले.

घटकाभरानें तात्यांनीं आंखडलेले पाय पुढें ताणले. पाठ खालीं घसरवून थोडा विसांवा घेण्याचा प्रयत्न केला. पण कमरेला रग लागूं लागली तसे ते पुन्हा ताठ झाले. दोन्ही हातांचे कोपर त्यांनीं टेबलावर टेकवले. त्यावर आपलें शिणलेलें मस्तक ठेवलें. डोळे मिटले.

मग थकलेल्या शरिरानें ते किती तरी वेळ तसेच पडून राहिले.

आंत स्वैंपाकघरांत स्टोव्ह फरफरत होता. मधूनमधून भांडीं वाजत होतीं. कुणी तरी मूल रडत होतें. या सगळ्या आवाजांतून बायकोचें खेंकसणें स्वच्छ उमटत होतें. हे सर्व सूर रोजच्या ओळखीचे होते. घरीं परत आल्यावर न चुकतां कानांवर पडणारे होते. तात्यांना त्याची संवय झाली होती. इतकी कीं संध्याकाळचा विशिष्ट वेळेचाच तो स्वाभाविक आवाज

आहे, असें त्यांना मनोमन वाटत असे. हा आवाज ऐकूं आला आणि त्यांची खात्री पटली—संध्याकाळचे सहा-साडेसहा झाले आहेत. आपण आपल्या घरीं परत आलों आहोंत. आतां आठ वाजेपर्यंत असेंच पडून राहायचें. थोड्या वेळानें चहा घेऊन बायको येईल आणि कांहीं कर्मकटकटी सांगेल. हें नाहीं, हें आणा, तें आणा. मग आपला दहा-बारा वर्षांचा पोरगा येईल, कशासाठीं तरी पैसे मागेल. आपण त्याची खोटी समजूत काढूं. यापेक्षां वेगळें काय घडायचें ?...

एकदां डोळे उघडावेसे वाटले. पण तात्यांनीं उघडले नाहींत. ते तसेच पडून राहिले. डोळे मिटले म्हणजेच बरें वाटतें. थकलेला देह कुरकूर करीत नाहीं. डोक्याची भणभण कमी होते. थोडासा विसावा मिळतो. कसें शांत वाटतें.

पांच-दहा मिनिटांनीं टेबलावर पिचका आवाज झाला. तात्यांनीं संवयीनें ओळखलें— चहा आला.

तात्यांनीं डोळे उघडले. हळूहळू वर पाहिलें.

ओला हात पदराला पुशीत बायको उभी होती. तात्यांनीं तिच्याकडे दृष्टि टाकल्यावर तिनें हसण्याचा प्रयत्न केला. दमून गेलेल्या सुरांत सांगितलें,

" चहा ठेवलाय बरं का. "

" अं ? हां हां—"

तात्या हळूहळू सरळ बसले. कुठें तरी उगीचंच पाहत राहिले. मग उजव्या हातानें टेबलावरचा सबंध कप चांचपला. त्यांतल्या त्यांत न पोळणारा भाग मुठींत धरून कप बशींत आडवा केला. बशींतल्या चहाचे सावकाश घुटके घेतले. थकलेल्या डोळ्यांनीं ते नुसतेच बायकोकडे बघत राहिले.

बशीभर चहा पोटांत गेल्यावर जरा बरें वाटलें. अगदीं खोल आवाजांत त्यांनीं प्रश्न विचारला,

" कोण रडतंय ग आंत ? "

दोन्ही हात पाठीमागें जुळवून, भिंतीला टेकवून बायको तशीच उभी राहिली होती. ती म्हणाली,

" प्रभ्या. "

" कां ? "

" त्याला लाडू पाहिजे. "

तात्यांनीं पुढचा प्रश्न विचारला नाहीं. उत्तर माहीत असलेला प्रश्न कशाला विचारायचा ?

एक सुस्कारा सोडून त्यांनीं जरा दम घेतला. राहिलेला चहा हळूहळू संपवला. बोटाचीं पेरें उगीचच टेबलावर वाजवलीं.

" नारायण कुठं गेलाय ? "

" खेळतोय बाहेर. असेल इकडं तिकडं कुठं तरी. "

" होय का ? "

बायकोनें रिकामी कपबशी हातांत घेतली.

" कोळसे संपलेत बरं का. उद्यां अगदीं नाहींत. निदान सकाळच्याला आणायलाच पाहिजेत. "

तात्यांनीं निमूटपणें मान हलवली. बोलणें समजलें अशा अर्थानें. तोंडानें त्यांनीं होय–नाहीं कांहींच सांगितलें नाहीं. बायको निघून गेली तरी ते तसेच मुकाट्यानें खुर्चींत बसून राहिले. टेबलावर बोटें वाजवण्याचा चाळा करीत त्यांनीं पुन्हा डोळे मिटले. चला, बायकोचा प्रवेश संपला. आतां मुलगा—

थोड्या वेळानें दार एकदम खडखडलें. धाड्दिशीं वाजलें. माहीत होतें, तरी पण तात्यांनीं डोळे उघडले.

दहा-अकरा वर्षांचा नारायण पळत पळत टेबलाजवळ आला. टेबलाच्या कडेला दोन्ही कोपर रोवून लोंबकळला. धांपा टाकीत म्हणाला,

" तात्या, तात्या—"

पण त्याला अशी जोरांत धांप लागली होती कीं, त्याच्या तोंडून शब्दच फुटेना.

तात्या त्रासिक सुरांत म्हणाले,

" अरे, हो हो हो !— किती पळतोस ? जरा सावकाश थोडं. "

धांप कमी झाल्यावर नारायणानें विचारलें,

" तात्या, आमच्या शाळेची ट्रिप जायचीय्—"

" हो का ? छान ! "

" वर्गणी फक्त तीन रुपये—"

" अरे वा ! "

" जाऊं मी ? मास्तर म्हणाले, उद्यां सकाळच्याला शाळेंत घेऊन या पैशे. "

तात्यांनीं नुसतीच मान डोलवली. होय नाहीं अन् नाहींहि नाहीं. नारायण फुरंगटला. रुसल्यासारखा आवाज काढून म्हणाला,

" असं का हो तात्या ? तुम्ही नेहमीं असंच करतां. देत नाहीं अन् कांहीं नाहीं. "

" बरं बरं. देऊं उद्यां. "

" हो ! देत नाहीं अन् कांहीं नाहीं तुम्ही. नुसतं म्हणतां. मागच्या महिन्याची फीच दिली नाहीं अजून. "

" नाहीं नाहीं. नक्की द्यायचे आतां. "

" उद्यां नको. आत्तांच रात्रीं देऊन ठेवा. उद्यां सकाळच्याला शाळा आहे. "

" बरं बरं, देऊं. जा, पळ. "

तात्यांनीं समजूत घातली तसें तें पोरगें पुन्हा पळालें. फाटकी चड्डी सावरीत खेळायला गेलें. त्याच्याकडे बघत तात्या उदास होऊन बसून राहिले. न बोलतां, न हलतां खुर्चींतच बसून राहिले. त्यांचे डोळे पुन्हां जड झाले. डोकें भणभणूं लागलें. सबंध दिवसभर लिहून लिहून शिणलेलीं बोटें शिवशिवूं लागलीं. अंग जड जड झालें. कधींकाळीं या खुर्चींतून आपल्याला उठतां येईल, असें त्यांना वाटेचना.

चांगला अंधार पडला. बाहेर दिवे लागले. घरांत कंदील लागला. कोनाड्यांतली मिणमिणती चिमणी पेटली. रस्त्यावरून येणारें लोकांचें हंसणें-खिदळणें कानांवर एकसारखें पडूं लागलें. घरांत पोरांची रडारड सुरू झाली तरी तात्या खुर्चींत बसूनच होते. त्यांचे डोळे दुखतच होते. डोकें भणभणतच होतें.

मग अवचित बाहेरून अनोळखी सुरांत हांक ऐकूं आली,

" तात्या, अहो तात्या— "

तात्यांनीं डोळे उघडले. इकडेतिकडे पाहिलें.

" कोण आहे ? "

" मी देशपांडे. तात्या कुळकर्णी आहेत का घरांत ? "

असें विचारीत देशपांडे आंतच आले. दारापाशींच उभे राहिले.

तात्यांनीं त्यांना ओळखलें. हे देशपांडे नाहीं का ? मामलेदार कचेरींतले. तशी आपली बेताबाताची ओळख आहे. पण रस्त्यांत भेटले तर नमस्कार करण्यापुरती. घरीं येण्याइतकी नाहीं. आज या गृहस्थाचें आपल्याकडे काय काम निघालें बरें ?

" या हो या. कांहीं विशेष ? "

" विशेष म्हणजे— "

असें म्हणत देशपांडे जरा थांबले. मग थोड्या वेळानें हलक्या आवाजांत म्हणाले,

" आमचे फडणीस भाऊसाहेब— "

" बरं बरं— "

" त्यांचे वडील गेले. "

तात्या भाऊसाहेबांना दुरून ओळखत होते. तरी पण ते एकदम ताठ होऊन खुर्चींत बसले. मोठ्यांदा म्हणाले,

" असं ? केव्हां ? "

" आत्तांच. झाला तास-दीड-तास. "

" कशानं हो ? "

देशपांड्यांनीं ' चालायचंच ' अशा अर्थानें हात उडवले.

" म्हातारपण. दुसरं काय ? "

" मग बरोबर. "

" गृहस्थ इथं नवीन. ओळखीपाळखी नाहींत, कांहीं नाहींत. माणसं मिळणं जरा—"

तात्या आश्चर्यानें म्हणाले,

" कां बुवा ? कचेरींतलीं—"

" नाहीं, तशीं माणसं आहेत. पण माहीतगार नाहींत कुणी. तुमचे जोशी वकीलसाहेब म्हणाले, तात्यांना बोलवा. म्हणजे काळजी नाहीं."

तात्या एकदम उठून उभेच राहिले. त्यांचे डोळे चमकले. अंगांत

एकाएकीं कुठून तरी जोम आल्यासारखें त्यांना वाटलें. मघाशीं खोलवर गेलेला आवाज शेंदून काढल्यासारखा वर आला. गडबडीनें ते म्हणाले,

" हो हो. चला ना ! अशा कामाला कधीं नाहीं नसतं आपलं. काळजी करायचं कारण नाहीं. "

" बरं झालं. मग येताय तुम्ही ?—"

" तुम्ही व्हा पुढं. मागोमाग आलोंच म्हणून समजा. पुढचं बघतों मी."

" ठीक आहे. "

देशपांडे निघून गेले आणि तात्यांची लगबग सुरू झाली. भराभर आंत जाऊन त्यांनीं हातपाय धुतले. तोंड धुतलें. स्वतःच हातानें ताटपाट करून बायकोला भराभरा वाढायला सांगितलें. ' हें तुमचं नेहमींचंच आहे ' असें बडबडत बायकोनें ताट वाढलें. तिकडे दुर्लक्ष करून त्यांनीं मन लावून जेवण केलें. मोठ्या उत्साहानें देशपांड्यांनीं सांगितलेला निरोप पुन्हा पुन्हा बायकोला सांगितला. आपल्याला जाणें कसें भाग आहे, यांचें वर्णन केलें.

" अग, प्रसंग आहे ! अन् जातों आपण म्हणून बोलवतात. नाहीं जायचं म्हटलं तर कोण खाणार आहे का आपल्याला ? "

असें कांहीं तरी बोलत त्यांनीं जेवण उरकलें. बाहेर येऊन सदरा घातला. उपरण्याची घडी करून खांद्यावर टाकली. पायांत चपला घातल्या. सुपारीचें एक खांड तोंडांत टाकलें. मग दार ओढून घेत त्यांनीं ओरडून सांगितलें,

" बारा-साडे-बारा होतील परत यायला. पाणी तापवून ठेवा बरं का ! "

तात्या त्या ठिकाणीं पोंचले तेव्हां येणारी बहुतेक मंडळी जमा झालेली होती. कुणी बाहेरच्या रस्त्यावर उभे होते. कुणी आंत अंगणांत बैठक मारली होती. हळू आवाजांत कुजबूज चालली होती. कचेरींतली कारकून मंडळी एका ठिकाणीं गोळा होऊन उभी होती. गांवांतले इतर चार प्रतिष्ठित दुसरीकडे थांबले होते. आंतून रडण्याच्या दबलेला आवाज बाहेर ऐकूं येत होता. मध्येंच एकदम कल्लोळ उठे; हळूहळू शांत होत पुन्हा हुंदके ऐकूं येत. बाकी सगळें सामसूम वाटत होतें. रस्त्यावर दिव्याचा अंधुक उजेड अंगणांत पडला होता. वातावरण मोठें विचित्र वाटत होतें.

सदरा, धोतर घालून रावसाहेब स्वतः समाचाराला आले होते. जोशी वकील त्यांच्याशीं बोलत उभे होते. आणखी एक-दोघे वकील गांवांतले एकदोघे प्रतिष्ठित त्यांच्या भोंवतीं कोंडाळें करून थांबले होते.

या वेळीं तात्या कारकून मंडळींत उभे राहिलेच नाहींत. थेट या मंडळींना सामोरे गेले. त्यांना बघितल्यावर जोशी वकील मोठ्यांदा म्हणाले,

" हे पाहा तात्या आलेच ! "

रावसाहेब त्यांच्याकडे कुतूहलानें बघूं लागले.

" हेच का तुम्ही म्हणत होतां ते ? "

" हेच. तात्या कुलकर्णी. मीं म्हणलं नाहीं का, तात्या माणूस आल्याशिवाय राहायचा नाहीं ? "

तात्यांच्या तोंडावर टवटवी आली. त्यांचा चेहरा खुलला. मामलेदारांकडे तोंड करून निःसंकोचपणें ते म्हणाले, " माझं आपलं तत्त्व आहे रावसाहेब, अशा वेळेला कधीं नाहीं म्हणायचं नाहीं. "

' चांगली गोष्ट आहे ' अशा अर्थानें रावसाहेबांनीं मान हलवली.

" असं पाहिजेच हो. ब्राह्मणाचं हेंच मोठं वाईट. माणसं सुद्धां धड मिळत नाहींत. "

तात्या सलगीच्या सुरांत म्हणाले,

" अन् माहीतगार नसतं कुणी एखाद्या वेळीं. फार वाईट." जोशी म्हणाले,

" तात्या म्हणजे दर्दी हां यांतले. अजिबात चूक व्हायची नाहीं कधीं. कांहीं विसरायचं नाहीं. तुम्ही आलांत, तात्या, आमची काळजी मिटली. आतां आम्ही बिनघोर झालों. "

अशीं इकडचीं तिकडचीं बोलणीं झालीं. तात्यांचें महत्त्व भोंवतालच्या मंडळींत चांगलें ठसलें. मग तात्यांनीं आंतून एक फेरी मारली. हळूहळू सगळीं सूत्रें ताब्यांत घेतलीं. जोशी वकिलांना बाजूला बोलावून घेऊन हळूच विचारलें,

" बरं, ह्याची व्यवस्था काय ? " त्यांनीं बोटानें पैशाची खूण केली. " म्हणजे पुढच्या उद्योगाला लागायला बरं. "

" किती हवेत ? " जोशांनीं अगदीं नम्रतेनें विचारलें.

" चाळीस-पन्नास पुरेत. "

" तेवढे आणलेत मीं. हे घ्या. "

" माझ्याजवळ काय करायचेत ? कुणाकुणाला द्यावे लागतील, तसतसे द्या म्हणजे झालं. "

" ठीक आहे. काय तुम्ही म्हणाल तसं. "

" मग बोलवा मंडळी. एकेकाला काम सांगून टाकतों. "

जोशांनीं, रावसाहेबांनीं फळीवर बसलेल्या, इकडेतिकडे उभ्या राहिलेल्या माणसांना हांका मारल्या. बोलावू घेतलें. तात्या काय काय सांगतील तें बिनबोभाट करायला सांगितलें. सगळे जण त्यांच्याभोंवतीं गोळा झाले तेव्हां एकेकाला कामें सांगतां सांगतां तात्यांची तारांबळ उडाली. एकादोघां कारकुनांच्या हातांत त्यांनीं कांहीं पैसे ठेवले आणि सामान आणायला त्यांची नेमणूक केली. हें सामान कुठें मिळतें, काय काय आणायचें याची त्यांनीं तपशीलवार कल्पना दिली. सुतळ्या नीट ताणून पक्क्या आहेत कीं नाहींत याची खात्री करून घेण्याविषयीं बजावलें. सगळें सामान अर्ध्या पाऊण तासाच्या आंत इथें हजर करण्याची ताकीद दिली.

मग आणखी एका प्रतिष्ठिताला हांक मारली. त्याच्या हातांत राहिलेले कांहीं पैसे दिले.

" तुम्ही पुढं व्हायचं वकीलसाहेब. छकडा करायचा. वाटेंतच अड्डा आहे लांकडाचा. पांच-सात मण टाक म्हणायचं. छकड्यांत टाकून घेऊन थेट निघायचंच. काय ? "

ते वकीलसाहेब मान हलवून म्हणाले,

" बराय— "

" आम्ही इकडून पोंचायच्या आंत लांकडं पडलेलीं पाहिजेत हां तिथं. "

" हो, हो. "

वकीलसाहेब वळले. चार पावलें गेले. तेवढ्यांत तात्यांनीं त्यांना पुन्हां माघारीं बोलावलें.

" अन् हें बघा. लांकडं वाळलेलीं बघून घ्या नीट. ओलं सर्पण जर का लागलं तर सकाळपर्यंत सुटका नाहीं म्हणून समजा. "

मग तात्यांनीं आणखी भराभर माणसें पिटाळलीं. एकाला म्युनिसिपालिटींत पास काढायला पाठवलें आणि येतांना भटजीबुवांना निरोप सांगायची

आठवण दिली. दुसऱ्याला बत्त्यांच्या दुकानांत धाडलें. सगळ्यांना अगदीं तपशीलावर सूचना दिल्या. घरच्या माणसांची रात्रीं जेवायची व्यवस्था कुणी शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं केली आहे किंवा नाहीं याचीहि खात्री करून घेतली. हें सगळे करीत असतांना तात्यांचा आवाज इतका हुकमी आणि भारदस्त होता कीं त्याबाबत शंका घेणें कोणालाहि रास्त वाटलें नाहीं. सगळ्यांनीं भराभरा त्यांच्या आज्ञा मानल्या कुणीहि उलट प्रश्न केला नाहीं. असें कां आणि तसें कशासाठीं हे प्रश्न विचारले नाहींत.

सगळ्या कामाची योग्य व्यवस्था लागल्यावर तात्यांची धांदल संपली. राहिलेल्या लोकांशीं गप्पा मारीत ते एका जागीं बसून राहिले. तिथूनच सूचना देऊं लागले.

आश्चर्यानें कुणी तरी म्हणालें,

" तात्या, अगदीं बारीकसारीक गोष्टसुद्धां निसटत नाहीं बुवा नजरेंतून तुमच्या. कमाल आहे ! "

जोशी वकील म्हणाले,

" मग सांगितलं काय मघाशीं तुम्हांला ? तात्या म्हणजे तात्या. काळजी करायचं कारणच नाहीं. एक्सपर्ट अगदीं ! "

तात्यांचा तजेलदार चेहरा आणखी खुलला. चेहऱ्यावर हंसू आणून त्यांनीं ' चालायचंच ' असे हातवारे केले.

" अहो, हें बघावंच लागतं कुणी तरी. पहिल्यांदाच पाहिलं व्यवस्थेशीर नीट, म्हणजे मग आपलंच काम होतं. नाहीं तर विनाकारण कटकट होऊन बसती मागनं. "

" हेंसुद्धां शास्त्रच आहे म्हणा कीं. "

" शास्त्र म्हणजे ? प्रश्नच नाहीं. " तात्यांनीं मान डोलवली. " मागं एकदां आशीच गंमत झाली हो. कुणाची तरी अशीच म्हातारी मेली. मी जरा उशिरा आलों. तंवर सगळ्यांनीं बांधून बिंधून उचललेली. उचलीनात का म्हणा. पण अडाण्याचा बाजार सगळा. अर्ध्या वाटेंतच सुतळ्या लागल्या तुटायला तटातट ! लागलं म्हातारीचं मुंडकं हलायला डगडगडग. आमचा रामभाऊ मला म्हणतो कसा, ' तात्या, म्हातारी मान हलवतीय. नगं नगं नगं मला म्हणतीय. ' मीं म्हणलं, ' आतां नगं नगं

२०,०३५ 
३-४-६१

म्हणून कसं चालतंय ? आतां पळवा गाडी जोरांत. ' सांगायची गंमत अशी कीं मसणवाटेपर्यंत पळत गेलों अक्षरशः ! स्मशानांत येऊन पोंचलों तेव्हां कुठें जिवांत जीव आला. "

तात्यांनीं सांगितलेली ही हकीकत ऐकून सगळ्यांनाच मजा वाटली. त्या प्रसंगाला शोभेल इतपत बेतानें सगळे हसले. रावसाहेबांच्याहि चेहऱ्यावर घडी पडली. कुणी तरी खूष होऊन नादांत विडी काढली. तात्यांना दिली. तिचा धूर काढीत तात्यांनीं आणखी कांहीं गोष्टी सांगितल्या. लोकहि आदरानें, कुतूहलानें त्या ऐकत राहिले.

" एकदां तर फार गंमत झाली. " तोंडांत घेतलेला धूर नाकांतून सोडीत तात्या म्हणाले, " आसंच आम्ही मर्तिकाचं सामान घेऊन परत येत होतों. दोघे-तिघे होतों चागले. कंटाळा आला म्हणून चहा प्यायला सहज हॉटेलांत शिरलों. सामान ठेवलं रस्त्याच्या कडेला बाहेर. अन् ज्या गप्पा रंगल्यात आमच्या आंत. अर्धा-पाऊण तास गेला. थोड्या वेळानं बघतों, तों शें-दीडशें माणूस रस्त्यावर उभं ! हॉटेलांत या कोण मेलं तें बघायला—हॅ: हॅः ! "

पुन्हा जरा खसखस पिकली. मग आणखी इकडच्यातिकडच्या गप्पा बऱ्याच झाल्या. एकदां प्रेतयात्रेच्या वेळीं धोधो पाऊस कसा पडला अन् खांदेकरी मंडळी चिखलांतून सरासर कशी घसरत होती—एक पैलवान गडी मेला तेव्हां त्याला न्यायला आठ आठ माणसें कशीं लागलीं...नाना गोष्टी सांगितल्या. तास-अर्धा तास तात्यांनीं सगळ्यांना अगदीं गुंगवून टाकलें. वेळ कसा गेला हें कुणाला कळलेंच नाहीं.

तेवढ्यांत बत्त्या घेऊन माणूस आला. सामान आलें. मग तात्यांची धांदल सुरू झाली. एखाद्या कारागिराप्रमाणें ते आपल्या कामांत रंगून गेले. जवळपासच्या मंडळींना सूचना देत, त्यांच्याकडून कामं करवून घेत, सगळी तयारी झटपट पूर्ण केली. सगळें काम पक्कें आहे याची खात्री करून घेतली.

मग पुढचा विधि यथासांग पार पडला.

दोघांतिघांना हाताशीं धरून तात्यांनीं आंतून शव आणलें. तिरडी बांधली. हळूहळू शांत होत असलेलें वातावरण घटकाभर पुन्हा उसळलें.

आंतून रडण्याचा कल्लोळ उठला. बायका, पुरुष, मुलें सगळ्यांचाच मिश्रित आक्रोश एकाएकीं सुरु झाला. सगळीकडे अंगणांत गर्दी झाली. कोलाहल माजला. रडारड, हुंदके, गहिंवर.. बघणाऱ्या माणसांच्या काळजाचें पाणी पाणी झालें.

तात्यांनीं कुणाकडेच्च लक्ष दिलें नाहीं. आपलें काम पुरें केलें. अखेर सगळें संपलें. आतां निघायचें म्हटल्यावर तात्या हळूहळू चालत गेले. उदास होऊन, खचून बाजूला उभ्या राहिलेल्या फडणीस भाऊसाहेबाकडे गेले. त्यांच्या खांद्यावर त्यांनीं सहानुभूतीनें हात ठेवला. संथपणें थोपटल्यासारखें केलें.

" आतां तुम्ही पुढं व्हायचं. पुन्हां मागं वळून पाहायचंच नाहीं. चला."

कुणी तरी फडणिसांना धरलें. मान खालीं घालून ते हळूहळू पुढें निघाले.

तात्यांनीं मग सगळ्यांना बोलावलें.

" हं, चला. उचला. श्रीराम श्रीराम ....."

स्मशानांत येऊन पोंचेपर्यंत अकरा वाजून गेले होते. दाट काळोख पसरला होता. बत्तीच्या उजेडानें तेवढ्यापुरता लख्ख उजेड पडला होता, पण बाकी सगळीकडे अंधारच होता. नाहीं म्हणायला थोड्या अंतरावर एक चिता जळत होती. गार वारें अंगाला झोंबत होतें. चितेची हाय लागून अंग उबदार होत होतें आणि जरा बरें वाटत होतें.

सगळीकडे सुन्न शांतता दाटली होती. लांब पलीकडून वाहणारा नदीचा प्रवाह जागच्या जागीं थबकल्यासारखा दिसत होता. कुठें तरी एखादें कुत्रें रडत होतें. त्याचा आवाज मध्येंच अस्पष्ट ऐकूं येत होता. वातावरण भेसूर वाटत होतें.

एका लहानशा टेकाडावर सगळी मंडळी मुकाट्यानें बसून राहिली. अशा ठिकाणीं मनावर असहायतेचें जें विचित्र दडपण येतें तें त्यांच्या मनावर आलें. आपण निःसत्त्व, निरर्थक आहोंत असें त्यांना उगीचच वाटूं लागलें. शरीर लुळें झालें.

पलीकडच्या बाजूला सर्पणाचा ढीग पडला होता. तात्यांनीं झपाझपा जाऊन लांकडें उचकटलीं. वंडीव, फोडीव लांकडें तपासून ओलें – वाळलें पाहिलें. मोठा समाधानाचा सुस्कारा सोडला. मग उत्तर–दक्षिण दिशा बघून चितेची जागा निश्चित केली. चार लांकडें मांडून दोघांचौघांना हांक मारली,

" हं, चला लवकर. पाय मोडून चालायचं नाहीं. चटचट आटोपलं पाहिजे. "

त्याबरोबर चारदोन जण उठले. भराभरा काम सुरू झालें. वंडीव लांकडांचे ठोकळे खालीं घालून तात्यांनीं तळ पक्का केला. मग त्यावर-फोडीव सर्पण रचलें. पहिले विधि पूर्ण झाल्यावर मृत देह उचलून त्या अखेरच्या शय्येवर ठेवला. वर गोवऱ्यांचा थर बसवला. सगळी चिता पूर्ण रचून तयार झाली.

शेवटीं तोंड झांकून टाकल्यावर तात्या हुश्श करून बाजूला दोन पायांवर बसले. शेजारीं बसून राहिलेल्या देशपांड्यांना म्हणाले,

" मघाशीं पानसुपारी अन् बिड्यांचं बंडल आणायला सांगितलं होतं. आणलंय ना ? का विसरलां ? "

देशपांड्यांनीं दोन्ही खिसे चांचपले.

" आणलंय ना ! काढूं का बाहेर ? "

" इतक्यांत नको. एकदां अग्नि दिला म्हणजे मोकळा झालों. मागाहून. "

हळूहळू सगळे विधि संपले. रॉकेलची बाटली घेऊन जोशी वकील उभे होते. त्यांना तात्यांनीं खूण केली. हुकमी आवाजांत फर्मावलें,

" वकीलसाहेब, सगळ्या बाजूंनीं टाकायचं अन् थोडं शिल्लक राहूं द्या. लागतं एखाद्या वेळीं. "

मान डोलवून जोशी रॉकेल ओतूं लागले, तेवढ्यांत तात्या ओरडले,

" हां हां – वर नाहीं. खालच्या बाजूला – खालचं पेटलं पाहिजे आधीं."

रावसाहेब मुकाट्यानें बाजूला बसले होते. मध्यरात्र व्हायला आल्यामुळें त्यांचे डोळे जड झाले होते. या विचित्र वातावरणांतून केव्हां एकदां बाहेर पडतों असें त्यांना झालें होतें. ते म्हणाले,

" तात्या, तुम्हीच घ्या हातांत काम. तुमच्याशिवाय खरं नव्हे तें. "

तात्या उठलेच होते. त्यांनीं मग सफाईनें कामें आटोपलीं. हां हां म्हणतां चिता पेटली. जाळ भराभरा वर चढला. फडणिसांनीं गाडग्यांतलें पाणी सांडीत उघड्या अंगानें तीन प्रदक्षिणा घालीपर्यंत चिता चांगलीच धडधडूं लागली. तांबडा-पिवळा उजेड पडला. वाऱ्यानें ज्वाळा इकडे तिकडे फाकूं लागल्या तशी जवळपास बसलेल्यांना हाय लागूं लागली. एकेक मागें सरकले. सगळ्यांच्याच तोंडांवर तांबडा शेंदरी उजेड पडला. ह्या उजेडांत उगीचच चेहरे विचित्र वाटूं लागले.

हळूहळू गोवऱ्या रसरसल्या. चांगला आर पडला. खचून खालीं जाऊं लागला. लांकडें इकडेतिकडे थोडीं ढासळूं लागलीं. ठिणग्या एकसारख्या उडत राहिल्या. बारीकसारीक आवाज निघूं लागले. तें सगळें बघत मंडळी उगीच बसून राहिली.

तात्यांनीं पानतंबाखू इकडेतिकडे सरकावली. विडीचें बंडल फिरवलें. ज्याला जें पाहिजे होतें तें त्यानें घेतलें. तात्यांनीं मग एक फर्मास बिडी शिलगावली. एखाद्या कर्त्या माणसाच्या ऐटींत धूर सोडीत ते कुणाकुणाशीं बोलूं लागले.

तेवढ्यांत ठिणग्या उडाल्या. कसला तरी आवाज झाला. एक-दोन लाकडें ढांसळून बाजूला पडलीं कुणी तरी स्वतःशींच बोलल्याप्रमाणें म्हणाले,

" नीट रचली नाहीं का काय म्हणावं ? अशीं सारखीं पडायला लागलीं तर पंचाईत आहे !—"

काम आटोपून स्वस्थ चित्तानें भटजीबुवा पान चघळीत बाजूला बसले होते. ते मान हलवून खात्रीच्या स्वरांत म्हणाले,

" हॅ-हॅ ! तात्यांचं काम आहे ! चिरेबंद. एक लांकूड इकडचं तिकडे व्हायचं नाहीं. हां ! "

तें ऐकल्यावर अभावितपणें तात्यांकडे सगळ्यांनीं बघितलें. तात्याहि खुलले. त्यांच्या चेहऱ्यावर वडीलपणाची तकाकी आली.

" चालायचंच. जरा वाऱ्यानं होतं पहिल्यांदा थोडं. " झुरका मारून ते बेपर्वाईनें म्हणाले, " पण कांहीं व्हायचं नाहीं. काळजी नको. "

रावसाहेब जिज्ञासेनें म्हणाले,

" पण होत असेल नाहीं हो कधीं कधीं असं ? "

तात्यांनीं मान डोलवली.

" होतं ना. अडाणी माणसं असतात एकेक. होतं मग. अहो, मागच्याच वर्षाची गोष्ट. त्या ह्याचा हा मेला—कोण ?—तर आम्ही घेऊन आलों. त्याआधीं जळतच होती एक चिता. काय सगळा गोंधळ नुसता. लांकडं एका बाजूला, मुडदा एका बाजूला...हाड् तुमची ! "

बोलण्यांतून बोलणें निघालें. तात्यांनीं मग आणखी कांहीं कांहीं खास गोष्टी ऐकवल्या.

" एकदां तर आशी गंमत महाराज—एक म्हातारी आणली आम्ही. वाळून कोळ झालेली. नुसतीं हाडंच. चिता पेटली धडाधडा. आम्ही आसे गप्पा मारीत बाजूला बसलेलों. अन् डोक्याखालचीं लाकडं जीं निसटलीत एकदम ! धाडधाडधाड ! मुंडकं गपकन् खालीं अन् दोन्ही तंगड्या वर... आगदीं आटेन्शन मार्च...घाबरून गेले एकेक ! आसला एकेक प्रकार. "

सगळ्यांनाच फार हंसूं आलें. रावसाहेबांनाहि हंसूं आलें. इतका वेळ विषण्णपणें एकस्याच बाजूला बसलेल्या फडणिसांच्या तोंडावरहि क्षीण हास्य चमकून गेलें. भेसूर वातावरणामुळें बंद पडलेलें मनाचें चलनवलन पुन्हां सुरू झालें. हळूहळू सगळ्यांना मोकळें वाटूं लागलें.

तात्यांनीं मग आणखीन् कुठल्या कुठल्या गोष्टी काढल्या. सगळ्यांची घटकाभर करमणूक केली. गुंग होऊन मंडळी ऐकत राहिली.

त्या नादांत बराच वेळ गेला.

शेवटीं कुणी तरी म्हणालें,

" काय तात्या, उठायचं का ? "

' जरा सबूर ' अशा अर्थानें तात्यांनीं मान हलवली. हाताचीं पांची बोटें जुळवून दाखवलीं.

" झालंच. आणखी पांच-दहा मिनिटं. "

पांच-दहा मिनिटें अगदीं स्तब्ध गेलीं. तेवढ्यांत एकाएकीं ठिणग्यांचें मोहोळ उडालें. फाड्दिशीं मोठा आवाज निघाला.

त्याबरोबर तात्या उठलेच.

" चला मंडळी. आतां निघायला हरकत नाहीं. "

जणूं परवानगी मिळाली असे सगळे भराभर उठले. एकामागोमाग

एक उठून उभे राहिले. तात्यांनीं लांब उभ्या राहिलेल्या राखणदाराला हांक मारली. चार-आठ आणे दिले. लक्ष ठेवण्याविषयीं बजावलें. तेवढ्यांत एकेक निघालाहि. दोन्ही हातांनीं छाती झांकून गार वारें अंगावर घेत चालूं लागले.

मसणवाट संपली, रस्ता मागें पडला. गांव लागलें तसे निरनिराळे रस्ते फुटले. एक-दोन शब्दांत तुटक निरोप घेऊन एकेकानें आपापली वाट धरली. रावसाहेबांसाठीं टांगा आला होता. ते टांग्यांत बसले. फडणिसांशीं उपचाराचे चार शब्द बोलले. तात्यांना सहज हांक मारली. जातों म्हणून सांगितलें आणि ते गेले.

तात्या आणि देशपांडे—दोघांचींहि घरें एकाच दिशेला होतीं. मोकळ्या पडलेल्या रस्त्यानें दोघेहि सावकाश पावलें टाकीत निघाले. थोडा वेळ गप्प चालत राहिले. मग मनगटावरच्या घड्याळाकडे बघत देशपांड्यांनीं मोठी जांभई दिली.

"एक वाजला कीं."

तात्यांनीं आभाळाकडे पाहिलें. चांदण्या बघितल्या.

"एक वाजला का? तेवढा वाजायचाच म्हणा."

"तात्या, बाकी तुमची कमाल हं!—"

"कसली बुवा?"

"सगळं व्यवस्थित काम. अगदीं बारीकसारीक—"

तात्यांचा आवाज उत्तेजित झाला. त्यांनीं एक हात अधांतरीं हवेंत उडवला.

"चालायचंच. काय विशेष त्यांत?"

"वा! असं कसं? तुम्ही होतां म्हणून आज झालं सगळं झटपट. नाहीं तर उजाडलंच असतं."

"आहे आपलं—चला! काम कामाचा गुरु. आहे काय अन् नाहीं काय?"

असें कांहीं बोलणें झालें. दुसरा रस्ता फुटला तसे देशपांडे थांबले. तात्यांचा निरोप घेऊन आपल्या वाटेनें घराकडे गेले.

मग तात्याहि निघाले. कसल्या तरी धुंदींत झपाझपा निघाले. ऐटींत

ठेका धरल्याप्रमाणें त्यांनीं पावलें टाकलीं. तोंडानें शीळ वाजवली. त्या नादांत कशी वाट सरली तें कळलेंहि नाहीं.

तात्या घरीं पोंचले तेव्हां एक वाजून गेला होता. सगळीकडे शांत होतें. बाहेर अंधार पसरला होता. घरांत केव्हांच निजानीज झाली होती. चिमणीच्या अंधुक उजेडांत एकटी बायको वाट बघत जागी राहिली होती तीहि डुलक्या घेत होती.

दार वाजले तशी ती जांभई देत उठली. दार उघडलें.

तात्या गुणगुणत आंत आले. दार ओढून घेऊन त्यांनीं कडी लावली. जमिनीवरच्या सतरंजीला ते ठेंचकळले. सतरंजी पुन्हा गोळा झाली. पण तिकडे लक्ष न देतां त्यांनीं टेबलाजवळची खुर्ची थोडी सरकावली. हुश्श करून खुर्चीत मांडी ठोकली, बायकोकडे चमकत्या डोळ्यांनीं पाहिलें.

जांभया आवरीत बायको अंथरुणावरच बसली होती. ती म्हणाली,

" अं ? त्या मानानं लवकर आलांत ? "

तात्यांनीं खुषींत मान हलवली. खुर्चीच्या हातावर उजव्या हातानें ठेका धरला.

" आटोपलं खरं लवकर. मी असलों म्हणजे नाहीं वेळ लावूं देत अजिबात. उरकायचं चटचटचट— "

मग त्यांनीं बायकोला सगळ्या गोष्टीचें इत्थंभूत वर्णन ऐकवलें. हातवारे करीत उत्साहानें सांगितलें. जागरणानें डोळ्याच्या कडेला सांचलेलें पाणी पुशीत पुशीत बायकोनें तें सराईतपणें ऐकून घेतलें.

थोड्या वेळानें तात्यांना आठवण झाली.

" बरं, पाणी तापवून ठेवलंयस ना ? आंघोळ करूनच झोपतों. अं ? "

बायको कांहीं बोलली नाहीं. पलीकडे अंथरुणावर पोरें झोपलीं होतीं. त्यांच्याकडे बघत ती उगीच बसून राहिली. तात्यांनीं पुन्हा विचारलें तेव्हां तिनें नाराजीनें मान हलवली. त्रासिक सुरांत म्हटलें,

" कशी तापवणार पाणी मी ? "

" म्हणजे ? "

" म्हणजे काय ! संध्याकाळींच नाहीं का सांगितलं. कोळसे संपलेत म्हणून ! स्टोमधलं तेलसुद्धां खलास झालं. करा आतां गार पाण्यानंच ! "

तात्या एकदम गप्प झाले. त्यांचा चेहरा एकाएकीं कसनुसा झाला हाताचा ठेका चुकला. कांहीं तरी हरवलें आहे, गमावलें आहे, असें त्यांना एकसारखें वाटूं लागलें. पण काय तें कळेना.

थोडा वेळ शांत गेला.

लोळागोळा होऊन नारायण पलीकडे झोपला होता. त्याच्या पाठीवरून यांत्रिकपणें हात फिरवीत बायको शून्य दृष्टीनें बसून राहिली. नंतर हळू सुरांत म्हणाली,

" पोरगं किती वेळ वाट बघत बसलं होतं तुमची. "

" होय ? कां ? " तात्यांनीं जड सुरांत विचारलें.

" तुम्ही पैशे देतों म्हणालां होतां ना रात्रीं ? तेंच धरून बसला होता— "

" मग ? "

" सकाळीं शाळा. सारखा नाद चालला होता. तात्या आले कीं मी पैशे घेणार—तात्या आले की पैशे घेणार ! कंटाळलं कंटाळलं, पण झोपेना. शेवटीं मी राग भरलें. दिला सपाटा ठेवून. रडलं रडलं अन् तसंच शेवटीं झोपलं झालं. "

ऐकतां ऐकता. तात्यांची नजर झोपलेल्या नारायणाकडे वळली. त्याचें तोंड अजून केविलवाणें दिसत होतें. पाण्यानें भिजून भिजून गाल मळले होते आणि लोळागोळा होऊन तो झोपला होता.

तें बघितलें आणि तात्यांच्या पायांतलें बळच गेलें. त्यांचें सगळें अंग एकाएकीं शिणलें. डोकें पुन्हां भणभणूं लागलें. डोळे पुन्हा निस्तेज झाले. जड झाले.

मग त्यांनीं नेहमींप्रमाणें दोन्ही हात टेबलावर पसरले. थकलेलें डोकें खालीं टेकवलें. डोळे मिटून घेतले, आणि मग एखाद्या जीव गेलेल्या माणसाप्रमाणें ते किती तरी वेळ तसेच पडून राहिले.

* * *

सत्यकथा : दिवाळी अंक

# आता आमोद सुनासि आले

मोकाशी दि. बा.

थडथडा पावसाचे थेंब पडत आहेत नि शिवा नेमाणेची गाय अगदीं व्यायला झाली आहे. पावसाचं पाणी पिऊन नदी मस्तीला येऊन वहात आहे नि रामजी लोहाराच्या एकुलत्या एक मुलाला तिनं आपल्या खळबळत्या धारांत वाहून नेलं आहे. हवा ओल्या फडक्यासारखी सर्द झाली आहे नि गण्या शिनारेचा दमा वाढला आहे. निसर्गाचं थैमान सुरू झालं कीं अशाच गोष्टी कां घडतात? माणसं अशी निपचीत कां पडतात?

आज सहा दिवस झाले. केंबळ खेडं पावसाचा मारा खात दबकून बसलं होतं. सहा दिवसांत आकाशाचा काळपट रंग बदलला नव्हता. ग्रहणासारखी भयाण काळोखी डोंगरापासून पायथ्याच्या खेड्यापर्यंत पसरली होती. पाण्याचे तांबडे लोंढे खळाखळा वहात होते. पावसाच्या सरी सुरीसाहख्या पृथ्वीवरून फिरत होत्या. इंजिनामधून वाफ सुटावी तसा आवाज वातावरण भरून टाकीत होता. घरें ठिबकत होतीं. माणसं विड्या ओढीत होतीं नि चहा पीत तीं अपापसांत असं कांहीं बोलत होतीं कीं पृथ्वी ही वास्तु त्यांना कधींच आवडली नव्हती असं वाटावं.

गांवांत जीं कांहीं दहा-बारा दुकानं होतीं तीं केव्हांच बंद झालीं होतीं. संतू वाण्याच्या दुकानाची एक फळी तेवढी उघडी होती. पावसाचे तुषार तिथून आंत घुसत होते नि कंदिलाच्या उजेडांत संतापल्यासारखे दिसत होते. आज बुधवार होता. आज संतू वाण्याच्या दुकानाच्या माळ्यावर

नेहमींसारखं ज्ञानेश्वरीवाचन होतं. दर बुधवारीं गांवांत जे चार माळकरी होते ते तिथं जमत. माळा बुटका होता. जमिनीवर मोठी सतरंजी पसरली होती. एक चौरंग आणि एक लहान आसन कोपऱ्यांत मांडलेलं होतं. आळीपाळीनं ते तिथं बसून ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी, तुकारामाचे अभंग असं कांहीं तरी पुढें घेऊन प्रवचन करीत.

वाण्याच्या ओसरींत आतां दोन माळकरी येऊन ठेपले होते. जोशी शिंपी धोतर पिळीत होता. गोविंदा भाजीवाला कंदील लहान करून ठेवीत होता. खुद्द संतू वाणी तक्क्याशीं टेकून बसला होता. दुकानांतील सर्व जिनसांचा मिळून एक तिखट ओलसर वास हवेंत दरवळला होता. तेलानं तुकतुकीत झालेलीं बाकं, काळपटलेले डबे, रंगीत चहाचे पुडे, निरनिराळ्या चिठ्या डकवलेली, हिंग, जिरं, धने यांच्या डब्यांची चळत, सारं दुकान या पावसांत छातीशीं ढोपरं टेकून निजलं होतं आणि एका पारड्यांत वजन टाकलेला तराजू दीड पायांवर शांत उभा होता. गळ्यांतील माळेशीं खेळत संतू वाणी म्हणाला,

" रामजी आले नाहींत. "

पिळलेला धोतराचा भाग झटकीत जोशी शिंपी म्हणाला, " हो–आले नाहींत. "

" येऊं द्या त्यांना. "

" येऊं द्या — मग करूं आरंभ. "

कंदील लहान करून गोविंदा भाजीवाला बाकावर बसला. तिघे कांहींच न बोलतां जरा वेळ उभे राहिले. मग जोशी म्हणाला, " दार लावूं ? झड येते आंत. "

" पण रामजी येतील. "

" हो रामजी येतील. "

रस्त्याकडे तिघांनीं निरखून पाहिलं. पण रामजीचा कंदील हलतांना दिसला नाहीं. बाहेर मिट्ट काळोख होता. पाऊस त्यावर वाजत होता. म्हणूनच रस्ता आहे हें कळत होतं. गोविंद म्हणाला,

" ही हवा दम्याला वाईट. "

" शिनाऱ्या भुईला डोकं टेकून पडला असेल. अशाच हवेंत तो मरेल एकदां."

" मरतोय् कसचा ! हींच माणसं चिवट असतात."

" हो-हो ! कुडी सोडायला तयार नसतात."

" पाऊस थांबू द्या ! विडीचे झुरके घेत बाहेर पडेल तुरुतुरु."

" अशांना धाड नसते."

" नि टगे भराभर मरतात."

या बोलण्यावरून सर्वांनाच रामजी लोहाराच्या पोराची आठवण आली. वाणी म्हणाला,

" आज चौथा दिवस पोर पुरांत गेल्याला."

" हातातोंडाशीं आलेलं पोर गेलं."

" रामजीचं वय काय असेल ?"

" साठीच्या आसपास."

" वंश खुंटला."

" मुलगा वांड नव्हता. कसा पुरांत गेला !"

" पोरं धमकींत जातात."

" गाय व्याली का शिवाची ?"

" छे हो ! तीन दिवस घेईल."

" आज विईल बघा."

" त्याचा पोरगा आला का माथेरानहून ?"

" या पावसांत ?"

" तो येईल."

" कशाला ? मरायला ? जाईल कड्यावरून खालीं."

पुन्हा कुणाला रामजीची आठवण आली.

" रामजी नाय आले ?"

" बोलवायला जायचं ?"

" जा — जोशीबुवा, तुम्ही जा. भात्याशीं दुःख करीत बसला असेल तो."

कंदील उचलून जोशी बाहेर पडला.

पाऊस पडतच होता.

शिवा नेमाणे वारंवार बेड्याशीं येऊन गाईकडे पाहत होता. गाय उभी होती त्या आसपासच्या जागेंतच गळणं कमी होतं. गाईनं विण्यासाठीं हाच दिवस निवडावा याचा शिवाला वैताग आला होता. मधूनच त्याची बायको उठून गोठ्यांत डोकावून जात होती. गाईची तगमग तिला जास्त कळत होती. वेदनांनीं गाईचं अंग उभ्या उभ्या वेडंवाकडं होत होतं. मधूनच ती बसत होती, धडपडत उठत होती. मधूनच माना वर करीत होती. सरळ नजरेनं कुठं तरी टक लावून बघत होती. तिचा मागला भाग फुगत चालला होता. पाणथळीचा निळाकाळा गोळा बाहेर येत होता. बेड्यांतील कोपऱ्यांत रॉकेलचं ढमणं धूर टाकीत जळत होतं. वाऱ्यानं त्याची ज्योत हलत होती नि गाईची तगमग अधिकच तीव्र भासत होती. शिवा म्हणाला,

" सोनाराच्या उकाडा अवंदा बंद करायचा. साला पैका देत नाय येक ! "

त्याची बायको म्हणाली, " कवाच्या धरून म्हनत व्हती ! तुमी सरकारी मानसास्नी गांठा. "

" हां ! पगारवाला बरा. येक तारखेस पैका येतो. "

एकमेकांना धीर द्यायलाच दोघं असलं बोलणं अधूनमधून काढीत होतीं. गाय धडपणें विते कीं नाहीं हें भय आंतून होतं. तिची सुटका नीट झाली तर बरं !

बायको म्हणाली, " अर्ज्या माथेरानास्नं येतो कीं नाय ? "

" तो कसचा येतो ! धुरांधार पाऊस चाललाय् "

" येईल पगा. "

" नाय आला तर बरा ! डोंगर उतरूनशान यायचं या पान्यांत— काय खरं नाय तें ! बुळबुळीत झालंय् समदीकडं. "

" मग रामजी लोहारास्नी बोलावतां ? "

" अगऽ ! त्याला कसं म्हंगायचं ये म्हून ! त्याचं पोर गेलं. "

" त्ये बी खरंच. "

इतक्यांत बेड्यांत गाईचे खूर थडथड वाजलेले ऐकूं आले. दोघें बेड्याकडे धांवलीं.

मुलगा पुरांत गेल्यापासून चार दिवस रामजी भात्याला टेकून बसला होता तो उठला नव्हता. आंतून अधून मधून त्याच्या बायकोचं रडणं ऐकूं येत होतं. एक ढमणी कोपऱ्यांत धूर ढाळीत तांबडा उजेड देत होती. तिन्हीसांजासारखा उदासपणा घरभर पसरला होता. रामजीच्या मनांत एकच एक कोरडा प्रश्न येत होता – आपला मुलगा कां जावा ? विठ्ठला ! तूं हें काय केलंस ? मुलानं असा काय अपराध केला होता ? त्याचं आयुष्य असं अर्ध्यावर कां संपावं ? नि मी म्हातारपणीं निःसंतान होऊन रडत कां बसावं ?

यापूर्वीं, पिकं आलीं नाहींत, धंदा चालला नाहीं, चोरी झाली— कशानंहि रामजीचं मन ढळलं नव्हतं. कुणीहि अशीं संकटं सांगत रडत आला तर रामजीनं त्याला शांत केलं होतं. चार अभंग ऐकवून, संतांचे पुरावे देऊन. लोक म्हणत, रामजीशीं बोललं कीं दुःख हलकं होतं.

पण आज रामजीचं स्वतःचं दुःख कशानं हलकं होत नव्हतं. जें कांहीं आजपर्यंत लोकांना त्यानं सांगितलं होतं तें फक्त वरवरचं समाधान होतं. जीव नि मृत्यु यांतलं त्यालाहि कळलं नव्हतं. नि संतांनाहि कळलं नव्हतं. त्यामुळंच आज कधीं केलं नव्हतं तें तो करीत होता. परमेश्वराला प्रश्न टाकीत होता. आपली तीस वर्षांची पंढरीची वारी विठ्ठलापुढें त्यानं टाकली. कुठं पुण्य गेलं या वारीचं ? प्राक्तनानं मुलगा गेला ? कसलं प्राक्तन ? म्हातारपणीं मीं रडावं हें प्राक्तन ?

जी भाषा इतरांच्या वेळीं समाधान करण्यास त्यानं वापरली होती त्यांतला अर्थ आज सुना झाला होता. विठ्ठलावर तो चिडला नव्हता. तेवढा आवेशहि राहिला नव्हता. घड्याळ बंद पडावं आणि मग वेळ खोटी वाटावी तसं त्याला वाटूं लागलं होतं. इतकीं वर्षं विठ्ठलाच्या भक्तीमुळं आपण जगत आहोंत असं त्याला वाटलं होतं. पण मुलगा जातांच मुलासाठीं आपण जगत होतों हें त्याच्या एकदम लक्षांत आलं. मुलगा होता तोंपर्यंत आपला जीव निराळा, आपला जगण्याचा आशय निराळा नि मुलाचा निराळा, असं त्याला वाटत होतं. पण मुलगा गेला नि स्वतःचं शरीरहि त्याला निरर्थक वाटूं लागलं. त्याचा देह जणुं पिशवी होती. त्यांतील पदार्थ सांडतांच पिशवीचं काय करायचं ?

कुणीहि वारकऱ्यानं सांगितलं असतं कीं रामजीचं दुःख हा अहंकाराचाच एक प्रकार होता. पण बाहेर जसं कैंबळ खेडं पावसांतून सुटूं शकत नव्हतं तसाच रामजीहि या अहंकारांतून सुटूं शकत नव्हता.

पडवीचं दार उघडून जोशी शिंपी आंत आलेला रामजीला समजला नाहीं. जोश्यानं छत्री कोपऱ्यांत ठेवली. कंदील कट्ट्यावर टेकला नि बोलायला कशी सुरुवात करावी हें न कळून गोंधळून जरा उभा राहिला. मग म्हणाला,

" रामजी, मंडळी तुमची वाट बघताहेत. "

रामजीची नजर हलली नाहीं. मान हलली नाहीं.

" रामजी, उठा. बुधवार आहे आज—"

पण या वेळीं हांक ऐकूं येऊनहि रामजीला बोलावंसं वाटलं नाहीं. जोशी आतां पुढं झाला. रामजीजवळ जाऊन त्याच्या खांद्यावर बोटं टेकून म्हणाला,

" रामजी, चला ! ज्ञानेश्वरी झाली कीं बरं वाटेल. "

रामजी मनांत म्हणाला, मला कशानं बरं वाटणार नाहीं — कशानं नाहीं. सगळं खोटं आहे. हें जग खोटं आहे. मी खोटा आहें. ज्ञानेश्वरी नि विठ्ठल खोटा आहे. आपण सारे उगीचच इथें आहोंत.

पण कुणाशीं बोलण्याची किंवा वाद घेण्याचीहि त्याची इच्छा गेली होती. कुणीं म्हटलं, ' रामजी, जेवायला उठा ' — तो उठे, ' कपडे बदला ' — बदली. चार दिवस हें असंच चाललं होतं. या वेळींहि जोश्यानं उठा म्हणतांच तो उठला. यंत्रासारखा दाराकडे गेला. जोश्यानं कंदील उचलला. बाहेर येतांच दार लोटून घेतलं. रामजी पडवींतून पुढें होऊन तसाच पावसांत शिरला होता. त्यानं झटकन् छत्री उघडून त्याच्या डोक्यावर धरली. मग आजारी माणसाला जपावं तसा तो रामजीला रस्त्यांतून जपूं लागला...रामजी ! पुढें खड्डा आहे–जपून ! रामजी, दगड आहे...वाण्याच्या पडवींत शिरतांना वांकलेल्या छपराशीं येतांच तो म्हणाला, " खालीं वाका रामजी !... "

वाण्याच्या दुकानांत शिरल्यापासून रामजीनं इकडे तिकडे पाहिलं नाहीं. नजर समोर ठेवून तो आंत गेला नि शिडी चढून माळ्यावर आला. समोरच्याच जागेवर बसला नि मांडी घालून निर्विकार चेहऱ्यानं पाहात राहिला. बाकीचे तीन माळकरी आपापल्या जाग्यांवर बसले. कुणी रामजी-कडे सरळ पाहाण्याचं धाडस करीत नव्हतं. जणू रामजीचा पोरगा गेला हा त्यांचाच अपराध होता.

पोथीसमोर संतू वाणी बसला होता. त्याच्या मनांत आज तिथं बसायचं नव्हतं. त्यामुळें तो अस्वस्थ दिसत होता. त्यानं एकदां आपल्या तिन्ही श्रोत्यांकडे नजर टाकली. आज काय वाचावं हें त्याला कळेना. त्यानं पोथीला नमस्कार केला. इतरांनीं केला. रामजी मात्र हात मांडीवर ठेवून बसला होता. संतूच्या मनांत आलं, आज जोश्यानं किंवा गोविंदालाहि बसायला हरकत नव्हती. आज मी काय सांगणार ?

त्यानं पुन्हा रामजीकडे पाहिलं. त्याच्या मनांत आलं—दुःखानं माणूस असा बधिर होतो. रामजी इतक्या जवळचा, पण त्याचं दुःख मला लागत नाहीं हें आश्चर्य आहे ! आपण कळवळलों, पण आंतलं सुखी नि निश्चिंत मन हललं नाहीं. आपलं सगळं ठीक आहे, ही भावना नि तिची ऊब कधीं तुटली नाहीं.

परमेश्वराचं कर्तृत्व हें असं आहे. तो एकेकाला गांठून मारतो—एके-कालाच जन्म देतो. माणसांनीं एकजुटीनं त्याच्या विरुद्ध जाऊं नये ही त्याची युक्ति आहे. एक माणूस दुसऱ्यासाठीं संपूर्ण दुःखी क्वचितच असतो.

पण आज वाचावं काय ?

जोश्यानंहि रामजीकडे पाहिलं. एक वेळ पाण्यानं ठिबकणारं, वाऱ्यानं फडफडणारं नि उन्हानं चमकणारं पान खालीं पडावं नि निर्जीव व्हावं तसा रामजी त्याला दिसला. गाडीचे आस भट्टींत लालपांढरे तापवून दणादण घणानं ठोकणारा हाच का तो रामजी ? घाम निथळत असतां हंसत पोरांना कोट्या करून हंसवणारा तो हाच का ? कुठें जनावर आजारी पडलं, म्हैस अडली, कीं धांवणारा हाच का रामजी ? मृत्यूच्या धक्क्यानं इतका हबक-लेला माणूस आपण पहिल्यांदाच पाहिला. आपल्या मामाच्या तीन बायका मेल्या नि त्यानं चार लग्नं केलीं. असं वैराग्य मामांत कधींच दिसलं नव्हतं.

माणूस मृत्यु विसरतो. रामजीहि विसरेल. माणसाचं मन परमेश्वरानं विसराळू केलं ही केवढी दया आहे ! नाहीं तर लहानपणीं फुटलेल्या भावलीचं दुःखहि मरेपर्यंत माणसाला सुटलं नसतं.

शिनारेच्या बेड्यांत गळूं लागलं होतं आणि घरांतहि गळत होतं. ठिबकणारं पाणी काढण्याची त्याच्या बायकोची खटपट सुरूच होती. कोणत्याहि ऋतूंत हें गळकं मोडकं घर त्यांची धांवपळ करीत होतं. हिंवाळ्यांत थंड वारा आंत घुसत असे नि पांघरुणं अपुरीं पडत. उन्हाळ्यांत सगळं तापून निघे नि चहूंकडून धूळच धूळ आंत येई. शिनाऱ्याला आठवत होतं तेव्हांपासून हें असंच होतं. शेतीशिवाय कांहीं तरी दुसरा धंदा जोडीला हवा, म्हणूनच त्यानं कर्ज काढून ही गाय घेतली होती. पुढें म्हैस घेणार होता. गाईची सुखरूप सुटका झाली तरच ठीक होतं.

माथेरानला नोकरीला गेलेला आपला मुलगा आज त्याला इथं सारखा हवासा वाटत होता. शिवाची पन्नाशी उलटली होती. नि ताण पडणारे असे प्रसंग त्याला एकट्याला सहन करणं आतां कठीण होत चाललं होतं. आपला तरुण अर्ज्या इथं असता तर आज कांहीं वाटलं नसतं – या पावसाचं, गळण्याचं, गाईच्या सुटकेचं. एकीकडे हेंहि त्याला कळत होतं कीं, या पावसांत डोंगर उतरून येणं धोक्याचं होतं. पण मुलानं धोका घेऊन डोंगर उतरावा असं त्याला आंतून वाटत होतं.

त्याची बायको गळणारं पाणी टिपतां टिपतां मधूनच कंबर धरून उभी राहत होती. गरिबीशीं झगडतां झगडतां ती अकालीं म्हातारी दिसूं लागली होती. तिचे केस गळले होते. शरीर बारीक झालं होतं. प्रत्येक काम या संसारांत कष्टाचं होऊन बसलं होतं. नि जेव्हां काम नसे तेव्हां उत्पन्नहि नसल्यानं अधिकच कष्ट वाटत होते. कित्येक वेळां तिच्या मनांत आलं तसं आजहि आलं. लहानपणीं ऐकलेली एक कहाणी ती स्वतःशीं रंगवूं लागली. शंकर-पार्वती वरून विमानांतून जात आहेत. पार्वतीचं लक्ष या घराकडे गेलं. इथल्या माणसांचं दारिद्र्य, कष्ट पाहून तिला कळवळा आला. शंकराला

तिनं विमान उतरवायला लावलं. झोपडींत येऊन तिनं आपल्याला एक मणी दिला. तो घासतांच हवं तें आपल्याला मिळूं लागलं.

नेहमींसारखी या कल्पनेंत ती रंगली. पार्वतीला आपण नमस्कार केलाय्, तिच्याशीं बोललों, मग नवरा आल्यावर पार्वतीनं दिलेल्या मण्याचा प्रभाव आपण त्याला दाखविला. त्याचा चेहरा खुलला. त्याचा आनंद पाहून आपल्या डोळ्यांत खरोखरच पाणी तरारलं. जणुं मणी आपल्या हातांतच आहे अस वाटून तिनं आतांहि इच्छा केली कीं, अर्ज्याला एक सुंदर, सशक्त बायको हवी आहे. मग सून आल्याच्या आनंदांत ती गुंग झाली.

संतू वाणी केव्हां पोथी सुरू करतो याची सर्वजण वाट पाहत होते. खालीं मान ठेवून, एकदां खोकून तो म्हणाला,

" सावधान मंडळी ! "

सर्वांनीं मान हलवली. फक्त रामजीची नजर हलली नाहीं. संतूनं सुरुवात केली—

" ज्ञानेश्वरी माउलीनं ज्ञानेश्वरी सांगून सगळ्या जगाला उपकृत केलं. अर्जुनाला कृष्णानं मोहांतून सोडवलं तर ज्ञानेश्वरांनीं आपल्याला सोडवलं, आतां ' अमृतानुभव ' आपण चाखून पाहूं ' ज्ञान-अज्ञान-भेद-कथन ' हें प्रकरण मी वाचतों. काय जोशीबुवा ? "

जोशीबुवांनीं मान हलवली. एकदां रामजीकडे पाहून तो पोथीकडे पाहूं लागला. प्रवचन सुरू झालं.

रामजीच्या कानावर शब्द पडत होते, इतकंच. त्याचं मन भरकटत होतं. त्याच्या मुलाचा देह अजून हातीं लागला नव्हता. तो देह त्याला दिसत होता. लाल केलेली धाव आपण ऐरणीवर सांडशीनं पकडल्यावर तो कसे धपाधप घाव घाली. त्याचे दंड आतांच पिळदार होऊं लागले होते. घण मारतांना त्याच्या दंडाचे स्नायु फिरक्या घेत. मुलगा असा आपल्यासमोर काम करीत असतां, मुलाऐवजीं आपणच वडिलांसमोर काम करीत आहोंत असा त्याला भास होई. आपलं जें कांहीं आहे तें आपण

मुलांत ओतलंय् याचा आनंद एखाद्या समाधीच्या आनंदांत आनंदासारखा होता. जणुं आपणच मुलाच्या रूपानं पुढं जगत आहोंत ही भावना एक तऱ्हेच्या अक्षयतेची जाणीव करून देत असे.

मुलगा जातांच ती जाणीव गेली होती. पोपटांत जीव असलेला राक्षस पोपट जातांच जसा तडफडूं लागतो नि निर्जीव होतो तसा निर्जीवपणा आपल्यांत आला आहे असं त्याला वाटत होतं.

संतू वाणी वाचीत होता :

" आतां अज्ञानाचेनि मारे ।
ज्ञान अभेदें वावरे ।।
नीद साधोनी जागरे ।
नांदिजे जेवी ॥ "

ओळ वाचून होतांच त्यानं सर्वांकडे पाहिलं. मग ओवीच्या सुरांत त्यांनं जें वाचलं तेंच तो सरळ गद्यांत म्हणूं लागला,

" ज्ञानोबा सांगतात, आतां अज्ञानाचेनि मारे, ज्ञान अभेदें वावरे, नीद साधोनी जागरे, नांदिजे जेवी —"

सर्वांनीं माना हलवल्या. कांहीं सोपे अभंग किंवा ओव्या सोडल्यास आपण काय वाचीत आहोंत हें वाचणाऱ्याला कळत नव्हतंच, पण ऐकणाऱ्यालाहि इथं कधीं कळत नव्हतं. आजपर्यंत वीस वर्षं अशाच तऱ्हेनं ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी हे ग्रंथ त्यांनीं शंभरदां वाचले होते. बहुतेकांची ज्ञानेश्वरी पाठ होती. पण तिथं अर्थाची कुणाला जरूर नव्हती. संस्कृत मंत्र ऐकतांना अर्थ कळत नसतो, पण आपण शिकलेले सुद्धां ज्या भावनेनं ऐकत असतों तीच भावना तिथं होती. संतू वाण्यानं पहिली ओवी गद्यांत म्हटल्यावर विचारलं,

" समजलं ? "

सर्वांनीं पुन्हां माना हलवल्या, तो वाचूं लागला :

का दर्पणाचा निघाला । ऐक्य बोधु पहिला ।।
सुख भोगी आपुला । आपणची ।।

अनुक्रम 30035

आणि ही ओवीहि आपण व्यवस्थित संपूर्ण अर्थबोध करून, फोडून सांगतों अशा आविर्भावांत त्यानं गद्यांत वाचली.

रामजीच्या कानांवर ओवी पडत होती. नि आता तो पुरांत वाहत चाललेला आपल्या मुलाचा देह पाहत होता. सगळं जग किती खरं खरं वाटत राहतं नि अचानक सगळं खोटं ठरतं ! पुराच्या तांबड्या लोंढ्या-बरोबर वर-खालीं वहात असलेल्या देहांत कांहीं उरलं नसेल. तो फक्त एक पंचमहाभूतांचा भाग होता. तो रामजीचा मुलगा नव्हता. भांडणारा — खेळणारा—हसणारा —'बाबा' म्हणून हांक मारणारा. आतां कुठं तरी किनाऱ्याच्या, नदींत उतरलेल्या फांदीला तो देह अडकला असेल. त्याला सृष्टीचं भान नसेल. तो कुणाला ओळखणार नाहीं. पाहणार नाहीं. फक्त जीव गेला म्हणजेच माणूस असहाय होतो. असा एखाद्या फांदीला तांबड्या पाण्याचा मारा खात अडकून राहतो.

रामजी हे विचार करीत होता नि इतरहि अस्वस्थ होते. त्यामुळं आज वाचनांतहि रंग भरत नव्हता. कुठल्याहि शब्दांनीं, मग ते अमृतानुभवांतील असोत, माणसाला समाधान मिळत नाहीं – अशा प्रसंगीं तर नाहींच. सर्वांना ही जाणीव होत होती. तल्लीन झाल्यासारखं करून, गंभीरपणानं वाचून जो तो, इथं समाधान आहे, हें इथं उत्तर आहे—असं दाखवीत होता, एवढंच. दोन-तीनशें वर्षांपूर्वीं कुणी तरी पोथी किंवा अभंग लिहितो नि ती पोथी किंवा अभंग आपण जीवनाचं सर्वस्व करतों. त्या आधीं ती पोथी नव्हती—अभंग नव्हते. मग तेव्हां लोक काय करीत होते ? अशीच त्यापूर्वींची एखादी पोथी काढून वाचीत होते—समाधान घेण्याचा यत्न करीत होते.

अशा तऱ्हेचं कांहीं तरी तीनहि माळकऱ्यांच्या मनांतून धांवत होतं. जसजशी एकेक ओवी पुढें जात होती तसतशी त्यांतून दुःख निवारण्याची धडपड व्यर्थ वाटत होती. कसलाच रस त्या वाचनांतून उत्पन्न होत नव्हता. शांत रस उत्पन्न होण्यास मनाची जी अवस्था आणावी लागते ती कुणालाहि आणणं जमत नव्हतं.

आणि ओवी संपली कीं, संतू वाणी श्रोत्यांकडे पाहत होता. श्रोते मान हलवीत होते. नि पुढची ओवी वाचीत होता.

शिवा नेमाणेची गाय आतां जोरारानं मधूनच हंबरूं लागली होती. शिवा नि त्याची बायको बेड्याच्या आसपास सारखीं खेपा घालूं लागली. पाऊण तासापूर्वीच गाईची पाणथळ फुटली होती. नि आतां तिच्या वेदना वाढूं लागल्या होत्या. गाईची ऊठबस वाढली होती. आपल्याला कांहीं करतां येत नाहीं या जाणिवेनं नवराबायको हतबल होऊन तिच्याकडे पाहत होतीं. एक जीव जन्मास येण्यावेळीं इतक्या यातना होतात! एक कोंब फुटतो, एक फूल उमलतं, एक फळ लागतं सृष्टींत सर्वत्र हें जनन चालू असतं नि सतत यातना सुरूच असतात. ह्या यातनांचं एक तंतोतंत लहानसं रूप त्या जोडप्याच्या तोंडावर दिसत होतं.

अचानक गाय उठून धडपडत उभी राहिली. फताटलेले पाय जवळ ओढून उभं राहतां राहतां तिनं एक करुण हंबरडा फोडला. ती उभी राहिली नि वासराच्या पायाचा एकच खूर बाहेर आला.

शिवानं जोरानं बायकोचा दंड आवळून धरला. दोघेंहि तल्लख होऊन खांबाला हात गच्च धरून पाहात राहिलीं. त्यांचे श्वास थांबले. डोळे ताठ झाले.

वासराचा एक पाय बाहेर येतांच दुसराहि येईल असं वाटलं होतं. पण पाय आंत गेला नि आतां डोकं दिसतंय् असं वाटलं. डोक्याकडून जगांत उडी मारण्याची वासरानं किंचित् चुळबूळ केली. तें पुन्हा सरकलं.

गाईची तगमग वाढूं लागली. वेदना असह्य होऊन ती पायावर इकडे-तिकडे करूं लागली. तिचं तोंड अधिक वर होऊं लागलं नि ती अधिक करुण सुरांत हंबरूं लागली. शिवाच्या बायकोच्या एकदम लक्षांत आलं— गाय अडली आहे!

मोठ्यानं विचित्र सुरांत हेल काढून तिनं रडण्यास सुरुवात केली. शिवा खिळल्यासारखा गाईकडे टक लावून पाहत होता. त्याचे सर्व अवयव बधिर झाले होते. मनहि. बायकोनं त्याला दंडाला धरून ओरडत हलवलं. तरी त्याची स्थिर नजर हलली नाहीं. नवऱ्याचा दंड सोडून ती घरांतून ओरडत धांवत रस्त्यावर आली नि ओरडत सुटली,

“रामजीदा! रामजीदा!–धांव रे बाप्पा! माजी गाय अडली रं ऽ– धांव!”

रामजीच्या डोळ्यापुढला मुलाचा देह गेला होता. समोर चाललेलं वाचन त्याला ऐकूं येऊं लागलं होतं. एकाएकीं त्याला विठ्ठलाचा संताप वाटूं लागला. आपली करुण हांक त्याच्या कानावर गेली नाहीं तर हे निर्जीव शब्द काय जाणार ? कां हे लोक निष्कारण हें सारं वाचीत बसले आहेत ? पंचवीस वर्षं हजारदां हें सारं वाचून झालं आहे. यांतून काय निघालं ? विठ्ठलानं काय केलं तें कानावर पडून ? माझा मुलगा नेला. आयुष्यभर हे असेच वाचीत राहतील. तेच शब्द—तोच ग्रंथ. नि मरतांना विठ्ठल विठ्ठल म्हणतील. माझ्या मुलाला तर त्यानं इतकं अवचित नेलं कीं विठ्ठल म्हणायलासुद्धां त्याला वेळ मिळाला नाहीं. त्याला गति मिळणार नाहीं का ? मग किती एक इतक्याच अवचित जातात त्यांचं काय ? विठ्ठला ! या सर्वांचीं उत्तरं मला दे ! मी तुला विचारतोंय्—रामजी—पंचवीस वर्षं माळकरी असलेला रामजी !

संतू वाण्यानं सहावी ओवी वाचली होती. तो तिचा अर्थ सांगत असतां हें निर्जीव चाललेलं प्रवचन कसं नि कुठं संपवावं याचा तो विचार करीत होता. इतक्यांत शिवा नेमाणेच्या बायकोचा रडका किंकाळा आवाज आला.

"रामजीदा ! रामजीदा !"

जोश्यानं रामजीकडे पाहत हळूच गोविंदाला म्हटलं'

"शिवाची गाय अडलेली दिसते—"

त्याचं वाक्यहि संपलं नाहीं तोंच खालच्या दारावर मुटी नि डोकं आपटण्याचे आवाज ऐकूं आले. तिघे माळकरी रामजीकडे पाहूं लागले. शिवाच्या बायकोचा रडवा सूर मागोमाग आला,—

"रामजीदा, धांव ! माजी गाय अडली रे ! धांव रामजीदा !"

रामजीच्या बधिर मनांत कांहीं तरी हलूं लागलं. 'धांव-धांव !' ही आरोळी आपण कुठं ऐकली ? रामजीला वाटलं पुराच्या खळखळत्या पाण्यांतून—सोसाट्याच्या वाऱ्यांतून ती आली होती. आपण घरीं होतों. नाहीं—ती हांक आपल्याला ऐकूं आलीच नाहीं. आपण कानशीनं विळे घाशीत होतों. ही आरोळी ती नव्हे. ही नेमाण्याची बायको हाकारते आहे. तिची गाय अडली आहे. तिची गाय अडली आहे कीं माझा मुलगा ओरडतो आहे ?—धांव !

" ऊठ ऊठ ! "—तो स्वतःला म्हणाला. शरीर उठलं, दुःखानं अवघडलेल्या त्या शरिराचा जरा झोक गेला. रामजी ओरडला, " चल–चल ! "

त्यानं शर्टच्या बाह्या वर केल्या. शिडीकडे जोरानं दोन पावलं टाकलीं नि धाडधाड उतरून दरवाजाकडे धांवला. दरवाजा उघडून बाहेर घुसत तो नेमाणेच्या बायकोला म्हणाला,

" पळ ! माझी पेटी घेऊन ये औषधांची—"

डोळे पुशीत ती धांवत—पळत सुटली.

झपझप आलेला रामजी बेड्याच्या तोंडाशीं थबकला. त्यानं नजर टाकून बेडयांतील स्थिति पाहिली. मग तो नेमाणेला म्हणाला,

" काय रे नेमाण्या ! उघडयावरच ठेवलीस गाय ! घोंगडी लावायची पण तुला अक्कल नाहीं ? म्हणूनच ती अडली. तुम्ही दोघं सारखं डोकावून पाहात होतां ना ? डोकं आहे का मडकं तुमचं ? "

त्यानं झप्‌दिशीं सदरा काढून नेमाणेच्या अंगावर फेकला. मग धोतर वर खोचलं. अगदीं संथ पावलांनीं तो बेडयांत शिरला. मग नेमाण्याकडे परतून म्हणाला,

" गाढवीच्या ! गाईखालीं पेंढा पसरायला सुद्धां सांगायला हवं का ? तुमच्या घरीं विण्यापेक्षां गाईला रानांत विणं परवडेल. "

नेमाणे पेंढा आणायला धांवला. रामजीनं हळूच पुढं होऊन पाहिलं. डोक्याकडून बाहेर येण्याचा वासरूं पुन्हां प्रयत्न करीत होतं. गाईनं एक-दोनदां हंबरून आपल्या कळांना वाट करून दिली. त्यानं आपले तळवे किंचित् दाब देऊन हळूहळू तिच्या दोन्ही कुशींवरून फिरवण्यास सुरुवात केली. हें सुरू असतां तो नेमाणेला म्हणाला,

" बादलींत पाणी आण. "

नेमाणेनं धांवत जाऊन बादली भरून आणली. बादलींत हात बुडवतांच रामजी ओरडला,—

" ए बैलोबा, गरम पाणी आण. "

रामजीची प्रत्येक शिवी नेमाणे कौतुकानं ऐकून घेत होता. नि रामजीच्या

सांगण्याप्रमाणें धांवपळ करीत होता. रामजी शिव्या देत होता—खेंकसत होता. आतां गाईची सुटका करण्याची तो शिकस्त करील याची शिवाला खात्री वाटली. रामजीनं एखादा फटका मारला असता तरी त्यानं तो झेलला असता.

नेमाणेची बायको पेटी घेऊन आली. शिवा चुलीशीं खटपट करीत असलेला येतांना तिनं पाहिला होता. पेटी रामजीपुढं ठेवून ती चुलीकडे धांवली.

आतां पाऊस पडत होता त्याची आठवणसुद्धां राहिली नव्हती. बेड्यांत जातांना पागोळ्या अंगावर पडत होत्या तरी कांहीं वाटत नव्हतं. नेमाणे जोडप्याला सगळं आकाश निळं स्वच्छ झाल्यासारखं वाटत होतं.

रामजीनं पेटींतून पोटॅशमची बाटली काढली नि झरकन् चार कण पाण्यांत टाकले. दोन्ही हात बुडवून त्यानं पाणी खळबळलं. मग एक-दोन वेळां नखांत नखं घालून त्यानं तीं साफ नि गुळगुळीत केलीं.

उठून तो गाईजवळ आला नि पुन्हां तिच्या पोटाच्या दोन्ही बाजूंनीं हात फिरवूं लागला. त्याचं हात फिरवणं सुरु होतांच गाईनं त्याच्याकडे वळून पाहिलं, जणुं माणसाला म्हणावं तसं तो म्हणाला,

" धीर धर—माझी बाय ! "

वयामुळं रामजीचे पिळदार दंडहि जरा ओथंबले होते. हात फिरवीत असतां स्नायूबरोबर उतरलेली कातडीहि हलत होती. कांहीं वेळ हात फिरवतांच त्याच्या दोन्ही खांद्यांशीं जरा भरल्यासारखं वाटूं लागलं. उठून त्यानं तेल काढलं नि दोन्ही हातांवर ओतलं. वासराचं डोकं दिसत होतं तिथं दोन्ही हातांनीं त्यानं फासलं. पुन्हा तो तिच्या पोटाच्या बाजूनं हात फिरवूं लागला.

महाकळींचा जोर वाढला होता हें गाईच्या वाढत्या हंबरण्यावरून नि अस्वस्थपणावरून कळत होतं. रामजीनं पुन्हा बादलींत हात बुचकळले. पुन्हा तेल हातावर घेतलं नि तोंडाशीं आलेल्या वासराच्या डोक्याभोंवतीं दोन्ही हातांनीं धरून तो त्याची जागा बदलूं लागला.

आतां बाहेरच्या पावसाचा गारवा त्याला भासत नाहींसा झाला होता.

त्याचं अंग आंतून गरम होऊं लागलं होतं. त्याला कुठलं भान नव्हतं. सगळं जग गाईंत, वासरांत दिसत होतं. एक जीव इथं अडकला होता. त्याला बाहेरच्या जगांत यायचं होतं, बागडायचं होतं, आणि त्याला कुणीं तरी अडवून ठेवलं होतं.

वासराचं डोकं आंत सारून तो तें चिमुकलं शरीर वळवूं लागला. आंत गेलेलीं त्याचीं बोटं जणुं अज्ञेयाचा वेध घेत होतीं. माणसाच्या पलिकडील घटनेचं ज्ञान घेत होतीं. आणि त्या घटना आपल्याप्रमाणं वळवूं पाहत होतीं. त्याची सगळी शक्ति, कौशल्य बोटांत येऊन राहिलं होतं. ज्ञानेश्वरांनीं म्हटलं असतं–आतां बोटं डोळे झाले आहेत. बोटं मेंदू झाले आहेत, बोटं जिवाशीं झगडत आहेत. ढोपरांत अर्धवट वांकून, मांड्या भरल्या कीं कमरेंत ओणवं होऊन, कंबर थकली कीं, गुडघ्यावर बसून तो वासराचे पुढचे खूर हाताशीं येण्याची वाट पाहत होता.

महाकळ येतांच थरथरणारं गाईचं अंग त्याच्या बोटांना कळत होतं. त्याचीं बोटं लवलवत होतीं नि शरीर सणकत होतं. महाकळ येऊन गाईनं जोर करतांच तोहि हात आणखी आंत नेऊन म्हणत होता,

"धीरानं–धीरानं–शाब्बास !"

हा जीव वांचवण्याच्या झगड्यांत तूं नि मी दोघं सारखींच गुंतलों आहोंत हें जणुं तो गाईला सांगत होता. खांद्याला खांदा भिडवून यातनांची लढाई दोघांना लढायची आहे. आतां ही लढाई हरायची नाहीं. सुटका करीत असतां एकोकडे त्या जनावराशीं बोलण्याची त्याला संवय होती. आतांहि तो हळूहळू गाईला म्हणूं लागला,

"धीर धर ! छान वासरूं आहे. आत्तां तें उडी मारील. मग तूं चाटतां चाटतां तें वाढेल. मोठं होईल—जरा कळ दे..."

महाकळ विरली नि गाय पुन्हां स्तब्ध झाली. तिच्या अंगावर आतां घाम फुटूं लागला होता. रामजीनं तिच्या पोटाच्या दोन्ही बाजूंस हात फिरविण्यास सुरुवात केली. त्याचे गुळगुळीत हात निसटूं लागले तेव्हां धोतराचा पुढचा सोगा सोडून त्यानं हात पुसले. मग तिच्या पोटाच्या दोन्ही बाजू पुसल्या. आणि हात फिरवीत महाकळ येण्याची तो वाट पाहूं लागला.

एखाद्या दुष्ट प्राण्यानं थांबून थांबून हल्ला करावा तसं महाकळ करीत होती. आतांहि गाईचं सगळं शरीर थरथरवीत ती येतांच रामजीनं झटकन् बादलींत हात बुडवले, पुन्हा तेल घेतलं नि हात घालून वासराचं शरीर तो वळवूं लागला.

या धडपडींत सगळं स्तब्ध झालं होतं. पावसाचा आवाजसुद्धां स्तब्धावला होता. जणुं देव-गंधर्व आपलीं भिरभिरतीं विमानं थांबवून निश्चल पाहत होते. जणुं पृथ्वीवर शुभ-अशुभाचा झगडाच चालू होता. माणसाला जीव हवा होता नि कुणाला नको होता ?

रामजीला फक्त तो जीव दिसत होता. आंतून त्याला ऊर्मि येत होत्या— हा जीव वांचवला पाहिजे, आपल्यासाठीं—गाईसाठीं—जगासाठीं. कुठें तरी एक दुवा तुटला आहे तो सांधला गेला पाहिजे. कुणी आड येवो—कुणाची इच्छा नसो.

आंतल्या जीवाची बाहेर येण्याची धडपड रामजीला कळत होती. त्या जीवाची ती अगतिकता. अशा जीवाबाबत ज्ञानेश्वरांनीं काय म्हटलं असतं ? ते म्हणाले असते— विश्वोत्पत्तीची अनुभूति आली. रामजीला स्वतःला जनावरांची सुटका करतांना नवल वाटलं होतं. हा जीव इथं कसा येतो ? कसा तयार होतो ? हा सर्वांत मोठा चमत्कार आहे. सर्व तत्त्वांचं सार इथं आहे. त्याला कधीं कधीं वाटे— वासरांत येणारा जीव किंवा त्यांतून जाणारा जीव कुठें तरी हातीं लागेल— केव्हां तरी साक्षात्कार देईल.

आलेली महाकळ सहन न होऊन गाईनं पुढचा एक पाय दुमडला. मग दुसराहि दुमडून ती थोडं जमिनीवर टेकून माना हेलकावीत अगतिक होऊन बसली. आतां शरीराचं ओझं सहन न होऊन ती मागचे पायहि दुमडून पडेल हें लक्षांत येऊन रामजी ओरडला,

" ए मूर्खा ! धांव, उचल तिकडून. उभी करूं हिला. " गाईला उभं करण्याची दोघांनीं धडपड सुरू केली. शिनारे श्वास टाकूं लागलाच, पण संवय असूनहि रामजीसुद्धां घामाघूम झाला. गाईला उभं करून कपाळावरचा घाम पुशीत तो परत तिच्या मागें आला.

गाईलाहि धाप लागली होती. येणाऱ्या नव्या नव्या कळांची ती तयारी करीत होती. तिच्या महाकळा जणुं आपल्याच अंगांत शिरत आहेत असा

रामजी थरथरूं लागला. त्याचं सगळं शरीर तल्लख झालं. गाईला त्यानं एक-दोनदां थोपटलं—गोंजारलं. हात पाण्यांत बुडवले. तेल घेतलं नि पुन्हा वासराचं शरीर वळवूं लागला.

आतां त्याला चेव आला होता. जणुं अज्ञेयाशीं तो प्रत्यक्ष झटापट करीत होता. कसला तरी सूड उगवणार होता—कांहीं तरी सिद्ध करणार होता. गमावलेलं कांहीं मिळवणार होता. गाईच्या पोटांतल्या हाल-चालीशीं त्याचं पुरं तादात्म्य झालं होतं. कळा भराभर येऊं लागल्या होत्या. वासरूं बाहेर टाकण्यासाठीं गाय तडफड करीत होती. तिच्या प्रयत्नांची लकब त्याच्या बोटांतून त्याला कळूं लागली होती. नि त्याचीं बोटं तिला आपोआप साथ देऊं लागलीं. वासरूं फिरत चाललं. डोकं आंत गेलंच—आतां पोट बोटांना लागलं. तें आणखी फिरलं. नि झटकन त्याचे पुढचे दोन खूर रामजीच्या बोटांना लागले.

तो हळूहळू ओढूं लागला. वासरूं बाहेर येऊं लागलं. रामजी डोक्यापासून मानेपर्यंत घामानं निथळला. गाईच्या सर्वांगावर घामाचे थेंब दिसूं लागले. रामजी धापा टाकूं लागला.

आणि एकदम न कळल्यासारखं वासरूं त्याच्या आवाक्यांत पडलं. बाहेर येतांच त्या वासराची लगबग सुरू झाली. जगांत येण्याची इतकी घाई त्याला दिसली. रामजीनं वरचं आवरण काढतांच त्यानं टुण्दिशीं उडी घेतली. त्याची उडी रामजीनं आईकडे वळवली.

गाईची लगबग सुरूच होती. मागचे पाय इकडे तिकडे हलवीत, शेपटी वेळावीत, माना फिरवीत तिची जीभ वासराची वाट पाहत होती. त्या जिभेला वासरूं लागतांच लगबगीनं तिचं चाटणं सुरू झालं.

रामजीनं धोतराचा सोगा सोडून तोंड, मान, हात पुसले नि तो भराभर सूचना देऊं लागला. गाईला खायला काय घालायचं? वार कशी कापायची? वासराला केव्हां पाजायचं? गाईला गरम पाणी पाजायचं नि स्वच्छ कसं ठेवायचं? तिच्या खाण्यांत गव्हाचा भुस्सा किंवा सुंठ-मिरी किती टाकायची?...

बोलतां बोलतां गव्हाणीवर ठेवलेलं आपलं कुडतं त्यानं अंगांत चढवलं. मग पेटी उचलून तो बाहेर पडला.

बाहेर पाऊस लागतांच त्याला सर्व भान पुन्हा आलं. नि गमावलेल्या पोराची आठवण आली. तो तसाच चालत राहिला. पावलं पुन्हा बधिर होऊं लागलीं. चेहरा कठोर बनला. संतू वाण्याच्या दुकानासमोर येतांच तो तिकडे वळला.

ओसरीवर तिघे माळकरी त्याचीच वाट पहात बसले होते. तो येतांच ते उठले. जोशी म्हणाला,

"पोथी पुरी करूं या."

चौघे माळ्यावर गेले नि आपापल्या जाग्यावर बसले. अमृतानुभव पुढें घेऊन संतूनं झटदिशीं उघडला नि तो वाचूं लागला :

"आता आमोद सुनासि आले ।
श्रुतीशीं श्रवण निघाले ।
आरसे उठले । लोचनेंशी ।।
आपलेनि समीरपणें ।
वेल्हावती विंजणे ।
किं माथेंचि चाफेपणें । बहकताती ।।

आतांहि कुणाला त्यांतला अर्थ कळला नाहीं. पण वाचण्याचा सूर नि शब्दांचा नाद यांत चौघेहि रंगूं लागले. आतां त्या सुरांत नि नादांत अर्थ प्रतीत होऊं लागला. सर्वांच्या माना हलूं लागल्या. रामजीचा चेहरा भावनांनीं भरूं लागला. तिसऱ्या ओवीला सुरुवात झाली न झाली तोंच तो रडूं लागला. पोथी चालूच होती—

जिव्हा लोधली रसे ।
कमळ सूर्यपणें विकासे ।।
चकोरची जैसे ।
चंद्रमा झाले ।।
फुलेंचि झालीं भ्रमर ।
तरुणीच झाली नर...

* * *

'मौज', दिवाळी अंक

# चंद्र सावली कोरतो

रेगे सदानंद

रोज नेमकं याच वेळीं ऊन त्या समोरच्या कठड्यावर येऊन बसतं. त्याच्या हातांत कधीं पिवळ्या रंगाचं आईसफ्रूट असतं, कधीं हिरव्या रंगाचं, कधीं तांबड्या रंगाचं. मी इथं स्टुलावर एकटाच बसलेला असतों अन् उन्हाची गंमत पाहत राहतों. आईसफ्रूट संपलं कीं तें आईसफ्रूटची काडीच चोखीत बसतं. भर दुपारच्या या उन्हांत तासन्-तास बसूनहि त्याला कांहींच कसं होत नाहीं कोण जाणे. मग त्याचं माझ्याकडे लक्ष जातं. उजव्या डोळ्याची भुंवई वर उडवीत तें मला विचारतं, ' काय दामूअण्णा ? काय वेड काय म्हणतं आहे तुमचं ? ' हा प्रश्न त्यानं मला विचारला कीं माझ्या तळपायाची आग मस्तकाला जाते. घरांतलीं माणसं एक म्हणतात, तीं म्हणतात म्हणून या रस्त्यावरच्या उन्हानंहि मला वेड लागलं आहे असं म्हणावं कीं काय ? मी जवळच्याच कोळशाच्या पिपांतला एक मोठासा कोळसा काढतों नि त्याच्या अंगावर मारतों. तेवढ्यांत आई बाहेर येते नि विचारते, " काय रे चाललं आहे दामू ? " मी म्हणतों, " कोळसा मारतों आहें मी त्या उन्हाला ! " आई ' बरं–बरं ' म्हणते नि मुकाट्यानं आंत जाते. मी एक कोळसा मारतों. दोन मारतों. तीन मारतों. तें ऊन मात्र खदखदां हंसत असतं नि आपल्या चड्डीच्या खिशांतून लिमलेटच्या गोळीसारखा पिवळा धम्मक सरडा काढून त्याचे मुके घेत घेत तें म्हणतं, " वेडा रे वेडा ! मला कोळसे मारून ते लागणार आहेत थोडेच !

मला का शरीर आहे, का हाडं आहेत, का चामडं आहे!" म्हणजे या उन्हाचंच डोकं फिरलेलं दिसतं आहे! चक्क चड्डी घालून या कठड्यावर येऊन बसलं आहे, माझ्याशीं बोलतं आहे, त्या सरड्याचे मुके घेतं आहे, (तो सरडा त्याची बायको आहे कीं काय?) आईसफ्रूट खातं आहे, नि म्हणे मला का शरीर आहे? हँ...शरीराशिवाय का चड्डी नेसतां येते? शरीराशिवाय का आपल्या बायकोचे मुके घेतां येतात? आईला सांगायला गेलं कीं ती मलाच टांगायला येते. मी तिला विचारतों, "आई, तूं गेली होतीस का ग उन्हाच्या लग्नाला?" ती ऐकल्या न ऐकल्यासारखं करते नि म्हणते, "बाहेर त्या स्टुलावर जाऊन बस पाहूं मुकाट्यानं. असं एकसारखं बडबडत राहूं नये माणसानं." मला माहीत आहे ती असं कां म्हणते तें! तिची अशी समजूत झाली आहे कीं, मला वेड लागत चाललं आहे. त्या उन्हानंच तिचे कान भरवून दिले असले पाहिजेत. नाहीं तर आमची आई असं वेड्यासारखं बोलायची नाहीं. तेवढ्यांत एक झुरळ निघून जात असतं. त्या उन्हाच्या हातांतला सरडा उन्हाच्या मुक्यांनीं ओले झालेले आपले ओंठ पुशीत त्याला विचारतो, "काड्याची पेटी आहे का?" झुरळ क्षणभर थांबतं नि खिशांतून काड्याची पेटी काढून त्या सरड्याला देतं. सरडा आपल्या मनीबॅगेंतून एक पनामा सिगारेट काढतो (म्हणजे उन्हाची ही बायको सिगारेटहि ओढते तर! आहे बुवा...आपणसुद्धां सिगारेट ओढणारीण बायको करणार. जरा मजा असते.) नि झुरळानं दिलेल्या काड्याच्या पेटींतली एक काडी काढून ऐटींत सिगारेट पेटवतो.

अन् मग येतात तिसऱ्या मजल्यावर नळाजवळच्या खोलींत राहणारे वायंगणकर मास्तर. ते येतात तेव्हां मी नेहमींसारखा आपला स्टुलावरच बसलेला असतों. जिना चढतां चढतां ते मला विचारतात, "काय दामोदरपंत? काय चाललं आहे?" वायंगणकर मास्तर मला फार आवडतात. ते कधींहि दामोदरपंत या नांवाखेरीज दुसऱ्या नांवानं मला हांक मारीत नाहींत. मी त्यांना जवळ बोलावतों अन् म्हणतों, "कान इकडे करा." ते खालीं वांकतात अन् एक कान माझ्या अगदीं तोंडाजवळ आणून हळूच विचारतात, "काय?" मी म्हणतों, "तें पहा." ते पुन्हां विचारतात,

"कुठं काय ?" मी म्हणतों, "तें ऊन पाहा." ते म्हणतात, "वा, फार छान आहे. फारच छान. असं ऊन पाहिलं नव्हतं आपण आजपर्यंत !"

"तें कीं नाहीं मधांशीं आईसफ्रूट खात होतं." "

"असं का ? अरे वा...ऊन आईसफ्रूट खात होतं म्हणतां ?"

"हो...हो...ऊन आईसफ्रूट खात होतं. कां ? त्यानं आईसफ्रूट खाऊं नये म्हणतां ?"

"तसं नव्हे हो, दामोदरपंत. उन्हानं आईसफ्रूट जरूर खावं. अहो, उन्हानं खाऊं नये तर काय बर्फानं खावं ?"

"मग ?"

"आपलं सहज विचारलं झालं. आम्ही कधीं उन्हानं आईसफ्रूट खातांना पाहिलं नव्हतं आजवर. म्हणून आपलं..."

"अन् तो त्याच्या हातांतला सरडा पाहिलात का ?"

"कुणाच्या ? त्या उन्हाच्या हातांतला होय ? वा...वा...फारच सुंदर...असा सरडा कुठंकुठंसुद्धां पाह्यला मिळायचा नाहीं."

"तो सिगारेट ओढतो आहे..."

"हं...छान. पण त्याला म्हणावं, फार ओढूं नकोस नाहीं तर बसशील खोकत."

"अन् बरं का..." बोलतां बोलतां मी त्यांना आणखी खालीं वांकायला सांगतों.

"काय ?"

"तो सरड्या त्या उन्हाशीं लग्न करणार आहे."

"अरे, काय, म्हणतां काय दामोदरपंत ? सरडा त्या उन्हाशीं लग्न करणार आहे ?"

"हो...कुणाजवळ बोलूं नका ! अगदीं गुप्त ठेवा."

"छॅ...छॅ...असं कसं मी भलत्याजवळ बोलेन. पण काय हो, दामोदरपंत ? तुम्हांला कशी कळली ही बातमी ?"

"तें तुम्हांला काय करायचं आहे ? वाटेल तशी कळली..."

"तसं नव्हे हो...असे रागावतां काय एकदम !"

" तुमचा विश्वास बसत नाहीं या बातमीवर ? मी खोटं बोलतों असं वाटतं तुम्हांला ? मला वेड लागलं आहे असं तुम्हांलाहि वाटतं ना ! "

" खुळा रे खुळा... "

वायंगणकर मास्तर मला खुळा म्हणतात, पण वेडा म्हणत नाहींत. मी उन्हाशीं बोलत बसतों हें त्यांना आवडतं. एकदां मीं त्यांना म्हटलं होतं, " मास्तर, तुमची शेंडी कशी खारीच्या शेपटीसारखी आहे नाहीं ? " तेव्हां ते स्वतःवरच खूष होऊन इतक्या मोठ्यानं हंसले होते ! माझ्या पाठीवर थाप मारीत ते म्हणाले होते, " दामोदरपंत, हें विपरीत असं मध्येंच घडलं नसतं तर तुम्ही खात्रीनं एक चांगल्यापैकीं कवि झालां असतां. " हें विपरीत...हें विपरीत...म्हणजे काय ?—

मग मास्तर जायला निघतात. निघतांना प्रेमभरानं ते माझ्या पाठीवरून हात फिरवितात. त्यांच्या डोळ्यांतून ओला मासा माझ्याकडे पाहात असतो. मी त्याला म्हणतों, " हॅलो ! " पण मास्तरांच्या डोळ्यांतला तो ओला मासा कांहींच बोलत नाहीं. मी पुन्हां त्याला ' हॅलो ' करतों तेव्हां माझ्याकडे वळून तो म्हणतो, " मला बोलतां येत नाहीं रे. माझे सगळे शब्द त्या समुद्राच्या राजानं काढून घेतले आहेत. माझी वाचा गेली आहे, अन् म्हणून तर मी इथं हा असा एका माणसाच्या डोळ्यांतून तुझ्याकडे हताशपणें पाहतों आहें... "

मी त्याला विचारतों, " तुला बोलतां येत नाहीं, मग हें कसं तूं बोललास ? " ( कसा अचूक प्रश्न केला होता ! )

अन् मग तो कांहीं केल्या बोलतच नाहीं. मला वाटतं, माझ्याशीं तो बोलला तेवढंच बोलण्यापुरते शब्द त्याच्यापाशीं शिल्लक होते.

मास्तर म्हणतात, " दामोदरपंत, बसा. मी जातों. अजून जेवण व्हायचं आहे माझं. अन् तुमच्या त्या उन्हाला आम्हांला लग्नाचं आमंत्रण द्यायला विसरूं नको म्हणून सांगा बरं का ! "

ते जिन्याच्या एक-दोन पायऱ्या चढतात अन् माझ्या डोक्यांत एक कबुतरांचा कळपच्या कळप येऊन दाणे टिपूं लागतो. तो नाक्यावरचा वाणी माझ्याच डोक्यांत या कबुतरांना दाणे कशाला घालतो कुणास ठाऊक !

एक कबुतर दुसऱ्या कबुतराला विचारतं, " उन्हाचं नि सरड्याचं लग्न आहे म्हणे लौकर. "

" अय्या ! पण भाद्रपदांत कुठलीं आलीं आहेत लग्नं ? "

" अग, रजिस्टर असेल. आजकाल कशाला कांहीं मेळ उरला आहे का ? वाटलं कीं उठला नि रजिस्टराच्या हपिसांत जाऊन लग्न करून आला. "

पहिल्या कबुतराचं पिल्लूं हें सगळं ऐकत असतं. आज त्याच्या शाळेला सुटी आहे म्हणून तें घरींच आहे. तें आपल्या आईला विचारतं, " पण काय ग आई ? ऊन नपुंसकलिंगी अन् सरडा पुल्लिंगी ना...? मग त्याचं लग्न कसं होईल ? "

त्याचा तो प्रश्न ऐकून पहिलं कबुतर बावरून जातं अन् दुसरं ' अय्या ऽऽऽ ' म्हणून वळचणींत पिसं फुलारून घुमणाऱ्या एका गलोल कबुतराच्या पुढ्यांत जाऊन बसतं.

कुणीच...कुणीच त्या पिलाला त्याच्या प्रश्नाचं उत्तर देत नाहीं.

मास्तर नुकतेंच जिना चढूं लागलेले असतात, त्यांना मी तो कबुतराच्या पिल्लाचा प्रश्न टाकतों.

मास्तर थोडा वेळ विचार करीत उभे राहतात नि म्हणतात, " त्याचं असं आहे, दामोदरपंत...ऊन हें नपुंसकलिंगी आहे अन् सरडा हा पुल्लिंगी आहे हें खरं. पण तें व्याकरणांत. प्रत्यक्षांत तसं अर्थातच नसावं... "

मला मास्तरांचं म्हणणं अर्थातच पटतं. त्या दिवसापास्नं मी उन्हाला तो ऊन म्हणतों नि सरड्याला ती सरडा. मीं असं म्हटलं कीं, आई तोंडाला पदर लावून हसूं लागते. मला तिचा फार राग येतो. तिचाच काय, घरांतल्या सगळ्या लोकांचा येतो. अगदीं भांड्यांचासुद्धां. तीं फळीवरचीं दादाचीं पुस्तकं मला जाळून टाकावींशीं वाटतात.

मग थोड्या वेळानं दूधवाला दूध घेऊन येतो. मी अजून तसाच स्टुलावर बसलेला असतों. हें स्टूल म्हणजे माझा घोडा आहे. जागेवरून न हालतांच तो नेहमीं चालत असतो. टप्...टप्...टप्...

दुधाचं भांडं वाजतांच माझ्या सदऱ्याच्या खिशांतून नऊ मांजरं बाहेर पडतात. नि त्या दूधवाल्याचं सगळं दूध संपवून टाकतात. दूधवाला तसाच नळावर पळतो नि पाण्यानं भांडं भरून आणतो.

" कितना ? "

" अर्धा शेर. "

मग तो अर्धा शेर पाणी आईनं आणलेल्या भांड्यांत टाकतो. मला हें सगळं माहीत असतं. पण मीच कांहीं बोलत नाहीं. मी आईला कांहीं सांगणार नाहीं. घेऊं दे तिला पाणी. कशी फजिती झाली एका माणसाची... हँ...आतां कुणाला वेड लागलं आहे ? तुला कीं मला ?

तेवढ्यांत सामंतांची सुषमा गॅलरींत येते नि तिथंच फतकल घालून बसते. तिच्या हातांत बांगड्यांच्या रंगीत कांचा असतात. बांगड्यांच्या कांचा मला फार आवडतात. मी आईला नेहमीं म्हणत असतों, बांगड्यांच्या कांचांची भाजी कर म्हणून. पण ती माझं कांहीं ऐकतच नाहीं. मॅडकॅपच आहे ती.

सुषमेच्या तोंडांत आंवळा असतो अन् माझी खात्री आहे, आणखीहि एक-दोन आंवळे तिनं आपल्या पोलक्यांत लपवून ठेवले असावेत. पांच वर्षांची चिमुरडी पोर आहे, पण भारी वात्रट आहे.

सदान्कदा पाहावं तेव्हां ती आंवळे नि चिंचा खात असते. मी तिला कितीदां जवळ बोलावतों. पण ती कांहीं येत नाहीं. मला तिचे केस फार आवडतात. मागें जिन्याखालीं एक परी मला भेटली होती तिच्या केंसांसारखे तिचे केस आहेत. सुषमेला एकदां मी फसवून पकडणार आहें अन् तिच्या केसांत तोंड लपवून दोन वर्षं रडत राहणार आहें. असा मी रडत राहिलों म्हणजे तो समुद्राचा राजा बुडून जाईल नि मास्तरांच्या डोळ्यांतील तो ओला मासा बोलूं लागेल. समुद्राच्या राजानं गिळलेले त्याचे शब्द त्याला परत मिळतील.

सुषमा ज्या अर्थी नेहमीं चिंचा-आंवळे खाते त्या अर्थीं ती गरोदर असावी. मला एकदां तिच्या पोटाला हात लावून पहायचा आहे. एक छान छान, भुऱ्या केसांचं बाळ तिच्या पोटांत बसलेलं असणार नि मला बघतांच

तें म्हणेल, " मा...मा...मा...मा..." मी त्या बाळाला घेऊन उन्हाच्या लग्नाला जाईन. तिथं खूप आईस्क्रीम खायला मिळेल त्याला. सुषमेच्या मुलाचं नांव मीं ठेवलं आहे दामू. दाम्या. दामोदरपंत. वेडा, खुळा. मॅडकॅप...

आज अण्णा घरीं आले म्हणजे मी त्यांना विचारणार आहें. चक्क विचारणार आहें. उन्हाचं लग्न झालं. सुषमेला मुलगा झाला. आतां माझं लग्न केव्हां करणार ? कांहीं अक्कल आहे कीं नाहीं तुम्हांला ? का मी आपला जन्मभर बाहेरच्या स्टुलावरच बसून राहूं ? त्यांनीं ऐकलं नाहींच तर मी एक दिवस घरांतून पळून जाईन नि त्या समोरच्या झाडावर जाऊन बसेन. कांहीं केल्या खालींच येणार नाहीं.

एव्हांना ऊन सरड्याला घेऊन कठड्यावरून खालीं उतरलेलं असतं. मला माहीत आहे, आतां तीं दोघं हातांत हात घालून समुद्रावर जातील. एकमेकांची उष्टी भेळ खातील अन् अंधार झाला कीं स्मशानाच्या भींतीला टेकून बसून शृंगार करतील. उन्हाचं लग्न होईल त्या दिवशीं सरडा गरोदर असेल नि त्यांचा मधुचंद्र स्मशानांतील पिंपळावर बसून घुबडासारखा ओरडत असेल. मला आईस्क्रीम नाहीं मिळालं...मला आईस्क्रीम नाहीं मिळालं...

पण मी त्याला कांहींच देणार नाहीं. लग्नांतलं सगळं आईस्क्रीम मी सुलभेच्या मुलासाठीं राखून ठेवणार आहे. त्या शेगटाच्या झाडावर सगळं आईस्क्रीम राहील.

मी स्टुलावर निवांतपणें बसलों असलों म्हणजे माझ्या दुष्ट आईला तें पाहवत नाहीं. ती आंतूनच ओरडते, ' दामू, चहा नाहीं का घ्यायचा ? "

यांचा आपला सदान् कदा चहा. कधीं अक्षतांच्या वड्या करतील किंवा लग्नांतील नारळाचा पाक करतील तर शपथ. यांचीं लग्नं व्हायचीं चहाच्या मळ्यांत. यांच्या लग्नाला भटजी असायचा चहा पिऊन पिऊन धुंद झालेला. यांच्या लग्नांत अक्षता पडायच्या चहाच्या पावडरीच्या !

पण करतां काय ? दामू वेडा पडला ना ? कांहीं बोलायला गेला तर त्यालाच टांगायला उठतात !

मी आपला मुकाट्यानं उठतों नि आंत चहा प्यायला निघून जातों.

कमळीनं आणलेलं एक गोष्टीचं पुस्तक खाटेवर पडलेलं असतं. तें मी उचलतों नि चहा पितां पितां वाचूं लागतों. तेवढ्यांत आंतून एक बाई बाहेर पडते नि मुसुमुसु रडत माझ्या मांडीवर येऊन बसते. मी तिला विचारतों, " कोण ग तूं ? "

ती म्हणते, " मी राजाची राणी. "

" असं का ? "

" हो. हा पाहा माझा मुकुट."

" आवडती कीं नावडती. "

" आवडती. "

" मग माझ्या मांडीवर येऊन रडत कशाला बसलीस ? "

" रडूं नको तर करूं काय ? "

" हंस. नाहीं तर चूप बैस. रडतेस कशाला ? "

" दामू, तूं अगदींच कसा रे हा ? "

" हा म्हणजे कसा ? "

" वेडा..."

" मी वेडा नाहीं. "

" वेडा नाहींस तर खुळा आहेस. "

" खुळाहि नाहीं. "

" मग मॅडकॅप आहेस. "

" पण तूं रडतेस कशाला तें तर सांगशील ? "

" राजा मला मूल होऊं देत नाहीं. "

" कां ? "

" तो म्हणतो, आपण प्लॅनिंग करायला हवं. आपण एका लोकसत्ताधिष्ठित राज्याचे प्रतिनिधि आहोंत. आपणांस मुलं होतां नयेत. "

" तुझ्या राजाचं डोचकंच फिरलेलं दिसतंय्. मुलं होतां नयेत हें ठीक आहे. पण एखादं मूल व्हायला काय हरकत आहे ? "

" तो म्हणतो, नावडत्या राणीला माझ्यापासून अकरा मुलं झालीं आहेत. आतां अधिक नको. "

" मला तर दुसराच संशय येतो..."

" काय ? "

" नावडतीचीं तीं मुलं दुसऱ्या कुणाचीं तरी असलीं पाहिजेत."

" मग तूंहि कां करीत नाहींस तसं ? "

" तूं आहेस तयार ? "

" नाहीं रे बुवा. या भलत्या भानगडींत आपण पडणार नाहीं. माझ्यापासनं तुला मुलं झालीं कीं तूं मला बेधडक कैदेंत टाकशील. नाहीं तर माझा शिरच्छेद तरी करून टाकशील. "

अन् मग ती राणी मोठमोठ्यानं गळा काढून रडूं लागते. ती मला फसवायला आलेली असते. माझ्यापासून म्हणे तिला मूल हवं आहे ! हं...

ती रडते रडते नि मुकाट्यानं पुस्तकांत जाऊन बसते. सुषमेला मुलगा झाला म्हणजे मात्र मी एकदां त्याला घेऊन राणीकडे जाणार आहें. तिला सांगणार आहे, माझ्यापासून तुला मूल व्हायला हवं आहे न्, मग याला खूप खूप खूप खूप खेळणीं घेऊन दे पाहूं. खेळणीं हातांत पडलीं कीं तिथून छूः व्हायचं. पुस्तकांतली राणी ती. करून करून ती काय करणार आहे ? फार तर एक दिवस येऊन रडत बसेल माझ्या मांडीवर. बसूं दे.

मग ती पुस्तकांत जाऊन बसते. तिच्या रडण्यानं पुस्तक ओलं होऊन जातं. आमची वेडपट आई माझ्यावर उगीचच खेंकसते, " दाम्या लेका, त्या कमळीचं पुस्तक खराब केलंस ना चहा सांडून ? नीट नाहीं का पितां येत ? "

मी पुन्हां गॅलरींत येतों नि स्टुलावर बसतों. या जगांत माझं असं हें स्टूलच काय तें उरलं आहे.

थोड्या वेळानं जिन्यावरच्या अंधारांतून एक बाई येते नि मला खूण करून आपल्याजवळ बोलावते. मी जवळ जाऊन पाहातों तों क्षीरसागरांची नीराका. लग्न झालं नि वर्षा सहा महिन्यांतच ती विधवा होऊन परत आली.

मी तिच्याजवळ जातों न जातों तोंच ती माझ्या गळ्याभोंवतीं हात टाकून लाडेंलाडें बोलूं लागते.

" दामू...माय डार्लिंग... " इंग्रजी पहिलींत असल्यापासूनच ती फाडफाड इंग्रजी बोलत असे.

बोलतां बोलतां ती माझे मुके घेत होती. मला ते हवे होते. नकोहि होते. हवे होते. नकोहि होते. हवे होते.

नीराक्काच्या स्पर्शानं...नुसत्या स्पर्शानं माझ्या अंगाला आग लागते. जिन्यावरच मी तिची चोळी सोडतों नि तिच्या आंत दडून बसलेले दोन थंडगार चंद्र माझ्या देहावर दुधाच्या साईचं पांघरूण टाकतात.

नीराक्का हळूच माझ्या कानाला लागून म्हणते, " माझ्या पोटाला हात लावून पाहा. "

आतां आम्ही दोघं त्या पांघरुणाखालीं असतों. नीराक्काचं पोट पिकत आलेल्या पपनसासारखं टचटचीत लागतं.

" कान लावून पहा. "

मी तिच्या पोटाला कान लावतों. सुषमेच्या पोटांतलं मूल नीराक्काच्या पोटांत आलेलं असतं. अन् राजाची आवडती राणी तें घेऊन पळूं लागलेली असते. मी तसाच त्या राणीचा पाठलाग करतों नि ती राजवाड्यांत शिरत असतांनाच तिच्या हातांतलं तें गोजिरवाणं मूल घेऊन उन्हाच्या लग्नाला जातों. तिथं आम्हांला गोल्डस्पॉट मिळतो. कोकाकोला मिळतो. आईस्क्रीम मिळतं. पानसुपारी मिळते. नारळ मिळतो. अत्तरगुलाब मिळतो.

नीराक्का मला विचारीत असते, " दामू, तूं माझ्याशीं लग्न करशील ? या मुलाला आपलं मानशील ? "

मी म्हणतों, " अवश्य... "

नीराक्का पुन्हां मला आलिंगन देते नि मी त्या दुधाच्या साईच्या पांघरुणांत वितळून जातों.

...मी पुन्हां स्टुलावर येऊन बसतों तेव्हां ऊन सरड्याला घेऊन समुद्रावर गेलेलं असतं, अन् स्मशानांतल्या पिंपळावर घुबडासारखा ओरडणारा तो चंद्र नीराक्काच्या पोटांतील गर्भावर एक अक्राळविक्राळ सावली कोरीत असतो...

* * *

'दीपावली', दिवाळी अंक

# आटापिटा

शेळके उद्धव ज.

पक्क्या सडकेपासून तब्बल पांच मैल आंत असलेल्या आपल्या गांवांत शिवराम शिरला त्या वेळीं गांवांतलीं झाडून सारीं बुबुळं झोपेच्या दाट थराआड नाहींशीं झालीं होतीं. विंचवाकांड्यांच्या भयालाहि भिववणारा शिवरामच्या 'तेल्हारा' जोड्यांचा कर्र्रकच् कर्र्रकच् आवाज एका ठेक्यावर वाजत होता. चालण्याच्या भरांत, भर थंडींतहि त्याच्या कुडत्याचा पिछा घामानं डबडबून शिवरामच्या काळ्याशार पाठींत-खोलगट दांड्यांत चिपकून बसला होता. ह्या भरधमकीच्या चालीनं चालणाऱ्या त्याच्या पायांतून अंधाराइतकं काळं असलेलं तें कुत्रं सावध होऊन शेपूट गुंडाळून पळालं नसतं तर त्याच्या बगरड्या-फासळ्या शिवरामनं अलग अलग करून टाकल्या असत्या, इतका तो आपल्या विचारांत चालत होता.

अर्धअधिक गांव तुडवून आपल्या घराकडे जाण्यासाठीं तो बरड चढला. त्याच्या ओळखीची चाहूल न ओळखून खाटेखालचं कुत्रं गुरगुरूं लागलं. नेहमींप्रमाणं कुत्र्याला शब्दानं चुचकारण्याच्या फंदांत न पडतां सायवानाशीं जातांजातांच शिवराम अधिरेपणानं बोलला,

"मा, नियली कायओ ?"

"कुत्चीरे बाप्पा !" आपल्या चेहऱ्यावरची काळजी झांकलोट करीत गीता म्हणाली, "समदं ध्यान तुह्या वाटीकडे लागलं होतं—येनं—"

"पाय धुवाले पानी नाई तपवलं काय ?"

" तपवलं नवतं त का—पन थे आतां थंडई होत आलं असन..."

असं पुटपुटतांना एकीकडे गीता शिवरामची मुद्रा न्याहाळीत होती. अपयशाचा निकाल एकदम शब्दांत ऐकण्याचं धाडस नसलेला मनुष्य प्रथमतः आजूबाजूचं वातावरण चांचपून पाहतो अन् मग हळूहळू त्याला नकळत तो परिणामाला तयार होतो. शिवरामची मुद्रा न्याहाळण्यांत गीताचा तिला नकळत हाच उद्देश होता. हें त्यालाहि कळू नये म्हणून ती बाजूच्या वाकळीकडे हांक पिटाळीत होती,

" पंचे, पाय बरं ओ बाई–निवलं काय त पानी–"

पंचीचं उत्तर आलं नाहीं. वाकळींतून येणाऱ्या घोरण्याच्या तीन-चार आवाजांत एक आवाज तिच्याहि उघडया तोंडांतून निघत होता. पंची घोरत होती. तिच्या डोक्यावरच्या वीत-वीत झिपऱ्यांनीं तिच्या तोंडावर विरळ बुरखा झांकला होता. कांहीं केस तर तिच्या नाकांतल्या पितळेच्या बाळींत गुंतले होते. चोळीची गांठ सुटून पाखे दोन्हींकडे लोंबकळत होते. यामुळें मुलासारखी दिसणारी तिची निराकार पोरकट छाती उघडी पडली होती. श्वासोच्छ्वास करणारा पोटाचा भाता घोरण्याच्या तालावर वर-खालीं होत होता. तिचा एक गुडघा उभा होता व त्यामुळं परकर खालीं जांघांपर्यंत पसरला होता. हें पाहून गीताचा हात पंचीचा परकर सावरूं लागला. तोंड पुटपुटूं लागलं,

" पोट्टीले त आतांपासून घेरलं वाट्टे सुस्तीनं—जसे का बारावर एक वाजून गेले, रात्रींचे!"

" आन् पसरली पाहा ना कसी—"

शिवराम म्हणाला, " उद्यां लगन झाल्यावरई नवऱ्याच्या इथं असीच पसरत जा जो मना–मंजे थे लोक दरोंज आमचाल्या मायबयनीचा उद्धार करतीना..."

शिवरामाच्या अशा अनाहूत बोलण्यानं–त्याच्या धडपडीला कांहीं तरी आशाजनक आकार आल्याचा समज करून गीता उत्सुकतेनं म्हणाली,

" कागा, काय मने रीतपूरवाले?"

" मनन काय–आशा रग्गड आहे."

" तरी?"

" त्याईले मी पसंत आये. "

" खरीच कायरे ? "

" त ? "

" देवा पांडुरंगा—" गीता मोठ्या भक्तिभावानं बाजूच्या कोनाड्याकडे दोन्ही हात जोडून भाविकपणें पुटपुटली, " कसंई करून इनलं तरी दे बाप्पा जमवून—माह्या रांडमुंडीचा लेकाले कोनाचा मून कसा अधार नाहीं. माहे डोये झांकाच्या आगूदर त्याचे दोनाचे चार हात कर मंजे झालं बाप्पा ! "

मग थांबून, चर्या वास्तवांत आणून ती शिवरामला विचारूं लागली,

" सांग काय मने त—"

" मनन काय ! " म्हणणाऱ्यांचे शब्द आपल्याच ताब्यांत होते, अशा आवेशांत शिवराम म्हणाला, " आटंसाटं कराले तैयार आये कानं ! "

" पैशामैशाची कांहीं गोठ काहाडली काय ? "

" मीं काहाडनार होतों, पन त्याच्या आगूदर त्याईनंच मनलं का आमाले कोनाची कौडी नाई लागत आन् आमी कोनाले नाई देत. "

" खरीच काय रे ? "

गीताच्या डोळ्यांत तृप्ति तरारली. ती पुन्हां भाविकपणें वाऱ्याशीं बोलली,

" देव पांडुरंग त्याईच्या तोंडांत साखर टाको बिचाऱ्याईच्या ! पोरगी पायली का तुनं त्याईची ? "

" हौ. "

" कशी आरे ? "

" आये आपली काईसावई. "

हें ऐकून गीताची आशा ठोकरावली. पडलेल्या चेहऱ्यानं ती विचारूं लागली, " काई ? "

" वज्जर काई नाईओ." शिवराम आपल्या मायला सावरूं लागला, " आन् असलीई त रंगाचं काय करा लागते. कायाच्या आन् गोऱ्याच्या खदानी थोड्याच आये..."

" खदानीचं नाई मी मनत–निदान नाकाडोयानं तरी बरी पायजे का नाई— "

" बरी मंजे ? " शिवरामचा सूर ताडकन उसळला, " काई डोयाईच्या जागीं कान आन् कानाच्या जागीं डोये नाई तिचे. आन् तसं पायल्याले आपली पंचीच असी कोन्ती हिरा लागून गेली आहे—धड लह्यंगा त नाई नेसतां येत अजून तिले... "

यावर गीतानं त्याला शब्दानं कुरवाळीत—त्याची व पंचीची बाजू सावरली, " अरे पन थे लान आये. सुदरतां सुदरतां सुदरनच. आतांच काय थे थ्या पोरीएवढी झाली ?—मून मनत होती बाप्पा का तुहा आन् तिचा जोड्याले जोडा जमन्याजोग्ता आये का नाई !... "

" राऊं देओ मां—" आतां तो सरळ सरळ मायवर उखडला, " जोड्याले जोडा लागन्या सांगड्या आतांवरी पन्नास पोरी पायल्या असतीना, पन देल्ली का एकानंई ? आये त्याईच्या बापाईले पांचपांचशें रुपये द्यासाठीं तुह्यापाशीं ? नाई ना ? मंग कसी मंतं त ? "

" बरं, थे जाऊं दे. तुह्यंवालं अवजार तुले पसंत असल्यावर मी कायले त्याच्यांत बोलूं ! "

गीतानं जुळवून घेतलं. नवेपणानं विचारलं, " कारे तिचा भौ कसा आये ? "

" थोई आये कायासावयाच. "

यावर गीता पुन्हां अंतर्मुख होणार होती—पण शिवरामचा चेहरा पाहून ती बोलली,

" असेना बिचारा. मान्साच्या जातीले रूपाचे काय करा लागते. मी मनत होती का त्याची उंबर कितीक आये ? "

" दिसांले त माह्यापरस डगय असन मना—पन मले वाटे उंबर काई जास्त नसन. "

" तरी ? "

" असन तीसक वर्सांचा. "

" तीस ऽ वर्सांचारे ऽऽ ? " गीतानं खूप सूर ताणला व तिचं तिच्या लक्षांत येतांच सावरून म्हणाली, " नाई नाई. मी मनत होती का अजून त्याचं लगन कसं नाई झालं... "

" दुसरपन्या आये. "

" दुसरपन्या ? "

गीताला नकळत तिची नजर बाजूच्या वाकळीवर गेली. ती पंचीकडे, तिच्या विस्कळित परकराकडे, नाकांतल्या पितळेच्या बाळीकडे, उघड्या, स्त्रीत्वाचा आकार न घेतलेल्या पोरकट छातीकडे पाहत शिवरामला म्हणालीच,

" शिवा, दुसरपन्यात पोट्टीच्या मानानं जरड होईन रे ! "

तिचं वाक्य पूर्ण व्हायच्या आंतच शिवराम त्राग्यानें पुटपुटूं लागला, " जरड होईन त राऊं दे. मले काय, मी राऊं रायलो त आक्यावानी ? ना होय्ना का माह्यावालं लगन–त्याची कोनाले फिकर आये... "

" हें पाय शिवा. " शिवरामचा त्रागा पाहून गीतांतली पंचीची माय लुप्त झाली. ती त्याची माय होऊन त्याला समजावूं लागली. " शब्दानं कुरवाळूं लागली,

" मी आतां राऊं दे मनत असन काय लेक् ? का मले असं वाटत असन का तुह्यावालं लग्न होऊं नोय ? तसं असतं त आडाचं देड करून याचे पाय धर–त्याच्या दाढीले हात लाव, याचे हात भर, त्याच्या खाईवर धा रुपये घाल. त्याच्या मढ्यावर पन्नास रुपये घाल असं कायले केलं अस्तं मनाव् लेक् ! "

यावर शिवराम कांहींच बोलत नव्हता. गीतानं खरोखर त्याच्यासाठीं केलेली, अन् वाया गेलेली धडपड त्याला आठवत असावी. त्या कृतज्ञतेनं त्याची मान खालीं झाली असावी. तो नुसता उभा होता. आतां गीताच नव्या उमेदीनं त्याला विचारीत होती,

" त मंग आखीर काय ठयरवलं ? "

" थे येनार आये पंचीले पाहासाठीं. "

" कवारे ? "

" उद्या — सकाई. "

" आतां माय ! " एवढ्या जवळ येऊन ठेपलं असेल याची कल्पना नसलेली गीता आश्चर्यानं म्हणाली, " एवढ्या लवकर रे ? "

पण शिवराम पराक्रमानं म्हणाला,

" हौ. थे त मनत होते का पुडच्या इतवारीं यीन मून. पन म्यां मनलं का उद्यांच या. तुले त माईतच आये, इतल्यांतच त्याईचे कोनं कानगीन भरले, संजे ? "

" बेस झालं..." गीता काय म्हणणार ? ती म्हणाली, " उद्यां कईसा ? "

" सकायच्या पायरीं. "

" आतां माय ! " गीता पुन्हां आश्चर्यानं म्हणाली, " पोट्टीले तैयार ठिवा लागन—"

" त ? "

तो पुन्हां पराक्रमी सुरांत सांगू लागला,

" तितल्यासाठींच त मी इतल्या रातीं तीन कोस जागा तुडवत आलों अंधारांत—थे त मले मनत होते का उद्यां सकायच्या पायरीं माह्यासंगंच छकड्यांत बसून चाल जा. पन म्यां इचार केला का त्या पावन्याईले एकदम घरीं आन्लंगिन्लं त पोट्टी कोन्त्या अवतारांत राईन आन् कोन्त्या नाई. "

" बरं झालं, आतां तूं येथून गेला त, आंधीं-"

एवढ्यावर, मोठ्या मुश्किलीनं त्यांचं तात्पुरतं बोलणं आटोपलं. मग पुन्हां जेवतां जेवतां अन् वाढतां वाढतां सुरू झालं. मायलेक दुसऱ्या दिवसाचा कार्यक्रम आंखीत होतीं. ठरवीत होतीं.

शिवराम वारंवार सूचना करीत होता. समजावून सांगत होता. जेवणं झाल्यावर वाकळांवर पडल्यापडल्याहि त्यांचं तेंच सुरू होतं. दुसऱ्या दिवसापासून तो लग्न करून बायको घरांत आणीपर्यंतचे, रस्त्यानं चालतां चालतां मनाशीं रेखाटून ठेवलेले सर्व बेत तो मायला सांगत होता. उतावळेपणास न भितां सांगत होता. गीताला झोप लागली तरी तो सांगत होता. ती झोपल्याचं जाणवल्यावर स्वतःला सांगत घोकत होता.

दुसऱ्या दिवशीं, संवयीप्रमाणं गीतानं शिवरामच्या वाकळीस मोठ्यानं हांक मारली, तेव्हां तो जागाच होता. माय झोपेंतून उठल्याचं जाणवतांच त्यानं पहिल्यांदा विचारलं.

" काव्ओ मा, खासर कोनाले मांगा ओ ? "

" तूं रातभर याचाच इचार करत होता काय गा ? "

" तसं नाई ओ—" उठून बसतांना कांहीं तरी बोलून तो म्हणाला, " पंचीले उठवनं ओ. कितीक वाजेठावरक पसरन थे, पोट्टी ? "

" निजूं दे रे बाप्पा ! " गीता अभावितपणें म्हणाली, " लेकाची जात आये. "

" अस्सं ? " मायनं पंचीची कड घेणं—निदान तिला लेकराची जात ठरवणं कांहीं शिवरामाला आवडलं नसावं. तो एकदम दमानं म्हणाला, " आन् दोदिसा सासी गेली मंजेओ ? सासू करत जाईन्ना जवातवा तिच्या मायबापाचा उद्धार ! आंधींपासूनच वयन असलेलं बरं नाई काय लेक पोरीसोरीच्या जातीले ? "

गीता कांहीं उत्तरली नाहीं. ती हांकांचा वर्षाव करून पंचीला जागवीत होती. पांच-सात हांका मारून झाल्यावरसुद्धां पंची जेव्हां हलली नाहीं तेव्हां मायची जागा घेऊन शिवराम तिच्यावर उसळला,

" उठे का नाईओ ! का देऊं एक होत्काडींत ठेवून, ऑ ? "

तशी पंची उठून बसली. तोंडावरचा बुरखा सावरूं लागली. शिवरामाचा आवेश घेऊन गीता तिच्यावर गरजूं लागली, " त वस्न्यावानाचे, लटाबटा होतं राईन संग. आंधीं थो लह्यंगा कर चांगला ! "

आळीपाळीनं शिवराम अन् त्याची माय पंचीला ज्ञान ढोसूं लागली. तिला झोपण्यापूर्वीं परकर खोचून झोपण्यास सांगूं लागलीं. तिला चोळी परकरांत न खोचतां तिची नीट गांठ बांधायला शिकवूं लागलीं. परकराची गांठ बेंबीवर न ठेवतां कुशीवर ठेवण्यास सांगूं लागली. तिच्या कुरतडलेल्या परकराला उद्देशून, पुन्हां परकर तोंडांत दिसल्यास घराबाहेर हाकलण्याची धमकी देऊं लागली. बराच वेळ ओरडून, वसकावून, शब्दानं कुरवाळून-दरडावून पंचीच्या मनाच्या कोवळ्या चित्रावर त्यांनीं संस्काराचे घाव घालण्यास, ज्ञानाचे बोळे फिरवण्यास सुरुवात केली. तरी शिवरामचं समाधान होत नव्हतं.

बाहेर पडतांना तो मायला म्हणाला,

" पन तूं तिले चांगलं समजावजो बरं, मा—नाई त ऐन वक्तावर कांई तरी गोटा टाकून देईन थे पोट्टी ! "

" नाई रे बाप्पा !—"

पंचीच्या जबाबदारींतून त्याला सोडवीत व स्वतः तींत गुंतत—पण पंचीविषयींच्या मायेनं ती म्हणाली, " मी सांगीन तिले समजावून— अजून थे झोपींत आये... "

यानंतर तो कांहींशा असमाधानानंच घराबाहेर पडला.

गीता पान्तावण्याशीं आली तेव्हां तिच्या सोबत पंचीहि होती. पाण्याखालच्या जाळाशीं बसतांना तिनं परकराचा घेर आपल्या हातांच्या तळव्याभोंवतीं लपेटला अन् तिथं ती ठाण मांडणार, इतक्यांत गीता म्हणाली,

" हं, बसूं नोको इथिसा—जाय तोंडमोंड धूय ! "

" मी नाईओ !–"

" ऑ ! तोंड फोडीन कदीका—नाई मन्लं त... "

गाल फुगवून पाय आदळीत आदळीत पंची तिथून उठली. नांदींतल्या पाण्यानं चार दोन गुरळे केल्यावर पुन्हा पान्तावण्यापाशीं येऊन बसली. तेव्हां गीतानं तिच्याकडे निरखून पाहिलं. तिच्या डोळ्यांच्या खांचांत चिपडाचे पेंड होते. नुसत्याच चाव्चाव् करून थुंकलेल्या कोळशाचे, रव्याइतके ठोकळ कण हिरड्यांना लडबडले होते. गुलाबी रंगाच्या जिभेवर काळा थर होता हें पाहून गीता म्हणाली,

" काओ बोहारे, असंच तोंड धूत असते ? "

आणि तिचं बखोट धरून गीता तिला नांदीकडे फरकाटत घेऊन गेली. स्वतांच्या देखरेखीखालीं पंचीचं तोंड धुववून घेऊं लागली. कोळसा चाववून घेऊं लागली. गुरळ्या पिचकारवून घेऊं लागली. अर्धी नांद रिकामी होईस्तोंवर पाणी सांडवून घेऊं लागली. जिथं जिथं व जें जें करवून घेणं जमेना तें तें स्वतः करून देऊं लागली.

पंचीचं तोंड धुणं आणि सर्वांचा चहा आटोपल्यानंतर गीताच्या सांगण्याप्रमाणं पंची न्हाण्यासाठीं आंघोळीच्या दगडावर गेली. तिच्यासोबतच सिकेकाईचं पातेलं घेऊन गीताहि गेली. कधीं नव्हे ती गीता पंचीला न्हाऊं

घालूं लागली. तिच्या रडण्याला फुसफुसण्याला न जुमानतां तिचे ओले केस फणीनं ओरबाडूं लागली. थंडीनं कुडकुडणाऱ्या अंगाला खराऱ्यासारख्या खरपूस वज्रीनं, रक्ताळेपर्यंत ओरबाडूं लागली. पंची सतत ओरडत होती, " अओ माओ ! ", " अरे देवारे ! " करीत होती. उंच सुरांतल्या खमंग शिव्यांचा शिडकावा देत देत स्वतांचं समाधान होईपर्यंत गीतानं आपल्या लेकीचं न्हाणं आटोपलं. स्वतः उभी होतांना तिला म्हणाली,

" थांब इथिसा. मी घरांतून लुगडं आन्तो... "

आणि ती घरांत गेली. लुगडं पाहूं लागली. नंतर त्याच्या निऱ्या घालूं लागली. या कामांत तिला अपेक्षेपेक्षां अधिक वेळ लागल्यानं म्हणा वा वातावरणांतली झोंबरी थंडी असह्य होऊन म्हणा, पंचीनं मायची वाट पाहिली तोंवर पाहिली अन् एकदम परकराच्या नाडीचा सरकफांस ओढून कमरेचा ओला परकर दगडावर सरकवला. दगडावरून उडी मारली. हातांची घडी छातीशीं गुंडाळली. मग पळत पळत व दांतकड्या थडथडवीत ती पान्तावण्याच्या जाळाशीं जाऊन बसली. हातापायाच्या पसाऱ्याला अंगापोटाशीं दडवून अंग गरम करूं लागली. शेकूं लागली. तिच्या सर्वांगावरून पाण्याचे थेंब निथळत होते. पावसाचा मारा संपल्यावर छपरावरून निथळावेत तसे.

पंचीला असं पाहून गीतानं तिच्या ओल्या पाठींत एक रट्टा हाणला. केस ओढून उभी केली. हातांतलं, नेहमीं स्वतः नेसत असलेलं लुगडं पंचीभोंवतीं लपेटलं, शिव्यांच्या व संतापाच्या वर्षावांत लुगड्याची घडी ती पंचीभोंवतीं झांकूं लागली. पोरसवदा पंचीभोंवतीं पोक्तपणा गुंडाळूं लागली. केस विंचरून दिले. वाळण्यासाठीं मोकळे पण पद्धतशीरपणें सोडून दिले. कपाळावर बारीकसं कुंकू लावलं. सरतेशेवटीं तिला घरांत—एका कोपऱ्यांत गुपचुप बसून राहायला सांगितलं. तिथून हललं तर मारण्याच्या धमकीचा कडक पहारा देऊन ठेवला.

कांहीं वेळानं, ठरल्याप्रमाणें शिवराम पाहुण्यांना घेऊन अंगणांत आला. मायला सावधवण्यासाठीं त्याचा जोडा वाजवीपेक्षां जोरानं खडखड करीत होता. त्या वेळीं गीता बाकीच्या लेकरांच्या मदतीनं ओसरींत बिछाईत अंथरीत होती. उणीवा लपविण्याची सावधगिरी घेत होती. शिवरामाचा

जोडा ऐकून जातिरिवाजांतला गोसा पाळण्यासाठीं तिनं तोंडावर हातभर लुगडं ओढून घेतलं अन् आंत गेली. तिच्या मागोमाग शिवरामहि आंत गेला. आपल्या गैरहजेरींत मायच्या अनवधानानं पंचीच्या साफसफाईत कांहीं उणीवा राहिल्या नसल्याची खात्री त्यानं करून घेतली. मग अंगणांतल्या पाहुण्यांच्या काळजीनं बाहेर आला. त्या वेळीं बाहेर उभ्या असलेल्या नवऱ्यामुलाची नजर मुलीचा सुगावा हुंगीत होती. घराअंगणाच्या कोनाकोपऱ्यांत तिच्या अस्तित्वाचा मागमूस हुडकीत होती. त्याची नजर ध्यानांत घेऊन-चेहऱ्यावर अतिलाचारी पघळवीत शिवराम त्याला म्हणाला,

"काय पायता नामदेवराव—आमच्या गरिबाच्या झोपड्याकडे! हें काई तुमच्या घरावानी, धाब्याचं नाई. आये आपलं तनामनाचं!"

यावर नामदेवऐवजीं त्याच्या पिकल्या केसांचा सोबती म्हणाला,

"बाप्पा, आमाले घरासंग लग्न करा लागते काय जी मून आमी घराकडे पाऊं—आमाले आमच्या वस्तूसीं गरज. थे आमच्या मनाजोक्ती असल्यावर कां घर चांगलं नाई मून आमी सोयरीक तोडून टाकूं असं तुमाले वाटते काय मनाव् लेक्?"

या मुरब्बी बोलण्यांत विनोद नसतांहि शिवराम अनावश्यक जोरानं हंसला. दुसऱ्याच क्षणीं त्याचा चेहरा पडला. किंचित्सा काळवंडलाहि. नंतर त्यानं मोठ्या धैर्यानं अंगणांतल्या पाहुण्यांना ओसरींत आणलं. जाजमावर बसवलं. आतां येतोसं सांगून तो आंत गेला.

त्या वेळीं गीता पंचीला पढवीत होती. तिच्या हातांत गडवे प्याले देण्याचा प्रयत्न करीत होती—पण ती हातहि लांबवीत नव्हती, मग हातांत भांडीं घेणं दूरच राहो. तिचं तोंड फुरंगटलं होतं. गालांवर डोळ्यांतल्या धारा ओघळत होत्या. गीता दबक्या आवाजांत तिला धमकावीत होती; समजावीत होती. बाई-बेटा करून कुरवाळून बघत होती. पण पंची बघत नव्हती. मारण्याच्या धाकानं सूर काढीत नव्हती—पण म्हणत मात्र होती,

"मी नाई नेतओ!"

शिवरामनंहि भावनांवर संयमाचं झांकण दाबून मायला मदत केली. पंचीला समजावून सांगितलं, सरतेशेवटीं स्वतांच गडवेप्याले घेऊन तो

पाहुण्यांपुढं आला. दुसऱ्यांदां पानसुपारीचं आणलं. त्याच्या प्रत्येक खेपे-बरोबर पाहुण्यांचे डोळे आंत ये-जा करीत होते. दारांत खुसपुसणाऱ्या चाहुलीकडे मोठ्या अपेक्षेनं टवकारत होते व प्रत्येक वेळीं त्यांची अपेक्षा ठोकरावत होती.

बराच वेळ झाल्यावर न राहवून पण आडपडद्यानं पिकल्या केसांचा पाहुणा शिवरामला म्हणाला,

" शिवरामपंत, तुमी बसा ना आमच्यापार्शी—तुमी जर असे अंदर-बाहीर करत रायले, त आमच्यासांगच्या पावन्याइनं कोनासंग बोलाव् लेक् ! "

" हो. थेई खरीच आये लेक् ! "

शिवराम अत्यंत दुबळं हंसूंनं पण तरीहि आंत जातांना म्हणाला,

" आतां येतोंच. मंग करूं आफून गोठा—"

आणि तो आवेशपूर्ण चालीनं आंत गेला.

पाहुण्यांची पानसुपारी आटोपली. तोंड हलूं लागलीं. हळूहळू सुस्कारे सुटूं लागले. लांब श्वास घेतले जाऊं लागले. मांड्या, बैठका बदलण्याचीहि वेळ आली, तेव्हां कुठं शिवरामनं दारांतून तोंड काढलं. त्याचं तोंड कमालीचं उजळलं होतं. चालींतहि चैतन्य होतं. धोतराचे दोन्ही पंखे दुमडून म्हाताऱ्याशेजारीं बसतांना आपणहूनच म्हणाला,

" पोरगी सेजारीं गेली होती. तिले बल्वाले धाडलं होतं..."

म्हाताऱ्याच्या चेहऱ्यावरचा संशय उडाला. तरुणाच्या चेहऱ्यावर उत्सुकतेंत मिसळलेलं समाधान तळपलं. मनें मोकळीं झालीं. त्यामुळं इकडल्या तिकडल्या गांवगप्पा झाल्या. त्यांतून लक्ष काढून शिवराम उजागरीनं ओरडला,

" मा, पंचीलेच धाडजो च्या घेऊन..."

आंतून उत्तरच आलं नाहीं.

तिकडे पाहुण्यांचं ध्यान वळूं नये म्हणून शिवरामनं पुन्हा पावसापाण्याचं बोलणं सुरू केलं. त्यांत लक्ष नसलेले पाहुण्यांचे डोळे दाराच्या चौकटी-भोंवतीं सूक्ष्म पहारा करीत होते.

शेवटीं दारांत चाहूल आली. तिनं शिवरामपासून सर्वांच्या चेहऱ्यावर समाधान परतवलं. पण प्रत्यक्ष कपबशा घेऊन डोकावली गीताच. तिची हातभऱ्या सेवानं झांकलेली चर्या काव लपविण्याची पराकाष्ठा करीत होती. तिच्याकडे पाहून तरुणानं लांबसा सुस्कारा टाकल्याचं जाणवतांच गैरसमज काढण्यासाठीं शिवराम एकदम म्हणाला,

" मा, पंचीले काबा नाई धाडलंओ ? "

मोठ्या प्रयासानं स्वतःला सावरीत गीता म्हणाली,

" थे लाजून रायली—"

शिवराम नेमकं काय तें समजला. त्याचा चेहरा काळवंडला व नेमकं न समजणारा पिकल्या केसांचा पाहुणा जनरूढीप्रमाणें म्हणाला,

" याच्यांत कायची लाज आली मनाव् ! एक डाव पोरीच्या जल्मांत आल्यावर हें काय कोनाले चुकलं आये काय लेक् ! "

" काजीनं काबा ! "

शिवरामनं त्यांतहि समाधान दाखवलं. घाईघाईनं चहा घेतला. पाहुण्यांसमोर पानाचं सरकावतांना म्हणाला,

आंतून आल्यावर पाहुण्यांना दिलासा देऊं लागला,

" येते, आतां येतो मंते—थे. "

पुन्हा पाहुण्यांची उत्सुकतेनं माखलेली दृष्टि दाराच्या चौकटीभोंवतीं भिरभिरूं लागली. कान चाहूल हुंगूं लागले. वेळ होऊं लागला. तसतशी शिवरामच्या चेहऱ्यावर अस्वस्थता जमूं लागली. संताप चढूं लागला. निराशा झाकळूं लागली. पाहुण्यांना तोंड दाखविणं अशक्य होऊं लागलं. शरमेनं तो अर्धमेल्यासारखा झाला.

तेवढ्यांत आंतून कुणी ढकलून दिल्यासारखी पंची दारांत अवतरली. तिच्या वीतभऱ्या अंगाभोंवतीं सोळा हातांचं लुगडं दुहेरी करून नेसवलं गेलं होतं. त्यामुळें भलभलत्या ठिकाणीं त्या लुगड्याचे भोकसे दिसत होते. अंगांत नवं कोरं—पण तिच्यापेक्षां तिपटीनं मोठ्या अंगाचं जंपर होतं. त्याच्या बाह्यांना व गळ्यांच्या छिद्रांना पिना लावून लहानवलं होतं. उरलेलं जंपर नेसण्यांत दाबल्यानं त्याची लांबी दिसत नव्हती. मुंगीच्या

पायानं ती चालत होती. तिचं अंग लटलटत होतं. डोळ्यतूनां पाणी वाहत होतं. नाक सतत फुरफुरत होतं. एका हातानं लुगड्याचा पदर कसाबसा धरून ठेवला होता. तिचे तिरकस डोळे शिवरामवर होते. हत्तीनं माहुताकडे किंवा वाघानं रिंगमास्टरकडे ठेवावेत तसे. पंचीला पाहून पिकल्या केसांखालच्या डोक्यांत अपेक्षेपेक्षां वेगळंच कांहीं तरी घुसलं त्याच सुरांत तो तिला केवळ म्हणावं म्हणून म्हणाला,

" ये. असी बस बटा."

ऐकतांच ती बसली तर नाहींच, पण तिचं अंग जाणवण्याइतकं थरथरूं लागलं. चालणं बंद झालं. सारं कांहीं ओळखून म्हातारा म्हणाला,

" भेवूं नोको बटा. तुले कोनी काई म्हणत नाई ! "

असं आणखी दोन-चारदां झालं तरीहि पंची जागची हलेना. अंगाची थरथर मात्र सतत वाढूं लागली. या वेळीं सहज म्हणून शिवरामनं तरुणाकडे पाहिलं. त्याचा चेहरा निश्चयी होता. केवळ रिकामपणचा चाळा म्हणून तो हातांतल्या अडकित्त्याला गरगरवीत होता. त्याची वागणूक बोंचवून घेत शिवरामनं पंचीला शक्य तितक्या सौम्यपणानं म्हणलं,

" बस मंते थे त आयकू नाई येत का ? "

तरुणच म्हणाला,

" राऊं द्या—राऊं द्या. उभं रायलं त काय बिघडते..."

आतां पंचीचा नाद सोडून म्हातारा शिवरामला विचारूं लागला,
" काओ, तुमी पोरीचं वय काय सांगितलं होतं ? "

तो चांचपडत म्हणाला,

" सतरा-अठरा...सांगितलं वाटते..."

म्हाताऱ्यानं पंचीकडे पाहिलं अन् बोलण्यासाठीं आवेश घेतला. तितक्यांत दाराआडची चाहूल प्रगटली. बैठकींत येतांना गीता म्हणाली,

" सतरा-अठरा त्यानं चुकून सांगितलं असन—त्याले नक्की काय माहीत—पंधरा-सोया असन तिची उंबर—"

" त्याईनं एक चुकून सांगितलं असन..." म्हातारा सरळ सरळ गीतालाच म्हणाला, " पन तुमी तरी खरं सांगतां काय ? "

" त्याच्यांतहि आमी खोटं बोलत असन काय लेक्—" गीतानं मोठ्या चातुर्यानं बाजू धरली, " आतां थें लेकरू आमच्यासांगड्या गरीबाच्या घरांत आये मून खान्यापेन्यानं कँडलं आहे. आन् तुमच्यासांगड्या खात्यापेत्या घरांत अस्तं त येद्धायून डोक्सावर पानी पडलं अस्तं ! "

म्हातारा कांहींच बोलला नाहीं. मायचं सांगणं अपुरं राहिलं म्हणून आतां तें शिवराम सांगूं लागला,

" आन् आतांई पायजा कदींका—इस्वराच्या क्रिपेनं एक डाव तिच्या अंगावर का कयसाचं पानी पडलं त कसी दिस्ते मून—"

" आलं ध्यानांत—"

म्हणतांना आपली कांहीं चूक झाली कीं काय हें ताडून पाहण्याच्या निमित्तानं म्हाताऱ्यानं पुन्हा पंचीकडे पाहिलं. खालून वरपर्यंत न्याहाळत विचारलं, " तुहं नांव काय आये, बटा ? "

पंची बोलली नाहीं. तिची थांबलेली थरथर पुन्हा सुरू झाली. म्हाताऱ्याचे तीन आवाज फुकट गेल्यावर गीताकडून राहवलं नाहीं,

" त बोलांलेई काई जाते घुमल्यावानाचे !..."

यावर न राहवून तरुण म्हणाला, " राऊं द्या-राऊं द्या—"

मग म्हाताऱ्याला म्हणाला,

" हं—तात्याजी, टाका काय द्याचं असन थे देऊन आन् आटपा लौकर ! "

तसा म्हाताऱ्यानं खिशांतून रुपया काढला. पंचीला दिला. तोंवर तरुणाची सर्व तयारी झाली होती. शिवरामला म्हणत होता,

" बरं शिवरामजी, चालतों आमी— "

" ऑ ? जेवून जात होते कायना तुमी..."

" मन्लं होतं. पन काम आटोपल्यावर कायले घेतां तरास तुमी सैंपाकापान्याचा. आतां त जावून पोहचूं..."

" तुमची मर्जी—" म्हणतांना शिवराम त्यांच्या सोबत बाहेर पडला. त्यांना खासरांत बसवून ' रामराम ' नाहीं घेत तर लांबलांब ढांगा

टाकीत घरांत आला. त्या वेळीं गीता पंचीवर दांत-ओठ चावून म्हणत होती,

" काओ मस्न्यावानाचे—तुले का तिथं कोनी खावून रायलं होतं का त—"

हें ऐकून मायपेक्षां चौताळून–ओरडून शिवराम पंचीवर गरजला,

" मार भोसडीच्या कंब्ल्यांत एक लात आन् हाकल खालीले घराच्या भाईर ! माह्या नज्रीपुढं नोको ठेवूं......"

* * *

सत्यकथा, मार्च

अनुक्रम २००३५
विभाग बा.वा
क्रमांक १८०
नों. दि. 3-८-६१
वाचनालय शाखा

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ६९९९ नों. दि ..........
वि. बा. वा. क्र. ..........

IRBK-0106999
IRBK-0106999